सदाचार-चिंतनं..

डॉ. गजानन श्रीप

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. 3935

भाग ३ रा

REFBK-0024795

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे 30

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

7 SEP 1986

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

संपर्क जिंदा
3934
3248
अगाद

सदाचार चिंतनी

तिसरा भाग

व्यवहाराच्या अनुभवावरील
चिंतनातून जन्मलेले विचार

REFBK-0024795

चिंतनिक
डॉ. गजानन श्रीपत खैर

मूल्य दहा रुपये फक्त

पुणे विद्यार्थी गृह
प्रकाशन पुष्प ३०

प्रकाशक

प. भ. कुलकर्णी

एम्. एस्सी./इंजि./एफ्.टेक्./लंडन.

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनाकरिता
१७८६ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

© प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ती ११ सप्टेंबर १९७२ गणेश चतुर्थी (१८९४)
पुनर्मुद्रण १ ले ऑक्टोबर १९७८
पुनर्मुद्रण २ रे ऑक्टोबर १९८२ (विजयादशमी)

मुद्रक

म. द. कश्यप एम्. ए.

महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना
१७८६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

अनुक्रमणिका

	पन्नास वर्षे सेवा व पन्नास हजार संचयदान	प्रारंभी
१.	तुम्हीही संशोधक व्हाल	१
२.	आपला धर्म व इतरांचा	३
३.	आजचा तरुण, उद्याचा बँक-नंबर	५
४.	दोघेही बरोबर, तरी वाद !	७
५.	खरे, खोटे ओळखण्याची सवय	९
६.	स्वभावाचा जमाखर्च पुरा करा	१०
७.	भाषाशुद्धीचा नवा अर्थ	१२
८.	सत्कृत्यालाही प्रसिद्धी लागते	१४
९.	मुक्या माणसांचे प्रकार	१६
१०.	अनीतीविरुद्ध मोहीम	१८
११.	मद्यपानाला प्रतिष्ठा देऊ नका	२०
१२.	अभ्यासाचा आराखडा–मुलांचा व तुमचा	२२
१३.	जुन्या–नव्या पिढीतील संघर्ष	२४
१४.	पेंढा भरलेली माणसे	२६
१५.	नवे संसार व सांसारिक	२८
१६.	इंटरक्लासची हकालपट्टी	३०
१७.	दिवाळीतला मूड	३२
१८.	भोगी, त्यागी व योगी	३३
१९.	आ वासून नुसते कौतुक करू नका	३५
२०.	अत्याचाराची चटक लागते	३६
२१.	अस्मानी, सुलतानी, इन्सानी–अन् हिंमत	३८
२२.	मनाचा मालक का गुलाम ?	३९
२३.	बालजीवनातील स्मृतींचा आनंद	४१
२४.	पैसा आणि वेळ यांचे नियोजन	४३
२५.	आत्मज्ञानाचा सोपा प्रकार	४५
२६.	कालचा विद्यार्थी–आणि आजचा	४८
२७.	सेफ्टी रेझरही जपून वापरा	४९
२८.	अपुरे दर्शन	५१
२९.	सदसद्विवेकबुद्धीचा पडदा	५४
३०.	मी मी मी ! काय हा अहंकार !	५५
३१.	भावना बोथट होत चालल्या !	५७

३२.	सत्य व अहिंसा चिरंतन राहोत	५९
३३.	गृहकलह—सभ्य आणि असभ्य	६१
३४.	रामशास्त्री अमर आहेत	६२
३५.	संस्कारभावेचा लोप	६४
३६.	या धर्मभावना की अंधश्रद्धा ?	६६
३७.	जनतेला झुलवणारे आणि शिकवणारे	६८
३८.	ब्रेक भक्कम तर ड्रायव्हिंगचा आनंद	७०
३९.	शिवबांचा वारसा—चारित्र्य व स्वार्थत्याग	७२
४०.	देवदेवतांची उपपत्ती शोधा	७३
४१.	गृहिणींना केवढी संधी आहे !	७५
४२.	तुमच्या तसबिरीला मुले हार घालतील !	७७
४३.	सार्वजनिक भाषणांची किंमत	७९
४४.	डॅडी, गीता म्हणजे काय ?	८१
४५.	भारताचा तिबेट किंवा चेको होणार काय ?	८३
४६.	ग्रंथसंग्रहावरून आपली बौद्धिक पातळी कळते	८५
४७.	लोकशाहीवर उमेदवारांची श्रद्धा आहे का ?	८७
४८.	मुले होतात पण ज्ञान मिळवावे लागते	८८
४९.	बायकोचे पातळ धुवाल का ?	९०
५०.	तत्त्वज्ञान चांगले, अनुयायी मूर्ख	९२
५१.	वेळेवर ब्रेक लावा	९३
५२.	निष्कारण गैरसमज	९५
५३.	कौटुंबिक संध्येचा प्रयोग	९६
५४.	नवे युग, नवे रोग—जुने उपाय	९८
५५.	चारित्र्यावर संक्रांत	१००
५६.	युद्धकाळाची शिकवण विसरू नका	१०२
५७.	हिला म्हणतात मॉडर्न गर्ल !	१०३
५८.	लोकशाही का हुकूमशाही ? धडा घ्या	१०६
५९.	सुखातही दुःखी होणारे जीव	१०८
६०.	धर्मप्रेम इष्ट, धर्मवेड घातक	११०
६१.	सात्त्विक आणि उदात्त—लिहा व वाचा	१११
६२.	चंद्रावरचा दगड आम्ही पाहिला !	११३
६३.	सुंदर चेहेरा हवा ना ?	११४
६४.	स्वर्ग-नरकाच्या नक्की जागा	११६

★ ★

डॉ. ग. श्री. (अण्णासाहेब) खैर यांची

पन्नास वर्षे सेवा व पन्नास हजार संचयदान

डॉ. गं. श्री. कोशे

गुरु. अण्णांनी त्यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवशी एक छोटा कौटुंबिक कार्यक्रम करून, अनाथ विद्यार्थी गृहात गेली सुमारे ५० वर्षे स्वार्थत्यागपूर्वक सेवा करीत असताना पै-पैसा मिळवून जो काही संचय केला, तो सर्व संस्थेला अर्पण करण्याचा संकल्प संस्थेच्या सर्व कार्यकर्त्यांना साक्षी ठेवून सोडला. दि. १ जून १९६९ ला हीरक-महोत्सवाच्या शुभदिनी त्यांनी आपला संकल्प पूर्ण केला.

१९२० साली गुरु. अण्णा अनाथ विद्यार्थी गृहाचे आजीव सेवक झाले. प्रथम २५ वर्षांची सेवा करून त्यांनी पहिला संकल्प पूर्ण केला आणि आता ही ४९ वर्षे, म्हणजे जवळ जवळ ५० वर्षे पुरी होत असतानाच, जसे तन-मन-धन हे आजपर्यंत संस्थेला दिले तसे जवळचे संचित देऊन ते आता ऋणमुक्त होत आहेत.

अनाथ विद्यार्थी गृहाचा एक निष्ठावंत आजीव सेवक संस्थेला ५०,००० रुपये देतो असे ऐकल्यानंतर स्वाभाविकपणे लोकांच्या मनात शंका येते की, हे पैसे याने आणले कोठून ? कोणी उघड बोलतील, कोणी बोलणार नाहीत. पण मनात विचार आल्यावाचून राहाणार नाही. तसा विचार कोणाच्या मनात आला तर गुरु. अण्णा त्यांना दोषही देत नाहीत; कारण अशी शंका मनात निर्माण व्हावी असे वातावरण आज सर्वत्र आहे. नदीचेच पाणी घेऊन नदीलाच अर्घ्य दिल्यासारखे तर केले नाही ना ? म्हणून शंका-निवृत्तीकरता काही खुलासा करणे अप्रस्तुत होणार नाही. गुरु. अण्णांनी एतद्विषयक आपली भूमिका कार्यकर्त्यांजवळ वेळोवेळी व्यक्त केलेली आहे. हे करीत असताना त्यांचा प्रसिद्धीचा किंवा अहंकाराचा प्रश्न नाही हे उघड आहे. त्यांच्या दृष्टीने हा प्रश्न सरळ हिशेबाचा आहे; आणि सार्वजनिक कार्यकर्त्याने आपले हे हिशेब समाजासमोर निर्भयपणाने मांडले पाहिजेत असे त्यांचे म्हणणे आहे.

१९६० साली त्यांनी एक लहान घर बांधले. मित्रमंडळींना जलपानास बोलाविले. मीही त्यात होतो. प्रवेशद्वारापाशीच एक फळा ठेवून त्यावर घराला खर्च किती आला व तो पैसा कोठून आणला याचा तपशील लिहून निमंत्रितांच्या संभाव्य शंकेचे निरसन त्यांनी आधीच करून टाकले. तेव्हापासून या प्रश्नावर गुरु. अण्णांचे जे जे विचार आम्हा कार्यकर्त्यांना ऐकावयास मिळाले त्यांच्या आधारावर त्यांची संचयदान ही काय कल्पना आहे हे विषद करण्याचा हा प्रयत्न आहे.

कॉलेजपूर्वी दोन वर्षे व कॉलेजची चार वर्षे अशी सहा वर्षे संस्थेत शिक्षण

घेऊन गुरु. अण्णा पदवीधर झाले, आणि पहिले आजीव सेवक म्हणून १९२० मध्ये संस्थेत कामाला लागले. त्या काळी वेतन देण्यासारखी संस्थेची स्थिती नव्हती, म्हणून निर्वाहापुरते अन्न-आच्छादन घेण्याची तयारी ठेवून ते कामाला लागले. पहिली १२ वर्षे जरूर ते धान्य आणि आवश्यक कपडे एवढेच काय ते त्यांनी संस्थेकडून घेतले. नंतर ५० रुपये वेतन व दरवर्षी एक रुपया वाढ अशी वेतनश्रेणी सुरू झाली. अशी एकूण २५ वर्षे गेली. या काळात ग्रंथलेखन व विद्यापीठीय परीक्षा यांतून मिळणारी खाजगी प्राप्तीही त्यांनी संस्थेकडेच जमा केली. आजीव सेवकांवर त्यावेळी तसे बंधनच होते. २५ वर्षांच्या सेवेनंतर हे बंधन थोडे सैल केले गेले व खाजगी प्राप्ती आजीव सेवकांना स्वतःसाठी ठेवण्याची परवानगी मिळाली. म्हणून त्यानंतरच्या काळात सुट्टीच्या व सवडीच्या वेळेचा सदुपयोग करून वाणीचे व लेखणीचे जे जे बौद्धिक व्यवसाय गुरु. अण्णांनी केले त्यातून हा निधिसंचय झाला.

संस्थेत १२ वर्षे शैक्षणिक सेवा केल्यानंतर १९३१ ते १९३३ या काळात गुरु. अण्णांनी अमेरिकेत शिक्षण घेतले आणि तुलनात्मक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाकरिता अमेरिका, युरोप, जपान इ. देशांत ते फिरले. तुलनात्मक शिक्षण हा त्यांचा सवडीचा, आवडीचा आणि अभ्यासाचा व लेखनाचा विषय होता. विश्वविद्यालयात "मास्टर ऑफ एज्युकेशन" चा अभ्यासक्रम आल्यावर त्यातील "कम्पॅरेटिव्ह एज्युकेशन" या विषयाचे प्राध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पुणे, मुंबई, कर्नाटक, बडोदा, नागपूर, मराठवाडा, कोल्हापूर अशा अनेक विद्यापीठांतून कोठे सुट्टीतील अध्यापनाचे, तर कोठे परीक्षकाचे अशी कामे त्यांना मिळत गेली. प्रारंभी या विषयाचे ते एकमेव प्राध्यापक होते, त्यामुळे सर्व विद्यापीठांशी या विषयाच्या अध्यापनाच्या निमित्ताने त्यांचा संबंध आला. त्याचा त्यांना आर्थिक फायदा झाला. त्यांच्या संचयात या प्राप्तीचा मोठा वाटा आहे.

"नवभारत वाचनमाला" भाग १, २ व ३ ही मराठी भाषेतील क्रमिक पुस्तके डॉ. खैर, प्रिं. छापेकर आणि प्रिं. फाटक यांनी संपादन केली व अ. वि. गृहाने ती प्रकाशित केली. संपादक म्हणून या पुस्तकातून मिळणाऱ्या प्राप्तीचा मोठा वाटा त्यांच्या संचय-निधीत आहे.

१९५२ ते १९५८ अशी सहा वर्षे गुरु. अण्णा विधान परिषदेचे (लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे) सभासद होते. या सभासदत्वाचे त्यांना मानधन मिळत असे. याशिवाय इतर काही ग्रंथ, वृत्तपत्र व मासिके यांमध्ये केलेले लेखन, रेडिओवरील भाषणे इ. मार्गांनी झालेली प्राप्तीही त्यांनी संचित केली. या सर्व जमेचा हिशेब वेळोवेळी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना सांगितलेला आहे. संस्थेत येणाऱ्या देणग्या गुरु. अण्णांच्या हातात कधीच आल्या नाहीत. एवढेच नव्हे तर देणग्यांच्या जमाखर्चाशी त्यांचा संबंधही नव्हता. संस्थेचे आणि गुरु. अण्णांचे ऑडिटर्स मे.

गद्रे व भिडे हेच आहेत ही गोष्ट या संदर्भात लक्षात आणून देण्यासारखी आहे. "Caesar's wife should be above suspicion". "श्रेष्ठांचे वर्तन संशयातीत असावे", ही वैचारिक आणि नैतिक परंपरा भावी कार्यकर्त्यांत निर्माण व्हावी हा गुरु. अण्णांचा प्रांजल प्रयत्न त्यांच्या या संचयदानात स्पष्टपणे दिसून येतो.

संस्थेत येण्यापूर्वी घरच्या परिस्थितीमुळे, नंतर संस्थेत मिळालेल्या संस्कारांमुळे आणि पुढे विचारपूर्वक स्वीकारलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळे अण्णांची रहाणी प्रारंभापासून साधी आणि काटकसरीची बनलेली आहे. निर्व्यसनतेची देणगी संस्थेने त्यांना दिली आहे असे ते म्हणतात. त्यांच्या आचारविचारांचा प्रभाव त्यांच्या कुटुंबियांवरही झाला आणि त्यांच्या पत्नी, मुले, मुली ही सुद्धा त्यांच्या जीवनपद्धतीशी स्वखुशीने एकरूप झाली. मुलामुलींचे शिक्षण आणि विवाह या सर्व जबाबदाऱ्या पार पाडूनही एका विशिष्ट उद्देशाने व प्रेरणेने ते हा संचय करू शकले. "थेंबे थेंबे तळे साचे" म्हणतात. अगदी अक्षरशः तसा अण्णांचा हा संचय आहे. जेथे पायी जाणे शक्य तेथे अण्णा बसने कधी गेले नाहीत; जेथे बसने जाणे शक्य तेथे रिक्षा व टॅक्सी त्यांनी वापरली नाही. उंची कपड्यांची आणि अलंकारांची हाव त्यांच्या कुटुंबियांनी कधीच धरली नाही. त्यामुळे त्यांच्या या संचयात त्यांच्या कष्टाचा, लेखणीचा आणि वाणीचा जसा भाग आहे तसा त्यांच्या साध्या व निर्लेप रहाणीशी समरस झालेल्या त्यांच्या कुटुंबियांचाही भाग आहे, याचा गुरु. अण्णा कृतज्ञतेने उल्लेख करतात.

त्यांच्या सार्वजनिक जीवनाशी समरस होऊन त्यांना साथ करणाऱ्या त्यांच्या पत्नी सौ. यमुताई यांचा उल्लेख अत्यंत कृतज्ञतेने करणे जरूर आहे. केवळ निर्वाहापुरते अन्न-आच्छादन घेऊन अण्णा संस्थेत आजीव सेवा करणार आहेत असे ऐकल्यानंतर वरसंशोधनार्थ त्यांच्याकडे आलेले मुलींचे बाप पुन्हा परत आले नाहीत, आणि जे आले ते मुलींचे फोटो परत नेण्याकरता ! अशा स्थितीत सौ. ताई त्यांच्या जीवनात आल्या आणि आपल्या आनंदी, कष्टाळू, मनमिळावू व सेवा-त्यागवृत्तीने गरिबी संसारात समरस झाल्या. त्यांनी किंवा मुलींनी कधी दागिन्यांची मागणी केली नाही की कधी उंची कपड्यालत्त्यांचा हट्ट धरला नाही. महिना ५० ते ७५ रुपये वेतन असताना जी रहाणी शक्य होती तिच्यात सर्व कुटुंबियांनी समाधान मानले व ते शेवटपर्यंत टिकविले. मुख्य म्हणजे संचयदानाचा संकल्प सोडण्यापूर्वी अण्णांनी सौ. ताईंची व चि. भास्करची संमती मिळविली होती हे विशेष. त्यांचा मुलगा चि. भास्कर याचीही या दानास संमती आहे. गुरु. अण्णांच्या गीतेतील तत्त्वज्ञान चिंतनाचा परिणाम म्हणून की काय चि. भास्करच्या अंतःकरणाची घडण लहानपणापासूनच एखाद्या स्थितप्रज्ञासारखी आहे. 'लाभालाभौ जयाजयौ' समान मानण्याची त्याची वृत्ती ही वडिलार्जित असावी. हे सर्व

सांगण्याचा हेतू हा की अण्णांच्या संचयदानाचे श्रेय ते स्वत:कडे संपूर्णपणे घेत नाहीत. त्यांच्या कुटुंबियांची काटकसर, साधी राहाणी, समाधान आणि एकरूपता या संचयामागे आहे.

द्रव्यसंपादन, द्रव्यसंचय आणि द्रव्यदान या बाबतींत आपल्या समाजामध्ये गेल्या ५० वर्षांत कसे परिवर्तन झाले आहे ते पाहाण्यासारखे आहे. १९२० ते १९४५ हा पंचवीस वर्षांचा काळ आणि १९४५ ते ७० हा २५ वर्षांचा काळ यात फार अंतर आहे. पहिला कालखंड हा स्वातंत्र्यप्राप्तीचा असल्याने सेवा, त्याग व साधेपणा या गुणांना महत्त्व आले होते. म. गांधी हे त्या गुणांचा परमोच्च बिंदू होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात या गुणांना गौणत्व येऊन सत्ता, संपत्ती, संचय आणि भोग या प्रवृत्तींची अमर्याद वाढ होऊ लागली. या वाढीला भरपूर संधी व वावही उपलब्ध झालेला आहे. समाजप्रगतीच्या इतिहासात असे नेहमी होते. लंबक एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे जातो, तसा तो त्यागाकडून भोगाकडे, सेवेकडून सत्तेकडे, दानापासून संचयाकडे झुकलेला आहे. त्याला मध्यावर आणणे हे आपल्या पिढीचे कार्य आहे. त्यामुळे दोन्ही कालखंडांतील प्रवृत्तींचा समन्वय होईल. 'त्याग आणि भोग, सत्ता आणि सेवा, संचय आणि दान या गोष्टी एकत्र नांदू शकतात' हे उदाहरणाने दाखविले पाहिजे अशी गुरु. अण्णांची धारणा आहे. भारतीय परंपरेचा प्राचीन कालापासून चालत आलेला आदर्श हाच नाही काय ? ईशावास्य उपनिषद् म्हणते—"तेन त्यक्तेन भुञ्जीथा:, मा गृध:, कस्य स्विद्धनम् ?" त्यागवृत्तीने भोग घ्या, अभिलाषा बाळगू नका. कारण द्रव्य कोणाचे आहे ?

"यज्जुहोषि यदश्नासि यद्ददासि दिने दिने ।
तत्ते वित्तमहं मन्ये शेषं कस्यापि रक्षसि ।।"

देवधर्म, संसार आणि दान यात खर्च झालेले द्रव्य तुझे. बाकीचे दुसऱ्याच्या मालकीचे. तू फक्त रखवालदार. शिवाजी महाराजांनी राज्य मिळविले आणि रामदासांच्या झोळीत टाकून त्याचे दान केले. पौराणिक व ऐतिहासिक कालात सुद्धा असे अनेक राजे होऊन गेले की ज्यांनी आपली सर्व संपत्ती समाजात वाटून टाकली व स्वत: अकिंचन झाले. प्राचीन कालच्या समाजवादाची व संपत्तीच्या विकेंद्रीकरणाची ही उदाहरणे आहेत. "मिळवा आणि द्या," "संचय करा पण संचय-दान करून ते सार्थकी लावा" या संप्रदायाचा प्रसार व्हावा अशी गुरु. अण्णांची मनीषा आहे. अण्णांची पिढी काय करू शकते हे त्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून अण्णांनी करून दाखविले आहे. या प्रथेचा प्रसार व्हावा, प्रचार व्हावा आणि जनतेत तिला अनेक उदाहरणांनी प्रतिसाद मिळावा, यासाठी या प्रथेला प्रसिद्धी मिळावी, ही अण्णांची तळमळ आहे. अनेकांच्या अंत:करणात या विचारबीजाचे आरोपण झाले तर समाजातल्या कितीतरी कार्याकुरांचे विशाल वृक्ष होतील. सध्याच्या

संचयतृष्णेवर व भोगवृत्तीवर हा एक उत्तम उपाय आहे असे त्यांना वाटते. कारण यात दोन्ही प्रवृत्तींचे समाधान होते आणि समन्वय साधला जातो. "मिळवावे, साचवावे, भोगावे आणि द्यावे; भोगाची त्यागाशी सांगड घालावी." हे नवे तत्त्वज्ञान आचरणात आणले तर संचयवृत्तीला सामाजिक कल्याणाचा ध्येयवाद मिळेल.

अनाथ विद्यार्थी गृहाच्या सेवेला मनःपूर्वक सारे आयुष्य वाहून सुद्धा गुरु. अण्णा द्रव्यप्राप्ती व संचय कणाकणाने आणि स्वतःच्या बौद्धिक शक्तीच्या सदुपयोगाने करू शकले हे एक अपवादात्मक उदाहरण आहे, किंबहुना 'तो एक योगायोग आहे' असे ते म्हणतात. अशी संधी सर्वांनाच मिळते असे नाही.

बालपणी वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षापासून हातात मधुकरीची झोळी घेऊन याच शहरात व याच सदाशिव पेठेत गुरु. अण्णा दारोदारी हिंडलेले आहेत. 'या शहरातील माता-भगिनींच्या औदार्यावर माझा पिंड वाढला आहे' असे गुरु. अण्णा नेहमी कृतज्ञतेने म्हणतात. या शहरातल्या रस्त्यारस्त्यामधून वर्तमानपत्रे, पंचांगे, नागनरसोबाची चित्रे, स्वदेशी माल, आरत्या-लावण्याची पुस्तके, रविवर्म्याची चित्रे विकून अण्णांनी स्वावलंबन केले आहे. लग्न-मुंजीच्या प्रसंगी हात पुढे करून फी-पुस्तकासाठी दक्षिणा मागितली आहे. त्यांच्या पू. मातोश्रींनी इतरांचे घरी काबाडकष्ट करून त्यांना वाढविले. चांगले कपडे व जेवण मिळावे म्हणून अण्णा नाटक कंपनीत जावयाला निघाले, त्या वेळी "आपल्याला शिक्षण सोडायचे नाही" असा आग्रहपूर्वक कानमंत्र त्यांच्या मातोश्रींनी दिला. डोळ्यांत तेल घालून त्यांच्या वर्तनावर लक्ष ठेवले. त्यांच्या मातोश्रींचे हे ऋण अण्णा कधीही विसरत नाहीत. शेवटी सहा वर्षे अनाथ विद्यार्थी गृहाने त्यांचे पालनपोषण केले. समाजाचे हे सगळे ऋण या संचयदानाच्या निमित्ताने त्यांनी फेडले, इदं न मम असे म्हणून समाजाला परत केले. गुरु. अण्णांनी दिलेल्या या देणगीला **खैर कुलविद्यानिधी** असे नाव असून त्यांच्या हयातीत त्यांच्या निर्वाहाकरता या रकमेच्या व्याजाचा विनियोग व्हावयाचा आहे. त्यानंतर त्याचे पूर्ण देणगीत रूपांतर व्हावयाचे अशी योजना आहे. देणगीच्या विनियोगाच्या अटी त्यांनी अत्यंत लवचिक आणि प्रगतिक्षम ठेवल्या आहेत. नवीन उपक्रम म्हणून त्या त्या काळात ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असेल त्या त्या गोष्टींकरता व्याजाचा उपयोग व्हावा अशी त्यांची इच्छा आहे. शिक्षण, संशोधन, सद्विचार-प्रसार, सदाचार-प्रोत्साहन, गीताप्रचार, इ. गोष्टींचा समावेशही त्यात होऊ शकेल.

गुरु. अण्णांनी स्वार्थत्यागपूर्वक उभी हयात काम करून पै-पैशाने जमा केलेले संचित **'खैर-कुलविद्यानिधी' या रूपाने संस्थेला दान केले. यासाठी त्यांच्याबद्दल दुसरे कृतज्ञतेचे व कौतुकाचे उद्गार काढून भागणार नाही.** त्यांच्या स्वार्थत्यागाची

बरोबरी सर्वांनी केली पाहिजे असाही कोणाचा आग्रह नाही. पण एक गोष्ट खरी की **केवळ शब्दाने आभार मानण्यापेक्षा अधिक काही तरी त्यांच्या विद्यार्थ्यांनी व चाहत्यांनी करावे इतके त्यांचे हे दातृत्व मोठे आहे.** संचयदानाच्या या परंपरेचा त्यांनी यथाशक्य प्रसार करावा.

कै. गुरु. दादासाहेब केतकर हयात असताना त्यांचा प्रमुख सहकारी म्हणून ३० वर्षे व १९५० सालापासून त्यांच्या निधनानंतर संस्थेचा अध्यक्ष म्हणून २० वर्षे त्यांनी जबाबदारीची धुरा पत्करली. एकाच संस्थेत निष्ठेने व सातत्याने पन्नास वर्षे त्यांनी सेवा केली आहे. संस्थेच्या कामाबरोबरच बाहेरचे व्यापक शैक्षणिक कार्य, ग्रंथलेखन, संशोधन इ. कामेही त्यांनी केली आहेत. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केवळ त्यांचे सहकारीच नव्हेत तर साऱ्या महाराष्ट्रातील किंबहुना भारतातील शिक्षणतज्ज्ञ मीठचा आदराने व कौतुकाने करतात.

१५।६।७३ ला गुरु. अण्णांच्या वयाला पंचाहत्तर वर्षे पूर्ण होतील. तथापि त्यांचे शरीर व त्यांची बुद्धी यांच्यात अद्याप शैथिल्य आलेले नाही. यापुढील आयुष्य अधिक वाचन, चिंतन आणि लेखन यांमध्ये घालवावे अशी त्यांची इच्छा आहे. यासाठी अधिक स्वातंत्र्य मिळावे म्हणून संस्थेच्या अध्यक्षपदाच्या व आजीव सभासदत्वाच्या जबाबदारीतून ते निवृत्त झाले आहेत. परंतु संस्थेशी असलेल्या त्यांच्या संबंधात फारसा फरक पडलेला नाही. संस्थेच्या जीवनात निर्माण होणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या विचार-विनिमयात गुरु. अण्णा अनुसंधानक म्हणून सहभागी असतात. अण्णा अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त झाले तरी त्यांच्या सल्ल्याचा लाभ आणि किंमत यत्किंचितही कमी नाही. संस्थेत रोज येण्याचा व कामकाजाशी परिचय ठेवण्याचा त्यांचा क्रम चालू आहे. एका काळी त्यांचेच विद्यार्थी असलेले आणि आज आजीव-सेवक म्हणून काम करीत असलेले त्यांचे सहकारी, ज्येष्ठ आणि कनिष्ठ आजीव सेवक, कार्यक्षमतेने संस्था चालवीत आहेत हे पहाण्यातही एक सात्त्विक आनंद आहे; तो त्यांना अवश्य मिळतो. म्हणून आपण सर्वजण गुरु. अण्णांना असे म्हणू "तुमच्या कामाची व विचारांची परंपरा आम्ही सतत चालू ठेवू."

अण्णा संस्थेच्या कार्यातून सेवानिवृत्त झाले असले तरी समाजाला नैतिक आणि धार्मिक शिक्षण देण्याचे त्यांचे काम चालूच आहे. भगवद्गीतेवर त्यांनी जे मूलगामी संशोधन केले आहे, त्याच्या आधाराने गीतेचा महाराष्ट्रात प्रचार करण्याकरता वाङ्मयाची निर्मिती ते करीत आहेत आणि व्याख्यानाचे दौरेही चालू आहेत. सदाचार चिंतनीतील त्यांचे विचार वाचले म्हणजे गीतातत्त्वज्ञानाच्या दृष्टीने जगातील व्यवहाराकडे कसे पहावे त्याची कल्पना येते. समाजाला नैतिक आणि वैचारिक मार्गदर्शन करण्याकरता त्यांना दीर्घायुष्य व आरोग्य लाभो.

[१५-८-१९७२

सदाचार-चिंतनी

भाग तिसरा



१. तुम्हीही संशोधक व्हाल

आपल्या ऐहिक जीवनात आज अनेक सुखसोयी निर्माण झाल्या आहेत. स्वयंपाकघरात गॅसच्या चुली आल्या. फ्रीज, मिक्सर इ. यंत्रे आली. रेडिओ टेलिव्हिजन इ. करमणुकीची व ज्ञानाची साधने आली. मोटारी, रिक्षा, स्कूटर, विमाने इ. आधुनिक वाहातुकीची साधने आली. सेफ्टी रेझर, फौंटनपेन, बॉलपेन, टेलिफोन, टेलिप्रिंटर अशा अनेक गोष्टी आल्या. कृषिशास्त्रात प्रगती झाल्यामुळे जपानी पद्धतीची भातशेती, अमेरिकन पद्धतीचा संकरित मका व संकरित धान्ये, इटालियन पद्धतीचा द्राक्ष-लागवड, सोयाबीन-उत्पादन इ. गोष्टी आल्या. युद्ध-साहित्यामध्ये मशीनगन्स्, रणगाडे इ. सामग्री आली. सारांश, आपले बाह्य जीवनाचे आधुनिकीकरण मोठ्या झपाट्याने होत आहे असे भासते. तरी पण माझ्या मते अद्याप आधुनिकीकरणात आपण खूप मागासलेले आहोत. जरा सूक्ष्म निरीक्षण करा म्हणजे तुमच्या लक्षात येईल. आपल्या व्यवहारातल्या सर्व क्रिया पहा. जमिनीचा केर काढणे, कपडे धुणे, भांडी घासणे, रस्ते झाडणे, मैला वाहून नेणे, खडी फोडणे, ओझी नेणे, सामुदायिक अन्न शिजवणे अशा किती तरी क्रिया अद्याप पूर्वापार गावठी पद्धतीनेच होत आहेत. त्यांत फारसा बदला झालेला दिसत नाही. याचे कारण काय ?

आजपर्यंत ज्या सुधारणा झाल्या त्या इतर प्रगत देशातील लोकांनी आपले स्वतःचे जीवनमान सुधारण्याकरता केल्या, आणि त्या सुधारणांची आम्ही आपल्या देशात फक्त आयात केली. मूळ संशोधन आम्ही केले नाही. त्यांची यंत्रसामग्री आणि त्यांनी बनविलेल्या प्रक्रिया घेऊन आम्ही वस्तूंचे उत्पादन याच देशात करतो ही बाब त्यातल्या त्यात चांगली आहे. पण मूळ संशोधक दृष्टी व संशोधन आपले नाही ही गोष्ट आपण लक्षात ठेवायला पाहिजे आणि त्याबद्दल खंत वाटून, ही परिस्थिती बदलली पाहिजे.

भारतातील संशोधकांनी शोध लावून जीवन सुधारण्याच्या काही वस्तू शोधून काढल्या आणि त्यांचा इतर देशात प्रसार झाला असे व्हायला पाहिजे. संशोधन क्षेत्रात आपण त्यांच्या बरोबरीला येऊन त्यांच्या पुढेही जाऊ शकू अशी महत्त्वाकांक्षा आपल्या वैचारिक वातावरणात निर्माण झाली पाहिजे. सिनेमाच्या व्यवसायातील मिररस्क्रीनचा शोध भारतीय संशोधकाने लावला, तसे अनेक क्षेत्रांत व्हायला पाहिजे.

संशोधन म्हणजे काही फार अलौकिक अशी गोष्ट नाही. ती एक दृष्टी, प्रवृत्ती आणि विचारांची दिशा आहे. पुरुष रोज दाढी करतात. सेफ्टी रेझरची कल्पना भारतातील पुरुषांना का नाही सुचली ? स्त्रिया रोज पाटावरवंटा वापरून वस्तूचे अणूकरण करतात—त्यांना मिक्सरची कल्पना का नाही सुचली ? त्याचे कारण एकच आहे. ज्या क्रिया पूर्वापार चालत आलेल्या आहेत त्या तशाच चालू ठेवायच्या ही आपली वृत्ती आहे. वेळ, श्रम, पैसा आणि किचकटपणा हे दोष कमी कसे करता येतील या दृष्टीने एकच क्रिया निरनिराळ्या प्रकाराने करून पाहाण्याची आपली प्रवृत्ती नाही. आपण जी कामे करतो ती आणखी निराळ्या पद्धतीने कशी करता येतील, ती करण्यातील वेळ व श्रम कसे वाचविता येतील, खर्च कसा कमी होईल, अशा दृष्टीने रोज विचार करीत राहा म्हणजे हळूहळू नवीन कल्पना सुचत जातील. संशोधन म्हणजे काही एकदम मोठी क्रांती करायची असे नाही. विचार करता करता, निरनिराळ्या पद्धतीने तेच काम करून पाहता पाहता, साधनांत काय सुधारणा करता येईल ती करून घेता घेता संशोधन होत असते. एकादे वेळी अचानक एकादी नवी कल्पना सुचते व त्यामुळे महत्त्वाचा शोध लागतो. त्यामुळे अनेक लोकांचा फायदा होतो. वेळ, श्रम व पैसा यांत बचत होते आणि जीवन सुकर व सुखाचे होते.

पाश्चिमात्य लोकांनी त्यांच्या त्यांच्या जीवनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने संशोधनपूर्वक अनेक साधने निर्माण केली आहेत. आपली जीवनपद्धती अद्याप बऱ्याच प्रमाणात पूर्वापार चालत आलेली आहे. तिच्यात सुधारणा करून नवीन नवीन साधने निर्माण करण्याचे काम आपले आपल्यालाच करायला लागणार आहे. अद्याप आपल्या घरगुती, औद्योगिक आणि शेतीविषयक क्षेत्रात अशी अनेक कामे आहेत की ती करण्यात वेळ, श्रम आणि पैसा यांचा बराच खर्च होतो. तो वाचविण्याच्या दृष्टीने आपल्या साधनांत काय सुधारणा करता येईल, नवीन साधने कशी निर्माण करता येतील, काम करण्याच्या प्रक्रियांमध्ये काय बदल करता येईल, अशा दृष्टीने अहर्निश विचार झाला पाहिजे. असा विचार अनेक ठिकाणी अनेक माणसे करू लागली म्हणजे एकाद्याची प्रतिभा अचानक जागृत होऊन नवीन शोध लागतो, नवे यंत्र निर्माण होते, नवीन प्रक्रियेची पद्धती सुचते. रोज

आपण ज्या गोष्टी करतो त्या ब्रह्मदेवापासून चालत आलेल्या आहेत आणि तशाच चालू ठेवल्या पाहिजेत ही दृष्टी सोडून द्या. काम करण्याच्या पद्धती आणि कामाची साधने यांत काय सुधारणा करता येतील त्याचा सतत विचार झाला पाहिजे आणि त्या दृष्टीने प्रयोग करून पाहिले पाहिजेत. आपल्याकडेही खूप संशोधन होऊ शकेल. आधी दृष्टीत बदल झाला पाहिजे.

[१-८-१९६५

२. आपला धर्म व इतरांचा

गेल्या चार-पाच हजार वर्षांच्या कालावधीत जगामध्ये अनेक धर्म अस्तित्वात आले. त्यांतील जे महत्त्वाचे धर्म आहेत त्या सर्वांचे अनुयायी आज भारतात आहेत. खुद्द भारतामध्येही आर्यांचा प्रवेश होण्यापूर्वी अनेक धर्म अस्तित्वात होते, त्यांत आर्यांच्या धर्माची आणखी भर पडली. या सर्व धर्मांचे अवशेष कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात शिल्लक राहिलेले आहेत. या प्रत्येक धर्मात आणखी पोटधर्म किंवा उपपंथ आहेत. अशा रीतीने सर्व धर्मांचे मिळून अनेक उपपंथ आहेत.

भारतात हिंदू, इस्लाम, ख्रिस्ती हे लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे धर्म आहेत. त्याशिवाय जैन, लिंगायत, बौद्ध, शीख, पारशी, यहुदी इत्यादी धर्मांचे थोडेथोडे अनुयायी आहेत. त्याशिवाय आधुनिक काळात निर्माण झालेले आर्यसमाज, प्रार्थनासमाज, बहाई इत्यादी उपपंथ आहेतच. ही सर्व विविधता पाहून सामान्य मनुष्य गोंधळून जातो. या सर्व धर्मांचा आणि त्यांच्यातील पंथोपपंथांचा सखोल अभ्यास करायचा म्हणजे एक आयुष्यभर पुरण्यासारखे काम आहे.

इतक्या धर्मांचे अनुयायी आणि अभिमानी भारतात असले तरी आपापल्या धर्माचाही सूक्ष्म अभ्यास करणारे लोक फारच थोडे आहेत. पूर्वापार चालत आलेले रीतीरिवाज पाळणे आणि त्या त्या धर्मातील देवदेवतांची उपासना करणे यापेक्षा स्वतःच्या धर्माचे अधिक ज्ञान असणारे अनुयायी फार थोडे असतात. धर्माचा अभ्यास करण्याचे काम ज्यांच्याकडे दिलेले असते असा एक पुरोहित व शास्त्रीवर्ग प्रत्येक धर्मात असतो. हे लोक बहुधा आकुंचित दृष्टीचे, पुराणमतवादी, प्रगति-पराङ्मुख आणि अंधश्रद्धाशील असे असतात. काही अपवाद आहेत. व्यापक दृष्टिकोनातून स्वतःच्या धर्माचा अभ्यास करणारे लोक अगदी थोडे. आपल्या धर्मा-व्यतिरिक्त अन्य एखाद्या किंवा अनेक धर्मांचा अभ्यास करणारे लोक तर त्याहून विरळे.

प्रत्येक व्यक्तीचे आणि समुदायाचे जीवन त्यांच्या धर्माशी निगडित झालेले असते. समाजाकडे, जगाकडे, इतर धर्मीयांकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या त्यांच्या धर्मावर अवलंबून असतो. एकाद्या व्यक्तीची किंवा समाजाची नीट ओळख करून घ्यावयाची असेल तर त्यांच्या धर्माचीही ओळख करून घ्यावयास हवी. अशी जिज्ञासा फार थोड्यांच्या ठिकाणी असते. भारतात अनेक धर्माचे अनुयायी असलेले समाज-गट एकत्र राहातात. परंतु परस्परांच्या धर्माचे एकमेकांना काहीच ज्ञान नसते. धर्मांतील तत्त्वज्ञानाची माहिती नसतेच. परंतु इतर धर्मीयांची देवळे, उपासना पद्धती, प्रार्थना पद्धती यांची देखील काही माहिती आपणाला नसते. या अज्ञानामुळे इतर धर्म व अनुयायी यांच्याविषयी सुप्त स्वरूपात असहिष्णुता, तुच्छता व औदासीन्य या भावना असतात.

भारतात अनेक धर्मांच्या व धर्मपंथांच्या लोकांना एका देशाचे निष्ठावंत नागरिक म्हणून एकत्र जीवन कंठावयाचे आहे. याकरता त्यांना परस्परांच्या जीवनपद्धतींची, विचारांची व उपासनापद्धतींची थोडी तरी माहिती पाहिजे. या ज्ञानाची योजना आपल्या शिक्षणपद्धतीमधेच व्हायला हवी. परंतु आपली राज्य-घटना सेक्युलर आहे. ती फक्त ऐहिक गोष्टींची काळजी वाहते, धर्म ही ज्या त्या व्यक्तीची व समाजाची वैयक्तिक बाब म्हणून शासन त्याकडे लक्ष देत नाही. परंतु ज्ञानाचा एक विषय म्हणून शिक्षणात सर्वच धर्मांची माहिती द्यायला खरोखर काही हरकत नाही. ऐहिक शासनाला धर्मज्ञान वर्ज्य नाही.

प्रत्येक धर्मातील विचारांचे दोन विभाग असतात. एक विभाग अध्यात्म-ज्ञानाचा व दुसरा विभाग नीतितत्त्वांचा. अध्यात्मज्ञानात प्रमुख विषय असे आहेत—विश्वाची उत्पत्ती व लय, मानवाची उत्पत्ती, पुनर्जन्म, जीवात्मा, मरणोत्तर जीवन, ईश्वराचे तात्त्विक स्वरूप, व ईश्वराच्या उपासनेची पद्धती. नीतिशास्त्रात दैनंदिन आचरणाचे सर्व विषय येतात. वैयक्तिक शुद्ध जीवनाकरता लागणारे सद्गुण आणि सामाजिक जीवनाकरता लागणारे सद्गुण यांचा नीतिशास्त्रात समावेश होतो.

धर्माधर्मात जे मतभेद आहेत ते मुख्यतः अध्यात्मशास्त्राच्या बाबतीत आहेत. विश्वाची उत्पत्ती, ईश्वराचे स्वरूप, पुनर्जन्म, आत्मा इत्यादीविषयी प्रत्येक धर्मांतील कल्पना निरनिराळ्या आहेत. अनेक शतकांपूर्वी त्या त्या धर्माच्या संस्थापकांनी हे विचार सांगून ठेवले आहेत व ते परंपरेने आजच्या पिढीपर्यंत चालत आले आहेत. त्यांना विज्ञानाची कसोटी लागू शकत नाही, त्यांच्यावर श्रद्धा ठेवावी अशी अपेक्षा असते. चिकित्सक दृष्टीने त्यांची चर्चा अनेक शतके झाली आहे पण तिच्यातून सर्वांच्या बुद्धीला पटतील अशी निर्णायक तत्त्वे निघू शकलेली नाहीत.

नीतितत्त्वांच्या बाबतीत मात्र सर्व धर्मांत पुष्कळच साम्य आहे. माणसाचे वैयक्तिक जीवन शुद्ध, सात्त्विक व आत्मसंयमाचे असावे. सामाजिक जीवनात अहिंसा, परोपकार, दया, क्षमा, दानधर्म, सौजन्य इत्यादी सद्गुण असावेत, अशा प्रकारची सर्व धर्मांची शिकवण आहे. असत्य, चोरी, हिंसा, व्यभिचार असल्या दुर्गुणांची शिकवण कोणताच धर्म देत नाही.

आपल्या या देशात सर्व धर्मांच्या लोकांना एका देशाचे बांधव म्हणून नांदावयाचे आहे. म्हणून आपल्या गावात, राज्यात व देशात जे इतर धर्मांचे लोक आहेत त्यांच्या धर्मांची स्थूल माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे परस्परांची ओळख अधिक होईल व नैतिक आचाराच्या बाबतीत अनेक धर्मांत साम्य किती आहे, ते लक्षात येईल. त्यामुळे आपल्या स्वतःच्या धर्माचाही अधिक चिकित्सक दृष्टीने अभ्यास होईल.

[११-८-१९६५

३. आजचा तरुण, उद्याचा बॅंक-नंबर

प्रत्येक कालखंडात तरुण आणि वृद्ध पिढीचा संघर्ष चालू असतो. हे पूर्वापार चालत आलेले आहे. पुढेही चालत राहील. पण जी माणसे भूतकाळ आणि भविष्यकाळ दोन्ही पाहातात त्यांच्या ठिकाणी अशी संघर्षभावना नसते. जीवनात परिवर्तन होणारच आहे व तो जगाचा नियमच आहे, हे जाणून ते काळाशी व मागल्या-पुढल्या पिढीशी जमवून घेतात. हे ज्ञान जेथे नसते तेथे निष्कारण संघर्ष होतात.

तरुण लोक वडील माणसांना नावे ठेवतात की हे लोक पुराणमतवादी, बुरसटलेल्या विचाराचे आहेत. त्यांची राहाणी मागासलेली, कपडेलत्ते, केस ठेवण्याच्या पद्धती जुन्या आणि विचारही जुने. आम्ही तरुण माणसे पुरोगामी विचाराची, क्रांती करणारी, जगाला पुढे नेणारी, समाजाचा उद्धार करणारी आहोत.

उलट वडील माणसेही तरुणांना नावे ठेवीत असतात. त्यांच्या ठिकाणी पूर्वापार संस्कृतीविषयी आदर नाही, त्यांना कपड्यालत्त्यात आणि केशभूषेत फक्त फॅशन करायला पाहिजे, त्यांच्या आचार-विचारात नीतिनियम नाहीत, त्यांनी समाज बिघडवून टाकला आणि संस्कृती बुडवली.

आता असा विचार करा की आजची वडील माणसे ही देखील एका काळी तरुण पिढीच होती. ती आपल्या वेळच्या वडील माणसांना नावे ठेवीत होती आणि त्या वेळच्या वडील माणसांनी या लोकांनाही एके काळी मूर्खात काढले होते. आपल्या तारुण्यावस्थेतील दोन पिढ्यांचा संघर्ष किती निष्कारण होता

याचे सिंहावलोकन वडील माणसांनी करावे. मग तरुण पिढीवद्दल त्यांची दृष्टी सहिष्णु व उदारमतवादी होईल. प्रत्येक पिढी थोडी थोडी वदलणारच हे सत्य त्यांना आकलन होईल.

तरुण पिढीनेही थोडे भविष्यकाळात डोकवावे. आजचे आपण तरुण उद्या वृद्ध होणार आहोत. आजची आपली राहाणी, विचारसरणी, वस्त्र-प्रावरण पद्धती, केशभूषा, करमणुकी इत्यादी गोष्टी उद्या जुन्या होतील. उद्याची तरुण पिढी आचाराने–विचाराने–राहाणीने आपल्यापेक्षा निराळी, दोन पावले पुढे असेल. त्यांच्याकडून आपल्याला शेलापागोटे मिळणार आहे की 'हे लोक जुने पुराण-मतवादी आहेत.'

अशा रीतीने तरुण आणि वृद्ध दोन्ही पिढ्यांनी आपल्या मागला व पुढला अशा दोन्ही काळाकडे नजर टाकली तर दोघांची मनोवृत्ती उदार आणि सहिष्णु होईल. वाह्यजीवन-पद्धतीत आणि आचार–विचारात संक्रमण झाले आहे, होत आहे व पुढे होईल, हे तत्त्व दोन्ही पिढ्यांच्या लक्षात आले तर परस्परांकडे पाहाण्याची त्यांची दृष्टी अधिक सहानुभूतीची होईल.

आपल्या आचार विचारांचा आणि वाह्यजीवन पद्धतीचा एकदम त्याग करणे कोणाला शक्य होत नाही. वयाची साठ वर्षे ज्यांनी पुणेरी जोडा, पेशवाई अंगरखा व पिळाची पगडी घातली त्यांना तो पोषाख टाकून एकदम सुटाबूटात राहाता येत नाही. ही पन्नास साठ वर्षांपूर्वीची गोष्ट झाली. नंतरची पिढी पारशी कोट व वहाणा घालणारी आली. त्यानंतर शॉर्टकोट व चपला आल्या. आता बुशकोट आणि तोही रंगीबेरंगी आला. पूर्वी घेरा, शेंडी आणि झुपकेदार मिशा यांची फॅशन होती. नंतर शेंडी गेली आणि क्रॉप व गुळगुळीत ओठ-हनुवटी आली. आता पुन्हा मिशा आणि कल्ले आले. असेच परिवर्तन कपड्यांत झाले. धोतर जाऊन पायजमा आला तेव्हा टीका झाली. त्यानंतर सैल पॅन्टा आल्या आणि आता अरुंद टाईट पॅन्टा आल्या. उद्या त्याही बदलतील. एके काळी नऊवारी सकच्छ लुगडी डौलदार समजली जात होती. मग सहावारी आली. पुढे स्कर्ट आले. आता घट्ट तुमानी आणि लुंग्या आल्या. उद्या काय येईल त्याची कल्पना करावी आणि मनाची करमणूक करून घ्यावी. खंत वाळगण्यात काही अर्थ नाही.

वाह्य जीवनात परिवर्तन झाल्याबद्दल विषाद मानू नये. पण आंतरिक मूल्ये जर विकृत होऊ लागली तर मात्र धोक्याचा इशारा देणे आवश्यक आहे. कितीही काल-परिवर्तन झाले तरी काही मानवीमूल्ये शाश्वत आहेत ती प्रत्येक पिढीने टिकवली पाहिजेत. वात्सल्य, मातृभक्ति, पितृनिष्ठा, पतिपत्नी प्रेम, मित्रप्रेम, शेजारधर्म, समाजहितबुद्धी, परोपकार, दानधर्मप्रवृत्ती इत्यादी नैतिक व भावनात्मक सद्गुण शाश्वत स्वरूपाचे आहेत. त्यांचे संगोपन झालेच पाहिजे. ही जीवनमूल्ये शुद्ध स्वरूपात प्रत्येक पिढीने जतन केली पाहिजेत.

जुन्या नव्या पिढीतील बराचसा संघर्ष विचाराने कमी करता येईल. जीवनात सर्व सुखसोयींची साधने उपलब्ध असूनही काही तरुण आणि वृद्ध माणसे निष्कारण दुःखी व असमाधानी राहातात. वरील विचारसरणीचे त्यांनी चिंतन केले तर त्यांची काल्पनिक दुःखे कमी होतील. जीवनात त्यांना समाधान व आनंद यांचा लाभ होईल,

[२५-८-१९६५

४. दोघेही बरोबर, तरी वाद !

घरोघरी नेहेमी एकाद्या प्रसंगाच्या निमित्ताने वादविवाद होतात. त्यात एकच घटना, पण वादविवाद करण्याच्या दोन निरनिराळ्या पद्धती कशा असतात ते पहा—

पहिला—मी दहा सांगितले.

दुसरा—मी सहा ऐकले.

पहिला—मी नक्की दहा सांगितले.

दुसरा—असेल. माझी ऐकण्यात चूक झाली असेल. तुम्ही दहाच सांगितले असे धरून चालू.

हा एक प्रकार झाला. आता दुसरा प्रकार पहा—

पहिला—मी दहा सांगितले.

दुसरा—नाही, तू सहा सांगितलेस.

पहिला—मी नक्की दहा सांगितले.

दुसरा—खोटे बोलू नकोस. तू नक्की सहाच सांगितले. मी या कानांनी ऐकले.

पहिला—पुन्हा सांगतो, मी दहा म्हणालो. तू बहिरा आहेस. कान तपासून घे. म्हणे सहा सांगितले !

तुमच्या घरात असे वादविवाद होतात का कधी ? वरील प्रकारात खरोखरी दोघांचेही म्हणणे बरोबर असेल. दहा आणि सहा हे शब्द इतके सारखे आहेत की ऐकण्यात चूक होणे शक्य आहे. पहिला म्हणतो 'दहा', ते त्याचे दृष्टीने बरोबर आहे. दुसरा म्हणतो 'सहा', तेही त्याच्या दृष्टीने बरोबर आहे. आपापल्या अनुभवाच्या दृष्टीने दोघेही बरोबर आहेत. पहिल्या प्रकारात वाद तुटला. दोघांची मने स्वच्छ राहिली. दुसऱ्या प्रकारात वाद चिघळला, दोघांची मने कलुषित झाली.

मुळात कारण काहीच नाही. ज्या ठिकाणी साक्षीदार म्हणून तिसरा कोणी नाही त्या ठिकाणी दोघांचा वाद तुटणार कसा ? प्रत्येकजण तेच तेच पुन्हा म्हणत राहाणार. या वादाला अंत नाही. दुसऱ्या बाजूचे म्हणणे बरोबर असणे शक्य आहे असे मानून समजूतदारपणा दाखवला गेला तरच वाद तुटणार.

'तुटे वाद संवाद ऐसा करावा ।' असे संत रामदासांचे एक वचन आहे, त्याची सत्यता वरील प्रसंगाच्या निमित्ताने प्रत्ययास येते. आपली कृती आणि तिच्याविषयी दुसऱ्या माणसाचा अनुभव या दोन गोष्टी अगदी वेगळ्या असू शकतात. प्रत्येकाच्या अनुभवाला जे येते त्याप्रमाणे तो बोलतो. अशा वेळी दोघांनीही परस्परांच्या अनुभवाला व त्यावर आधारलेल्या बोलण्याला मान दिला पाहिजे.

भाजीत घातलेले मीठ एखाद्याला कमी वाटेल, एखाद्याला जास्त वाटेल. हा ज्याच्या त्याच्या जिभेचा प्रश्न आहे. एक म्हणणार 'भाजी आळणी झाली', दुसरा म्हणणार 'भाजी खारट झाली.' दोघांचेही बरोबर आहे. दिव्याचा प्रकाश; एकाच पॉवरचा बल्ब लावला तरी एकाला प्रकाश कमी वाटेल, दुसऱ्याला तोच पुरेसा होईल. एक म्हणणार 'दिसत नाही', दुसरा म्हणणार 'छान दिसते'. दोघांचेही त्यांच्या त्यांच्या अनुभवाप्रमाणे बरोबर आहे.

दुसरा माणूस ज्यावेळी आपापल्या अनुभवाप्रमाणे बोलतो, त्यावेळी, आपल्या स्वतःच्या अनुभवापेक्षा ते निराळे असले तरी, त्या माणसाच्या अनुभवाला व बोलण्याला मान द्यावा. दोघांनीही आपल्याला काय वाटते तेवढे सांगावे आणि वाद संपवावा. त्यामुळे वेळ वाचतो, शब्द वाचतात, भावना वाचतात, प्रेम कायम राहाते.

आपली कृती व तिचा दुसऱ्याला आलेला अनुभव यांत जेव्हा भिन्नता असेल, त्यावेळी उदार व सहिष्णु वृत्ती ठेवावी. त्या माणसाच्या मनावर परिणाम काय झाला या बाबतीत तोच अधिकाराने बोलू शकेल. तुमचा उद्देश काय होता त्याविषयी तुम्ही अधिकाराने बोलू शकाल. दोघांनी परस्परांचे ऐकून घ्यावे आणि वाद संपवावा.

देवघेव, तडजोड, समजूतदारपणा म्हणतात तो हाच. हीच मनाची उदारता व संस्कृती. ती आपल्या रोजच्या व्यवहारात दाखवली तर पुष्कळ कडू प्रसंग टाळता येतील व तुम्हांला आणि इतरांना सुख लागेल. वाद घालताना हे लक्षात ठेवा.

[१-५-१९६७

५. खरे-खोटे ओळखण्याची सवय

व्यवहारज्ञानाचे शिक्षण देण्याचा अभ्यासक्रम किंवा शाळा नाही. रोजच्या व्यवहारावर व अनुभवावर विचार करता करता मनुष्य मनाशी काही आडाखे बांधतो, त्यालाच व्यवहारज्ञान म्हणतात. व्यवहारात माणसे फसल्याची अनेक उदाहरणे आपण पाहातो व वाचतो. इतरांना फसवणारे ठग समाजात नेहमी असतात. त्यांच्या फसवणुकीला बळी पडणारी भोळी भाबडी माणसेही असतात. आपला समावेश या बावळट वर्गात होऊ नये याची काळजी घेणे प्रत्येकाच्या हातात आहे.

एका बाईच्या अंगावर सोन्याचे दागिने होते. तिला एक ठग भेटला. म्हणाला—'दागिने दुप्पट करून देतो.' बाईचा विश्वास बसला. तिने दागिने दिले. त्या भामटयाने ते दागिने रुमालात घातले. त्याच्या जवळच्या रुमालात पितळेचे दागिने होते ते गाठोडे बाईला दिले अन् म्हणाला—'उद्या उघडून पहा.' भामटा पसार झाला. बाईच्या हातात पितळेचे दागिने पडले ! आता इथे कोण काय करणार ? जेथे बावळट, भोळी–भाबडी माणसे आहेत तेथे ठग, भामटे आणि फसवणारे नसले तरच नवल.

खरे आणि खोटे, लबाडी आणि प्रामाणिकपणा, असली आणि नकली, खरी बातमी आणि अफवा––यांतील अंतर ओळखायला शिकले पाहिजे. घरोघरी जाऊन मालाची विक्री करणारे फेरीवाले सर्वत्र असतात. 'आज इथे तर उद्या तिथे' असा त्यांचा धंदा असल्यामुळे त्यांच्यावर प्रामाणिकपणाची जबाबदारी फारशी नसते. खोटा माल गिऱ्हाइकाच्या गळ्यात बांधून ते पसार होऊ शकतात. दोष आपला आहे. खोटा माल आणि खोटा प्रचार ओळखायला आला नाही हा आपला दोष आहे. स्वस्त तांदूळ देतो म्हणून एका बाईकडून पोत्याचे पैसे एका माणसाने घेतले. 'मुलगा बरोबर द्या, त्याच्या बरोबर पोते पाठवतो.' म्हणून मुलाला बरोबर घेतला. दुकानात मुलाला उभा केला आणि मागल्या दाराने पसार झाला ! पैसे गेले. 'स्वस्त लोणी आणून देतो' असे सांगून एक माणूस एका बाईचे मोठे पातेले घेऊन पसार झाला. तुमच्या ऐकण्यात, पाहाण्यात आणि वाचण्यात असे किस्से आले असतीलच. तुमच्यावर कधी तरी असे प्रयोगही झाले असतील. अशा प्रकारच्या बतावणीला मीही दोनतीन वेळा फसलो आहे. म्हणूनच अनुभवाने आता हे लिहीत आहे. जीवनाच्या प्रारंभ-काळात आपल्या प्रत्येकाच्या ठिकाणी थोडा बावळटपणा असतोच.

प्रत्येकजण कधी ना कधी तरी या भामटेगिरीला बळी पडतो. ते एके परी

चांगलेच आहे. थोडे नुकसान होते पण माणूस सावध होतो. सगळीच माणसे साव नसतात हे तत्त्व अनुभवाने कळलेले बरे असते. कायमचे लक्षात राहाते. म्हणून फारसे नुकसान न होता तुम्ही कधी फसला असाल तर मनात खंत मानू नका. त्या अनुभवापासून धडा घेऊन कानाला खडा लावा अन् पुन्हा न फसण्याची काळजी घ्या.

आपल्या ऐकण्यात, वाचनात आणि अनुभवात ज्या गोष्टी येतात त्या सर्वांत खऱ्या–खोट्यांचे मिश्रण असते. त्याची विभागणी करून खरे-खोटे ओळखण्याची सवय मनाला व बुद्धीला लावली पाहिजे. वर्तमानपत्रातल्या जाहिरातीत पुष्कळ भाग खोटा आणि फसवा असतो. 'पीपल लाईक टु बी फूल्ड', असे या जाहिरात लेखकांचे तत्त्व असते. भलत्याच गोष्टीकडे लक्ष वेधून आपला माल चांगला असल्याचे ते भासवतात. सुंदर स्त्रीच्या चित्राबरोबर वाटेल त्या मालाची जाहिरात केली की लोक भुलतात असे त्यांना वाटते. खरेही असेल. फसणारे मूर्ख जगात असल्यावर फसवणारे न निघाले तरच नवल. निवडणूक आली की राजकीय पक्षांचे फतवे बाहेर पडतात. प्रत्येक पक्षाचा जाहीरनामा काय आहे म्हणून लोक मोठ्या आस्थेने त्यांची चर्चा करतात. निवडणूक झाल्यावर सर्व थंड. जाहीरनामे म्हणजे थापा असतात हे कळायला त्यावर माणसाने विचार करायला लागतो. नाताळ, दिवाळी आणि पाडवा आला की बाजारात सर्वत्र 'सेल, सेल' म्हणून जाहिराती लागतात. दहा, वीस, पंचवीस टक्के कमी किंमतीत सेल ! आता खरी किंमत किती आणि सेलची किंमत किती याची शहानिशा करणारे किती लोक आहेत ?

खोटेपणा, भुलावणी, असत्य प्रचार, फसवणूक, लबाडी, थापा, या गोष्टी ओळखायची सवय पाहिजे. बालवयातच ती व्हावी म्हणून इसापनीती, पंचतंत्र, हितोपदेश अशा प्रकारची काल्पनिक गोष्टींची पुस्तके लिहिली गेली. पण मोठेपणी त्या गोष्टी विसरल्यामुळे कित्येकांना फार नुकसान सोसावे लागते. म्हणून सावध असावे. समाजात भोळे भाबडे ससे आहेत म्हणून त्यांना फसवणारे धूर्त कोल्हेही आहेत.

[८–५–१९६७

६. स्वभावाचा जमाखर्च पुरा करा

आर्थिक वर्ष संपले. आपापले जमाखर्च तुम्ही पुरे केलेच असतील. जमेची बाजू आणि खर्चाची बाजू यांची तुलना करून या वर्षीची एकूण प्राप्ती किंवा एकूण खर्च यांचे आकडे काढून तुम्ही वर्षाचे सिंहावलोकन करता आणि पुढील

वर्षाचा अंदाज करून ठेवता. हे द्रव्याच्या बाबतीत झाले. आता तुमच्या स्वभावाचा, म्हणजे स्व–भावांचा, स्वतःच्या भावनांचा जमाखर्च काढा. या वर्षी तुमच्या स्वभावात कोणत्या चांगल्या गुणांची भर पडली व कोणत्या दुर्गुणांचा खर्च केला त्याचा आढावा घ्या. तुमच्या व्यक्तित्वात किती विकास झाला, पूर्वीच्या ठिकाणी आहात, प्रगती केली की पिछेहाट झाली त्यावर विचार करा. आर्थिक जीवन हे साधन आहे. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होणे, ते अधिकाधिक श्रेष्ठ पातळीवर नेणे हा जीवनाचा अंतिम उद्देश आहे. असावा.

या वर्षी तुम्ही जे वाचन केले त्यापैकी किती वाचन विचारांचे दृष्टीने सकस झाले ? किती वाचन केवळ करमणुकीखातर वेळ जाण्यापुरते झाले ? चिरंतन संस्कार करणारे असे काही ग्रंथ तुम्ही वाचले का ? त्यामधून तुमच्या जीवनात उपयोगी पडतील अशा कोणत्या गोष्टी मनात शिल्लक राहिल्या ? नोटा मोजता तसे हे विचारही मोजून पहा. भारी किमतीच्या नोटाप्रमाणेच भारी मोलाच्या विचारांचा संग्रह करा. दोन्हीही आयुष्यात उपयोगी पडतील.

वाचन, चिंतन, अनुभव यांमुळे तुमच्या स्वभावात किती प्रगती झाली ? आपल्या स्वभावाला दोन बाजू आहेत; एक वैयक्तिक जीवनाची व दुसरी सामाजिक जीवनाची. पातंजल योगशास्त्रात यम आणि नियम अशा संज्ञा आहेत. यांतील यम म्हणजे आत्मसंयमनाचे गुण. यांचा उपयोग सामाजिक जीवनात इतरांशी व्यवहार करताना होतो. नियम म्हणजे वैयक्तिक प्रगती करता नित्य आचरणात आणण्याचे गुण. अहिंसा, अक्रोध व अस्तेय हे सामाजिक सद्गुण म्हणजे यम आहेत. दृढनिश्चय, अभय, स्वाध्याय, समाधान हे नियम म्हणजे वैयक्तिक सद्गुण आहेत. दोहींचा विकास परस्परांना पोषक आहे.

आपले जीवन परिपूर्ण होण्याचे दृष्टीने कोणते गुण आवश्यक आहेत पहा. आनंद, समाधान, शांती, निर्भयता, निश्चितता, आत्मविश्वास, दृढनिश्चय, चिंतनशीलता, उदात्तता, निर्लोभता, अनहंकार, आत्मसंयम, ममत्वत्याग, ज्ञानार्जन—अशा अनेक गुणांच्या साहाय्याने आपले जीवन परिपूर्ण होते. यांपैकी किती गुण आपल्याजवळ होते, किती नवीन मिळवले, त्याचा जमाखर्च करा.

आता सामाजिक दृष्टीने तुमच्या स्वभावाचा विचार करा. मनमिळाऊ स्वभाव, सहिष्णुता, मधुरभाषण, विनय, प्रांजलपणा सेवावृत्ती, दानधर्मप्रवृत्ती, त्यागवृत्ती, दया, क्षमा, सहनशीलता, परोपकार, बंधुभाव, असे कोणते गुण तुम्ही या वर्षी विचारपूर्वक जमा केले ? या गुणांमुळे समाजात तुमच्याबद्दल आदर व प्रेम वाटेल. तुम्ही लोकप्रिय व्हाल.

काही गुण मिळवावे लागतात तसे काही दुर्गुण खर्च करावे लागतात. त्यांचा हळूहळू त्याग करावा लागतो. या दुर्गुणामुळे आपले व्यक्तिमत्त्व निकृष्ट

दर्जाचे होते आणि समाजात आपण अप्रिय होतो. वैयक्तिक आणि सामाजिक असा भेद या दुर्गुणांतही आहे. प्रत्येक सद्‌गुणाच्या विरुद्ध असा एकेक त्याचा प्रतिस्पर्धी दुर्गुण आहेच.

भय, चिंता, दुःख, उदासीनता, कमकुवतपणा, मोह, चंचलता, अहंकार, लोभ, मत्सर, भोगप्रवृत्ती, गर्व, अज्ञान इत्यादी दुर्गुण हळूहळू ताब्यात आणले पाहिजेत. त्यामुळे जीवनात समाधान व शांती मिळेल. समाजातील व्यवहार करताना काही दुर्गुणांमुळे आपण अप्रिय होतो व लोक आपले शत्रू होतात. रागीटपणा, तुसडेपणा, कडू भाषण, स्वार्थी वृत्ती, कामचुकारपणा, चिक्कूपणा, उर्मटपणा, अनादर, खुनशीवृत्ती, दुष्टपणा, असहिष्णुता, उतावीळपणा—हे सर्व दुर्गुण कधी तरी पश्चात्तापाला आणि दुःखाला कारण होतात. या सर्व दुर्गुणांचा हळूहळू त्याग करा.

आर्थिक जमाखर्चाच्या याद्यांप्रमाणे या नैतिक जमाखर्चाच्या याद्याही कंटाळवाण्या आहेत. पण वर्षाकाठी शिल्लक राहिली म्हणजे जसा आनंद होतो तसा आनंद केव्हा होईल ? आपण सद्‌गुणांचा विकास आणि दुर्गुणांवर मात करीत आहोत ही भावना निर्माण झाली तर अभूतपूर्व आनंद होईल. त्यामुळे तुम्ही सुखी व्हाल.

[२१-५-१९६७

७. भाषाशुद्धीचा नवा अर्थ

साहित्याच्या क्षेत्रात भाषाशुद्धी हा शब्द एका विशिष्ट अर्थाने वापरला जातो. मराठी भाषेत जे उर्दू व इंग्रजी शब्द आले आहेत त्यांच्या जागी शुद्ध मराठी किंवा संस्कृत शब्द वापरणे याला भाषाशुद्धी असे नाव आहे. मी दुसऱ्या एका अर्थाने भाषाशुद्धी हा शब्द वापरीत आहे. त्याला साहित्यिक अर्थापेक्षा सांस्कृतिक व नैतिक अर्थ अधिक आहे.

आपल्या भावना भडकल्या म्हणजे न कळत आपल्या मुखातून जी काही भाषा बाहेर पडते तिचे परीक्षण करा. मनाविरुद्ध एखादी गोष्ट झाली, राग आला, मतभेद झाला म्हणजे आपल्या भावना काही विशिष्ट शब्द घेऊन बाहेर पडतात. या शब्दांचे बाबतीत प्रत्येक व्यक्तीचे वैशिष्ट्य असते. पण हे सर्व शब्द कठोर, उद्वेगकारक, ग्राम्य आणि मर्मभेदक असे असतात.

माझ्या भाषेतही बरीच वर्षे हा दोष होता. मूर्ख, हलकट, गाढव, कृतघ्न,

बेइमान अशा प्रकारचे जहाल शब्द वापरून आपल्या भावना प्रखर शब्दांत व्यक्त करण्याची व दुसऱ्या व्यक्तीवर शब्दप्रहार करायची मलाही सवय होती. अनुभवाने व चिंतनाने मला असे कळून आले की मी बऱ्याच माणसांची मने दुखवली. माझ्याविषयी त्यांच्या मनात अप्रीती व तिरस्कार उत्पन्न झाला. मी दिवसेंदिवस अप्रिय होत चाललो आहे. मग मी आपला स्वभाव बदलला. प्रथम भावनेला लगाम घातला. राग आला तरी तो ताब्यात ठेवायचा, आणि भावना व्यक्त करायच्या झाल्या तरी साधे सौम्य शब्द वापरायचे. अजाण, वेडा, अज्ञ, असे शब्द मी वापरू लागलो. माझ्या भाषेत सुधारणा केली. भाषाशुद्धी केली.

काही काही व्यक्तींच्या तोंडात यापेक्षाही जहाल शब्द असतात. अनेकांच्या भाषेत ग्राम्य शिव्या असतात. त्यांचा येथे निर्देश करून मी माझी लेखणी भ्रष्ट करीत नाही आणि वाचकांना क्लेश देत नाही. काही लेखकांच्या वाङ्मयातून वास्तवतेच्या नावाखाली असली भाषा आणि इरसाल शब्द येऊ लागले आहेत; ही वाङ्मयाची अधोगती आहे. कठोर शब्द आणि शिव्या या बाबतीत मराठी भाषा संपन्न आहे. शिवाय इतर भाषेतील उखाण्यांची उसनवारी करून ग्राम्यतेच्या बाबतीत मराठी भाषेची संपत्ती आपण पुष्कळच वाढवली आहे ! म्हणूनच आता दुसऱ्या टोकाला जाऊन भाषेची शुद्धी करण्याची वेळ आली आहे. आपल्या स्वतःपासूनच प्रारंभ करू या. स्वार्थाच्या दृष्टीनेही हे करणे जरूर आहे. कसे ते पहा.

कठोर भाषा वापरली की इतर माणसांची मने दुखावली जातात. शरीरावरील जखमा बऱ्या होतात पण वण कायम राहातात. मनाच्या जखमा आणि वण दोन्ही कायम राहातात. शब्द वर्मी लागतात. जन्मभर लक्षात राहातात. माणसे आपला तिटकारा करू लागतात. आपल्या शत्रूंची संख्या वाढते.

ज्यांची मने आपण दुखवली आहेत ते आपले हितशत्रू आपल्याला केव्हा गोत्यात आणता येईल याची संधी पहात असतात. सर्व दिवस सारखे नसतात. आपल्यालाही कधी अडीअडचणीचे दिवस येतात. चार चौघांचेकडे जाण्याचा, कधी कोणाचे पाय धरण्याचा प्रसंग येतो. अशा वेळी ही दुखवलेली माणसे आपल्या कामात आडवी येतात आणि आपले नुकसान करतात. समाजात राहाणाऱ्या माणसाचा अनेक व्यक्तींशी संबंध येतो. कधी, कोठे, कोणाची गरज पडेल सांगता येत नाही. अशा वेळी आपण निर्माण केलेले शत्रू आपल्यावर सूड घेतात. आपला काटा काढतात !

तुम्ही निरनिराळ्या प्रसंगी कोणती भाषा आणि कोणते शब्द वापरता त्याचे नीट परीक्षण करा. मतभेद, नाराजी, राग, नापसंती इत्यादी भावना व्यक्त करणे ही गोष्ट संसारात अपरिहार्य आहे. त्याशिवाय जगातील व्यवहारच करता येणार नाहीत. सर्वच प्रसंगी काही गोड गोड बोलता येत नाही. कडू बोलण्याचे

प्रसंग येणारच. पण त्यावेळी आपण वापरीत असलेली भाषा फार कठोर, ग्राम्य आणि मर्मभेदी नसावी. माणसात सुधारणा व्हावी हा उद्देश दृष्टीपुढे ठेवून, सौम्य शब्दात आपल्या भावना व्यक्त कराव्यात. दुसऱ्या माणसाला त्याच्या चुकीची व दोषाची जाणीव होऊन त्याच्यात सुधारणा व्हावी—इतक्या पुरतीच आपली भाषा मर्यादित ठेवा. माणसे सुधारावीत, तोडली जाऊ नयेत हे धोरण ठेवा.

माणसाचे वय, अधिकार आणि दर्जा या गोष्टी जसजशा वाढत जातात त्या प्रमाणात त्याच्या भाषेत सुसंस्कृतपणा यावा आणि भावनेत आत्मसंयम असावा. प्रत्यक्ष अनुभव मात्र उलट येतो, त्याचे कारण माणसे आत्मनिरीक्षण करीत नाहीत. तुमच्या भाषेच्या द्वारे तुमच्या मनाची संस्कृती व्यक्त होऊ द्या. वयाच्या वाढीबरोबर भाषेत व स्वभावात सुसंस्कृतपणा येऊ द्या.

[२०-६-१९६७

८. सत्कृत्यालाही प्रसिद्धी लागते

सत्य, सदाचार आणि सद्गुण या गोष्टी समाजात आहेत म्हणून जगात माणुसकी जिवंत राहिली आहे. बहुसंख्य माणसांना चांगल्या गुणांविषयी आदर व प्रेम वाटते. माणूस स्वतः कितीही व्यसनी, दुराचारी व दुर्गुणी असला तरी त्याला सदाचारी सद्गुणी व्यक्तीच्या सद्गुणांबद्दल आदर वाटतो. सद्गुण म्हणजे चांगूलपणा. हा अनेक स्वरूपात असू शकतो. चांगल्या कृतीचे प्रकार अनेक आहेत. चांगले विचार देणाऱ्या व्यक्ती व ग्रंथ अनेक आहेत. चांगल्या भावनांचे संगोपन करणाऱ्या कलाकृतीही सर्वत्र आहेत. निरनिराळ्या स्वरूपात सत्कृत्ये, सद्गुण, सात्त्विक गोष्टी आणि चांगुलपणा सर्वत्र आहे.

पण चांगल्या गोष्टीही लोकांच्या दृष्टीला आणल्याशिवाय त्यांना दिसत नाहीत व त्यांच्या लक्षात येत नाहीत. उत्कृष्ट संगीतातील सुंदर जागा लक्षात आणून दिल्या म्हणजे त्या श्रोत्यांना समजतात. भव्य चित्रकलेतील सौंदर्यस्थळे एकदा दाखवली की ती पाहाण्याची नवी दृष्टी प्रेक्षकांना प्राप्त होते. असेच इतर सर्व चांगल्या गोष्टींचे आहे. सात्त्विक आचरणाची माणसे, चांगल्या विचारांचे ग्रंथ, निसर्गातील सौंदर्यस्थळे, उत्तमोत्तम कलाकृती—या सर्वांची प्रसिद्धी होणे अवश्य असते. कोणी तरी प्रचारक व प्रसिद्धीकर्ता मिळाला म्हणजे चांगल्या गोष्टींची समाजात माहिती होते. नकळत त्यांचे थोडे फार अनुकरण होऊ लागते.

आजकाल आपले जीवन इतके धावपळीचे झाले आहे की जवळपास काय चांगले वाईट आहे ते पाहायला कोणाला वेळ नसतो. शिवाय आपल्या स्वतःच्या

कामात, सुखात आणि स्वार्थात माणसे इतकी गढून गेलेली असतात की इतरांकडे चिकित्सक दृष्टीने पाहायला त्यांना सवडच नसते. त्यामुळे चांगल्या गोष्टी जवळपास असल्या तरी त्या लक्षात येत नाहीत. हे काम कोणी तरी करावे लागते. पूर्वी कीर्तनकार, प्रवचनकार, पुराणिक, शाहीर, कवी, लेखक हे सद्गुणांच्या व सदाचाराच्या प्रसिद्धीचे व प्रचाराचे काम करीत. आजच्या काळात नवीन संस्था निर्माण झाल्या आहेत. वृत्तपत्रे, व्यासपीठे, रेडियो इत्यादी आधुनिक साधनांच्या साहाय्याने चांगल्या गोष्टींचा प्रसार करता येतो. परंतु जुन्या आणि नव्या साधनांत थोडा फरक आहे. पूर्वीच्या प्रसिद्धीच्या साधनांत फारसा व्यापारीपणा नव्हता तो आजच्या साधनांत आला आहे. चांगला वशिला असल्याशिवाय आजकालच्या नियतकालिकांतून अथवा व्यासपीठावरून चांगल्या गोष्टींना प्रसिद्धी मिळेलच अशी खात्री देता येत नाही. आपलेपणाने प्रसिद्धी देणारा एकादा मित्र, आपुलकीचा माणूस किंवा सद्गुणांचा चहाता मिळाला तरच चांगल्या वृत्तीला प्रसिद्धी मिळते, नाहीतर तिची उपेक्षा होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन चांगली कृती करणाराने स्वावलंबनाची कास धरली पाहिजे.

आपली कृती चांगली आहे अशी मनोमन खात्री असेल तर आपणच ती लोकांच्या दृष्टीला आणून दिली पाहिजे. ज्ञानेश्वरांनी गीतेवरील भाष्य अत्यंत सुंदर भाषेत लिहिले. पण ही कृती फार अभूतपूर्व आहे असे श्रोत्यांना वारंवार सांगणे ज्ञानेश्वरांनाही भाग पडले. 'शब्दांच्या पलीकडे जे आहे ते मी तुम्हांला सांगीतले', असे म्हणून त्यांना स्वतःच्या कृतीचा चांगुलपणा स्वतःच्या मुखाने सांगावा लागला. त्यानंतर अनेक प्रवचनकारांनी ज्ञानेश्वरीचा प्रसार केला व ती आपल्या पिढीपर्यंत येऊन पोचली. ज्ञानेश्वरांच्या कृतीला कोणी अहंकाराचा दोष देत नाही. चांगल्या गोष्टी श्रोत्यांच्या नजरेला आणण्याकरता त्यांनी आपल्या कृतीचे सद्गुण लोकांना सांगितले. भवभूती, जगन्नाथ पंडित, केशवसुत यांच्या काव्यकृतीतही स्वतःच्या गुणांची स्तुती व प्रसिद्धी आढळून येते. तोच काळ आजही आला आहे. अहंकाराची भावना न ठेवता केवळ चांगली कृती समाजाच्या लक्षात आणावी म्हणून, चांगल्या गुणांचा प्रसार व अनुकरण व्हावे म्हणून—आपल्या चांगल्या कृतीची ज्याने त्याने अवश्य प्रसिद्धी करावी.

तुमच्या स्वतःच्या व तुमच्या माहितीतील इतरांच्या चांगल्या कृतींची व गुणांची शक्य तितकी प्रसिद्धी अवश्य करा. व्यक्तीपेक्षा गुणांना मोठेपणा व प्रसिद्धी मिळावी ही भावना त्यात ठेवा म्हणजे अहंकाराचा दोष लागणार नाही. पूर्वीच्याही लोकांना हेच करावे लागले. चांगल्या कृतींपासून स्फूर्ती मिळाल्यामुळे अनेकांना तिचे अनुकरण करण्याची बुद्धी होते व सद्गुणांचा समाजात प्रसार होतो.

[१२-७-१९६७

९. मुक्या माणसांचे प्रकार

या लेखाला मी प्रथम 'मुक्यांचे प्रकार' असे शीर्षक दिले होते. पण मग विचार केला की त्यामुळे लेख वाचल्यानंतर काही वाचकांची निराशा होईल! म्हणून मग 'माणसांचे' हा शब्द मधेच घातला. त्यामुळे लेखाचा विषय एकदम बदलला.

आपल्याला समाजात न बोलणारी, किंवा कमी बोलणारी अनेक माणसे भेटतात. त्यांच्यांत कारणपरत्वे किती प्रकार असू शकतात याचा विचार मोठा मनोरंजक आहे.

काही लोक जन्मापासूनच मुके असतात. जन्मतः जे बहिरे असतात त्यांना इतरांची भाषाच ऐकू येत नसल्यामुळे ते मुके राहातात. हा निसर्गाचा शाप आहे. दुर्दैव. परंतु आता अशा माणसांना वाचा देण्याचे शास्त्र निघाले आहे, त्यामुळे व्यवहारापुरते ते बोलू शकतात. करपल्लवीच्या सहाय्यानेही ते आपल्या भावना व्यक्त करू शकतात.

बोलता येत असून काही लोक मुखदुर्बळ असतात. त्यांच्या तोंडाला चिकटा असतो. चारचौघांत तासभर ते बसून राहातील पण एकही वाक्य उच्चारणार नाहीत. त्यांच्याजवळ इतरांना सांगण्यासारखे काही नसते म्हणून, किंवा असले तरी बोलायची भीती म्हणून ते बोलत नाहीत. पुष्कळ लोक विचारच करीत नाहीत. त्यामुळे बोलण्यासारखे व इतरांना सांगितलेच पाहिजे असे त्यांच्याजवळ काही नसते. अशा माणसांना फारसे मित्र मिळत नाहीत व लोकप्रियताही लाभत नाही. स्वतःचे काम निघाले म्हणजे मग त्यांना बोलायलाच लागते, पण कामापुरते बोलणाराबद्दल कोणाला आपलेपणा वाटत नाही, म्हणून त्यांची कामे करायला कोणी उत्सुक नसते.

राग, दुःख, इतराजी, मत्सर, हेवा इत्यादी कारणामुळे काही माणसे बोलत नाहीत. आपल्या भावना व्यक्त करण्याचा हा एक मार्ग आहे. नेहेमी मोकळेपणाने बोलणारा माणूस अचानक बोलेनासा झाला म्हणजे इतरांच्याही लक्षात येते की स्वारीचे काही तरी बिनसले आहे. असे मौन हे इतरांना शिक्षा करण्याचे एक हत्यार आहे. आपल्यावर अन्याय झाल्याचे मुके आणि बोलके प्रदर्शन आहे. यात आत्मसंयमाचा देखावा असतो पण त्याच गुणाचा अभाव असतो. या अवस्थेतून मीही एकदा गेलो आहे याची आठवण झाली म्हणजे माझी मला कीव वाटते. नेहेमीच असा अबोला धरणाऱ्या माणसाची इतर लोक फारशी पर्वा करीत नाहीत. त्यांची लहरच आहे, वाटेल तेव्हा बोलतील, वाटेल तेव्हा गप्प बसतील असे म्हणून दुर्लक्ष करावे. पण कधी काळी मौन धरणाऱ्या माणसाविषयी मात्र इतर लोक विचार करू लागतात. आपल्याकडून काही चुकी झाली नाही ना असे आत्मनिरीक्षण

लोकांना करायला लावण्याच्या दृष्टीने एक साधन म्हणून अशा मौनाचा उपयोग होतो. पण अशा प्रसंगी मौन बाळगून इतरांना व स्वतःला शिक्षा करण्यापेक्षा मोकळेपणाने बोलणारा माणूस अधिक चांगला. ज्याकरता मौन स्वीकारायचे त्या गोष्टीबद्दल संबंधित माणसाशी मोकळेपणाने चर्चा केली तर त्या माणसाचीही बाजू कळते आणि निष्कारण गैरसमज झाले असल्यास ते नाहीसे होतात. चूक करणाराला आपल्यात सुधारणा करण्याला मार्गदर्शन मिळते.

आध्यात्मिक दृष्टीने आत्मनिरीक्षणाला वेळ मिळावा म्हणूनही मौन धारण करण्याची एक प्रथा आहे. मुनींचे व्रत ते मौन. मनुष्य राग-द्वेष-मत्सर इत्यादी विकारांच्या भरात उद्वेगकारक भाषण करीत असतो. त्याला आळा बसावा असा एक उद्देश त्यात असतो. माणसाची बोलण्याकडे खर्च होणारी शक्ती आत्म-निरीक्षणाकडे लावावी हाही एक हेतू त्यात आहे. शांतमनाने, मानवहित-बुद्धीने, विश्वप्रेमाने, आत्मसंयमाच्या वाढीकरता या मौनाचा चांगला उपयोग होतो. ज्याच्याजवळ बोलण्यासारखे व इतरांना सांगण्यासारखे पुष्कळ आहे त्याने काही काळ मौन स्वीकारले तर ते खरे आत्मसंयमन आहे. आध्यात्मिक प्रगतीचे ते एक चांगले साधन आहे.

पण मौनव्रत स्वीकाराथचे आणि पाटी पेन्सिलीच्या साहाय्याने इतरांशी विचार विनिमय करायचा, अशा मौनात मला तरी काही तत्त्व दिसत नाही. बोलणे मर्यादित होते इतकेच. सौभद्र नाटकात यतिवेषधारी अर्जुनाने मौन स्वीकारले होते, पण त्याच्या भावना व्यक्त होत होत्या, हा प्रसंग वाचकांना आठवत असेलच. 'नारायण' या एकाच शब्दाचा अनेक प्रकाराने उच्चार करून पसंती, प्रेम, राग, दुःख इत्यादी भावना नाटकातला अर्जुन व्यक्त करीत असतो. अनेक थोर सत्पुरुष अशा मौनाचे व्रत पाळतात. अनेक वर्षे मौन पाळून ठरादिक दिवशी मौन सोडणार व त्याचवेळी जगात मोठी क्रांती होणार असे एका सत्पुरुषाने जाहीर केले, पण तो दिवस येण्यापूर्वीच बिचारा दिवंगत झाला. त्यामुळे त्या मुनीचे मोठेपण कमी होत नाही पण 'मीच ईश्वर आहे' असे सांगणाऱ्या मानवाचे मानवपण लक्षात येते. आपण सर्व निसर्गाच्या नियमांचा एक भाग आहोत.

आध्यात्मिक मौन आणि त्यागा व्यक्त करणारे मौन यांतला फरक प्रेक्षकाला वरूनच कळू शकतो. आत्मोन्नतीकरता मौन धरणारा माणूस शांत, समाधानी, प्रेमळ, आनंदी, विचारी दिसतो. उलट त्याग्याच्या पोटी मौन धरणारा माणूस आतून जळफळत असतो आणि विकार त्याच्या अंतकरणात धुमसत असतात, म्हणून बाह्यतः अबोल असून देखील रुष्ट, दुःखी, वैतागलेला, असमाधानी असा तो दिसतो.

तुमच्या अनुभवात व पाहाण्यात असे किती मौनी आले आहेत ?

१०. अनीतिविरुद्ध मोहीम

चोरी, लबाडी, खोटे बोलणे, पैसे खाणे आणि अत्याचार करणे या दुर्गुणांचा प्रसार समाजात फार मोठ्या प्रमाणात झाला आहे. प्रत्येक कालखंडात हे दुर्गुण काही प्रमाणात असतातच, पण त्यांचे प्रमाण वाढले म्हणजे चिंता वाटू लागते, तशी परिस्थिती सध्या आली आहे. जिकडे पहावे तिकडे या गोष्टी दिसतात. या दुष्कृत्यापासून अलिप्त आहे असे एकही क्षेत्र दिसत नाही. पूर्वी अशी कल्पना असे की, पृथ्वीला पापांचा भार असह्य झाला म्हणजे परमेश्वर अवतार घेतो आणि अधर्माचा विनाश करून धर्माचे राज्य स्थापन करतो. सद्गुणांचा प्रसार करणारे, अलौकिक बुद्धीचे व कर्तबगारीचे शिवाजी–टिळक–गांधी यांच्यासारखे अलौकिक पुरुष हेच ईश्वराच्या अवतारासारखे आहेत. असा नैतिक गुणांचा भव्य आदर्श आज महाराष्ट्रात, भारतात किंवा सर्व जगात नाही ही एक प्रचलित कालाची शोकांतिका आहे.

यथा राजा तथा प्रजा. आज एक राजा राहिलेला नाही. ही राजसत्ता अनेक व्यक्तींमध्ये विभागलेली आहे. या व्यक्ती मध्यवर्ती लोकसभा, राज्यांतील विधानसभा आणि जिल्ह्यांतील व शहरांतील समित्या, नगरपालिका इत्यादी ठिकाणी आहेत. त्यांच्या हातात कायदा करण्याची, सार्वजनिक पैसा उभा करून तो खर्च करण्याची, श्रीमंतांना गरीब व गरिबांना श्रीमंत करण्याची—अशी अफाट सत्ता आहे. या सर्व लोकांतील काही लोकांनी जरी सदाचरणाचा आदर्श समाजापुढे ठेवला तरी वातावरणात खूपच बदल होईल. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे ? हे लोक आपापला स्वार्थ साधण्यात आणि सर्व मार्गांनी धनसंचय करण्यांत मशगुल झालेले आहेत. निवडणुकीत खर्च झालेला पैसा अनेक पटींनी वसूल कसा करता येईल ही त्यांची मुख्य विवंचना आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत हेच धोरण आहे. तेव्हा राजसत्ता पेलणारे हे लोक नैतिक ध्येयवाद पेलण्याला आणि त्याचा प्रसार करण्याला असमर्थ झाले आहेत. सत्तेच्या मागे लागलेल्या सर्वच पक्षांतील नेत्यांची व अनुयायांची ही स्थिती आहे.

दुष्कृत्ये आणि दुराचार यांचे स्वरूप किती व्यापक झालेले आहे पहा. खाजगी मालमत्तेच्या चोऱ्या आणि घरावर घातलेले दरोडे वर्तमानपत्रात येतात त्यापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणात घडत असले पाहिजेत. मोठी माणसे आणि लहान मुले यांना खोटे बोलणे म्हणजे काही वाटतंच नाही. कायद्याच्या कचाट्यात न सापडता दुसऱ्याच्या वस्तू पळवता आल्या तर त्या पळवाव्यात अशी वृत्ती बळावत चालली आहे. दुसऱ्याच्या बागेतील पिके, बायकांच्या गळ्यांतील मंगळसूत्रे,

प्रवाशांच्या हातांतील घड्याळे व खिशांतील वस्तू यांच्या चोरीचे प्रमाण वाढत आहे. लहानसहान व्यवहारात पैसे खाणे आणि लाचलुचपत ही आता एक स्थिर, सर्वमान्य आणि प्रतिष्ठित बाब झाली आहे. लहानसहान भांडणावरून वर्दळीवर येणे, मारामारी–जाळपोळ करणे, खून करणे, हातपाय तोडणे असे गुन्हे वाढत आहेत. रेल्वेमध्ये त्या खात्यातील नोकरांकडून होणाऱ्या चोऱ्यांना रेल्वेखातेही पायबंद घालू शकत नाही. यावरून शासनाची असमर्थता व नालायकी स्पष्टपणे दिसून येते.

खरोखर दुराचार आणि दुर्गुण यांचे प्रमाण वाढून हा रोग सर्व थरांत पसरल्यानंतर त्याचे निर्मूलन करणे शासनालाही कठिण जाणार आहे. या कार्याकरता समाजात वातावरण निर्माण झाले पाहिजे आणि दुराचार-निर्मूलनाची व सदाचार-प्रसाराची एक मोहीमच मोठ्या प्रमाणावर काढली पाहिजे. शासन-संस्थेने व राजकीय पक्षांनी सहकार्याने हे काम केले तर अल्प काळातच समाजात नैतिक क्रांती झाल्याचे दिसून येईल. असा काळ केव्हा तरी येईल अशी आशा करू या. शासनसंस्थेत व राजकीय पक्षांत अलौकिक ध्येयवादाचा एखादा नेता निर्माण झाल्यास तो हे कार्य हाती घेऊ शकेल. तरुण पिढीतील नेत्यांमध्ये या ध्येयवादाचा प्रसार करणे आवश्यक आहे. भविष्यकाळ त्यांचा आहे.

आपल्यासारख्या सामान्य जनांच्या हातात एक गोष्ट आहे. नैतिक विचारांचे आणि आचाराचे वातावरण निर्माण करणे प्रत्येकाला शक्य आहे. समाजात ही एक गुप्त मोहीमच सुरू करणे आपल्या हातात आहे. "व्हिस्परिंग कँपेन" म्हणतात त्या धर्तीवर आपापल्या वर्तुळात, मित्रमंडळीत, कुटुंबात, ऑफिसात, कारखान्यात, ज्या ज्या ठिकाणी व समाजात आपला संबंध येतो त्या त्या ठिकाणी सदाचाराचे व सद्गुणांचे वातावरण निर्माण करा. दुराचार आणि दुर्गुण यांविषयी तिरस्कार व घृणा निर्माण करा. मूलतः मानवी स्वभाव तुम्हांला अनुकूल आहे. माणसे स्वतः किती जरी वाईट असली तरी नैतिक ध्येयवादाविषयी त्यांना आदर असतो. चोर, दरोडेखोर, दारूबाज, वेश्या आणि गुन्हेगार—यांनाही त्यांची सदसद्विवेकबुद्धी टोचण्या देत असते. मनातून त्यांना सदाचार आणि सद्गुण यांविषयी आदर वाटतो. सामान्य जनांतही नैतिक गुणांविषयी प्रेम व आस्था असते, ती जागृत करणारे लोक हवेत. प्रत्येक व्यक्तीला हे काम करता येईल. चांगल्या विचारांचा, गोष्टींचा, सत्कृत्यांचा, वाङ्मयाचा आपापल्या वर्तुळात प्रसार करा. हे काम प्रत्येकाने केले पाहिजे याची जाणीव स्वतःच्या मनाशी ठेवा आणि हीच कल्पना इतरांच्या मनात रुजवा. अशी ही गुप्त मोहीम, व्हिस्परिंग कँपेन, हळूहळू मोठ्या प्रमाणात पसरली तर नैतिक वातावरण तयार होईल. त्यामुळे एक कार्यभाग साधेल. समाजाची सदसद्विवेकबुद्धी जागी ठेवल्याचे श्रेय

आपल्याला मिळेल. आज आपल्या भावनाच बोथट होत चालल्या आहेत. वाईट आणि निंद्य गोष्टींविषयी घृणा आणि तिरस्कार वाटण्याऐवजी उदासीनता वाटत आहे. आणखी काही काळाने याच दुर्गुणांविषयी सहिष्णुता वाटू लागेल. पुढे आपणच त्या दुर्गुणांना बळी पडू. वातावरणाचा हा परिणाम आहे. ते वातावरण आपण बदलू या. त्या कामी खाजगी भाषणे, व्याख्याने, वाङमय-प्रसार, हस्त-लिखित वाङमय-प्रसार, ग्रंथालय स्थापना, उत्सव इत्यादी सर्व साधनांचा उपयोग होऊ शकेल.

या गुप्त मोहिमेचा फायदा आपल्यापैकी प्रत्येकाला होणार आहे. म्हणून स्वार्थाच्या दृष्टीने तरी प्रत्येकाने एवढे कार्य केले पाहिजे.

[८-८-१९६७

११. मद्यपानाला प्रतिष्ठा देऊ नका

पुण्यातील सुशिक्षितांच्या वस्तीत पाश्चिमात्य पद्धतीचे एक होटेल पूर्वीच सुरू झाले होते. त्या ठिकाणी प्रगतीचे एक पाऊल म्हणून मद्यपानाचा अड्डा (बार) मोठ्या समारंभाने सुरू करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्ष आणि मुख्य पाहुणे म्हणून दोन प्रतिष्ठित व आदरणीय व्यक्तींना योजण्यात आले व त्या व्यक्तींनी तो समारंभ साजरा केला.

मी स्वतः बुद्धिवादी आणि पुरोगामी प्रगतिशील विचाराचा माणूस आहे. माझे विचार अंधश्रद्धेवर आधारलेले नाहीत. समाजजीवन तर्कशुद्ध पद्धतीने व विज्ञानवादी श्रद्धेने चालावे अशा मताचा मी आहे. मद्यपान हे पाप आहे, ते केल्याने माणसे नरकात जातात, असेही मी मानीत नाही. तरीदेखील वरील घटना ही अनिष्ट झाली, असा समारंभ व्हायला नको होता, त्याला प्रतिष्ठित व्यक्तींनी जायला नको होते आणि सुशिक्षित निमंत्रितांनीही जायला नको होते असे मला वाटले. ज्या लोकांनी हा समारंभ घडवून आणला ते बोलून चालून व्यापारी वृत्तीचेच होते, त्यांना दोष देण्यात अर्थ नाही. पण त्यांची जाहिरात करण्याला जे बळी पडले त्यांनी आपल्या वर्तनाचा समाजावर होणारा दूरगामी परिणाम लक्षात घेतला नाही असे मला वाटते. मद्यपानाला त्यांनी प्रतिष्ठित स्थान (स्टेटस) आणि सुसंस्कृत जीवनाचा एक अपरिहार्य भाग असे स्वरूप दिले ही चूक झाली. कॉलेज विद्यार्थी, तरुण–तरुणी, कामगार वर्ग व बहुजनसमाज या सर्वांवर त्याचा काय परिणाम होईल त्याचा विचार झाला नाही.

कै. कृ. प. खाडिलकर यांच्या विद्याहरण नाटकातील एक महत्त्वाचा प्रवेश

मला आठवतो. शुक्राचार्याचे शिष्य, राजघराण्यातील राजे व राजपुत्र, मद्यपान महोत्सवाचा एक मोठा समारंभ योजतात. त्या ठिकाणी कच येतो आणि तो प्रकार पहातो. विद्वान माणसे आणि राजसत्ता दोघांच्या सहकार्याने मद्यपानाला प्रतिष्ठित स्थाने देण्याचा तो प्रयत्न पाहून कच संतप्त होतो आणि तेथे भरलेले मद्याचे घट लाथेने ठोकरून देतो.

मद्यपानाचे मध्यम वर्गातील कुटुंबावर होणारे घातक परिणाम कै. राम गणेश गडकरी यांनी 'एकच प्याला' नाटकात अत्यंत सहृदयतेने चित्रित केले आहेत. वाङ्मय आणि बोध यांचा सुंदर मिलाफ होऊ शकतो हे दाखवणारे नाटक म्हणजे 'एकच प्याला'. आजही हा विषय साहित्यिकांच्या प्रतिभेला आवाहन करणारा राहिला आहे.

सोमपान आणि मदिरापान भारतात पूर्वापार चालत आलेले आहे. परंतु समाजावर होणारे त्याचे दुष्परिणाम लक्षात आल्यानंतर मद्यपानाला समाजात कनिष्ठ व हीन स्थान देण्यात आले. सुसंस्कृत सुशिक्षित व्यक्तींनी मद्यपान करणे हे पाप आहे असा संकेत पाडण्यात आला. पुढे इंग्रजांचे राज्य आले. त्यांच्या समाजात मद्यपानाला प्रतिष्ठा होती. त्यामुळे भारतातही लौकरच मद्यपानाला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त झाली. अधिकारी, व्यापारी, श्रीमंत लोक यांच्या भेटीगाठीत मद्यपानाला अग्रस्थान असे. मद्यपान न करणारे लोक सनातनी, मागासलेले, अप्रतिष्ठित, अडाणी समजले जाऊ लागले. श्रीमंतांचे अनुकरण करणारे बहुजन समाजातील लहान मोठे लोकही मद्यपानाचे दास बनले. त्यामुळे अनेक कुटुंबे धुळीला मिळाली. मुंबई–पुण्यासारख्या शहरांत कामगारवर्गाच्या अनेक कुटुंबांचा दारूमुळे सत्यानाश झाला. कामाचे पैसे आले की दारू पिऊन घरी यायचे आणि बायकापोरांना यथेच्छ मारायचे अशी दृश्ये ठिकठिकाणी दिसू लागली. बायकोने दारूला पैसे दिले नाहीत म्हणून तिच्या अंगावर रॉकेल ओतून तिला जाळणारे नरपशू दारूने निर्माण केले ! अशा दारूला इंग्रज राज्यकर्त्यांनी प्रतिष्ठेचे स्थान दिले आणि येथील श्रेष्ठ आणि कनिष्ठ समाजवर्ग त्या मोहाला बळी गेला.

विसाव्या शतकाचे आरंभी राष्ट्रीय चळवळीला जोर चढला. राष्ट्रीय चळवळीत मद्यपानबंदी हा एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनी मद्यपान-बंदीकरता खूप प्रयत्न केले. त्यामुळे देशातील राष्ट्रीय चळवळीचे पुढारी मद्यपानापासून अलिप्त होते. मद्यपान हे समाजाला व व्यक्तीला घातक आहे, त्यात प्रतिष्ठितपणा नाही हे तत्त्व राष्ट्रीय पुढाऱ्यांनी लोकांच्या मनावर पुष्कळ प्रमाणात ठसविले. इंग्रजाच्या अमदानीत दारू पिणारा प्रतिष्ठित समजला जाई व न पिणारा अडाणी मानला जाई. राष्ट्रीय चळवळीच्या व नंतर स्वातंत्र्याच्या प्रारंभ-काळात मद्यपान न करणारा प्रतिष्ठित समजला

जाई व मद्यपान करणाऱ्या व्यक्तींचा तिरस्कार केला जाई. अमुक मनुष्य दारू पितो असे कळले तर त्या व्यक्तिविषयीचा समाजातील आदर कमी होई. सारांश या काळात मद्यपान-व्यसनाची प्रतिष्ठा गेली आणि मद्यपान करणाऱ्या निर्व्यसनी माणसांना प्रतिष्ठा प्राप्त झाली.

स्वातंत्र्य–काळात दारूबंदीचा कायदा आला. त्यामुळे दारू करण्याचा धंदा भूमिगत झाला, आणि कायद्याचा परिणाम अनिष्ट होऊन प्रतिक्रिया उलट झाली व कायदा रद्द करण्याची मागणी होऊ लागली. लौकरच दारूबंदी-कायदे सर्वत्र रद्द होतील. अमेरिकेतही हाच अनुभव आला. कायद्याने दारूबंदी होऊ शकत नाही. समाजातील जीवनमूल्ये बदलणे हे महत्त्वाचे आहे. मद्यपानाला प्रतिष्ठामूल्य आले होते, ते कमी करणे हे आवश्यक आहे. दारूबंदी कायदा रद्द झाला तरी दारूपान हे वाईट आणि समाजघातक आहे ही भावना जागृत ठेवली पाहिजे. सुसंस्कृत सुशिक्षित व्यक्तीने मद्यपान करणे हे प्रतिष्ठितपणाचे लक्षण नाही, त्याचप्रमाणे मद्यपान न करणे हे काही मागासलेपणाचे लक्षण नाही—या कल्पना समाजात रूढ होणे जरूर आहे. मद्यपानाला प्रतिष्ठा आणि निर्व्यसनीपणाला अप्रतिष्ठा अशी अवस्था समाजात आली तर चांगल्या मूल्यांचा घात झाल्यासारखे होईल.

मद्यपान हे सर्व दृष्टींनी घातक आहे. त्यामुळे व्यक्तीचे अधःपतन होते आणि कुटुंबे धुळीला मिळतात. मितपान म्हणून आवश्यक असेल त्यांनी ते करावे पण त्या आपल्या व्यसनाधीनतेला प्रतिष्ठा देऊ नये. त्याचे प्रदर्शन करू नये. मद्यपान करणारी समाजातील व्यक्ती कर्तबगारीने, सत्तेने, संपत्तीने, शिक्षणाने कितीही मोठी असली तरी दारूच्या व्यसनामुळे तिचा मोठेपणा कमी होतो. तिच्या चांगल्या गुणांचे अनुकरण करा. मद्यपान व्यसनाचे अनुकरण करू नका असे माझे निक्षून सांगणे आहे.

[१८-९-१९६७

१२. अभ्यासाचा आराखडा—मुलांचा व तुमचा

"नेमेचि येतो मग पावसाळा । हे सृष्टिचे कौतुक जाण बाळा ।।" या काव्यपंक्तीप्रमाणे पावसाळ्याचा जून महिना लागला आणि बौद्धिक जीवनातील कॅलेंडरचे पहिले पान सुरू झाले. तुमच्या घरातील मुले आणि मुली शाळेत किंवा कॉलेजात जाऊ लागली आणि त्यांच्या अभ्यासांनाही सुरुवात झाली. माँटेसरी किंवा किंडर गार्टन वर्गात जाणाऱ्या बाल-बालिकांना तीन चार तास घरापासून

दूर राहण्याचा प्रथमच प्रसंग आला असेल. विद्येच्या नवीन जगात त्यांचा प्रवेश होत आहे. त्यांचे हे उपनयनच झाले, असे म्हणावयास हरकत नाही. पहिल्या इयत्तेतील मुलांनी श्रीगणेशाला किंवा गमभनला प्रारंभ केला असेल. माध्यमिक शाळेतील मुलांनी इंग्रजी, संस्कृत, विज्ञान, हिन्दी इत्यादी नवीन विषयांच्या अभ्यासाला प्रारंभ केला असेल. महाविद्यालयात जाणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांनी इंजिनिअरिंग, मेडिकल इत्यादी नवीन विषयांच्या अभ्यासक्रमांना प्रारंभ केला असेल. शाळेत आणि घरात अभ्यासाचे वातावरण निर्माण झाले असेल, होईल किंवा व्हावे.

तुमच्या मुला-मुलींचा अभ्यास वर्षभर, प्रारंभापासून, मध्यकालात व शेवटी, अखंडपणे, सातत्याने आणि नियमितपणाने झाला पाहिजे. याकरिता त्यांना महिनावार अभ्यासाचा आराखडा करायला सांगा किंवा तुम्ही करून द्या. त्याचप्रमाणे त्यांना दैनिक अभ्यासाचे वेळापत्रक करायला सांगा किंवा तुम्ही दोघे मिळून ते तयार करा. मुलांच्या संमतीने करा. त्यांच्यावर लादू नका. अभ्यासातील यशाची निश्चिती करण्याच्या दृष्टीने वरील दोन गोष्टींची अत्यंत जरुरी आहे.

आता आदर्श पालक या दृष्टीने आपणही या वयात अभ्यास करतो असे मुलांना प्रत्यक्ष दिसू द्या. तुमचा स्वतःचा या वर्षातील अभ्यासाचा आराखडा तयार करा आणि त्याकरिता दिवसातील, आठवड्यातील आणि महिन्यातील निश्चित काल राखून ठेवा. असे केल्यास सवडीच्या वेळात आणि सुटीच्या दिवसांत काय करावे हा प्रश्न पडणार नाही. आता प्रश्न विचाराल की आम्ही मोठ्या माणसांनी अभ्यास कसला करायचा ?

मला हे माहीत आहे की आजकाल प्रसिद्ध होणाऱ्या साप्तहिकांतून आणि मासिकांतून प्रसिद्ध होणारे हलके-फुलके कथात्मक वाङ्मय तुम्ही वाचता. मला हेही माहीत आहे की आमच्या सुशिक्षित गृहिणींचाही बहुतेक रिकामा वेळ असले सोपे करमणुकीचे वाङ्मय वाचण्यात आणि 'विविध भारती' किंवा 'सिलोन' ऐकण्यात जातो. या गोष्टींकरिता थोडा वेळ अवश्य द्या; पण 'थोडा' हा शब्द 'पुष्कळ' प्रमाणात ध्यानात ठेवा. चटणी-कोशिंबीर खाऊन पोषण होऊ शकत नाही. सकस अन्नही खावे लागते. तुमच्या ठिकाणी परमेश्वराने बुद्धी दिली आहे. तिचे पोषण आणि विकास होण्याकरिता तुम्ही, आई-बापांनीही, रोज नियमितपणे थोडा तरी अभ्यास केला पाहिजे. त्याकरिता तुमच्या आवडीचा विषय घ्या. इतिहास, समाजशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान, वाङ्मय, विज्ञान, कला, संगीत-शास्त्र, गृहजीवनशास्त्र, आरोग्यशास्त्र, होमिओपॅथी, आयुर्वेद, ज्योतिष, हस्त-सामुद्रिक, हे किंवा अशासारखे अभ्यासाचे विषय निवडा. दहा-बारा वर्षांत या विषयांवर अधिकाराने बोलण्याइतपत तुमची तयारी होईल. तुमच्या अभ्यासाचा

विषय व्यवसायाशी निगडित असला तर तुमच्या अभ्यासामुळे तुम्हाला वरची खुर्ची मिळेल.

सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे आपले आई-बाप देखील अभ्यास करतात असे तुमची मुले मोठ्या अभिमानाने सांगतील. 'त्यांचा आदर्श पुढे ठेवून आम्हीही अभ्यास केला व जीवनात यशस्वी झालो' असे आपल्या मुलांना ते मोठेपणी सांगतील. प्रारंभ करा.

[१५-६-१९६८

१३. जुन्या नव्या पिढीतील संघर्ष

मानवी संस्कृती सुरू झाली तेव्हापासून जुन्या नव्या पिढीतील संघर्ष चालूच आहे. तो कधी इष्ट दिशेने जातो, कधी अनिष्ट दिशेनेही जातो. पण अशा संघर्षातूनच प्रत्येक पिढी एकेक पाऊल पुढे जात असते. संघर्षाला इष्ट वळण लावणे हे विचारवंतांचे काम आहे.

असा संघर्ष प्रत्येक कालखंडात असला तरी त्याचे स्वरूप सध्या तीव्र झालेले आहे. त्याचे कारण आजचे युग हे संघटनाप्रधान असल्यामुळे संघटनेचे सामर्थ्य, विशेषतः संख्याबलाचे सामर्थ्य, प्रत्येक चळवळीला मिळते. गतकालातील तरुण पिढीपेक्षा आजची तरुण पिढी, किंवा कॉलेजमध्ये जाणारा प्रौढ विद्यार्थी-वर्ग, हा अधिक संघटित झाला आहे. संख्याबलाने व संघटनेच्या जोरावर आपले म्हणणे शक्यतर वादविवादाने, आणि ते न जमल्यास सामर्थ्याने, समाजावर आपण लादू शकतो असा विश्वास तरुण पिढीत उत्पन्न झाला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील असंतोष आणि उद्रेक हे भारतापुरतेच मर्यादित नसून त्यांचा प्रसार जगातील सर्व देशांत झाला आहे. जपान, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, अमेरिका अशा पुढारलेल्या सर्व देशांतून विद्यार्थ्यांच्या असंतोषाच्या आणि बंडखोरवृत्तीच्या वार्ता येत आहेत.

नव्या जुन्या पिढीतील संघर्षाचे हे लोण काही कुटुंबात आलेही असेल. जेथे अद्याप आले नसेल तेथे येण्याचा संभव आहे. कौटुंबिक जीवनातील स्वास्थ्याच्या दृष्टीने प्रत्येक घरातील पालकांनी व तरुणांनी या संघर्षाकडे जरा विचारपूर्वक आणि चिकित्सक दृष्टीने पाहावे. आपल्या ठिकाणी योग्य ती सुधारणा करावी.

गेल्या पाचपन्नास वर्षांत काही देशांची व समाजाची आर्थिक स्थिती खूप सुधारली आहे. त्यामुळे संपत्तीत वाढ झाली आहे. यांत्रिक सुधारणांमुळे सुखोपभोगाच्या आणि विलासाच्या साधनसामग्रीतही खूप वाढ झाली आहे. त्यामुळे

पुढारलेल्या देशांतील समाज भौतिक आणि शारीरिक सुखांचा पाठलाग करण्यात, आणि ती प्राप्त व्हावीत म्हणून न्यायाने अथवा अन्यायाने, नैतिक अथवा अनैतिक मार्गांनी, सत्ता आणि संपत्ती मिळविण्याच्या नादात गर्क आहेत. त्यामुळे वयस्क अशा प्रौढ पिढीच्या ठिकाणी नैतिक अधिष्ठान राहिलेले नाही. तरुण पिढीला मार्गदर्शन आणि उपदेश करण्याचा त्यांचा अधिकार नष्ट आणि भ्रष्ट झाला आहे. औद्योगिक, व्यापारी, राजकीय, कामगारविषयक, कलाविषयक, वाङ्मयात्मक, आणि शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील प्रौढ पिढी, तरुणांना मार्गदर्शन व उपदेश करण्याचा आव आणते, परंतु स्वतः सर्व नैतिक आणि सामाजिक तत्त्वांचे उल्लंघन करते, ही विसंगती उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रौढ विद्यार्थ्यांच्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही. जुन्या पिढीविरुद्ध बंडखोरी पुकारण्याचे हे एक बलवत्तर कारण आहे.

दुसरेही एक कारण आहे. आजचा जमाना लोकशाहीचा आहे. प्रौढ झालेल्या प्रत्येक तरुणाला स्वतःच्या मतांची व विचारांची जाणीव झाली आहे. आपली मते ऐकली जावीत असे त्याला वाटते. लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाचा फायदा आपल्यालाही मिळावा असे तो अपेक्षितो. परंतु नव्या पिढीशी वागताना जुन्या पिढीतील लोक अधिकारशाहीचाच उपयोग करण्याची परंपरा चालू ठेवतात. आजच्या नव्या जमान्यात ही विसंगती आहे. लोकशाहीच्या गप्पा मारणारे प्रौढ लोक आपल्याकडून मात्र 'शिरसावंद्य' आज्ञापालनाची अपेक्षा करतात, ही विसंगती तरुण पिढीला बोचते. बंडखोरीचे हे दुसरे कारण आहे.

आपला असंतोष प्रकट करण्याचे नवे नवे मार्ग विद्यार्थ्यांनी आपल्या वडीलधारी पिढीकडून आत्मसात् केले आहेत. संप, सत्याग्रह, घेरावो, मोडतोड, जाळपोळ, मारहाण, जबरदस्ती, कायदे व नियम धाब्यावर बसविणे—हे मार्ग आज राजकीय व औद्योगिक क्षेत्रांत प्रचलित आहेत. त्यांचे अनुकरण खाली विद्यार्थी-वर्गात उतरल्यास दोष कोणाकडे ? सुधारणेला प्रारंभ कोठे व्हायला हवा ? विचार करा.

या परिस्थितीत सुधारणा वरच्या थरातून झाली पाहिजे. वयस्क, प्रौढ, अधिकारी आणि श्रेष्ठ अशा व्यक्तींनी नैतिक आणि सामाजिक तत्त्वांचे आचरण स्वतः करून तरुण पिढीपुढे योग्य आदर्श ठेवला पाहिजे. आत्मसंयमन, सहिष्णुता, न्याय, त्यागवृत्ती, लोकशाहीवृत्ती इत्यादी गुणांचे आचरण स्वतः केले पाहिजे. त्यामुळे तरुण पिढीला उपदेश करण्याचा अधिकार त्यांना पुन्हा प्राप्त होईल. तरुण पिढीही त्यांना मान देईल. कारण उच्च आणि उदात्त अशा ध्येयवादाचे आकर्षण तरुण पिढीला नेहमीच असते.

[२५-७-१९६८

१७. पेंढा भरलेली माणसे

चित्रपटाच्या जाहिराती प्रेक्षकांच्या कामुक भावनांना आव्हान करणाऱ्या व चेतवणाऱ्या असतात. बोलून चालून चित्रपट निर्मिती, चित्रपटगृहे आणि त्यांच्या जाहिराती करणाऱ्या संस्था हे सर्व पैशाचे भुकेले असतात. समाजाच्या सर्व चांगल्या व वाईट भावनांचा व विकारांचा उपयोग करून घेऊन आपले खिसे भरणे हे त्यांचे उघड उघड ध्येय असते. खिसे हा शब्द फारच क्षुद्र झाला, तिजोऱ्या भरणे असा प्रयोग करायला पाहिजे. पण कधी कधी चित्रपटांच्या या जाहिराती देखील चांगल्या कल्पना देऊन जातात व लक्षात ठेवण्यासारखं तत्त्व शिकवतात.

मी एका चित्रपटाची जाहिरात वाचली—'ए वुमन ऑफ स्ट्रॉ'. म्हणजे 'पेंढा भरलेली स्त्री'. त्या नावाखाली मोठा उद्‌बोधक खुलासा होता. यू कॅन ईझिली सेट फायर टु ए वुमन ऑफ स्ट्रॉ. पेंढा भरलेल्या बाईला तुम्ही सहज पेटवू शकता. चित्रपटाच्या नावाने व त्याच्या खुलाशाने तुमच्या मनात काय काय विचार येतात ते तर पहा.

म्हणे गवताने आणि पेंढ्याने भरलेल्या बाया झटकन पेट घेतात ! पण पुरुष तरी काही निराळे आहेत थोडेच ! काही पुरुषांची मने देखील गवताची असतात आणि ठिणगी पडल्याबरोबर ती पेट घेतात. स्त्री-पुरुष असा भेद करायचे कारण दिसत नाही. दोघांच्या मनात दारूगोळा ठासलेला असतो. ठिणगी पडल्याबरोबर भडका उडतो. बाहेरची ठिणगी पडायचीही जरुरी नसते. स्वतःच्या घर्षणानेही तो भडकू शकतो. मात्र हे काही व्यक्तींच्या बाबतीत लागू आहे. सरसकट सर्व स्त्री-पुरुषांच्या बाबतीत नाही.

अनेक स्त्री-पुरुषांची मने पोलादी असतात. पोलाद नेहेमी थंड राहाते तशी ही माणसेही मनाने शांत असतात. लहान सहान गोष्टींनी ती भडकत नाहीत. कधी काळी ती तापली तरी मऊ होतात व नवा आकार घेतात. त्यांचे पोलादी मूळ द्रव्य कायम राहाते. उलट गवताची राख होऊन जाते. पेंढा जळून खाक होतो. स्वतःचाच नाश करून घेतो.

वरील सिनेमात मुख्यतः कामविकाराला धरून स्त्री-पुरुषांच्या घटना दाखवल्या असतील, पण कामविकाराच्या बाबतीत माणसा--माणसात भेद आहे, तसाच इतर विकारांचे बाबतीतही आहे. काहींचा कामविकार सहज क्षुल्लक गोष्टीने पेट घेतो तर काही अत्यंत संयमी वृत्तीने राहू शकतात. विकारहेतौ सति विक्रियन्ते । येषां न चेतांसि त एव धीराः ।। असे कालिदास कवीचे वचन

आहे. 'विकाराला जागृत करणारी परिस्थिती असतानाही ज्यांची मने विकार-रहित राहू शकतात तीच माणसे शहाणी', असा वरील वचनाचा अर्थ आहे.

विकारात अनेक प्रकार आहेत. कामविकाराइतकेच प्रबळ विकार म्हणजे क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे आहेत. काही व्यक्तींच्या बाबतीत हे विकार देखील सहज जागे होणारे असतात. लहान सहान गोष्टीवरून रागावणारी माणसे आपल्या आवतीभोवती किती तरी असतात. आपण फार रागीट आहोत याचा त्यांना अभिमान वाटतो आणि त्याचीच ते इतरांना भीती घालीत असतात. 'माझा राग फार वाईट आहे बर का' असे ते वारंवार बजावीत असतात. बायकोने वेळेवर जेवण केले नाही म्हणून रागावलेल्या एका नवरोजीने तिला ठार मारले. क्रोधाला बळी पडलेली माणसे त्या भावनेच्या भरात वाटेल ते अविचारी कृत्य करून जातात. दुसऱ्याला टाकून बोलतात आणि त्यांना जन्माचे शत्रू करून ठेवतात. क्रोधाच्या विकारामुळे नवरा-बायको, पिता-पुत्र, मित्र-मित्र यांचे संबंध कायमचे दुरावले गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. दुसऱ्या बाजूला आपल्या क्रोधावर नियंत्रण ठेवणारी शांत वृत्तीचीही अनेक माणसे पाहायला सापडतात. न्यूटन हा एक महान संशोधक व शास्त्रज्ञ होता. त्याच्या आवडत्या कुत्र्याने दिवा पाडून न्यूटनचा एक महत्त्वाचा हस्तलिखित ग्रंथ जाळून टाकला. एखाद्या विद्वानाने त्या कुत्र्याची चामडी लोळवली असती. पण न्यूटन एवढेच म्हणाला--'डायमंड, काय केलस हे ?' पोलादी माणसाचे मन शांत राहाते गवताच्या माणसाचे मन सहज पेट घेते.

लोभ, मोह, मत्सर यांचेही असेच आहे. लहान मोठ्या वस्तूंची चोरी करणारे अनेक लोक लोभाला बळी पडलेले असतात. लाचलुचपतीची वाढ लोभाच्या विकारामुळेच होते. आठ आणे रुपयापासून लाख रुपयापर्यंत लाच घेऊन वाटेल ते काम करायला तयार होणारी माणसे समाजात आहेत. संपत्तीच्या, शेतजमिनीच्या आणि दागिन्यांच्या लोभापायी खून करणारे नराधम जगात आहेत. आपल्या म्हाताऱ्या मावशीचे दागिने मिळवण्याकरता एका नरपशूने तिचे तुकडे तुकडे केले आणि ते एका पेटीत घालून ती तळघात टाकून दिली ! लोभ आणि मत्सर यांचे मूर्तिमंत उदाहरण समाजापुढे राहावे म्हणून वाल्मीकीने रामायणात कैकयीचे पात्र उभे केलेले आहे. मत्सराचा विकार प्रत्येकाच्या मनात थोड्या फार प्रमाणात असतोच. आपल्यापेक्षा अधिक श्रीमंत, सुखी आणि वरिष्ठ स्थितीत असलेल्यांचा अनेकांना मत्सर वाटतो. सौंदर्य, अलंकार आणि उंची वस्त्रे याबाबतीत स्त्रियांना परस्परांचा मत्सर वाटतो ही गोष्ट सर्वत्रच दिसते. लोभ आणि मत्सर यांना बळी पडणारी माणसे आहेत तशीच या विकारांना ताब्यात ठेवणाऱ्याही अनेक व्यक्ती आहेत.

पोलादी मनाच्या व्यक्ती पहा आणि त्यांचे अनुकरण करा. पेंढा भरलेल्या

माणसाचे कौतुक करू नका. पोलादी मनाची माणसे धीर, गंभीर, शांत, संयमी, निर्लोभी, निरहंकारी, दयाळू अशी असतात. ती आहेत म्हणून जगात आनंद आहे.

आता विचार करा तुमच्यात पेंढा भरला आहे का पोलाद ?

[३-८-१९६८

१५. नवे संसार व सांसारिक

यंदा सिंहस्थ असूनही मंगल विवाहकार्यांचा मोसम जोरात गेला आणि नवीन नवीन मुहूर्त निघून अधून-मधून विवाह चालूच आहेत. नूतन वधूवरांनी आपले घरकुल थाटून नवीन संसाराला सुरुवात केली असेल. काही लवकरच करतील. नवीन संसाराचा अनुभव हा ज्याला त्याला प्रत्यक्षच घ्यावयाचा असतो आणि त्यातून आपले व्यावहारिक तत्त्वज्ञान बनवावयाचे असते. इतर अनुभवी माणसांच्या अनुभवाचाही थोडा उपयोग करून घेतल्यास संसारात अधिक सुख लाभेल ! कमी निराशा पदरात पडेल आणि खटकणारे प्रसंग कमी येतील.

विवाहानंतरचे पहिले काही दिवस किंवा महिने काही अंशी स्वप्नसृष्टीतच जातात! परस्परांविषयीच्या नवीन आकर्षणामुळे आपल्या जोडीदाराच्या व्यक्तित्वावर मनाने चढवलेला एक काल्पनिक मुलामा असतो. प्रत्यक्षात असलेल्या गुणांपेक्षा काल्पनिक गुण चढविण्याची नैसर्गिक प्रवृत्ती असते. शहाणी माणसेही याला अपवाद असू शकत नाहीत. कारण उघडच आहे. प्रेम आंधळे असते. "शी वॉज् ए फॅन्टम् ऑफ् डिलाइट्" असे वर्डस्वर्थचे एक सुंदर काव्य आहे.

संसारात प्रत्यक्ष पदार्पण केल्यानंतर हा मुलामा हळूहळू झिजून जातो. कल्पनेने विणलेला जोडीदारावरील वुरखा हळूहळू विरून जातो. मुळात असलेला जोडीदाराचा स्वभाव व गुणदोष दृष्टीस येऊ लागतात. आपण केलेल्या कल्पनेत वरीच अतिशयोक्ती होती हे लक्षात येऊ लागते. प्रारंभीच्या गणितात हळूहळू वजाबाकी होऊ लागते. हीच अत्यंत कसोटीची आणि आणीवाणीची वेळ असते. ह्या कसोटीतून जे जोडपे शिरसलामत बाहेर पडते, त्याचा संसार सुखाचा होतो. ह्या दिव्यातून ज्यांना बाहेर पडता येत नाही त्यांचे जीवन दुःखमय होते.

संसार ही एक तडजोड आहे. त्यामध्ये आपल्या स्वभावाला मुरड घालावी लागते. जोडीदाराशी जमवून घ्यावे लागते. दुसऱ्या माणसालाही त्याचे त्याचे व्यक्तिमत्त्व आहे, आणि ते राहणार, याची जाणीव ठेवावी लागते. कोणत्याही दोन माणसांचे स्वभाव अगदी तंतोतंत जमू शकत नाहीत. मग योगायोगाने, गणगोत्र जुळवून, अनेक अटी पुऱ्या करून, एकत्र आलेल्या दांपत्यात तंतोतंत

जुळणारे स्वभाव मिळणे कितीतरी अधिक कठीण आहे. व्यक्तीच्या स्वभावरचनेचे हे मानसशास्त्र ज्यांना समजते ते जमवून घेतात व सुखी होतात.

संसारात आपल्या जोडीदाराचे व्यक्तिमत्त्व ओळखले पाहिजे आणि त्याचा आदर केला पाहिजे. त्याबरोबर आपल्या स्वतःच्या स्वभावाला मुरड घातली पाहिजे. हा देवघेवीचा प्रश्न आहे. परस्परांचे गुणदोष ओळखून एकमेकांचा स्वीकार केला पाहिजे. आपल्या स्वतःमध्ये अनेक दोष असूनही आपण स्वतःवर प्रेम करू शकतो ना ? मग आपल्या जोडीदारात काही दोष असल्यास त्याबद्दलही सहिष्णुता बाळगणे आपल्याला शक्य नाही काय ? संसार म्हणजे लघुकथा, नाटक, कादंबरी यांच्या कागदी जगातून दगडमातीच्या आणि हाडामासाच्या जगात यावयाचे असते. "हे विश्व आपल्या दोघांचे आहे" ही काव्यकल्पना सोडून, आपण आपल्या मोठ्या कुटुंबाचे व समाजाचे घटक आहोत ही जाणीव ठेवावयास पाहिजे. उभयतांचे जवळचे व लांबचे नातेवाईक, शेजारीपाजारी, मित्रमैत्रिणी, इतक्या सगळ्यांचे मिळून नवीन जग निर्माण होते. त्यांच्या उपयोगी पडावे लागते व मदतीला जावे लागते. असे केले तरच आपल्या अडचणीत आपल्याला इतर लोक उपयोगी पडतील.

संसार म्हणजे चोवीस तास प्रेम करणे नाही, हे लवकरच कळते. घराकरता पागडी, पैशाच्या अडचणी, तुटीचे अंदाजपत्रक, कर्ज, आजारीपण, बाळंतपण, ऑपरेशन्स, डॉक्टरांची बिले, बेकारी, कष्टाची कामे, विरह, नको असलेले पाहुणे, जवळच्या नातेवाइकांचे मृत्यू, आपल्याविषयी इतरांना वाटणारा हेवा, मत्सर आणि द्वेष, इतरांच्या विषयी आपल्या तशाच भावना, अशा अनेक गोष्टींनी संसार भरलेला आहे. या गोष्टी सहन करावयास समर्थ करणारी सुखेही संसारात आहेत. पती-पत्नींचा जिव्हाळा, अपत्यांचे कौतुक, साजूक अन्नाचा आहार, सात्त्विक करमणुकी इत्यादी अनेक सुखे आहेत म्हणून माणसे संसार सहन करतात. त्यांच्या साहाय्याने नवीन दांपत्याला मानवी जीवन पूर्ण करावयाचे आहे. आपला स्वभाव विकसित करावयाचा आहे.

संसार हे मानवी जीवन पूर्ण करण्याचे एक साधन आहे. प्रारंभी ज्या स्वभावाने संसाराला प्रारंभ केला, त्यामध्ये कालांतराने विकास आणि प्रगती झाली तरच संसार यशस्वी झाला. तीस चाळीस वर्षांनंतर आपल्या संसाराचे सिंहावलोकन करणारांना आपल्या स्वभावात आत्मसंयमन, प्रसन्नता, शांती, सहिष्णुता, भूतदया, क्षमाक्षीलता, सदभिरुची इ. सद्गुणांचा विकास झालेला दिसेल तरच गृहस्थाश्रम यशस्वी झाला असे म्हणता येईल. "धन्यो गृहस्थाश्रमः।" याचा असा अर्थ आहे.

[१५-८-१९६८

१६. इंटरक्लासची हकालपट्टी

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या अनेक घटना झाल्या त्यांत रेल्वेवरील इंटरमीजिएट क्लास बंद झाला ही मोठी निदर्शक, सूचक आणि प्रतीकात्मक गोष्ट आहे. रेल्वेवर सेकंडक्लास ठेवला असला तरी डेक्कनक्वीन सारख्या गाडयांवर आणि लोकल गाडयांवर फक्त पहिला आणि तिसरा हे वर्ग आहेत. पहिल्या वर्गाचा तिप्पट चौपट दर तरी द्या, नाहीतर सरळ गर्दीत चेंगराचेंगरी सहन करून शीर-सलामत राहाल अशा बेताने प्रवास करा. औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रात ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मध्यमवर्ग काम करतो त्या ठिकाणी असे दोनच वर्ग ठेवणे हा सोलीव निर्बुद्धपणा आहे !

गेल्या १५-२० वर्षांत झालेले कायदे मध्यम वर्गाच्या मुळावर आलेले आहेत. घरभाडे कायदा, जमीनविषयक कायदे, सुवर्णनियंत्रण, ही काही ठळक उदाहरणे आहेत. सारी हयात संरक्षण खात्यात किंवा सरकारी नोकरीत घालवून पदरी साठविलेले चार पैसे म्हातारपणी उपयोगी पडावेत म्हणून काही लोकांनी मोठ्या विश्वासाने ते जमिनीत किंवा घरबांधणीत गुंतविले. उद्देश हा की हातपाय थकल्यानंतर ह्या व्यवहारातून पोटापुरती प्राप्ती व्हावी. भीक मागण्याचा प्रसंग येऊ नये. ह्या सर्व लोकांच्या आशाआकांक्षांना कायदा करणाऱ्याच्या लेखणीच्या एका फटकाऱ्याने बरबाद करून टाकले. ही गोष्ट बुद्धिपुरःसर केली असेल तर तो दुष्टपणा आहे; आणि परिणाम न जाणता सहजगत्या केली असेल तर तो अदूरदर्शीपणा आहे.

मध्यमवर्ग म्हणजे केवळ ब्राह्मणवर्गच आहे अशी चुकीची कल्पना करून घेऊ नका. वरच्या आणि खालच्या अशा दोन्ही वर्गांचा आश्रयस्थान असा हा मधला वर्ग आहे. त्याने आर्थिक स्थिती दर्शविली जाते त्याचप्रमाणे मानसिक आणि सांस्कृतिक पातळीही दाखविली जाते.

शिक्षणाची आवड आणि त्याकरिता त्यागाची तयारी हा ह्या वर्गाचा विशेष गुण आहे. मोलाने स्वयंपाक करणारी बाई आणि भांडी घासणारी मोलकरीण देखील कष्ट सोसून आपल्या मुलाला शिक्षण देते, आणि हा शिकलेला मुलगा मध्यमवर्गात समाविष्ट होतो. मानाने आणि अब्रूने जगतो. आपल्यासारख्या स्थितीत असलेल्या इतरांना मदत करतो. मध्यम वर्गीयांच्या संख्येत भर घालतो.

सुसंस्कृत, स्वच्छ, सदभिरुचिपूर्ण अशा जीवनाची उत्कंठा या वर्गामध्ये

आढळून येते. तो वैयक्तिक स्वार्थाकडे अवश्य पाहातो, पण त्याबरोबरच समाज-हिताकडे पाहण्याची नैतिक जाणीव त्याला असते. स्वतःच्या सुखदुःखात तो मशगूल होऊन राहात नाही. विचारवंत, कलाकार, लेखक, कामगार-पुढारी, राजकीय-पुढारी असे समाजाचे वैचारिक नेते सतत निर्माण करणारी खाण म्हणजे हा मधला वर्ग आहे. अतिश्रीमंत होण्याविषयी ह्या वर्गाची महत्त्वाकांक्षा नसते; त्याप्रमाणे अतिदारिद्र्यातही राहाण्याची त्याची तयारी नसते. मध्यमवर्गाची ही विशेष लक्षणे आहेत.

अतिश्रीमंत लोकांचा वर्ग संपत्ती मिळविण्यात आणि मिळविलेल्या संपत्तीच्या मदात किंवा सुख-विलासात गुंग असतो. अतिगरीबीत राहणारा वर्ग आपल्या दैनंदिन सांसारिक विवंचनेत दंग असतो. खालच्या आणि वरच्या दोन्ही वर्गांतील हे लोक व्यापक दृष्टीने समाजाचा, देशाचा, परिस्थितीचा, जीवनाचा आणि विश्वाचा विचार करण्यास असमर्थ असतात, उदासीन असतात, अपात्र असतात. पायापुरते पाहाणारे कनिष्ठ वर्ग असतात. "जगातील कामगार बंधूंनो" किंवा "जगातील संपत्तिमान लोकहो" अशी ह्यांची हाक असते. "जगातील मानवांनो" अशी साद घालणारा पुढारी मध्यमवर्गातूनच निघणार. गांधी, विनोबा, लिंकन, विल्सन अशांना जन्म देणारा हा मध्यम वर्ग आहे.

ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध उभा ठाकणारा हाच वर्ग. देश स्वतंत्र झाल्यावर प्रारंभीच्या काळातील नेतृत्व केले ते ह्याच वर्गाने. यापुढेही ही परंपरा राहायला पाहिजे असेल तर मध्यम वर्ग जगायला हवा. जागृतपणे जगायला हवा. तो जितका मोठा होईल तितका चांगला. खालच्या वर्गातून अधिकाधिक लोक या वर्गात यायला हवेत. सत्ता–संपत्ती पासून भ्रष्ट झालेले लोक यात येतच असतात. राजे, महाराजे, संस्थानिक, सरदार हळूहळू ह्याच वर्गात येणार.

हा वर्ग जगविण्याकरिता आणि त्याच्या उन्नतीकरिता सरकार काही एक प्रयत्न करणार नाही. स्वतःच्या प्रयत्नानेच त्याने आपले अस्तित्व टिकविले पाहिजे. सामान्य जनातील मुलामुलींना शिक्षण देऊन त्यांना मध्यम वर्गात समाविष्ट करून घेतले पाहिजे. मध्यम वर्गातील असहाय्य मुलांच्या शिक्षणाला अधिकाधिक मदत केली पाहिजे. या वर्गातील आपद्ग्रस्त व्यक्तींची देखभाल केली पाहिजे. विचारांच्या दृष्टीने आपल्या वर्गापुरतेच न पाहता अथांग समाजाच्या हिताचा विचार केला पाहिजे. वैचारिक, सांस्कृतिक, मानवतावादी, समाजनिष्ठ, राहणीच्या दृष्टीने आदर्श असे आपले जीवन ठेवले पाहिजे. ही एक समाजसेवाच आहे.

[१२–९–१९६८

१७. दिवाळीतला 'मूड'

आद्यमानवाने ज्या वेळी दिव्याचा शोध लावला त्याच वेळी मानवी संस्कृतीचे एक पाऊल पुढे पडले. रात्रीच्या अंधारावर दिव्याने विजय मिळविला. निसर्गावर मानवाने मिळविलेल्या विजयाच्या परंपरेत एक महत्त्वाची भर पडली. मानवाने रात्रीचा दिवस केला, अंधारावर विजय मिळवला.

लक्षावधी दिवे लावून त्यांतून दिवस निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणजे दिवाळी. हजारो वर्षे चाललेला हा प्रयत्न आपल्या पिढीत यशस्वी झालेला आहे. रात्रीच्या वेळी आपल्या खोलीत ट्यूब-लाईट लावून दिवसासारखा प्रकाश पाडता येतो. आपल्या हयातीतच असा दिवस, नव्हे रात्र .येईल की, कृत्रिम चंद्र आकाशात चढवून मुंबई–पुण्यासारख्या शहरावर दिवसासारखा प्रकाश रात्री पाडता येईल. वर्षातून चार दिवसच दिवाळी न राहता तीनशे पासष्ट, आणि कधी तीनशे सहासष्ट दिवस दिवाळीच राहील.

भौतिक सृष्टीत साध्य झालेली ही किमया मानवी मनाच्या विश्वातही सिद्ध झालेली नाही. ती व्हावी याकरता दिवाळीचा सण आहे. बाहच्य जगामध्ये कृत्रिम दिवे उजळावेत; मनाच्या जगात सुखासमाधानाचे दिवे लावावेत; मानवी दुःखाच्या विश्वावर प्रकाशाचे साम्राज्य विस्तारावे; सर्वत्र आनंद–शांती–समाधान यांची लयलूट व्हावी.

आपले जीवन हे सुखदुःखांनी मिश्रित आहे. या रसायनाच्या मिश्रणाचे प्रमाण प्रत्येकाच्या वाटचाला निरनिराळे आलेले असते. कोणाला सुख जास्त, कोणाला दुःख जास्त. एकाच व्यक्तीच्या जीवनाच्या प्रत्येक कालखंडात ते निराळे असते. कधी न मागता सुखे दारी चालत येतात, तर कधी साडेसातीचा फेरा संपता संपत नाही. या गोष्टी सर्वस्वी आपल्या हातात नाहीत; आपले जीवन सुखी किंवा दुःखी करण्याचा काही थोडच्या प्रमाणात अधिकार आपल्या हातात आहे. परंतु तितक्याच प्रमाणात तो अधिकार आपल्या बाहेरच्या विश्वशक्तीत आहे. त्याला निसर्ग म्हणा, प्रकृती म्हणा, ईश्वरी इच्छा म्हणा किंवा दैव म्हणा !

दिवाळीच्या चार दिवसांत ही सर्व दुःखे विसरून आनंदी वातावरण वाढवावयाचे असते. चार दिवसांचा कालखंड ठेवण्याचा उद्देश, आनंदीवृत्तीच्या हचा स्प्रिंगला चार दिवसांत इतके वेढे द्यावेत की ते वर्षभर उलगडत राहतील.

आबालवृद्धांना आनंद देणारा हा दिवाळीचा सण आहे. लहान मुले फुलबाजा आणि गोड खाऊवर खूष; कुटुंबियांना जिवलगांच्या भेटीचा आनंद; वृद्धांना इतरांचा आनंद. आई-बाप आणि मुलेमुली, पति-पत्नी, बंधु-भगिनी, मित्र-

मित्र, मालक-नोकर सर्वांना परस्परांविषयी प्रेम, माया आणि स्नेह दाखविण्याचा हा सण आहे.

दिवाळीत लावलेल्या सहस्र दीपांचा प्रकाश अंतःकरणातही शिरू द्या. तो तेथेच तसाच वर्षभर प्रज्वलित ठेवा. सुख–समाधान–आनंद–शांती या वृत्तींची जोपासना करा. तिच्यामुळे तुमचे आरोग्य नि आयुष्य वाढेल. तुमच्याभोवती आनंदाचे वातावरण पसरेल. बाहेर प्रकाश, अंतःकरणात आनंद. दिवाळीतला "मूड" वर्षभर कायम ठेवा.

[१६–१०–१९६८

१८. भोगी, त्यागी, योगी

समाजात स्थिरस्थावर परिस्थिती आली की लोकांत भोगाची प्रवृत्ती वाढते. भोगांची साधने मिळविण्याकरिता द्रव्यसंचय लागतो. तो करण्याकरता लोक सर्व प्रकारचे भलेबुरे मार्ग शोधतात. त्यापोटी दुराचार व भ्रष्टाचार यांची वाढ होते. समाजाची नैतिक अवनती होते. समाज-धर्म नष्ट होतो.

भोगवृत्तीच्या पराकोटीला समाज गेला की काही व्यक्तींच्या ठिकाणी दुसऱ्या टोकाला जाण्याची प्रवृत्ती होते. सामाजिक संकेताविरुद्ध बंड करण्याची मनोवृत्ती होते. कोणी संन्यासी–वैरागी–जोगी होऊन संसारत्याग करतात. कोणी समाजात राहूनच सामाजिक रूढीविरुद्ध क्रांती करू पाहातात. युरोप-अमेरिकेतील बीटनिक आणि हिप्पींची चळवळ या प्रतिक्रियेची निदर्शक आहे. सर्व जगात तरुणांच्या ठिकाणी दिसणारी अस्वस्थता ही प्रौढांच्या सामाजिक दुराचाराविरुद्ध अजाणता झालेली प्रतिक्रिया आहे; त्यामुळे आजचे जीवन अस्थिर झाले आहे.

जीवन आणि संसार द्वंद्वांनी व विरोधांनी भरलेले आहेत. सुख आणि दुःख, यश आणि अपयश, संपत्ती आणि दारिद्र्य, न्याय आणि अन्याय, मान आणि अपमान, स्तुती आणि निंदा, कीर्ती आणि अपकीर्ती, लोकप्रियता आणि लोक-अनास्था, प्रेम आणि द्वेष—अशा विरोधामध्ये आपले जीवन मागे-पुढे हेलकावे खात असते. सुखदुःखांच्या लाटांवर माणूस वर खाली होत असतो. सुखाने हर्षित होतो, दुःखाने दीन होतो. सुखातही दुःखाची जाणीव असते. 'आवर सिन्सिअरेस्ट लाफ्टर । वुईथ् पेन इज् फरॉट ॥' असे शेले या कवीने फार समर्पक वर्णन केले आहे.

समाजातील आणि जीवनातील या द्वंद्वापासून सुटका होण्याकरता गीतेने मार्ग सांगितला आहे. अर्जुना, योगी हो. योगवृत्तीने कर्तव्यकर्मे कर. योगवृत्तीचा विकास कर. निर्विकार मन ठेव. बुद्धी स्थिर आणि निश्चल कर. विश्वातील चैतन्याचा तू अंश आहेस याची जाणीव ठेवून आपले मूळ स्वरूप सतत लक्षात ठेव. मग तुला या जगातील सुखदुःखांची, पाप-पुण्याची आणि यशापयशाची कशाचीच भीती राहाणार नाही.

सुख आणि दुःख यांसारख्या विरोधी भावनांच्या आडव्या उभ्या धाग्यांनी जीवनाचे वस्त्र विणले आहे. त्याला योगवृत्तीची, निर्विकार मनाची आणि निश्चल बुद्धीची किनार लावा, म्हणजे या वस्त्राला मजबुती येईल. जे वस्त्र तुमच्या वाटचाला आले असेल ते टिकेल. कोणाला बुट्ट्याचा शालू मिळाला असेल तर कोणाला पांढरी शुभ्र शाल मिळाली असेल. जे मिळाले ते स्वच्छ आणि मजबूत ठेवणे आपल्या मनावर व बुद्धीवर अवलंबून आहे. अंतःकरणावर सतत योग-वृत्तीचा, निर्विकारतेचा, समत्वबुद्धीचा, निश्चल मनाचा संस्कार करा. जीवनात सुखी आणि निर्भय व्हाल.

सुखोपभोग सोडू नका, पण त्यांत फार आसक्तही होऊ नका. त्यागाच्या अंतिम टोकाला जाऊ नका, पण त्यागाची मनोवृत्ती व तयारी सतत ठेवा. सुख घेतानाच ते सोडायची तयारी ठेवा. तेन त्यक्तेन भुञ्जीथाः । असे ईशावास्य उपनिषदाने सांगितले आहे. भारतातील सर्व थोर पुरुषांच्या जीवनात गीतेचा हा मंत्र प्रतिबिंबित झाला आहे.

जनक, अशोक, शिवाजी, सर्व राजे होते, पण कसे ? गडकऱ्यांनी राज-संन्यास या अपूर्ण नाटकात संभाजीच्या तोंडी उद्‌गार घातले आहेत—" राजा हा राज्याचा उपभोगशून्य स्वामी आहे. " यात सर्व गीतेचे सार आहे. भोग आणि त्याग यांतील चांगल्या तत्त्वांचा संयोग योगात झालेला आहे. तोच गीतेचा संदेश आहे—

भारता, योगी हो. योगस्थ वृत्तीने कर्तव्य कर.

योगी म्हणजे जोगी नव्हे हे लक्षात ठेवा. कपडे बदलायला नकोत. संसार सोडायला नको—मनोवृत्ती बदलायला पाहिजे. योगवृत्तीने झालेले कर्म म्हणजे कर्मयोग.

मार्गशीर्ष शु. ११ ला गीताजयंती आहे. रोज गीतेचा एक विचार वाचा. आजन्म उपयोगी पडणारे ते विचार आहेत.

[१६-११-१९६८

१९. आ वासून बुसते कौतुक करु नका !

अंतराळातील प्रवासात आणि चंद्रादी ग्रहांच्या संशोधनात १९६८ व १९६९ ही दोन वर्षे क्रांतिकारक ठरणारी आहेत. न जाणो यापुढील एकेक वर्ष यापेक्षाही क्रांतिकारक ठरेल. विज्ञानातील ही प्रगती अत्यंत आश्चर्यकारक, कल्पनातीत आणि मनाला गुंग करून टाकणारी आहे. क्षणभर डोळे मिटून या घटनांवर विचार करा. ज्या चंद्राची देव म्हणून पूजा होत होती, प्रेमिकांच्या मनावर आनंदलहरी निर्माण करतो म्हणून ज्याचा लौकिक, शंकराच्या मस्तकावर विराजमान झालेला म्हणून ज्याचा मान—तो चंद्र म्हणजे वाळवंट आणि दऱ्या-खोऱ्यांनी भरलेला प्रदेश, यापेक्षा काही गूढ नाही असे सिद्ध झाले. ही निव्वळ गणिताची व कल्पनाप्रधान तर्कशास्त्राची सिद्धता नसून, टेलीव्हिजनवर चंद्राचे हे स्वरूप लक्षावधी लोकांनी आपल्या डोळ्यांनी पाहिले. या सर्व अंतराळप्रवासात स्थल आणि काल यांच्याबाबत अत्यंत सूक्ष्म काटेकोरपणा व बिनचूकपणा पाळला गेला म्हणूनच तो यशस्वी झाला. विज्ञानप्रगतीचा कळस, बिनचूकपणा, धाडस आणि सहकार्य या गुणांचे अभूतपूर्व प्रदर्शन झाले.

आ वासून या प्रयोगाकडे पाहायचे, कौतुक करायचे आणि मग आपल्या दैनंदिन गबाळ, आडमाप, बिनहिशेबी, परंपरागत व्यवहारांत मग्न व्हावयाचे, एवढाच या प्रयोगाचा आपणाला उपयोग होणार असेल तर दुर्दैव ! प्रत्येक व्यक्तीने, आपण आपापले नेमलेले नित्याचे काम व व्यवहार कसे करतो या दृष्टीने पाहायची, आत्मनिरीक्षण करायची वेळ आली आहे. विज्ञानाची प्रगती ही केवळ प्रयोगशाळेत होत नसते. वैज्ञानिक मनोवृत्ती ज्या समाजात अथांग पसरलेली आहे त्याच समाजात वैज्ञानिक प्रगती होते व संशोधक निर्माण होतात. वैज्ञानिक मनोवृत्ती तुमच्या ठिकाणी आहे का असा विचार करा बरं. काय उत्तर आहे ?

विज्ञानात दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. प्रत्येक गोष्टीविषयी 'ती अशी का ?' असा मनाला प्रश्न विचारणे ही एक, व अत्यंत सूक्ष्म बिनचूकपणा आणि काटेकोरपणा ही दुसरी. सतत प्रश्न आणि बिनचूक मोजमाप, यांच्या आधाराने ज्योतिष, वैद्यक, रसायन, पदार्थविज्ञान, यंत्रज्ञान, जीवशास्त्र इत्यादी सर्व शास्त्रांतील प्रगती झालेली आहे. आपल्या दैनंदिन जीवनात हे दोन गुण कुठे कुठे आणता येतील त्याचा विचार करा. प्रत्येक ठिकाणी त्यांचा उपयोग आहे. स्वयंपाकघरात, बागेत, कारखान्यात, कचेरीत, मैदानात, डोंगरावर, दिवसा, रात्री, सर्वत्र, सर्व ठिकाणी, सर्व वेळी, सर्व व्यवहारांत आपणाला "का व किती" हे दोन प्रश्न मनाला विचारून ही वैज्ञानिक दृष्टी वाढवता येईल. तुमच्या

ठिकाणी ती आली की घरच्या मंडळीत येईल, मुलाबाळांत येईल, तुमच्या कनिष्ठ सेवकांत, मित्रमंडळींत, जिथ जिथे तुमचा प्रभाव पडतो तिथे तिथे ती येईल.

आज आम्ही विज्ञान शिकतो आणि ते पुस्तकांत, प्रयोगशाळेत आणि परीक्षेच्या पेपरात संग्रहीत करून कोरडे परत येतो ! शिकलेल्या मुली, गृहिणी वा माता झाल्या तरी शाळेत शिकलेले आरोग्य व आहारशास्त्र त्यांच्या संसारांत एक टक्काही दिसत नाही. शिकलेल्या मुलांनाही व्यवहारातल्या साध्या दैनंदिन उपयोगातल्या यांत्रिक उपकरणांचे ज्ञान नसते. व्यवहारातल्या साध्या रोजच्या कामात किती विज्ञान दडलेले आहे याचा आम्ही विचारच करीत नाही. पोटात पाण्याची पिशवी निराळी आणि अन्नाची निराळी असे मानणारे प्राणी आहेत ! शेकडा नव्वद लोकांना आकाशातील प्रमुख ग्रहांची माहिती नसते. वीज गेली तर फ्यूज बसवता येत नाही. बर्शेन गॅसच्या टाकीत काय असते, स्टोव्हची अंतर्रचना कशी असते, मोटार सायकलचे एंजिन कसे असते, आगगाडी धावत असताना निरनिराळे आवाज कसले होतात—असे अनेक प्रश्न पावलोपावली विचारण्यासारखे आहेत. आमच्या स्वयंपाकाच्या क्रियेत कशालाच मोजमाप नाही. सारा चिमटीचा आणि मुठीचा कारभार ! चोवीसताशी दिवसाचा $\frac{१}{८६४००}$ वा भाग दाखवणारी घड्याळे मनगटावर असून शाळेला, कॉलेजला, कचेरीला, गाडीला, सभेला, भेटीला, तासातासाने उशीरा जाणारे लोक आहेत. रेल्वे आणि एस्. टी. बस यांची वेळापत्रके म्हणजे उशीर मोजण्याची साधनेच इतका त्यांचा बिनचूकपणा ! एक ना दोन, किती उदाहरणे द्यावीत ? सुज्ञांच्या अनुभवात याहीपेक्षा अधिक असतील.

विज्ञानाची प्रगती आभाळातून पडत नाही. ती रक्तात, नसानसांत, स्वभावात, दृष्टीत, सवयीत, व्यवहारात यावी लागते. तीं आणा मग आकाशातला चंद्र दूर नाही. दृष्टीत, विचारात व व्यवहारात हे संक्रमण करा.

[१४–१–१९६९

१०. अत्याचाराची चटक लागते

रोमन समाजाचा ऱ्हास होण्याची अवस्था आली त्या काळात त्याच्यामध्ये हिंसा, क्रौर्य आणि अत्याचार यांची आवड वाढली होती. क्रूर श्वापदे आणि माणसे–माणसे यांना लढायला लावून त्यांच्यात होणारा रक्तपात व मृत्यू पाहाणे हा करमणुकीचा प्रकार मोठ्या प्रमाणात वाढला होता. ख्रिस्ती भिक्षू व संन्यासी यांना ही करमणूक आवडत नसे. एकदा एका भिक्षूला त्याच्या मित्राने बळेबळे

ओढून नेले. अत्याचार दिसू नयेत म्हणून भिक्षूने आपल्या हाताने डोळे झाकून घेतले. पण जिज्ञासेने बोटाच्या फटींतून हळूच पाहिले, त्याला गंमत वाटली. मग तो या खेळांना नेमाने जाऊ लागला. अत्याचार पाहण्याची व करण्याची चटक लागते ती अशी.

विशेषतः ज्या अत्याचारात स्वत.च्या घरादाराचे, कुटुंबाचे किंवा संपत्तीचे नुकसान नसते, व अत्याचार करून शीरसलामत सुटून जाण्याची शक्यता अधिक असते, त्यात अधिक गंमत वाटते. शेजारच्या व समाजाच्या मिळकतीची होळी करण्यात पुरुषार्थ वाटतो. स्वतःवर हा प्रसंग शेकणार नाही असा भ्रम असतो पण ही पाळी केव्हा तरी अत्याचार करणारावरही येते. आपल्या प्रतिस्पर्ध्याचा व शत्रूचा काटा काढण्याचे हे एक तंत्र आहे.

दोन पक्षांत युद्ध झाले तर त्यात धर्म असतो. समोरासमोर आव्हान देऊन पूर्वतयारीने सर्व अत्याचार होतात. त्यांत निर्भयता, धैर्य, शौर्य, पराक्रम, बलिदान हे गुण असतात. पण प्रतिपक्षी असावध असताना त्याच्या घरादाराची व मिळकतीची जाळपोळ, लुटालूट आणि नासधूस करणे या कृतीत विश्वासघात, क्रौर्य, राक्षसी वृत्ती, भेकडपणा आणि विघ्नसंतोषी वृत्ती आहे. कोणत्याही समाजाला रसातळाला नेणारे हे दुर्गुण आहेत. यात माणुसकीचा खून आहे.

या अत्याचारी वृत्तीचा एकदा अनुभव आला की, सवय लागते. ती सुटणे कठीण आहे. ज्याने आयुष्यात तिचा एकदा वापर केला आणि जो शीरसलामत सुटला तो पुन्हा त्याच अत्याचाराची पुनरावृत्ती करील. तो त्याचा एक धंदाच होऊन बसतो. ज्या लहान मुलांनी व तरुणांनी ही कृत्ये केली ते जन्मभर संधी आली की तेच करणार. ही चटक लागते.

या मूर्ख लोकांना हे कळत नाही की ही अत्याचार-प्रवृत्ती शेवटी आपल्या गावापर्यंत आणि घरापर्यंत येणारी आहे. शेवटी स्वतःच्या घरादाराची, कुटुंबाची आणि मिळकतीची आहुती या अत्याचारातच पडणार आहे. ज्या तंत्राचा आपण उपयोग करतो तेच प्रचारात राहाते; दुसराही त्याचा उपयोग करतो आणि शेवटी सर्वांचाच नाश होतो. दूरदृष्टीने या प्रश्नाकडे पाहायला कोणाला सवड नाही !

समाजातील प्रश्न सोडवण्याचे पूर्वापार दोन मार्ग आहेत. सामर्थ्य किंवा हिंसा व सामोपचार. सामर्थ्य किंवा हिंसा हा झटपट निकाल लावणारा मार्ग आहे असे वाटते. सामोपचाराने दीर्घ काल लागतो. त्यामुळे सामर्थ्याचा मार्ग आकर्षक व जवळचा वाटतो. परिणामतः तो लांबचा आणि आत्मघातकच ठरतो. कारण कधीतरी त्या सामर्थ्याचा उपयोग आपल्या विरुद्धच होतो व आपला नाश होतो.

सामोपचाराचा मार्ग उभयपक्षांना हितकारक असतो. दीर्घकालाचा असला तरी त्यात कोणत्याच पक्षाची हानी नसते. काही प्रश्न सुटायला, मतपरिवर्तन

व्हायला, प्रश्नाचे आकलन व्हायला, काळाचीही जरुरी असते. सुधारलेल्या समाजाने व लोकशाहीने असे ठरवले आहे की सामर्थ्यापेक्षा सामोपचाराचा मार्ग चांगला.

सध्या आपल्या समाजात, राज्यात, देशात आणि सर्व जगातच अत्याचार, हिंसा व सामर्थ्यप्रदर्शन यांचा सर्रास वापर चालला आहे. त्यात लोकशाहीची होळी होत आहे. माणुसकीने सामाजिक प्रश्न सोडवावेत म्हणून लोकशाही अस्तित्वात आली, पण आज माल तिला भर रस्त्यावर आणून, वस्त्रहरण करून, तिरडीवर घालून स्मशानात नेऊन दहन करण्याची वृत्ती बळावत आहे.

हे ठीक नाही. यामुळे हा भस्मासुर स्वत:चाच नाश करून घेईल. समाजाच्या ऱ्हासाचे हे लक्षण आहे. उत्कर्षाचे खास नाही. अत्याचार ही मानसिक विकृती आहे, त्याची चटक लागली तर दुर्दैव !

[१५-२-१९६९

२१. अस्मानी, सुलतानी, इन्सानी ! अन् हिंमत

गेल्या पंचवीस-तीस वर्षांचे सिंहावलोकन करा म्हणजे एक गमतीदार चित्रपट डोळ्यांपुढून सरकत जाईल. भूतकाळातील आठवणी रम्य असतात आणि त्यांचा भावी काळाकरता उपयोग करून घेता येतो.

१९३९ ते १९४५ या काळात जागतिक युद्ध होऊन अनेक देश बेचिराख झाले. जपानवर अॅटमबाँब पडला, जर्मनीवर व इटलीवर बाँबचा वर्षाव झाला आणि हे देश जवळजवळ बेचिराख झाले. युद्ध जिंकणाऱ्या इंग्लंड-फ्रान्सचीही तीच स्थिती झाली होती. त्या आपत्तीतून या सर्व राष्ट्रांनी डोके वर काढले. नवी घरे बांधली, कारखाने काढले, शहरे वसवली. व्यापारधंदा वाढवला. आज पूर्वीपेक्षा भरभराटीच्या स्थितीत ते देश आहेत.

महाराष्ट्रातील गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील घटना डोळ्यांपुढे आणा. १९४८ मध्ये अर्ध्याअधिक भागात जाळपोळ झाली. १९६१ मध्ये पानशेत झाले. १९६७ मध्ये कोयना भूकंपाचा प्रचंड धक्का बसला, सबंध महाराष्ट्र हादरला. १९६९ मध्ये मुंबईत प्रलय झाला आणि तो होतो ना होतो तोच तळेगाव, पुसेगाव येथे प्रचंड आगी लागल्या. प्रत्येक पाच दहा वर्षाच्या कालखंडात एखादी तरी मोठी आपत्ती ठेवलेलीच आहे. जे मागे झाले तेच पुढेही होणार !

या आपत्तीत अनेक प्रकार आहेत. काही अस्मानी म्हणजे दैवी, निसर्गप्रकोपामुळे आलेल्या; काही सुलतानी म्हणजे त्या त्या देशांच्या व राज्यांच्या अधिकारी वर्गांनी आणलेल्या, व काही इन्सानी म्हणजे सामान्य माणसांनीच

आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांवर, देशबांधवांवर किंवा गावकऱ्यांवर आणलेल्या. लहरी निसर्ग, सत्ताधारी अधिकारी आणि आसुरी मानव जगात आहेत तोपर्यंत या आपत्ती केव्हा आणि कोणावर येतील त्याचा नेम नाही. संसारातील आणि व्यवहारातील अपरिहार्य घटना म्हणून त्या धरून चालावयास पाहिजे. व्यापार-धंद्यात ज्याप्रमाणे बूड धरून चालावी लागते तसेच हे आहे. आपल्या जीवनाच्या वेळापत्रकात या आपत्ती धरावयाला हव्यात.

त्यांच्यावर काही इलाज नाही का ? आहे. एकच उपाय आहे. हिंमत. आपत्तीवर मात करणारी हिंमत ही एकच शक्ती आहे. ती व्यक्तीला, समाजाला आणि देशाला आपत्तीतून बाहेर पडायला उपयोगी पडते. हिंमत वाढवणे आणि जोपासणे एवढेच आपल्या हातात आहे. इतर सावधगिरीचे उपायही योजावेत. पण अखेरपक्षी उपयोगी पडणारी हिंमत आहे. " केला जरी पोत बळेचि खाले । ज्वाला तरी ते वरती उफाळे ।। " मशाल उलटी धरली तरी तिची ज्योत उलटी होत नाही. ती आकाशाकडेच झेपावते. तसे माणसाच्या धैर्याचे आहे. " विपत्काली धैर्य, प्रभुपणि सहिष्णुत्व बरवे ।। "

ज्या देवाने आपत्ती दिल्या त्याच देवाने हिंमत आणि धैर्य या प्रवृत्ती दिल्या आहेत. त्या आपल्या समाजात भरपूर आहेत, तोपर्यंत डगमगण्याचे कारण नाही. जगात इतरांवर जे प्रसंग येतात ते आपणावरही येण्याचा संभव आहे. मनाची तयारी असावी म्हणजे आयत्या वेळी काळीज कच खाणार नाही. अर्जुनासारखे हृदय-दौर्बल्य निर्माण होणार नाही.

इतिहास म्हणजे निव्वळ कागदपत्रे आणि जुन्या वस्तू संशोधून काढलेल्या गोष्टी, येवढ्यापुरताच मर्यादित नाही. आपल्या हयातीतल्या घटना हा इतिहासच आहे, त्यापासून बोध घ्यायचा असतो आणि जीवनाचे वेळापत्रक आखायचे असते.

[१९-३-१९६९

२१. मनाचा मालक का गुलाम ?

मानवाचे सद्गुण व दुर्गुण सर्व युगात सारखेच असतात ही गोष्ट अंशतः खरी आहे, सवस्वी खरी नाही. प्रत्येक कालखंडात एखाद्या गुणाचा किंवा दुर्गुणाचा अतिरेक किंवा आधिक्य होत असते. आजच्या समाजाविषयी माझे निरीक्षण असे आहे की आपल्या मनावर माणसाचा ताबा राहिलेला नाही. माणसाने मनावर स्वार होण्याऐवजी मन माणसावर स्वार झाले आहे, आणि

त्याच्या तोंडात लगाम घालून त्याला वाटेल तसे वंगवीत आहे. आत्मसंयम हा गुण लोप पावत आहे.

मनात अनंत विकार येत जात असतात. पण त्यांना वळण लावण्याचे काम बुद्धीचे आहे, आणि मनाची आज्ञा पाळण्याचे काम शरीराचे आहे. इंद्रियात्मक शरीर, मन आणि बुद्धी, या तीन शक्तींपैकी तिसरी शक्ती जी बुद्धी ती हळूहळू अर्धांगवायूने विकल होत चालली आहे. मनात काम, क्रोध, राग, लोभ, मद मत्सर इत्यादी विकार आले की माणूस त्यांच्या आहारी जातो आणि विकाराच्या भरात काय वाटेल ते अत्याचार करतो. बुद्धी गहाण टाकतो. विचाराला फाटा देतो.

घरी आल्यावरोवर वायकोने जेवायला वाढले नाही म्हणून एका नवऱ्याने आपल्या हाताने तिला ठार मारले. दहा पंधरा रुपयांच्या किंमतीचा दागिना मिळविण्याकरता एकाने लहान बालिकेचा खून केला. शेताच्या हद्दीच्या वादावरून कुऱ्हाडीने माणसांना तोडणे हा जणू कायदाच झाला आहे. स्वतःच्या पाशवी वासना तृप्त करण्याकरता भगिनींची अब्रू घेऊन त्यांचे संपूर्ण जीवन बरवाद करणारे नराधम आहेत, त्यांची संख्या वाढत आहे. या वैयक्तिक गोष्टी झाल्या. ही उदाहरणांची यादी लांबवता येईल.

सामुदायिक अविचार, अत्याचार आणि वेबंदशाही ही गोष्ट तर रोजच्या अनुभवाचीच झाली आहे. गाडी उशिरा आली म्हणून डब्यावर दगड फेकून नासधूस करणे व आग लावणे हा उतारूंचा सनदशीर हक्क होऊ पहात आहे. मनाविरुद्ध झालेल्या कोणत्याही गोष्टीविरुद्ध अविचाराची कृती करणे, जाळपोळ, नासधूस, लुटालूट, वैयक्तिक हल्ले या स्वरूपाची निदर्शने करणे रूढ होत आहे. विशेष म्हणजे त्यांचे तात्त्विक समर्थन केले जाते. जनतेची जागृती या नावाखाली तिचे कौतुक केले जाते.

विज्ञानाच्या साहाय्याने मानवाने वाहेरचे जग जिंकले. निसर्गाच्या सर्व शक्तींवर तावा मिळवून त्यांना कामाला लावले. परंतु स्वतःच्या मनावरील त्याचा तावा नाहीसा झाला आहे. मनात त्या त्या वेळी येणाऱ्या विकारांना, वासनांना, मोहांना, तो सहज वळी पडत आहे. अशाच माणसांचे प्रमाण समाजात अधिक झाल्याने समाजातही असंतोष आणि नापसंती व्यक्त करण्याच्या प्रकारात अविचार आणि अत्याचार यांचा वापर सर्रास होऊ पहात आहे.

माणसाचे मन हे अत्यंत उच्छृंखल आहे. त्याला आत्मसंयमन करायला शिकविले पाहिजे, हा पूर्वीच्या संस्कृतीचा व जीवनाचा एक महत्त्वाचा सिद्धांत होता. त्याकरता रोजच्या जीवनात मनाला ताब्यात ठेवण्याचे अनेक प्रसंग यावेत अशी योजना होती. धार्मिक व्रते आणि आचार यांचा मूलभूत उद्देश सामान्य

माणसाला आत्मसंयमाचे वळण लावणे हा होता. आज ती व्रते व ते विचार नष्ट झाले आहेत. त्यांचे पुनरुज्जीवन करणे शक्यही नाही, इष्टही नाही, त्यांच्यावर आता कोणाचा फारसा विश्वासही बसणार नाही. धार्मिक गोष्टींना पूर्वी जो अधिकार (सँक्षन) होता तोही आता नष्ट झाला आहे. आता मनुष्य बुद्धी वापरू लागला आहे. धार्मिक नियमांची जागा कायद्याने आणि वैयक्तिक बुद्धीने घेतली जाते. या बुद्धीचा अंकुश त्याने आपल्या मनाला लावला पाहिजे. मनाच्या विकारांना बुद्धीच्या विचाराने वळण लावले पाहिजे.

आत्मसंयमनाचे हे वळण प्रत्यक प्रौढ व्यक्तीने स्वतःला लावून घेतले पाहिजे. सक्तीने, नियमाने, कायद्याने करण्यासारखी ही गोष्ट नाही. आत्मनिरीक्षण करून कोणता विकार तुमच्या ठिकाणी प्रबळ आहे ते शोधून काढा. त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याचा निश्चय सतत मनात ठेवा. सकाळ–दुपार–संध्याकाळ–रात्री, सवड सापडेल तेव्हा, या निश्चयाचाच विचार करा. एकदोन महिन्यात स्वतःमध्ये बदल झालेला तुम्हाला दिसेल. तुमच्या मुलांनाही असेच वळण लावा. जीवनाला काही तरी बंधने घालून घेतली पाहिजेत आणि कितीही मोहाचे प्रसंग आले तरी आपली मानसिक बंधने आपण पाळायचा निश्चय टिकवला पाहिजे. 'दि मॉरल सेन्स ग्रोज बट वाय एक्सरसाईझ्.' मोहाचा, विकारांचा, वासनांचा, प्रतिकार केल्याने, त्यांच्यावर नियंत्रण ठेवल्याने, त्यांना विचाराच्या व बुद्धीच्या ताब्यात ठेवल्याने माणसाची ताकद वाढत असते. निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ ।। मनोनिग्रह हेच साध्य आहे.

काही निश्चय करीत जा आणि ते टिकवा. आपल्या मनाचे आपण मालक आहोत, असा आत्मविश्वास तुम्हाला येईल. मनाचे, विकारांचे व भावनांचे गुलाम होऊ नका. स्वामी व्हा. मालक व्हा.

[१९–४–१९६९

१३. बालजीवनातील स्मृतींचा आनंद

शाळा-कॉलेज सोडून संसारात पडल्यावर आणि व्यवसाय–धंद्यातील रुक्ष जीवनाचा अनुभव घेतल्यावर माणसाला जाणवते की या जगात खरे प्रेम फार दुर्मिळ आहे. माणसे एकत्र येतात, नांदतात, राहातात, व्यवहार करतात, पण त्यात काही तरी हेतू असतो. निर्हेतुक शुद्ध प्रेम क्वचितच मिळते. कौटुंबिक गरज, उद्योगधंदा, रक्ताचे नाते, नैमित्तिक कामकाज, सहव्यवसाय या निमित्तांनी माणसे एकत्र येतात. प्रत्येकजण विचार करीत असतो की दुसऱ्याचा मला उपयोग कसा

करून घेता येईल; त्याच्यापासून फायदा काय होईल. अगदी शुद्ध प्रेमाची नातीही असू शकतात, असतातही. माता–पुत्र, पति–पत्नी, बहीण–भाऊ, जिवलग मित्र–– यांच्यातील प्रेम निर्हेतुक शुद्ध असू शकते. याच प्रेमाच्या वर्गात बालपणी मित्र असलेल्या प्रौढांचा मित्रभाव येऊ शकतो. अपेक्षा न ठेवता एक वेळ केलेले ते प्रेम असते. प्रौढपणी त्याचा अवशेष शिल्लक राहातो.

प्राथमिक–माध्यमिक शाळेत जडलेली मैत्री निर्हेतुक असते. एकमेकांचा फायदा घेण्याची वृत्ती तिच्यात नसते. समान वय, समान अनुभव, समान सुखदुःखे यामुळे अशा मैत्रीत अधिक आपलेपणा असतो. त्यांच्या सुखद स्मृती जन्मभर टिकतात. मोठेपणी असे मित्र व्यवसाय-धंद्याच्या निमित्ताने दूरदूर जातात. पण कधी काळी पुन्हा एकत्र आले की आपले बालपणचे जीवन कल्पनासृष्टीत पुनः साकार करतात. मग शाळेतल्या सर्व आठवणींना उजळा मिळतो. बालपणचे एकत्र जीवन आणि प्रौढ वयात दाखवलेली कर्तबगारी यांच्याविषयी गप्पा सुरू झाल्या की रात्रीचा दिवस होतो.

सुखदुःखांचा अनुभव एकत्र घेणाऱ्या माणसांत एक जिव्हाळा उत्पन्न होतो. बालपणची सुखदुःखे ही खरीखुरी असतात. मोठेपणी ती क्षुल्लक वाटतात तरी त्या त्या वयातील मुलांच्या मनावर त्यांचा खोल परिणाम होत असतो. अशा सुखदुःखांच्या अनुभवामुळे मैत्रीला ओलावा आलेला असतो.

बालपणचे मित्र चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रकारच्या गोष्टी एकमेकांच्या सहकार्याने करीत असतात. दुसऱ्याच्या बागेतल्या कैऱ्या चोरणे, आईबापांना थापा देऊन सिनेमाला जाणे, अभ्यासाच्या निमित्ताने निषिद्ध पुस्तके वाचणे, अशा गोष्टी कट करून झालेल्या असतात. सहकार्याने शाळेचे संमेलन यशस्वी करणे, एकत्र अभ्यास करून उत्तम यश मिळवणे, आजारी मित्राची शुश्रूषा करणे, गरीब मित्रांना मदत देणे अशा सात्त्विक गोष्टीही केलेल्या असतात. पाप-पुण्याच्या आणि बऱ्या-वाइटाच्या कल्पना प्रगल्भ झालेल्या नसतात. त्यामुळे काही नियमाविरुद्ध आणि निषिद्ध अशा गोष्टीही मुले लहानपणी करतात. त्यांत एकमेकांना सहकार्य देतात, संरक्षण आणि पाठिंबा देतात. या बाबतीत बालकांचा पक्ष निराळा आणि पालक-शिक्षकांचा पक्ष निराळा असे दोन तटच पडलेले असतात.

लहानपणी आपण मित्रामित्रांनी एकत्र केलेला अभ्यास, मनोरंजक वाचन, अटीतटीचे सामने, करमणुकी इत्यादी अनेक गोष्टींच्या आठवणी आनंददायक असतात. पण खरी गंमत येते ती बालपणी केलेल्या खोड्यांची, गुन्ह्यांची, कटांची व संकटांची आठवण निघाली म्हणजे. गुरुजींना फसवून परीक्षेत केलेली कॉपी, शाळेला बुट्टी देऊन केलेला सिनेमाचा किंवा पोहण्याचा कार्यक्रम, चोरून पाहिलेले सिनेमा आणि नाटके, पालकांना न कळवता आईस्क्रीमचा किंवा हॉटेलातल्या खाण्याचा कार्यक्रम, प्रवासात सायकली पंक्चर झाल्यामुळे आलेले संकट—अशा

एकमेकांच्या सहकार्याने केलेल्या गोष्टी आठवण्यात खरी मजा येते. एकत्र भोगलेल्या शिक्षा त्या वेळी दुःखदायक वाटल्या तरी काळाच्या झिरझिरीत पडद्याआडून त्यांच्याकडे पुन्हा पाहिले की त्यांच्या आठवणी मनोरंजक वाटतात. कटुता नाहीशी होऊन सुखद स्मृती शिल्लक राहातात.

बालपणच्या मित्रांच्या भेटी आणि त्या भेटींतील पूर्वजीवनातल्या बऱ्यावाईट स्मृती हा एक जीवनातील अलौकिक आनंद आहे. हे निराळचा वर्गातील सुख आहे. ज्यांना ते मिळण्यासारखे असेल त्यांनी ते ओलांडून पुढे जाऊ नये. प्रौढ जीवनातील व्यवसायांमुळेही ज्यांच्या जीवनाला रुक्षपणा आलेला नाही, ज्यांची रसिकता व आनंदी वृत्ती वयामुळे नष्ट झाली नाही त्यांनाच हा आनंद अनुभवता येतो. या आनंदामुळे त्यांच्या आयुष्यात एका वर्षाने तरी वाढ होते.

[१२-५-१९६९

२१. पैसा आणि वेळ यांचे नियोजन

नियोजनाची कल्पना आणि कृती या गोष्टी पूर्वापार चालत आलेल्या आहेत. पण त्या सार्वत्रिक नव्हत्या आणि जीवनाचे व समाजाचे एक तत्त्वज्ञान म्हणून त्यांचा स्वीकार झालेला नव्हता. आज नियोजनाची कल्पना व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये उपयोगात आणली जात आहे. नियोजनाच्या तत्त्वामुळे आपल्याजवळ असलेल्या साहित्यसामग्रीचा व्यवस्थितपणाने उपयोग करून आपण प्रगती व सुख यांचा लाभ घेऊ शकतो.

आपल्या स्वतःच्या जीवनात नियोजनाच्या या तत्त्वाचा फार उपयोग होईल. ज्यांचे नियोजन केलेच पाहिजे अशा दोन महत्त्वाच्या गोष्टी आपल्याजवळ असतात—वेळ आणि पैसा. या प्रत्येकाजवळ सारख्याच असतात असे नाही. प्रत्येकाला उपलब्ध होणारा वेळ आणि पैसा यांचे प्रमाण निरनिराळे असते.

वेळेचाच मुद्दा घ्या. आपली कामे आणि वेळ यांत नेहेमीच समतोल असेल असे नाही. कामाच्या मानाने कोणाला वेळ अधिक असतो तर कोणाला कमी पडतो. दोघांनीही आपापल्या वेळेचे विचारपूर्वक नियोजन केले नाही तर त्यांना त्रास व दुःख होत राहील. ज्याला वेळेपेक्षा कामे अधिक आहेत त्याने आपल्या कामांचे नियोजन अशा तऱ्हेने केले पाहिजे की ती कमीत कमी वेळात होतील. आपल्या कामाच्या स्वरूपाचा काळजीपूर्वक अभ्यास करावा, आपल्या क्रियांचे निरीक्षण करावे, कामाच्या पद्धती तपासून पहाव्यात, म्हणजे आपल्या लक्षात येईल की अनेक सुधारणा करण्यासारख्या आहेत. ही कामे

घरातली असोत की व्यवसायातील असोत. अनावश्यक क्रिया टाळाव्यात, वेळ व श्रम वाचवणारी साधने उपयोगात आणावीत, कामांचा क्रम व वेळापत्रक ठरवावे. असे केले तर थोडचा वेळात अधिक कामे करता येतील. वेळ कमी पडतो ही अडचण राहाणार नाही.

कामे करून ज्यांचा वेळ शिल्लक राहात असेल त्यांनीही शिलकी वेळेचे नियोजन केले पाहिजे. एखादा पुरवणी व्यवसाय, आवडीचा छंद, समाजसेवा, कुटुंबसेवा, मुलांचा अभ्यास, स्वतःचा अभ्यास—अशा काही गोष्टी ठरवून त्यांकडे वेळेचा विनियोग करावा. विशेषतः सुटीचे दिवस अशा कामांकडे लावता येतील.

आता पैशासंबंधी किंवा मिळकतीसंबंधी विचार करू. या बाबतीतही खूपच विषमता आहे. कोणाला संसाराला पैसा पुरत नाही, तर पैशाचे काय करावे हा काहींना प्रश्न पडतो. दोघांनाही द्रव्याच्या बाबतीत नियोजन करण्याची जरुरी आहे. आपली कमाल मिळकत एकदा निश्चित झाल्यानंतर तिच्या मर्यादेत आपल्या सर्व गरजा बसवणे हे अपरिहार्यच आहे. आज बहुसंख्य लोकांची उत्पन्ने मर्यादितच आहेत, आणि वेतनांचे प्रमाण कितीही वाढले तरी आपल्या गरजा वाढत्या असतात त्यामुळे उत्पन्न कमीच पडते. महिन्याचा पगार पुरत नाही असे म्हणणारे गरीब, मध्यम आणि उच्च तिन्ही वर्गात लोक आहेत ! अंथरुण पाहून पाय पसरणे अवश्य आहे. आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणात आपल्या गरजांचे प्रमाण ठेवले म्हणजे कर्जबाजारी होण्याची वेळ येणार नाही. जाहिरातीत आणि बाजारात आज इतक्या वस्तू आहेत की सर्वच सर्वांना हव्याशा वाटतात. पण आपली ऐपत प्रत्येकाने पाहिली पाहिजे.

जरुरीपेक्षा जास्त द्रव्यप्राप्ती झाली तरीही नियोजनाची आवश्यकता आहे. सर्व काळ सारखा नसतो. अडीअडचणीकरता तरतूद केलेली असावी. विशेषतः आयुष्याच्या उत्तर कालात कधी ना कधी तरी मोठ्या रकमेची एकदम जरुरी भासते. मुलामुलींचे उच्च शिक्षण, दूरचे प्रवास, लग्नसमारंभ, मोठा आजार, एकादे ऑपरेशन—अशा कामाकरता एकदम मोठ्या रकमांची गरज लागते. आधीपासून नियोजन केले तरच अशा द्रव्याची सोय होऊ शकते.

ज्यांच्यापाशी नियोजन नाही, भविष्यकाळात पहाण्याची दृष्टी नाही आणि जीवनाविषयी खोल विचार नाही, अशा लोकांना जादा वेळ आणि जादा द्रव्य या गोष्टी वरदान होण्याऐवजी शाप ठरतात. मूर्ख माणसांना जादा वेळ मिळाला आणि त्याच्या जोडीला जादा पैसाही मिळाला की व्यसनांची कल्पना सुचते. पैसे लावून पत्ते, जुगार, रेस, मद्य, व्यभिचार—असली व्यसने चटकन लागतात. मिळवलेला पैसा त्यात जातो आणि माणूस भिकारी होतो. शहाणपणा येण्यापूर्वी

जादा द्रव्य हातात येणे म्हणजे एक आपत्तीच आहे. माणसांचे वय वाढते, धंदा चालतो पण शहाणपण येतेच असे नाही. खाणावळ, हॉटेल, व्यापार, कंत्राटे इत्यादीत खूप पैसा मिळवूनही शेवटी व्यसनापायी कफल्लक झालेली अनेक माणसे आहेत. म्हणून जादा वेळेचा उपयोग कसा करावा त्याची योजना हवी, त्याचप्रमाणे जादा पैसा मिळाला तर त्याचा आपल्या सुखाकरता संचय व विनियोग कसा करावा त्याचीही योजना करायला हवी.

समाजवादी अर्थरचनेच्या आजच्या युगात कामगार, शेतकरी व बहुजन-समाज यांच्या हातात जादा पैसा खेळणार आहे आणि कामाचे तास कमी, सुट्या इत्यादीमुळे रिकामा वेळही जादा मिळणार आहे. त्याचे नियोजन करण्याचे शिक्षण दिले नाही तर या समाजाला पैसा मिळूनही जीवनातील सुख व शांती लाभणार नाही. वेळ आणि द्रव्य या गोष्टींतील नियोजन गरीब, मध्यम आणि श्रीमंत, सर्वच लोकांना आवश्यक आहे.

[१७-५-१९६९

२५. आत्मज्ञानाचा सोपा प्रकार

आपल्या वेदान्त तत्त्वज्ञानात आत्मज्ञान या शब्दाला एक गूढ अर्थ आहे. हे आत्मज्ञान अगदी अलौकिक पुरुषांनाच शक्य आहे, त्याकरता गुरू पाहिजे, विशेष साधना करायला हवी, अशा प्रकारच्या कल्पना आहेत. त्यामुळे बहुसंख्य लोक या आत्मज्ञानापासून चार हात लांबच राहातात. हा प्रांत आणि हा अधिकार आपला नाही असे मानून, 'जे कोणी आत्मज्ञानी असतील त्यांना नमस्कार असो' असे म्हणून व्यवहारी माणसे आपल्या मार्गाला लागतात.

मी आत्मज्ञानाचा अर्थ लावतो तो अगदी सोपा आहे. आत्मा म्हणजे आपण स्वत: आणि आपल्या स्वत:बद्दलचे जे निरीक्षण ते आत्मज्ञान. आपण स्वत: म्हणजे आपले शरीर, मन आणि बुद्धी. या सर्वांना चालना देते ते तत्त्व म्हणजे वेदान्तामधील आत्मा, तो आपण सध्या बाजूला ठेवू. तो सोडून राहिलेला जो बाकीचा 'मी' त्याबद्दल तरी आपल्याला पुरी आणि अद्ययावत माहिती आहे का ?

तुमचे शरीरच घ्या. तोंडात दात किती आहेत सांगा पाहू ? आता आरशात पाहून प्रत्यक्ष मोजा म्हणजे कळेल. सर्वांनाच बत्तीस दात नसतात. त्या आरशात तुमची जीभ पहा. वैद्य लोक या जिभेवरून तुमच्या आरोग्याचे मोजमाप करतात. आता घसा पहा. हवा आत घेताना आणि बाहेर सोडताना घशाची हालचाल कशी होते ते पहा. डोळ्यांचे नीट निरीक्षण करा. माणसाला झालेल्या सर्व रोगांची

नोंद डोळ्यात असते असे नेत्रतज्ज्ञ म्हणतात, त्याचा अर्थ तरी काय ते तुमच्या डोळ्यांत वाचून बघा. त्वचा कशी आहे ते पहा. तिला हजारो छिद्रे आहेत आणि त्यांवर आपले आरोग्य अवलंबून आहे म्हणतात.

बहुतेकांना आपली उंची व वजन माहीत असते. पण सेंटिमीटर आणि किलोच्या भाषेत त्यांचे आकडे सांगता येणार नाहीत. तेही एकदा पाहून ठेवा. आपले दोन्ही हात आणि दोन्ही पाय सारखे आहेत काय ? थोडा तरी फरक असतोच असे म्हणतात. मोजून पहा. हातावरच्या रेषा आणि चेहेऱ्याची ठेवण पाहून हस्तसामुद्रिक व मुखपरीक्षक तुमचा स्वभाव, भूतकाल आणि भविष्य सांगतात. या रेषा तरी काय आहेत त्यांचे गंमत म्हणून निरीक्षण करा. रेषाही बदलतात म्हणे. तुम्ही आपल्या हातावर शंख घेऊन आलात की चक्र घेऊन, तेही पहा. तळहात पाहून स्वभावाचे बिनचूक वर्णन करणारे हस्तसामुद्रिक माझ्या पाहाण्यात आले आहेत. आरशात तुमचे संपूर्ण शरीर पहा. बसण्याची-उठण्याची रीत, उभे राहाण्याचा डौल आणि चालण्याचा झोक—या गोष्टी तुम्ही पहा व इतरांनाही विचारा. या सर्व गोष्टी मिळून तुमचे व्यक्तित्व, पर्सनॅलिटी, होते. इतरांवर प्रथम दर्शनी छाप या व्यक्तिमत्त्वाची पडते.

तुम्ही आजारी पडला म्हणजे डॉक्टर लोक ज्या गोष्टी पहातात त्या आरोग्याच्या अवस्थेत कशा आहेत ते पाहून ठेवा. म्हणजे नेहेमीपेक्षा चढउतार किती झाला आहे ते तुम्हांलाच कळेल. नेहेमीच्या स्थितीत तुमचे उष्णतामान, टेंपरेचर, किती असते, मिनिटाला श्वास किती होतात व नाडीचे ठोके किती पडतात; तसेच श्रम आणि काम झाल्यानंतर हे मोजमाप काय असते ते पाहा. रक्तवाहिन्या आणि नाड्या यांचे निरीक्षण करा. करमणूक आणि अभ्यास दोन्ही होईल. डॉक्टर घरी आले म्हणजे त्यांच्या यंत्रावर आपला रक्तदाब किती कमी जास्त आहे ते पहा. पुढे मागे ब्लडप्रेशर वाढले तर पूर्वी किती होते ते सांगता येईल.

आपल्या शरीराविषयीचे आपले ज्ञान आणि अज्ञान यांचे प्रमाण किती आहे ते तुमच्या लक्षात येईल. आता आपल्या मनाच्या गाभाऱ्यात डोकावून तेथे काय काय चालते ते पहा. आध्यात्मिक आत्मज्ञानाची ही पूर्वतयारीच आहे. तुम्ही अभ्यासात व कामात ज्या वेळी व्यग्र नसता त्यावेळी मनात कोणते विचार येतात त्यांचे निरीक्षण करा. वारंवार कोणते विचार येतात व त्यांचा तुमच्या स्वभावावर काय परिणाम होतो त्याचा विचार करा. हा विचारांचा विचार आहे. मनाच्या सहाय्याने मनाच्या क्रिया पहाण्याचा हा प्रकार आहे. एखाद्या विषयावर एकाग्र चिंतन करावयाचे झाल्यास तुम्हाला ते किती वेळ करता येते ? तुमच्या वारंवार विचाराचा किंवा ध्यासाचा विषय कोणता आहे? मन हे जसे विचारांचे वाहन आहे तसेच भावनांचे आणि विकारांचेही आहे. प्रसंगाप्रसंगाने मनात निरनिराळ्या भावना व विकार यांची उत्पत्ती होत असते. कोणत्या प्रसंगांनी

तुमच्या कोणत्या भावना आणि विकार जागृत होतात त्यांचे सिंहावलोकन करा. बालकाच्या क्रीडा, निसर्गातील सौंदर्य आणि रुद्रता, गरिबांची दुःखे, श्रीमंतांचे विलास, खलपुरुषांची दुष्कृत्ये—असे अनेक प्रसंग, पाहून किंवा कथा-कादंबऱ्यांतील वाचून तुमच्या कोणत्या भावना प्रबळ आहेत हे अजमावता येईल. कोणत्या विकारांचा आपल्या मनावर फार मोठा प्रभाव आहे ते पहा. काम–क्रोध–लोभ–मत्सर–गर्व हे विकार आपल्या सर्वांच्या ठिकाणी थोड्याफार प्रमाणात असतात. तुमच्या मनावर कोणत्या विकारांचा प्रभाव प्रबळ आहे ?

मनाचे विश्व बाहेरच्या विश्वाइतके विशाल आहे. त्याचा अभ्यास करावा तितका थोडाच आहे. पण आपल्या स्वतःपुरता तुम्ही अभ्यास केला तर तुम्हांला इतरांच्याही मनाची कल्पना येईल. माणसांची परीक्षा करायला तुम्ही शिकाल आणि इतरांशी वागताना त्यांच्या भावना व विकार लक्षात घेऊन तुम्ही आपले धोरण ठरवू शकाल.

आपल्या जीवनाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे बुद्धी आहे. बुद्धिशास्त्राचा अभ्यासही खूप झाला आहे. आपण विचार कसा करतो, स्मरण-शक्तीचे स्वरूप काय आहे, नवीन शिकण्याची पात्रता किती वयापर्यंत असते, अशा अनेक मुद्द्यांवर संशोधन होत आहे. आपण आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या निर-निराळ्या अंगांचे परीक्षण करू शकतो. आपली स्मरणशक्ती कितपत कार्यक्षम आहे, कोणत्या गोष्टी स्मृतीत राहातात, कोणत्या सुटतात; त्या का सुटतात व काय केले असता स्मरणात राहू शकतात ? स्मरणशक्ती ही व्यवहारात अत्यंत उपयोगी पडणारी देणगी आहे. ती वाढवता येते. आपली बुद्धी कोणत्या विषयात विशेष चालते, कोणत्या विषयात कुंठित होते, कारण काय, याचा विचार करा. तुमची बुद्धी तर्कप्रधान आहे का श्रद्धाप्रधान ? एकाद्या गोष्टीवर तुम्ही चटकन् विश्वास ठेवता का विचार करून मग ती स्वीकारता ? बुद्धीचा आणि तर्कशास्त्राचा उपयोग कोणत्या क्षेत्रात करता ? तुमच्या डोळस श्रद्धेची आणि अंधश्रद्धेची क्षेत्रे कोणती आहेत ? आणि शेवटी एक महत्त्वाचे आत्मपरीक्षण—माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान काय आहे ? मी जगात व समाजात जे व्यवहार करतो त्यांच्या मुळाशी काही तत्त्वे आहेत का ? कोणती आहेत ? अशा रीतीने बौद्धिक आत्मपरीक्षण करता येईल.

आपल्या जवळच्या संपत्तीची ज्याला संपूर्ण माहिती आहे तो व्यापार–उद्योगधंदा चांगला करू शकेल. त्याचप्रमाणे आपल्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक गुणदोषांची व सामर्थ्यांची ज्याला बिनचूक कल्पना आहे तो जीवनात सुखी होऊ शकेल.

[१७–६–१९६९

१६. कालचा विद्यार्थी, आणि आजचा—

महाराष्ट्रीय तरुणा, तू भाग्यवान आहेस. साठ वर्षांपूर्वीच्या तरुणापेक्षा तू अधिक सुखी आहेस. आज तुझ्या शिक्षणाकरता तुला ज्या सोयी मिळतात त्या मागल्या पिढीने स्वप्नात देखील पाहिल्या नाहीत ! कुठे १९१० साल आणि कुठे १९७० ! साठ वर्षांत जमीन अस्मानाचे अंतर पडले आहे. कसे ते पहा. तुला त्या काळाची कल्पनाही येणार नाही.

त्या वेळी प्रत्येक गावात प्राथमिक शाळाही नव्हत्या. माध्यमिक शाळा जिल्ह्याच्या ठिकाणी एखादी असायची. कॉलेजे म्हणजे पुणे, नागपूर, किंवा मुंबई या ठिकाणी एक दोन होती. विद्यापीठ फक्त मुंबईचे. शाळा-कॉलेजांची दुर्मिळता आणि जी होती ती फक्त शहरांत, त्यामुळे खेड्यापाड्यांतल्या मुलांना शिक्षण दुर्मिळच. ज्यांची शहरात राहायची सोय असेल त्यांनाच पुढचे शिक्षण. बाकीचे आपले व्ह. फा. म्हणजे व्हर्न्याक्युलर फायनल; मराठी पदवीधर ! मुलकी परीक्षा देणारे.

तीच आजची स्थिती पहा. बहुतेक गावी प्राथमिक शाळा आहेतच. माध्यमिक शाळा खेड्यापाड्यांतून पसरल्या आहेत. पूर्वी सांगली—नाशिक येथे कॉलेजे निघाली तेव्हा लोकांना अपूर्व वाटले. आता जिल्हा-तालुक्याच्या गावी कॉलेजे निघाली आहेत. पाच विद्यापीठे आहेत. एंजिनिअरिंग—मेडिकल कॉलेजांची संख्या वाढली आहे.

निर्धन विद्यार्थ्यांच्या शिक्षणसोयीमध्ये तर खूपच वाढ झाली आहे. तुला कल्पना येणार नाही की मागल्या पिढीत गरीबांना शिक्षण किती दुर्मिळ होते. गावात शाळा नसायची, शहरात यायला लागे. तेथे राहायची सोय नाही. मग कोणाकडे काम करून राहा, वाराने जेवण कर, मधुकरी माग, खाणावळीत वाढप्याचे काम कर, हॉटेलमध्ये कपबशा धू अशी कामे करावी लागत. आज तुला वार आणि मधुकरी ही काय संस्था होती तिची माहितीही नसेल ! बाबारे, या साधनांचा आधार घेऊन अनेक निर्धन तरुण शिकले आणि मोठे झाले. त्यांची राहायची, दिवाबत्तीची, जेवायची सोय नव्हती. म्युनिसिपालिटीच्या कंदिलाखाली अभ्यास करून, देवळात किंवा कोणाच्या तरी ओसरीवर राहून, वार—माधुकरीच्या साहाय्याने निर्धन मुलांनी विद्या संपादन केली. अन् मुली ? त्यांची फारशी काहीच सोय नव्हती.

आज पहा. सोयींच्या मानाने विद्यार्थी कमी पडतात ! सर्वत्र अनेक वसतिगृहे निघाली आहेत. गावातच किंवा गावाजवळ शाळा-कॉलेजे आली आहेत. सरकारी

शिष्यवृत्त्या आणि नादाऱ्यांची संख्या खूप वाढली आहे. ज्ञातीविषयक शिष्यवृत्त्या पुष्कळच आहेत. त्यामुळे शहरात न येता आपल्या गावी किंवा जवळपास राहून अनेक गरीब मुलांना शिक्षण घेता येते. आज शहरात मधुकरी-वाराने निर्वाह करणारा विद्यार्थी दिसतच नाही. ती गरजच संपुष्टात आली आहे; आणि अन्न-धान्य स्थितीही या परंपरेला मारक झाली आहे हा भाग निराळा.

पूर्वी शहरातली आणि पांढरपेशा वर्गातलीच मुले शिकायची. आज सर्रास सर्व जातींची मुले-मुली शिक्षण घेत आहेत; पदवीधर, एंजिनिअर, डॉक्टर, अधिकारी, पुढारी—काय पाहिजे ते होऊ शकतात.

केवढी ही क्रांती—साठ वर्षांतली !

या क्रांतीचे फळ काय ? ज्या प्रमाणात सोयींची वाढ झाली त्या प्रमाणात तुमची कर्तबगारी वाढणार आहे का ? का व्यस्त प्रमाणाने तिची पीछेहाट होणार आहे ? पूर्वीच्या पिढीला शिक्षणाकरता जीवनसंघर्ष करावा लागला. कष्ट करावे लागले. अडचणींचे डोंगर चढावे लागले. त्यामुळे त्यांची जिद्द वाढत्या प्रमाणात होती. तुला सर्व आयते मिळत आहे म्हणून, मला भीती वाटते, की सुखासीनता आणि परावलंबन या दोषांची वाढ तर होणार नाही ? आयते मिळाले तर किंमत वाटत नाही; कष्ट पडले तर महत्त्व कळते.

पण तुझ्या बाबतीत तसे नको होऊ देऊस. हा इशारा घे. मागल्या पिढीने विद्या संपादनाकरता जे कष्ट घेतले ते तू विद्या संपादन करून परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवण्याकरता घे. पहिला, किंवा निदान दुसरा वर्ग व उत्कृष्ट शेकडेवारी मार्क मिळवण्याची महत्त्वाकांक्षा ठेव. व्यायाम करून उत्तम शरीरसंपत्ती मिळव, आणि धंदेशिक्षणाचा फायदा घेऊन भावी जीवनात स्वावलंबी हो. स्वतःचे शील व चारित्र्य उज्ज्वल व संशयातीत ठेव.

[२६-६-१९६९

२७. सेफ्टी रेझरही जपून वापरा

माणसाच्या शरीराला जखमा होऊ नयेत म्हणून नवे नवे शोध लागले आहेत, आणि लावले जात आहेत. सेफ्टी रेझर हा त्यांतलाच एक लहानसा शोध. हे शस्त्र सर्वांना, निदान पुरुषजातीला, परिचित आहेच. पण ते प्रत्यक्ष वापरणाराला काय अनुभव येतो ? सेफ्टी रेझरही पुरेसा सेफ नसतो. त्यानेही कधी कधी जखम होऊन रक्त वाहू लागते आणि मग तुरटी व जंतुनाशक औषधे लावावी लागतात. गालावर एखाददुसरी बारीक पुटकुळी असते ती सेफ्टी रेझरने

कापली जाते अन् रक्त येते. कधी रेझरचा कोन चुकल्यानेही जखमा होतात. सेफ्टी रेझरवरोवर मनाचा सावधानपणाही लागतोच. तो नसला तर सेफ्टी रेझरही लहानसहान रक्तस्रावाला कारणीभूत होतो.

मी इतर माणसांशी वागताना माझे मनही सेफ्टी रेझरप्रमाणे ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्याशी सौम्यपणाने वागतो, त्यांच्या भावनांचा विचार करतो आणि त्यांच्याशी बोलतानाही शब्दांची योजना तोलून करतो. पण इतके करूनही न कळत एखाद्या वेळी माझ्या शब्दाने आणि वागण्याने दुसऱ्या माणसाचे मन दुखावले जाते. त्याच्या मनावर कुठं तरी लहानसहान पुटकुळ्या असतात त्या माझ्या सौम्य भाषणाने आणि वागण्यानेही दुखावल्या जातात आणि त्याला यातना होतात.

एकदा एस्. टी. बसने प्रवात करीत असताना पुराच्या पाण्यामुळे आमची बस वाटेतच थांबली. तेथे एका झोपडीतील बाईने चहा करून अगदी वाजवी दरात सगळ्या उतारूंना दिला. त्यांच्या आपत्तीचा फायदा घेऊन दर वाढवले नाहीत आणि फाजील नफ्याचा मोह धरला नाही. त्या बाईचे मला फार कौतुक वाटले, व सहानुभूती दाखवावी म्हणून इकडचे तिकडचे प्रश्न विचारताना म्हणालो, " बाई, मुले वाळे काय करतात ? " झाले, इथे माझे न कळत चुकले बाई निपुत्रिक होत्या. " काय सांगू बाबा, देवाने लेकरबाळं दिली नाहीत " असे म्हणून ती बाई खिन्न झाली. जितक्या आनंदाने मी त्या झोपडीत शिरलो तितक्याच दुःखाने बाहेर पडलो, आतले वातावरणही दुःखित करून ! !

सहानुभूती, सौम्य भाषा, चांगुलपणा यांच्याही पलीकडे जायला हवे असते. दुसऱ्या माणसाच्या मनातील शल्यही कल्पनेने जाणून घ्यायचा प्रयत्न करायला हवा, आणि त्याप्रमाणे वागायला पाहिजे. काही वेळेला असे प्रश्न विचारायचा मोह टाळणे हेही आवश्यक असते. परीक्षांचे निकाल लागलेले असतात. कित्येक लोक पास होतात, त्यांच्यापेक्षा अधिक नापास होतात. सहज भेटलेल्या एखाद्या विद्यार्थिनीला किंवा तिच्या पालकाला आपण मोठ्या उत्साहाने विचारतो—— " काय, परीक्षेचा निकाल काय लागला ? " आणि ती बिचारी नापास झालेली असते. अशा वेळी आपला आपुलकीचा आणि सहानुभूतीचा प्रश्नही दुसऱ्या माणसाच्या दुःखाला कारणीभूत होतो.

पुण्यात फिरणाऱ्या काही रिक्षावाल्यांनी गाडीत एक बोर्ड लावलेला असतो तो मला फार आवडतो. " शब्द हे शस्त्र आहे, जपून वापरा. " हा उपदेश गिऱ्हाईकांना आणि स्वतः वाहनाच्या मालकाला, दोघांनाही लागू आहे. भाषा वापरणाऱ्या प्रत्येकाला तो लागू आहे.

याचा अर्थ शब्द वापरायचेच नाहीत असा नव्हे. कधी काळी रक्त येते

म्हणून सेफ्टी रेझरचा वापर कोणी सोडीत नाही. जास्त काळजी घेतो. फोड पुटकुळ्या कोठे आहेत ते पाहून शस्त्राचा वापर करतो. त्याचप्रमाणे आपल्या शब्दशस्त्रांचा उपयोग करताना सावधगिरी घ्यायची असते.

व्यवहारात बोलताना फक्त आपल्या विचाराच्या आणि भाषेच्या अहंकारात आपण असतो. दुसऱ्या माणसाच्या कमीपणावर किंवा व्यंगावर एखादी गमतीदार आणि नवीन कोटी सुचते. सर्वांना हसवण्याकरता आणि आपल्या बुद्धीची चमक दाखवण्याकरता विनोद करावासा वाटतो. जगात प्रत्येक माणसाला निसर्गाने काहीना काही तरी कमीपणा दिलेला असतो. त्यात त्या व्यक्तीचा फारसा दोष नसतो. असा कमीपणा कधी कृष्णवर्ण, कुरूप चेहेरा, असा वरवर दिसणारा शारीरिक असेल तर कधी निपुत्रिकता, कमी हुशारी, अशासारखा उघड न दिसणारा असेल. माणसाशी बोलताना त्याची परिस्थिती व त्याच्या भावना या सर्वांचा विचार करूनच जपून बोलायचे असते.

इतके करूनही, सर्व प्रकारची काळजी घेऊनही एखाद्या वेळी न कळत आपल्या बोलण्याने अन् वागण्याने दुसरी माणसे दुखावतात. अशा वेळी त्याचेही निराकरण केले पाहिजे. दुःखावर फुंकर घालायला पाहिजे. जखमेवर औषध लावावे लागते. मनाच्या दुःखावरही प्रेमाच्या शब्दांचे व सहानुभूतीच्या वागण्याचे औषध लावायचे असते.

सारांश, जगातले आपले वागणे आणि बोलणे यांत सतत सावधानता पाहिजे. सेफ्टी रेझर वापरतानाही सावधान असावे लागते; नाहीतर रक्त येते

[२६-६-१९६९

२८. अपूरे दर्शन

हैदराबाद शहरात सालरजंग म्यूझियम नावाचे एक नावाजलेले कलावस्तु-संग्रहालय आहे. जगातील दुर्मिळ व सुंदर वस्तू मिळवून एका व्यक्तीने आपल्या हौसेखातर हा संग्रह केलेला आहे. त्यांत फ्रान्समधून आणलेला एका सरदाराचा पुतळा ठेवलेला आहे. मोठा डौलबाज आणि रुबाबदार आहे हा सरदार. त्याच्याच मागे एक मोठा आरसा आहे. त्यात या सरदाराची पाठीमागची बाजू दिसते. आणि काय आश्चर्य, सरदाराच्या पाठीऐवजी एक सुंदर विनयशील तरुणीचा पुतळा त्या आरशात दिसतो ! हीच मूर्तिकाराची प्रतिभा आहे. एका बाजूला पौरुष, दुसऱ्या बाजूला स्त्रीसौंदर्य. स्त्री-पुरुषांचे ऐक्य अशिल्पाकडेही एका

3934

शिल्पकलेत सूचित केले आहे. तुम्ही अर्धनारीनटेश्वराची मूर्ती किंवा चित्र कधी पाहिले आहे काय ? त्यात उजवा अर्धा भाग शंकराचा आहे आणि डावीकडील अर्धा भाग उमेचा आहे. पण दोन्ही भाग एकदम दिसतात. मी जे सांगणार आहे त्याकरता सरदार-तरुणीचा हा जोड-पुतळा अधिक महत्त्वाचा आहे.

आपण एकाद्या व्यक्तीविषयी ज्यावेळी अभिप्राय देतो त्यावेळी आपल्याला त्या व्यक्तीची किती माहिती असते ? प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाची अनेक क्षेत्रे असतात आणि स्वभावाला अनेक पैलू असतात. आपण त्यांपैकी एखाद्या क्षेत्रातील काम किंवा स्वभावाचा एखादा पैलू पाहून व्यक्तीचे मूल्यमापन करतो. त्यात त्या व्यक्तीचे संपूर्ण मूल्यमापन होत नाही. त्या व्यक्तीची संपूर्ण ओळख आपल्याला झालेलीच नसते. आपल्याला त्या माणसाच्या कार्याचा व स्वभावाचा एखादा भाग दिसतो आणि त्यावरून आपण त्याच्याविषयी आपले मत बनवतो. यात आपला अभिप्राय एकांगी ठरतो आणि त्या व्यक्तीचे मूल्यमापन अगदी अंशतः होते. त्यामुळे अभिप्रायात कधी त्या व्यक्तीवर अन्याय होतो तर कधी वाजवीपेक्षा अधिक मोठेपणा दिला जातो. दोन्हीही गोष्टी सदोषच आहेत.

कुटुंबात एखादी प्रमुख व्यक्ती असते. जन्मभर त्या व्यक्तीच्या सान्निध्यात राहाणाऱ्या घरातल्या माणसांना तरी त्या व्यक्तीच्या सर्व क्षेत्रांतील कामांची ओळख झालेली असते का ? आपला नवरा कामावर गेल्यावर तेथे तो कशा प्रकारचे काम करतो, तेथील कनिष्ठ-वरिष्ठ माणसांशी कसे वागतो, त्याच्या कामाचा दर्जा काय आहे--याविषयी त्याच्या पत्नीला तरी माहिती असते का ? ती त्याला कधी विचारीत नाही आणि तोही कधी तिला सांगत नाही. ही गोष्ट सांगण्यासारखी व ऐकण्यासारखी आहे असे दोघांनाही वाटत नाही. पतीलाही आपल्या पत्नीच्या कार्यक्षेत्राविषयी असेच अज्ञान असते. ती शेजारीपाजारी मैत्रिणीकडे गेल्यानंतर काय बोलते चालते, बाजारहाटाला गेल्यावर कशी वागते, महिलामंडळात काय काय करते याची माहिती फारच थोड्या पतिराजांना असते.

प्रत्येक माणसाच्या व्यवहाराची अनेक क्षेत्रे असतात. त्या त्या ठिकाणी माणसाचा स्वभाव व गुणावगुण व्यक्त होत असतात. ज्या क्षेत्रातील व्यक्ती त्या माणसाला पाहातात त्या तेवढ्यापुरते मत बनवतात. मनुष्य व्यवसायानिमित्त आपल्या कार्यालयात किंवा कारखान्यात जातो, करमणुकीकरता मित्रमंडळात जातो, एखाद्या सार्वजनिक संस्थेत काम करतो, स्वतःच्या कुटुंबात वावरतो, नातेवाईकांच्याकडे जातो. या सर्व ठिकाणी तो कसा वागतो आणि काय काय काम करतो त्याची समग्र माहिती मिळाली तरच त्या व्यक्तीचे संपूर्ण मूल्यमापन करता येईल. व्यक्ती जितकी अधिक कर्तबगार व बुद्धिमान तितकी तिची कार्य-

क्षेत्रेही विपुल आणि व्यापक. या प्रत्येक क्षेत्रात आपण काय काम करतो ते मनुष्य इतरांना सांगतोच असे नाही. त्या माणसाचे चरित्र लिहायचा प्रसंग येतो तेव्हाच चरित्रकार सर्व बाजूंनी सर्व क्षेत्रांतील माहिती मिळवून त्या माणसाचे सर्वांगीण चित्र उभे करू शकतो.

इतरांविषयी अभिप्राय देताना, त्याच्या स्वभावाचे वर्णन करताना आणि त्याच्या कामाचे मूल्यमापन करताना आपण सावधगिरी बाळगावी. आपले ज्ञान अपुरे आहे ही जाणीव ठेवून आपला अभिप्राय द्यावा. आपल्या अभिप्रायाच्या आधारावर इतर माणसेही आपापली मते बनवीत असतात. स्तुती आणि सद्‌गुण-प्रशंसा यांचे सढळ माप त्या व्यक्तीच्या पदरात पडले तरी चालेल. पण टीका, निंदा आणि दुर्गुण वर्णन करताना मात्र जिभेवर नियंत्रण ठेवावे. भरमसाट विधान न करता जेवढा प्रत्यक्ष अनुभव असेल तेवढ्यापुरतेच बोलावे, एखाद्या उदाहरणावरून एकदम सामान्य सिद्धान्त काढू नये.

चार समवयस्क माणसे एकत्र जमली की उपस्थित नसलेल्या एखाद्या व्यक्तीविषयी चर्चा हा एक महत्त्वाचा कार्यक्रम असतो. त्यावेळी आपला अभिप्राय देताना प्रत्येकाने ही काळजी बाळगली पाहिजे. नाहीतर या चर्चेला कुटाळकीचे स्वरूप येते. आपल्या मनाला असा प्रश्न विचारावा की 'त्या व्यक्तीचे समक्ष त्याच्याविषयी मी हे बोलू शकेन का ? माझे बोलणे मी आधाराने सिद्ध करू शकेन का ?' इतके पथ्य पाळून आपले मत सांगायला काही हरकत नाही.

ज्या ज्या व्यक्तींशी आपला अधिक संबंध येतो त्यांच्या सर्व क्षेत्रांतील कामाविषयी आपण अधिक माहिती घ्यावी. सर्वसामान्य मनुष्य आपण होऊन आपले काम सांगत नाही. पण विचारल्यावर त्याला बरे वाटते आणि तो मग मोकळ्या मनाने सर्व सांगतो. जगातल्या घडामोडींविषयी बोलणे जितके महत्त्वाचे तितकेच आपण काय कामे करतो हेही महत्त्वाचे आहे. त्याचीही माहिती परस्परांना द्यावी व त्यांचेकडून घ्यावी.

माणसाच्या सर्व बाजूंनी दर्शन घेण्याचा प्रयत्न करावा. एकांगी दर्शन असू नये. देवाला प्रदक्षिणा घालण्याचे तत्त्व हेच आहे. सर्व देवालयाची शोभा पाहिली जावी. अर्जुन जन्मभर कृष्णाच्या सहवासात होता. पण आपली ओळख करून देण्याकरता विश्वरूप–दर्शनाचा चित्रपट त्याला दाखवणे कृष्णालाही आवश्यक वाटले. तुमचेही समग्र दर्शन इतरांना झाले तर ते तुमचे मूल्यमापन योग्य रीतीने करू शकतील.

[३०–६–१९६९

१९. सदसद्-विवेक बुद्धीचा पडदा

संघटना, संस्था आणि सामुदायिक समाज यांच्या दृष्टीने १९६९ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे आहे. देशात ज्या घटना घडत आहेत त्यामुळे काही तात्त्विक व मौलिक विचार सुचतात. ते कौटुंबिक जीवनापासून राष्ट्रीय संघटनापर्यंत सर्वच संस्थांना बोधप्रद व चालना देणारे ठरतील.

राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकीच्या निमित्ताने "कॉनशन्स्," सदसद्-विवेक-बुद्धी हे तत्त्व प्रामुख्याने पुढे आले आहे. सभासदांना आपल्या सदसद्-विवेक-बुद्धीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य असावे की नसावे हा अगदी मूलगामी प्रश्न उपस्थित झाला आहे. त्याचा देशाचे भवितव्यावर दूरवर परिणाम होईल. प्रत्येक संघटनेत असा प्रसंग कधी ना कधी तरी येतोच.

सत् आणि असत्, इष्ट आणि अनिष्ट, चांगले आणि वाईट, सदाचार आणि दुराचार, असा प्रश्न केव्हा उभा राहतो? ज्या वेळी एखाद्या संघटनेत त्या त्या प्रश्नाविषयी निश्चित नियम, कायदा, संकेत, परंपरा, घटना किंवा आदेश इत्यादी नसतात, निश्चित मार्गदर्शन नसते, त्याच वेळी वैयक्तिक सभासदाला आपल्या सदसद्-विवेक-बुद्धीचा उपयोग करण्याचा प्रसंग येतो व आवश्यकता भासते. परंतु असे निश्चित मार्गदर्शन संघटनेमार्फत ज्या वेळी सभासदांना असते त्या वेळी नियमपालन हेच सत् म्हणजे श्रेयस्कर व कल्याणकारक असते.

एखाद्या संघटनेची घटना किंवा तिचे नियम केले जातात त्याच वेळी सर्व दृष्टींनी विचार करून सत् आणि असत् काय यांची चर्चा करून सत् तत्त्वांना धरूनच नियम केले जातात. नाही तर प्रत्येक घटकेला सत् काय व असत् काय याचा विचार प्रत्येक सभासदाला करावा लागेल आणि प्रत्येकाचे उत्तर निराळे आल्यामुळे संघटनेत गोंधळ माजेल. अनिष्ट नियम बदलून घेण्याचे स्वातंत्र्य व तो हक्क प्रत्येक सभासदाला असतो. परंतु नियम बदलून घेईपर्यंत त्याचे पालन करणे हाच प्रत्येकाचा धर्म असतो. त्याचे उल्लंघन हा दुराचार, अधर्म, स्वैराचार ठरतो.

ज्या क्षेत्रात संघटनेचे नियम नसतील, संकेत किंवा परंपरा नसतील, निश्चित आदेश नसेल तेथे मात्र सदसद्-विवेक-बुद्धीला पूर्ण वाव राहातो. वाटेल त्या क्षेत्रात या बुद्धीचा वापर केला तर संघटना, घटना, नियम, परंपरा, संकेत, आदेश यांना काही अर्थ राहाणार नाही. संघटनेत गोंधळ आणि बजबजपुरी माजेल. 'काँग्रेस' सारखी जुनी, सुप्रतिष्ठित, बलशाली संघटना असली तरी तिच्यात 'ग्रेस' राहाणार नाही.

निश्चित नियमांचे मार्गदर्शन असताना एखाद्या संघटनेचे सभासद स्व-

बुद्धीच्या नावाखाली नियमभंग करू लागले तर स्वार्थ, अहंकार, सत्तालोभ, पक्षभेद, पक्षपात, फाटाफूट, द्रोह यांना वाव मिळेल. इतर वेळी संघटनेच्या ऐक्याचा, यंत्रणेचा, बलाचा फायदा घ्यायचा; आणि स्वार्थाच्या वेळी किंवा लहरीखातर अथवा अहंकाराला वळी पडून, अथवा अगदी प्रामाणिक बुद्धीनेही, सदसद्-विवेक-बुद्धीच्या पडद्याआड नियमभंग, स्वैराचार करायचा हे अयोग्य आहे. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनातील आणि ती सभासद असलेल्या संघटनेतील सर्व 'ग्रेस' च निघून जाईल. शिल्लक राहील 'डिस्-ग्रेस.'

देशातील या प्रसंगातून प्रत्येक संघटनेला तात्त्विक बोध घेण्यासारखा आहे. जे पिंडी ते ब्रह्मांडी; मनुष्यस्वभाव सारखा असल्यामुळे जी तत्त्वे मोठ्या संघटनांना लागू पडतात तीच लहानसहान संघटनांनाही उपयोगी पडतात. या दृष्टीने सर्वांनीच बोध घेतला तर समाजाचा फायदा होईल. संघटनेचे निश्चित नियम नसतील तेथेच सदसद्-विवेक-बुद्धीचा उपयोग अवश्य करावा.

सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरण-प्रवृत्तयः । ——कालिदास

[१५-८-१९६९

३०. मी मी मी ! काय हा अहंकार !

आजारी होतो म्हणून सहज रेडिओ लावला. एका उच्चपदस्थ व्यक्तीच्या भाषणाचा वृत्तान्त निवेदक सांगत होता. पूर्वीच्या काळी राजाच्या पदरी भाट असत, तीच भूमिका रेडिओचे निवेदक आणि काही वृत्तपत्रांचे बातमीदार यांची असते. सत्ताधारी व्यक्तींच्या तुताऱ्या फुंकायच्या. त्यांच्या क्षुल्लक भाषणांना पुन्हा पुन्हा प्रसिद्धी, आणि एखाद्या विचारवंताने मौलिक विचार मांडले तरी त्यांची पूर्ण उपेक्षा. असो. तर निवेदकाने त्या व्यक्तीचे भाषणातील उतारे सांगितले. त्यात मी मी मी इतक्या वेळां येऊ लागले की त्या 'मी'ची शिसारी येऊन माझ्या 'मी' ने रेडिओचा कान पिळला आणि दुसरे स्टेशन लावले. त्यावर असे शब्द ऐकू आले—अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझिया विष्णुदासा भाविकांसी ॥

मग अहंकाराविषयी विचार करता करता गीतेतील पुढील ओळ आठवली—निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥ हे दुसऱ्या अध्यायातले स्थितप्रज्ञाचे वर्णन होते. मग तेराव्या अध्यायातले ज्ञानी पुरुषाचे वर्णन आठवले—इंद्रियार्थेषु वैराग्यम् अनहंकार एव च ॥ मग सोळाव्या अध्यायातल्या आसुरी व्यक्तीचे वर्णन मनात आले—अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ॥ शेवटपर्यंत

गेल्यावर अठराव्या अध्यायातील सिद्ध व्यक्तीचे वर्णन, जे मला फार आवडते, ते मनाशी गुणगुणू लागलो---

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् । विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ।। अहंकार इत्यादी दुर्गुणांचा त्याग केल्यावर माणूस श्रेष्ठपदाला पोचतो.

ज्यांच्या मनावर भारतीय विचारांचा, तत्त्वज्ञानाचा, संस्कारांचा परिणाम झाला आहे त्या व्यक्ती अहंकारापासून अलिप्त असतात. त्यामागे एक तात्त्विक विचारसरणी आहे. माणूस एकटा काही करू शकत नाही. त्याच्या यशात अनेक घटक भागीदार असतात. परिस्थिती, साधने, सहकारी व्यक्ती, या सर्व गोष्टी अनुकूल असल्या म्हणजे व्यक्तीला यश मिळते. व्यक्ती हा त्यांतील एक चतुर्थांश किंवा पंचमांश म्हणजे बीस-पंचवीस टक्के घटक आहे. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे, या तत्त्वाची जाणीव ज्या व्यक्तींना झाली आहे त्या अहंकार बाळगीत नाहीत. स्वार्थ आणि अहंकार या दोषापासून अलिप्तता हे थोर व्यक्तींचे भूषण आहे, लक्षण आहे.

आजच्या लोकशाहीच्या युगात व्यक्तीपेक्षा समुदायाला महत्त्व व शक्ती प्राप्त झालेली आहे. ज्या गोष्टी सामुदायिक रीतीने करता येत नाहीत, त्या करण्याचा अधिकार समुदायाकडून एकाद्या कर्तबगार व्यक्तीकडे येतो. समुदायाच्या, त्यांतील सहकाऱ्यांच्या सहाय्याने, नेतृत्व करणारी व्यक्ती आपले काम करीत असते. तिला जेव्हा यश मिळते तेव्हा त्या यशात इतर सर्व भागीदार असतात. अशा स्थितीत 'मी हे केले, मी ते केले' अशी शेखी मिरवणे हा क्षुद्र अहंकार आहे. ऐकणारी माणसे शांतपणे ऐकून घेतात पण अहंकाराचा दर्प त्यांना जाणवतो. मनामध्ये अशा अहंकाराचा तिरस्कार वाटतो.

जी गोष्ट राजकीय क्षेत्रात आहे तीच इतरही सर्व क्षेत्रांत आहे. व्यक्तीची बुद्धी आणि कर्तबगारी या गोष्टी महत्त्वाच्या आहेत यात शंकाच नाही. पण या गुणांना इतरांच्याही बुद्धीची व कर्तबगारीची जोड मिळाल्याशिवाय व्यक्तीला यश मिळू शकत नाही. यश सर्वांचे मिळून असते. व्यक्तीचा वाटा मोठा आणि महत्त्वाचा असतो हे खरे, पण त्याच्या जोरावर फार अहंकाराचे प्रदर्शन करणे इतर माणसांना आवडत नाही.

एखादा एंजिनियर उत्कृष्ट इमारत बांधतो. त्यात कितीतरी लहानमोठ्या व्यक्तींची भागीदारी असते. डॉक्टर एखादा असाध्य रोगी बरा करतो, त्याला इतर सर्व व्यक्तींचे सहकार्य लागते. सेनापती युद्धात विजय मिळवतो तो काही एकटा लढत नाही. एखाद्या कारखान्यातून उत्कृष्ट माल बाहेर पडतो तो निर्माण करण्याचे कामी अनेक डोकी आणि हात लागलेले असतात. एखादी संस्था यशस्वी होते त्या यशात सर्व कार्यकर्त्यांची भागीदारी असते. कौटुंबिक जीवनातही तेच

आहे. कुटुंबातील प्रत्येक लहान-मोठ्या व्यक्तीला इतरांची मदत मिळते तेव्हाच ती यशस्वी होते.

एकाद्या वृक्षाचा डौलदार भाग आपणाला वरवर दिसतो. पण त्या वृक्षाला पोषण देणारा, त्याला आधार देणारा, त्याचा तोल सांभाळणारा भाग भूमीमध्ये अदृश्य स्वरूपात असतो. तो जोपर्यंत कार्यक्षम आणि बलवान आहे तोपर्यंतच वृक्ष ऊन, पाऊस, वारा, वादळ—सर्व गोष्टींना सहन करून फुले आणि फळे देऊ शकतो. असेच व्यक्तीच्या यशस्वी जीवनाचे आहे. त्याची मुळे खोल गेलेली असतात. वैयक्तिक यशाला अनेकांचे हातभार लागलेले असतात. त्यांची जाणीव न ठेवता अहंकाराने मी मी करणारे कृतघ्न ठरतात.

परिस्थितीला वळण लावणारी, अलौकिक बुद्धीची व कर्तबगारीची माणसे असतात. त्यांच्या अभावी इतिहासाला, परिस्थितीला, समाजाला निराळे वळण लागले नसते हे खरे आहे. पण वळण लावण्यात आपली बुद्धी व प्रतिभा असली तरी तिला इतरांचे सहकार्य मिळाले आहे ही जाणीव थोर पुरुषांना असते. म्हणून ते आपल्या यशाने हुरळून जात नाहीत आणि अपयशाने खचत नाहीत. यशापयश आपल्या एकट्याच्या हातात नाही या जाणीवेने ते नम्र आणि विनयशील राहातात. आपल्या यशाचे श्रेय ते सहकाऱ्यांना, परिस्थितीला आणि जगातील अदृश्य अशा विश्वशक्तीला देतात.

अहंकार, मीपणा, माझेपणा, स्वार्थ, गर्व हे माणसाचे मोठे दुर्गुण आहेत. त्यांपासून मुक्त न झालेली माणसे विकासाच्या खालच्या पातळीवर राहातात. "मी मी" बरळणाऱ्या हिटलर-मुसोलिनी-सोकार्नो सारख्या व्यक्ती धुळीला मिळाल्या. आजच्या तरुण पिढीला त्यांची नावेही माहीत नसतील ! वैयक्तिक मोठेपणाच्या अहंकाराने अंध झालेल्या व्यक्तींना अंतिम समाजहित दिसू शकत नाही, म्हणून त्यांचे अधःपतन होते. कर्तबगारीला अहंकार चिकटला की अधःपात ठेवलेलाच असतो.

अलौकिक बुद्धी, प्रतिभा आणि कर्तबगारी असणारी व्यक्ती विनयाने शोभते. लोकमान्य होते. चिरकाल मार्गदर्शन करीत राहाते. अजरामर होते.

[२८-८-१९६९

३१. भावना बोथट होत चालल्या !

दिवसेंदिवस आपल्या भावना बोथट होत चालल्या आहेत असे मला स्वतःच्या अनुभवावरून वाटायला लागले आहे. समाजात अनिष्ट, अनैतिक,

अयोग्य, संस्कृतिविनाशक गोष्टी इतक्या मोठ्या प्रमाणावर व इतक्या वारंवार होत आहेत की, असे वाटू लागते—'चालायचेच. रोज मरे त्याला कोण रडे ?'

रोज वाचनात येणाऱ्या, कानावर पडणाऱ्या आणि प्रत्यक्ष दिसणाऱ्या काही घटनाच पहा. रेल्वेचे अपघात वारंवार होऊन अनेक निरपराधी माणसे मृत्युमुखी पडतात, किंवा जन्माची अधू होतात. तीच गोष्ट बस आणि विमान वाहतूक यांचीही. माणसांचे खून पडत नाहीत असा दिवस जात नाही; आणि हे रक्तपात अगदी साध्यासुध्या कारणाकरता होतात ! बलात्कार वाढत आहेत. गावगुंडांनी दिवसाढवळ्या कुलीन स्त्रियांची अब्रू घ्यावी आणि उजळ माथ्याने समाजात वावरावे ! लाचलुचपत म्हणजे तर व्हायरसपेक्षा वेगाने पसरणारा रोग. या लंचावतार युगात संध्यापासून–मंध्यापर्यंत सगळे त्यात सापडू लागले आहेत. पुन्हा चौकशी करायला विरोध ! शिक्षकांना मारहाण आणि परिचारिकांचा विनयभंग करणारांत प्रतिष्ठित गावकरी सामील होत आहेत. गावपंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, कायदेमंडळे, लोकसभा हे आमच्या लोकशाहीचे, प्रजातंत्र राज्याचे बालेकिल्ले ! पण तेथे काय चित्र दिसते ? भरपूर मासिक पगार आणि लठ्ठ दैनिक भत्ते खाऊन सभातहकुबी, वॉकआऊट, आरडाओरड, वर्दळीवर येणे, एकमेकांवर चालून जाणे, खुर्च्या फेकणे, पेपरवेट फेकून मारणे, लाऊड स्पीकर मोडून टाकणे, स्पीकरच्या अंगावर धावून जाणे—हा आपल्या लोकशाहीचा दुर्गावतार आणि प्रजातंत्री चंडीचा थयथयाट आहे ! विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्याकरता प्रयोगशाळा, ग्रंथालये, वर्ग यांना आगी लावणे व त्यांची नासधूस करणे म्हणजे साधी गोष्ट आहे ! हे गद्धेपंचविशीच्या अलीकडील विद्यार्थ्यांचे झाले. आता बत्तिशी पार पडलेले लोक तरी काय करतात पाहा. साध्या मागण्यांचे दडपण सरकारवर आणण्याकरता बसेस जाळणे, रेल्वेचे रूळ उखडून अनेकांचा जीव गोत्यात आणणे—हे थोरामोठ्यांचे प्रताप. ही यादी वाढत चालली म्हणून थांबतो. पण तुम्हीही विचार करून तीत भर घालू शकाल. अहो, अनिष्ट आणि भयंकर काय आहे हे तरी कळले पाहिजे; तरच त्यावर इलाज करता येईल. रोगांच्या लक्षणांची यादी करायला भिऊन कसे चालेल ?

पण येवढे खरे की हे सर्व रोग पुन्हा पुन्हा पुष्कळ वेळा सर्वत्र घडत असलेले पाहून मन विटून जाते. भावना बोथट होतात. मनाचा हळुवारपणा बधिर होऊन जातो. विषण्णतावृत्ती थकून जाते. आपण कोडगे होऊ लागतो. निगरगट्ट होतो. कालांतराने सर्व पचवू लागतो.

आम्हाला चांगले वाईट यांचे सोयरसुतक नाहीसे होत चालले आहे. चांगले झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित करायची वृत्ती लोपत चालली. वाइटाचा निषेध करायची बुद्धी नष्ट होत चालली. उदासीनता वाढत चालली. पण लक्षात ठेवा, उदासीनता हेही दुराचाराला उत्तेजनच आहे.

सत्ताहीन लोकांच्या हातांत प्रत्यक्ष प्रतिकाराचा मार्ग नाही. पण लोकशाहीत मतप्रदर्शन हे एक प्रभावी शस्त्र आहे. त्याचा सर्व प्रकाराने उपयोग करा. त्याचा पुरेपूर फायदा घ्या. चांगल्यास चांगले म्हणा, वाइटाचा कडाडून निषेध करा. आपापल्या वर्तुळात बोला. चर्चा करा. संबंधित व्यक्तींना पत्रे लिहा. वर्तमानपत्रात पत्रे द्या. पंचायती, परिषदा, नगरपालिका, कायदेमंडळे, लोकसभा, इत्यादींच्या ज्या सभासदांना मते दिली त्यांना समक्ष भेटून, पत्राने, सभा भरवून अथवा अन्य मार्गाने तुमच्या भावना कळवा. चांगल्या गोष्टींचा गौरव होतो, आणि वाईट गोष्टी सुखासुखी सहन केल्या जात नाहीत हे सर्वांना कळू द्या.

चांगले झाले वाहवा—वाईट झाले तरी वाहवा, असे वाहून जाऊ नका. अलिप्तपणे वागू नका. आज जो प्रसंग इतरांवर तोच आपल्यावर येणार नाही कशावरून ? हातात आहे ते तरी करा. उदासीन राहू नका. भावना जिवंत ठेवा. माणुसकीची तीच एक खूण आहे.

[१५-९-१९६९

३१. सत्य व अहिंसा चिरंतन राहोत

सत्या, अहिंसा—तुम्ही या देशात आज पाच हजार वर्षांपेक्षा अधिक राहिलात. असेच राहा. आम्ही तुम्हाला सोडले तरी, तुम्ही आमचा त्याग करू नका. तुम्ही देशांतर केले की आम्ही एकमेकांना लुबाडू आणि परस्परांच्या नरडीचा घोट घेऊ ! तुमची या देशाला यापुढेही फार गरज आहे.

महात्मा गांधींचा शताब्दिमहोत्सव झाला. सर्व राजकीय पक्षांनी आणि पुढाऱ्यांनी आपल्याला अनुकूल असा गांधीजीवनाचा अर्थ लावला. गांधींचा उपयोग करून घेतला. वर्ष संपले की सर्व वातावरण थंड होईल.

प्रत्येक थोर विभूतीच्या शिकवणुकीत दोन भाग असतात. एक भाग चिरंतन शाश्वत तत्त्वांचा, व दुसरा भाग त्या तत्त्वांच्या आचरणाचा; तत्त्वांच्या व्यवहाराकरता, उपयोगात आणलेल्या तंत्रांचा आणि साधनांचा.

तत्त्वे चिरंतन असतात, साधने कालमानाप्रमाणे बदलतात. म. गांधींचा सारा भर सत्य आणि अहिंसा या दोन तत्त्वांवर होता. ही तत्त्वे भारतात आज पाच हजार वर्षे विचारात आहेत. रामायण, महाभारत, गीता, बौद्धधर्म, जैन संप्रदाय इत्यादी सर्व धर्मांत व धर्मग्रंथांत ही तत्त्वे आहेत. त्यांचा गांधींनी नवा शोध लावला नाही. तेच म्हणाले "सत्य आणि अहिंसा ही तत्त्वे प्राचीन आहेत. मी काही नवीन शिकवीत नाही."

मग म. गांधींनी नवे काय दिले ? त्यांनी नवीन साधने व तंत्रे दिली, भारताच्या त्या वेळेच्या परिस्थितीला, राजकारणाला, अर्थव्यवस्थेला, समाजाला, व्यवहाराला योग्य अशी नवी साधने गांधींनी निर्माण केली. तत्त्वे जुनी, व्यवहार नवा. सत्याग्रह, कायदेभंग, असहकार, करबंदी, खादी, सूतकताई, निःशस्त्र प्रतिकार, उपवास इत्यादी नवी नवी तंत्रे व साधने म. गांधींनी निर्माण केली, हे त्यांचे वैशिष्ट्य.

जसा काळ तशी साधने. या देशावर ब्रिटिशांचे साम्राज्य होते. आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असे त्यांचे सैन्य येथे होते. भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक नाड्या त्यांच्या हातात होत्या. भारतातील लोक दरिद्री, शिक्षणहीन, शस्त्रहीन, अधिकारहीन असे होते. या देशावर कायद्याचे राज्य होते पण ते कायदे करणे आणि मोडणे ब्रिटिशांना सुलभ असे. या साम्राज्याशी मुकाबला करण्याकरता म. गांधींनी सत्य–अहिंसा तत्त्वावर आधारलेली नवी साधने शोधून काढली— असहकार, कायदेभंग, करबंदी, सत्याग्रह, निःशस्त्र-प्रतिकार, खादी, मूलोद्योगशिक्षण उपवास इ. त्या परिस्थितीला अनुकूल अशी नवीन साधने, त्यांनी भारताला दिली.

आज देश स्वतंत्र आहे. सैन्यावर आपले वर्चस्व आहे. कायदे करण्याचा अधिकार आपला आहे. अर्थव्यवस्था, शिक्षण, राज्यशासन सर्व आपल्या हातात आहे. आजच्या समाजाला म. गांधींनी प्रश्न केला असता—कायदे तुम्ही करता तेथे कायदेभंग कसला करता ? राज्य–शासनातील माणसे तुम्हीच निवडून देता मग सत्याग्रह आणि उपवास कोणाकरता ? अर्थव्यवस्था आणि शिक्षण तुमच्याच हातात आहे म्हणून आता सुबत्ता आणि संस्कृती आणण्याची पराकाष्ठा करा.

सर्वांत म. गांधींना दुःख होईल ते सत्य आणि अहिंसा यांचा दिवसा ढवळ्या चाललेला खून पाहून ! ते म्हणतील—माझी मूलतत्त्वे विसरलात. माझ्या साधनांचा उपयोग करताना असत्य आणि हिंसा यांचा मात्र सर्रास उपयोग करीत आहात. ' हेचि फल काय मम तपाला ? '

आज देशात खुली लोकशाही आहे. बहुमत आपल्या बाजूला करून घेऊन आपल्या तत्त्वाप्रमाणे कारभार करण्याची प्रत्येक गटाला संधी आहे. वाटाघाटी, चर्चा, देवाणघेवाण, सहिष्णुता ही लोकशाहीची तत्त्वे आहेत. सत्य-अहिंसेच्या तत्त्वज्ञानाला लोकशाहीत भरपूर वाव आहे. म. गांधींनी शिकविलेली तत्त्वे चिरंतन आहेत. आम्हीच त्यांना विसरलो. म्हणून विनंती, सत्य देवा, अहिंसा माते, आम्हाला सोडून जाऊ नका.

[२–१०–१९६९

३३. गृहकलह—सभ्य आणि असभ्य

या वर्षी देशातील सार्वजनिक व राजकीय जीवनात जो एक झगडा पाहायला मिळाला त्यावरून सामान्य माणसाला पुष्कळ धडा घेण्यासारखा आहे. पिंडी ते ब्रह्मांडी. माणसाचा स्वभाव सर्वत्र सारखाच आहे. त्यामुळे ज्या गोष्टी मोठ्या प्रमाणावर मोठ्या संघटनेत घडतात त्याच लहान प्रमाणात अनेक कुटुंबांत व संघटनांतही घडतात. काँग्रेसमधील कलहाला उद्देशून हे आहे.

देशातल्या प्रत्येक राजकीय पक्षात दोन दोन पंथ झालेले आहेत. होत आहेत किंवा होऊ घातले आहेत. कामगार संघटनांतही तीच स्थिती आहे. अनेक संस्थांत भांडणे व विभक्तीकरण झाले आहे. कुटुंबातही भाऊबंदकी, गृहकलह व विभक्त होणे या गोष्टी काही नवीन नाहीत.

मतप्रणाली, स्वभाव, कार्यपद्धती, हितसंबंध इत्यादी कारणांकरता ज्या व्यक्तींचे किंवा पक्षांचे जमत नाही त्यांनी विभक्त होण्यात काही वावगे नाही. ही विभक्तीची क्रिया सुसंस्कृत पद्धतीने झाली तर तिचा गाजावाजा होत नाही व विभक्त होणाऱ्या पक्षांना कोणी दोष देत नाही. पण मारामारी, भांडण, कोर्टकचेरी, शिवीगाळ, आरोपप्रत्यारोप, पाताळयंत्रीपणा इत्यादी मार्गांनी ही विभागणी झाली तर ती उभय पक्षांनाही हितावह किंवा भूषणावह होत नाही.

कुटुंबात, संघटनेत किंवा पक्षात शक्य तो ऐक्य राखावे. ते अशक्यच झाले तर सभ्यपणाने व सामोपचाराने विभक्त व्हावे. या दृष्टीने हे कलह पाहून काही सूत्रे आणि आडाखे आपल्या मार्गदर्शनाकरता आपल्याला बसवता येतील का ?

प्रांजळपणाने बोलल्यामुळे व चर्चा केल्यामुळे अनेक गैरसमज व मतभेद नाहीसे होतात. नाहीसे झाले नाहीत तरी मतैक्य आणि मतभेद, यांचे स्वरूप स्पष्ट होऊन, एकत्र राहायचे का विभक्त, हे ठरवता येते. त्यामुळे परस्परांविषयी आदर राहून द्वेष, तिरस्कार, शत्रुत्व या भावना वाढण्याची शक्यता कमी होते.

घरातील आणि संघटनेतील भांडणे चव्हाट्यावर मांडू नयेत. तुमची भांडणे वाढविण्यात लोकांना गंमत वाटते. ती मिटली तर त्यांची निराशा होते. भांडण, टक्कर, झुंज, कुस्ती, फ्रीस्टाईल किंवा बॉक्सिंग पाहाणे हा मानवाचा अनादि काळापासूनचा छंद आहे. मग ही झुंज जनावरांची असो, माणसांची असो, की संघटनांची असो, तिच्यापासून वयस्थाची करमणूकच होते. घरातील भांडणे शेजाऱ्याजवळ सांगितल्याने ती कधी मिटत नाहीत; उलट वाढतात. कलह, मतभेद, किंवा तक्रारी आपल्या घरातच ठेवा. जाहिरात करू नका. तुमचा तमाशा पहयला लोकांना निमंत्रण देऊ नका.

कुटुंबात अथवा संघटनेत कलह होण्याची अनेक कारणे असतात. मतभेद प्रामाणिक असू शकतील. माणसांचे स्वभाव भिन्न असल्यामुळे जमत नसेल. संपत्ती, सत्ता, अथवा अधिकार यांच्याविषयी दोन व्यक्तींत अथवा गटांत चुरस असेल. या गोष्टी पूर्वापार चालत आल्या आहेत. नवीन काही नाही. जोडाजोडी न करता तडजोड करणे, सामोपचाराने विभक्त होणे, आणि विभक्त झाल्यावरही परस्परांशी माणुसकीने व सौजन्याने वागणे या गोष्टी नवीन आहेत. सुसंस्कृत समाजाने त्यांचे आचरण करायला पाहिजे.

लोकशाही पद्धतीने बहुमत घेऊन गोष्टी ठरवाव्यात हे खरे, पण अल्प मतातील व्यक्तीचे स्थान, अनुभव, दर्जा, वजन, महत्त्व, कर्तबगारी, उपयोग, पूर्वेतिहास इत्यादी गोष्टी बहुसंख्यांक पक्षाने लक्षात घेऊन शक्य तितक्या एकमताने निर्णय घ्यावेत. अल्पमतातील नाखूष व्यक्तीच पुढे संघटना मोडायला निमित्त होतात. कुटुंब व संघटना यांचे बळ ऐक्यात, एकोप्यात व परस्परांविषयीच्या आदरात व त्यागात आहे.

हे सर्व पुराण कोणाकरता ? दोन्ही बाजू सभ्य व समजूतदार असतील तर त्यांच्याकरता. एखादी बाजूही शिरजोर, हट्टी, स्वार्थी, कलहप्रिय, पाताळयंत्री किंवा कांगावखोर असेल तर या तत्त्वज्ञानाचा काही उपयोग नाही. एकच बाजू समजूतदार असून चालत नाही. अशा वेळी धर्म, न्याय, नियम, कायदा, दृढनिश्चय आणि धिमेपणा यांचा आश्रय घेऊन योग्य तो मार्ग स्वीकारणे व कलहाची तीव्रता आणि जाहिरात कमी करणे एवढेच सज्जनांच्या हातात असते. श्रीकृष्णासारखा कुशल मध्यस्थ असूनही दुर्योधनाच्या तामसी स्वभावामुळे भारतीय युद्ध झालेच ना ? खुद्द कृष्णाच्या यादव वंशातही कलह होऊन मारामारी झालीच ना ! म्हणूनच यादवी या शब्दात सर्व गृहकलहांचा इतिहास समाविष्ट झाला आहे. यादवीतही सभ्यपणा ठेवता येईल.

[२०-११-१९६९

३४. रामशास्त्री अमर आहेत

न्यायाधीश, तत्त्ववेत्ते, लेखक आणि अध्यापक यांचे जीवन बाह्यतः सुखाचे, शांततेचे आणि निष्कंटक असे दिसते. पण या व्यवसायांतही अधूनमधून कसोटीचे क्षण येतात. त्यावेळी व्यक्तीची तत्त्वनिष्ठा, सद्विवेकबुद्धी, सत्यप्रेम आणि निस्पृहता यांची खरी परीक्षा होते. त्या कसोटीतून उतरण्याला माणसाच्या अंगी धैर्य, निर्भयता व त्यागाची तयारी या गुणांची आवश्यकता असते.

रामशास्त्री प्रभुणे हे समाजातील बुद्धिवंतांचे आदर्श आहेत. सत्याला धरून न्यायनिवाडा करताना त्यांनी राजसत्तेची भीती बाळगली नाही. सत्तात्यागाची, दारिद्र्य-स्वीकाराची, आणि वनवासाची तयारी ठेवली. आपल्या बुद्धीशी, ज्ञानाशी, सद्विवेकबुद्धीशी प्रतारणा न करता ते प्रामाणिक राहिले; बुद्धिजीवी समाजाची अब्रू सांभाळली; त्यांची पातळी उंचावर नेली.

सुप्रीम कोर्टाच्या बँक-राष्ट्रीयीकरण-विषयक निर्भीड निकालाने मला राम-शास्त्रींची आठवण झाली आणि एकंदर बुद्धिजीवी वर्गाच्या भवितव्याविषयी काही विचार मनात आले. देशातील वरिष्ठतम न्यायमूर्ती मंडळाने राजसत्ता, सत्ताधारी व्यक्ती, लोकप्रियता इत्यादी शक्तींची क्षिती न बाळगता न्यायदेवतेची अब्रू सांभाळली. भारतीय बुद्धिमंतांच्या निस्पृहतेची व निर्भयतेची अखिल जगात कीर्ती पसरली. त्यांच्यावर टीका करणारांचा बौद्धिक तोल सुटला आणि सारासार बुद्धी नष्ट झाली. विद्यमान घटना, कायदा आणि नियम यांना धरून न्यायाधीशाला निकाल द्यावा लागतो हे साधे तत्त्व थोरामोठ्यांच्याही लक्षात येऊ नये, हे बौद्धिक पातळीचे खालचे टोक दिसले !

बौद्धिक व्यवसाय करणाऱ्या बुद्धिजीवी व्यक्तींना अनेक मोहाच्या दिव्यातून जावे लागते. राजसत्ता, लष्करी शक्ती, द्रव्यमोह, अधिकार, लालूच, नोकरीत शाश्वती–बढती, मानसिक छळ इ. अनेक गोष्टी त्यांच्या विवेकबुद्धीची आणि प्रामाणिकपणाची कसोटी पाहातात. असे प्रसंग नेहमीच येतात असे नाही. पण ते आल्यानंतर तोंड देण्याची तयारी ठेवावी लागते.

आपल्या फायद्याकरता सुशिक्षितांची बुद्धी विकत घेणाऱ्या अनेक शक्ती समाजात आहेत. राजसत्ता, समाजातील प्रतिष्ठित पुढारी, कामशास्त्राचा व्यापार करणारे प्रकाशक, चित्रपट चालक, जाहिरातदार आणि कारखानदार, प्रसिद्धीप्रिय धनिक, इत्यादी अनेक शक्ती विद्वानांच्या बुद्धीचा दुरुपयोग करून आपले हित साधण्याच्या मागे असतात. त्या शक्तींना बळी पडणारा बुद्धिजीवी वर्ग ज्या समाजात वाढला, त्याचे भवितव्य संपले. उलट सद्विवेक-बुद्धीला जागून, प्रसंगी त्याग सोसूनही बुद्धीशी प्रामाणिक राहाणारा विद्वान वर्ग समाजाला आदर्श घालून देतो. समाज जिवंत ठेवतो.

पूर्वयुरोपातील साम्यवादी देशांत बुद्धिजीवी वर्गाला अत्यंत मोठ्या कसोटीतून जावे लागते. तेथील दडपण असह्य होऊन अनेक लेखक पळून गेले, काही वेडे झाले, काही नामशेष झाले. चीनमध्ये तर त्यांचा भयंकर छळ झाला. भारतात होणाऱ्या राजकीय व सामाजिक परिवर्तनात फाशिस्ट आणि कमुनिस्ट शासनातील हा धोका सतत दृष्टीपुढे ठेवायला पाहिजे.

उदयोन्मुख लेखक, अध्यापक, वकील, न्यायाधीश यांनी डोळे उघडे ठेवून

या व्यवसायात पडावे. त्यांत मोह आहेत, आपत्ती आहेत, कसोटीचे क्षण आहेत. विद्वानांचा वर्ग हा समाजाची विवेकबुद्धी आहे, विचारशक्ती आहे, जीवनाचा आदर्श आहे. त्यांची खरेदी-विक्री किंवा मुस्कटदाबी सुलभ झाली की, त्यांचे महत्त्व संपले. तो समाज रसातळाला चालला असे समजावे. निःस्पृह, निर्भय, चारित्र्यवान, मोहावर मात करणारा बुद्धिवान वर्ग ज्या समाजात अधिक तो जगात सतत आदरणीय, वंदनीय राहील.

[२०-२-१९७०

३७. संस्कार भाषेचा लोप

प्रत्येक संस्कृतीत काही विशेष शब्द प्रचारात असतात. शब्द हे कल्पनांचे वाहन आहे. एकेका शब्दात बराच अर्थ भरलेला असतो. तो अर्थ व्यक्त करायला तोच शब्द अधिक समर्थ असतो. समाजातील चिंतनशील व्यक्तींनी ज्या कल्पनांचा शोध लावलेला असतो त्या कल्पना व्यक्त करण्याकरता ते विशिष्ट शब्द शोधून काढतात. प्रत्येक भाषेत असे काही शब्द असतात की त्यांचे भाषांतर इतर भाषेत करता येत नाही. ब्रह्म, योग, यज्ञोपवीत, गोत्र, आरती, उच्छिष्ट, श्राद्ध, श्रावणी इत्यादी अनेक शब्द असे आहेत की त्यांना इंग्रजी भाषेत प्रतिशब्द नाहीत.

काळाच्या ओघात असे अनेक शब्द लुप्त होतात, कारण त्या शब्दांतील कल्पनांची समाजाला गरज राहिलेली नसते, किंवा गरज असून समाजाचे त्याकडे दुर्लक्ष झालेले असते. धार्मिक-सामाजिक चालीरीतींना आणि उपासना-विधींना लागणारे शब्द प्रचारातून जाणे स्वाभाविक आहे. आजकाल यज्ञ ही पूर्वीसारखी दैनंदिन जीवनाची बाब राहिलेली नाही त्यामुळे यज्ञविषयक शेकडो शब्द प्रचारातून लुप्त झाले. आपल्या उपासना पद्धतीही बदलल्या त्यामुळे दोन पिढ्यांपूर्वी प्रचारात असलेले शब्द आजच्या पिढीला अपरिचित आहेत. वैश्वदेव, चित्राहुती, आपोषणी, संकल्प या शब्दांचा अर्थ आजच्या पदवीधरालाही सांगता येणार नाही. आज कोणतीच उपासना पद्धती अस्तित्वात नाही. सामाजिक जीवनातील ही बदलणारी क्षेत्रे आहेत. परिवर्तनाप्रमाणे भाषेतही बदल होतो.

परंतु नैतिक जीवनात आणि तत्त्वज्ञानात अशा काही कल्पना असतात की त्यांचे जतन करणे आवश्यक असते. या कल्पना कोणत्याही पिढीत, कोणत्याही काळात उपयोगी पडण्यासारख्या आणि आवश्यक असतात. या कल्पना आणि त्या व्यक्त करण्याचा शब्दसंग्रह टिकवला पाहिजे. वारंवार प्रचारात आणला पाहिजे. सांस्कृतिक वारसा म्हणून पिढी-पिढीला त्याचे संक्रमण झाले पाहिजे.

त्रिगुण म्हणजे सत्त्व, रज, तम. तीन ऋणे म्हणजे देवऋण, पितृऋण आणि ऋषिऋण. चार आश्रम म्हणजे ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास. षड्रिपू म्हणजे काम–क्रोध–लोभ–मोह–मद–मत्सर. अशा अनेक महत्त्वाच्या कल्पनांचा अर्क एकेका शब्दात साठवलेला असतो. हे शब्द व या कल्पना एके काळी आपल्या दैनंदिन कौटुंबिक जीवनाचा भाग होते. गृहशिक्षणाच्या द्वारे त्यांचे संक्रमण एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे होत होते. या परंपरेत आज खंड पडला आहे. हे शब्द व कल्पना असलेले वाङमयच आपल्या घरात नाही. शाळा-कॉलेजात किंवा समाजात हे शब्द भुलामुलींच्या कानावरून जात नाहीत. समाजातील भावी पिढीची ही सांस्कृतिक उपासमार होत आहे; आपण ती करीत आहोत.

व्याख्यानाच्या निमित्ताने प्रवास करीत असताना मी एका सुसंस्कृत व सुशिक्षित कुटुंबात उतरलो होतो. व्याख्यानाच्या ओघात माझ्या विवरणात सात्त्विक, राजस व तामस गुणांचा उल्लेख आला. त्या कुटुंबातील माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांनाही सत्त्व–रज–तम या त्रिगुणांची काहीच माहिती नव्हती. त्यांनी मला या त्रिगुणांची माहिती विचारली. याचा अर्थ असा की आपल्या सुशिक्षित कुटुंबातही या त्रिगुणांचा उल्लेख करण्याची कधी वेळच येत नाही. मानवी स्वभावाची आणि कृतीची विभागणी करण्याचे दृष्टीने त्रिगुणांचे तत्त्व अतिशय महत्त्वाचे आहे. भारतीय मानसशास्त्रातील हे एक अत्यंत महत्त्वाचे संशोधन आहे. इंडिव्हिज्युअल डिफरन्सेस, वैयक्तिक विविधता हे आधुनिक मानसशास्त्रात महत्त्वाचे तत्त्व आहे. ते सांख्यमुनींनी तीन हजार वर्षांपूर्वी त्रिगुणांच्या तत्त्वात व्यक्त केले होते. अशाच प्रकारच्या अनेक कल्पना आपल्या नीतिशास्त्रात, तत्त्व-ज्ञानात व समाजशास्त्रात आहेत की त्या कालबाह्य झालेल्या नाहीत, चिरंतन महत्त्वाच्या आहेत.

प्राचीन काळी कीर्तन-प्रवचनांच्या द्वाराने या कल्पनांचा प्रसार होत असे. आज याच विषयावरील ग्रंथ उपलब्ध आहेत. ते आपण वाचू शकतो, मुलांना देऊ शकतो, त्यांची चर्चा करू शकतो. आधुनिक विचाराचे वाङमय आपल्या मुलांना अवश्य द्या. पण त्याचबरोबर चिरंतन स्वरूपाचे विचार व कल्पना देणारे काही प्राचीन वाङमयही आपल्या घरात ठेवा व मुलांना ते वाचायला द्या.

महाराष्ट्र विद्यालयात प्रार्थनेच्या वेळी 'गीतेतील मुख्य विचार' या माझ्या पुस्तकातील रोज एक विचार वाचायला प्रथमच सुरुवात केलेली होती. एस्. एस्. सी. च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याची सभा होती. प्रत्येक विद्यार्थी शाळेतील चांगल्या–वाईट गोष्टी मोकळेपणाने सांगत होता. त्यावेळी प्रत्येक विद्यार्थी सांगू लागला की, 'गीतेतील विचार प्रार्थनेत वाचण्याची प्रथा मला

फार आवडली.' मी विचारले, 'ही प्रथा तुम्हाला का आवडली ?' तेव्हा विद्यार्थी म्हणाले, 'गुरुजी, आमच्या घरी, शाळेत किंवा गावात हे शब्द, या कल्पना आणि हे विचार ऐकण्याचा कधी योगच येत नाही. तो या शाळेत येतो हे आमचे मोठे भाग्य आहे'.

असे हे भाग्य तुम्ही पालकही आपल्या मुलामुलींना देऊ शकता. हाच तुमचा विचारांचा वारसा आहे. तो पुढल्या पिढीला देणे हे आपले सांस्कृतिक कर्तव्य आहे. शाळा–महाविद्यालये हे कार्य करीत नाहीत तर ते कुटुंबाने केले पाहिजे.

[११–३–१९७०

३६. या धर्मभावना की अंधश्रद्धा ?

धर्म या शब्दाचा अर्थ व्यापक आहे. ईश्वरविषयक विचार व उपासना, सामाजिक व्यवहाराचे नीतिनियम आणि वैयक्तिक उन्नतीचे मार्ग इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश या एका शब्दात झालेला आहे. देवदेवतांची उपासना हा एक भाग आणि नैतिक आचरण हा दुसरा भाग. पण फार प्राचीन काळापासून हे दोन्ही भाग अगदी निगडित आहेत. उपासना आणि नीती यांची सांगड पूर्वापार चालत आलेली आहे. त्यामुळे नैतिक सुधारणेकरता धर्मभावनेची वाढ आवश्यक आहे अशी समजूत सर्वत्र प्रचलित आहे.

प्रत्येक समाजात नैतिक आचाराचे दृष्टीने चढउतार चालू असतो. समाज कधी नैतिक आचारात वरच्या पातळीवर असतो, तर कधी ही पातळी फार खाली जाते. नैतिक अधःपतन होत आहे अशी जाणीव समाजातील विचारी व्यक्तींना होते. ते थांबवण्याकरता आणि समाज सुधारण्याकरता प्रयत्न सुरू होतो. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे धर्मभावनेला उत्तेजन देणे हा आहे. आपल्या समाजात सध्या या धर्मभावनेची लाट वाढत्या प्रमाणात येत आहे.

धार्मिक ग्रंथांचे प्रकाशन मोठ्या प्रमाणावर होत आहे आणि जाहिरातीवरून असे वाटते की त्यांचा खपही वाढत्या प्रमाणावर आहे. उपासना, व्रतवैकल्ये, मंत्रतंत्र इत्यादींची माहिती देणारे मासिकांचे खास अंक, कोश, वगैरे वाङ्मय दरवर्षी प्रसिद्ध होत आहे. जुनी स्तोत्रे, मंत्र, पोथ्या, पुराणे यांचाही खप वाढत आहे. धार्मिक व आध्यात्मिक विषयांवर व्याख्यानमाला होत असून त्यांचा उपयोग करून घेणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. नवे आणि जुने बुवा, महाराज, स्वामी, बाबा यांची लोकप्रियता वाढत्या प्रमाणावर आहे. त्यांच्या अनुयायीवर्गात

आधुनिक शिक्षण घेतलेले स्त्रीपुरुषही मोठ्या प्रमाणात जात आहेत. सारांश लौकिक अर्थाने सध्या धर्मभावनेमध्ये वाढ होत आहे.

प्रश्न असा आहे की ज्या प्रकारचे धार्मिक पुनरुज्जीवन होत आहे तो आचार टिकाऊ स्वरूपाचा आहे काय ? एका काळी जे धार्मिक आचार रूढ होते त्यांचेच अनुकरण पुन्हा होत आहे. ज्या कारणांमुळे ते आचार मागे पडले त्यांची चिकित्सा करून व त्या कारणांचे निराकरण करून धार्मिक आचारांना नव्या युगाला योग्य अशी बैठक देण्याचा प्रयत्न होत नाही. आधुनिक विज्ञान, समाजशास्त्र व इतर ज्ञानातील वाढ, चिकित्सक वृत्तीचा उदय, बुद्धिवादाचा विकास, अंधश्रद्धांचा त्याग करण्याची प्रवृत्ती, वैचारिक आधारावर आचार सुधारण्याची जाणीव इत्यादी गोष्टींमुळे पूर्वीचा अंधश्रद्धाप्रधान धार्मिक आचार मागे पडला होता. त्यात फारशी सुधारणा न करताच त्याचे पुनरुज्जीवन केले तर पूर्वीप्रमाणेच तो अल्पावधीत ओसरून जाईल. वृद्ध पिढीतील लोक, अशिक्षित, अर्धशिक्षित स्त्रीपुरुष आणि अंधश्रद्धेला बळी पडणारी माणसे यांच्यापुरतीच ही चळवळ मर्यादित राहील.

तर्कशुद्ध विचार, चिकित्सक बुद्धिवाद, विज्ञाननिष्ठ प्रवृत्ती, सामाजिक न्यायाची जाणीव, अंधश्रद्धांचा त्याग करण्याची तयारी, अशा तत्त्वांवर धर्माचे, उपासनांचे आचारविचारांचे व नैतिक जीवनाचे पुनरुज्जीवन झाले तरच ते टिकाऊ स्वरूपाचे होईल. ते तरुण पिढीलाही आकर्षित करील आणि त्यामुळे पाचपन्नास वर्षे तरी टिकेल. परंतु केवळ जुन्या अंधश्रद्धांवर आधारलेली धर्माची लाट लौकरच ओसरून जाईल. आधुनिक विज्ञानवाढीपुढे आणि बुद्धिवाढीपुढे तिचा टिकाव लागणार नाही. ज्या तरुण पिढीवर तिचा परिणाम व्हायला पाहिजे तिच्यावर होणार नाही.

धार्मिक आणि नैतिक प्रवृत्तीमध्ये अवश्य वाढ व्हायला पाहिजे. तुमच्या घरी कुलधर्म व कुलाचार म्हणून काही गोष्टी अवश्य व्हायला पाहिजेत. पण त्या करताना तुमच्या घरातील आजचे शिक्षण घेतलेली तरुण पिढी, तिचे ज्ञान, भावना, प्रवृत्ती, विचार या सर्वांना जमेस धरा. त्यांच्या विचारसरणीला पटतील तेच आचार, विचार, उपासना काही काळ टिकतील. धार्मिक आचार प्रत्येक पिढीला बदलतो. वैदिक आचार पौराणिक काळी राहिले नाहीत, पौराणिक काळचे वैज्ञानिक काळात राहाणार नाहीत. त्यांत विकास झाला पाहिजे, विचारपूर्वक तो केला पाहिजे.

[१६-३-१९७०

३७. जनतेला झुलवणारे आणि शिकवणारे

जनता हा प्राणी काही विसाव्या शतकातच जन्माला आलेला नाही. तो पूर्वापार हजारो वर्षे अस्तित्वात आहे. त्याचे बारसे परवा परवा झाले इतकेच. दुसरे म्हणजे जनता म्हणून जी वस्तू आहे तिला आपण जनता आहोत अशी जाणीव झाली आहे. या वस्तूचा चांगला आणि वाईट उपयोग करून घेणारेही अलीकडेच उदयास आलेले आहेत.

इंग्रजीत जिला 'मासेस' म्हणतात तीच आपल्या भाषेतील जनता. मास म्हणजे गोळा, मासेस म्हणजे गोळे. मानवी गोळे म्हणजे थवे, मोठे समुदाय, बहुजन असा अर्थ निष्पन्न होतो. इंग्रजी मासेसपेक्षा आपला जनता हा अर्थ अधिक योग्य आणि आदर दाखवणारा आहे. मासेसच्या उलट क्लासेस. क्लास म्हणजे कोणत्याही मोजणीतील वरचा वर्ग. क्लासेस म्हणजे वरच्या वर्गातील लोक. संपत्ती, शिक्षण व संस्कृती यांनी व यांमुळे येणाऱ्या गुणदोषांनी संपन्न असा वर्ग. मासेस म्हणजे जनता, ही द्रव्य, शिक्षण आणि संस्कृती यांपासून वंचित असलेला लोकसमूह अशी पाश्चात्य कल्पना आहे. ती भारताला लागू नाही.

भारतात समाजाचे चार वर्ग होते. त्या प्रत्येक वर्गाला काही सवलती होत्या तशीच काही बंधने होती. ब्राह्मणांनी विद्याव्यासंग करावा पण द्रव्यसंचय करू नये. क्षत्रियांनी राजसत्ता भोगावी पण मृत्यूला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी. वैश्यांनी संपत्ती मिळवावी पण ती दानधर्मात खर्च करावी. शूद्रांवर जबाबदारी कमी पण नेमलेली कामे त्यांनी करावीत. सारांश पाश्चात्य राष्ट्रांतील जनता जितकी द्रव्य आणि संस्कार यांपासून वंचित झाली होती तशी स्थिती भारतात नव्हती. ती इंग्रजी अमदानीत आली व येथील समाजही पाश्चात्य पद्धतीचा होऊ लागला.

व्यक्तीचे मानसशास्त्र आणि समुदायाचे मानसशास्त्र (मास्-सायकॉलॉजी) यांत फरक आहे. समुदायाचे मानसशास्त्र हे जनतेचा स्वभाव जाणण्याला उपयोगी पडते. जबाबदारी, आपल्या कृत्याचे परिणाम, सारासार विचार, नफा नुकसान, नावलौकिक, या गोष्टींचा विचार करून व्यक्तीची कृत्ये होत असतात. जनतेची गोष्ट याच्या अगदी उलट आहे. पुढाऱ्याने सांगितलेला विचार तो जनतेचा विचार, तिला स्वतंत्र विचार नाही. आपल्या कृत्याचे अंतिम परिणाम काय होणार याची फिकीर जनतेला नसते. मोडतोड, जाळपोळ, लुटालूट या गोष्टी करायला व्यक्ती कचरेल, पण ती समुदायात सामील झाली की बिनदिक्कत करील. व्यक्ती सारासार विचार व परिणामाचा अंदाज करते. ती जनतेचा भाग झाल्यावर या सर्व गोष्टी

आपल्या पुढाऱ्यावर सोपवते. व्यक्तीला आपल्या नावलौकिकाची काळजी असते. चोरी, लुटालूट, हिंसा, आगलावेपणा, कृतघ्नपणा, शिवीगाळ करायला एकटया व्यक्तीला संकोच वाटेल. ती जनतेचा भाग झाल्यावर व्यक्तित्व विसरते आणि सर्व गोष्टी करू शकते. व्यक्ती आपल्या भावनांचा तोल सांभाळू शकते. जनतेला एकच सामुदायिक भावना असते. ती चांगली असेल किंवा अनिष्ट असेल. समुदायांचा भाग झाल्यानंतर व्यक्तीच्या भिन्न भावना व तिचे भिन्न विचार यांना स्थानच नसते. त्यामुळे प्रभावी पुढारी असला तर आपल्या इच्छेप्रमाणे तो जनतेच्या भावनांना चांगले अथवा वाईट दोन्ही प्रकारचे वळण देऊ शकतो, झुलवू शकतो किंवा शिकवू शकतो.

शेक्सपीयरच्या ज्यूलियस सीझर या नाटकात जनतेचा स्वभाव व त्याचे मानसशास्त्र यांचे सुंदर चित्र रेखाटले आहे. सीझर सत्ताधारी हुकूमशहा होईल म्हणून त्याचाच स्नेही ब्रूटस हा त्याचा खून करतो. त्याला पाहून मरताना सीझर म्हणतो, 'ब्रूटस, तूही ! सीझर, आता मर.' मग लोकांचे समुदाय रोम शहरात ठिकठिकाणी जमतात. ब्रूटस त्यांच्यापुढे तर्कशुद्ध भाषण करून सांगतो की, 'सीझर राजा होण्याचा प्रयत्न करीत होता म्हणून, तो माझा मित्र असूनही, मी त्याची हत्या केली.' श्रोते त्याला प्रतिसाद देऊन म्हणतात, 'ब्रूटसचा जयजयकार— आपण त्यालाच राजा करू.' यातील विनोद लक्षात आला का ? ब्रूटसचा प्रतिस्पर्धी ॲन्टनी. तोही जनतेपुढे भावनाप्रधान भाषण करून सांगतो की, 'ब्रूटस सन्मान्य मनुष्य आहे. पण सीझरसारख्या सज्जन माणसाचा त्याने खून केला. या पहा सीझरच्या जखमा.' लोक ओरडतात, 'ब्रूटसला मारा, जाळपोळ करा, मारेकऱ्यांना ठार करा.' आणि ते सर्व पाहून ॲन्टनी म्हणतो—'मिस्चिफ्, दाऊ आर्ट अफूट. नाऊ टेक व्हॉट कोर्स दाउ विल्ट.' म्हणजे—'हिसाबाई, तुला आता पाय फुटले. वाटेल तसा धुमाकूळ घाल.'

असे आहे हे जनतेचे मानसशास्त्र. पुढारी आपल्या इच्छेप्रमाणे तिला सन्मार्गाला नेऊ शकतात किंवा वाममार्गाकडेही वळवू शकतात. व्यास, वाल्मीकी, श्रीकृष्ण, शिवाजी, टिळक, गांधी इत्यादी सर्वांना जनतेचे मानसशास्त्र माहीत होते व त्याचा त्यांनी चांगला उपयोग केला. उलट मुसोलिनी, हिटलर, स्टालीन, सुकर्ण इत्यादींनी जनतेच्या स्वभावाला अनिष्ट वळण लावले.

छाप पाडणाऱ्या कोणत्याही पुढाऱ्यामागे जायला जनतेची तयारी असते. आपण जनतेचे कैवारी आहोत आणि तिचे हित करणारे आहोत, असे त्यांनी सांगितले पाहिजे. काही पुढारी जनतेचे कल्याण करतात, काही फक्त तिला झुलवतात आणि आपल्या सत्ता–संपत्ती–सुख-साधनेच्या कामी तिचा उपयोग करून घेतात. या पुढाऱ्यांत अमुकच सद्‌गुण पाहिजेत असा जनतेचा आग्रह नसतो.

रुबाबदार व्यक्तिमत्त्व आणि प्रभावी वक्तृत्व हे दोन आवश्यक गुण. तो ब्रह्मचारी असला तरी कौतुक, छिनाल बायकांच्या घोळक्यात राहाणारा असला तरी कौतुक. त्यागी असला तरी स्तुती, भोगी असला तरी स्तुतीच. चारित्र्य असले तरी चालेल, नसले तरी चालेल. स्वार्थत्यागी असला तरी वाहवा, स्वार्थसाधू असला तरी काणाडोळा. लोकांच्या डोळ्यांत भरेल असा एकादा अलौकिक गुण असला तर त्या गुणाखाली पुढाऱ्याच्या अनेक दोषांकडे काणाडोळा करायला जनता तयार असते.

ही लोकप्रियता चंचल असते हेही जनतेचे वैशिष्य आहे. एखाद्या नेत्याला ती आज डोक्यावर घेईल तर उद्या त्याला मडक्यासारखे खाली फेकून देईल. लोकनेता कोणीही होऊ शकतो. लोकांचा हितकर्ता होणे कठिण पण महत्त्वाचे आहे. जनतेचा चंचल व भावनाप्रधान स्वभाव ओळखूनही तिला चांगले वळण लावणारे, विधायक कार्याला प्रवृत्त करणारे ते खरे नेते. लोकहितसाधना हे त्यांचे ध्येय असते. लोकप्रियतेची ते फारशी फिकीर करीत नाहीत. त्यांना हेही माहीत असते की जनतेच्या पुढारीपणाची सद्दी जशी येते तशी ती ओसरतेही. लोकप्रियता मिळो न मिळो, लोकहित–साधनेचे कार्य अखंड करणारी माणसेच समाजाचे कल्याण करतील.

या लेखाचा उद्देश काय आहे ? आज कामगार, मजूर, शेतकरी, कारकून, शिक्षक, शिपाई, सैनिक अशा अनेक स्वरूपांत जनता जागृत झाली आहे. तिने सच्चा पुढारी आणि लबाड पुढारी ओळखायला शिकले पाहिजे. आपली दोषस्थाने ओळखली पाहिजेत. आणि पुढाऱ्यांनी मनाशी खूणगाठ बांधावी की पुढारीपणाचा अमरपट्टा आपल्याला कोणी दिलेला नाही. आजचा पुढारी उद्याचा सामान्य नागरिक आहे.

[१०–४–१९७०

३८. ब्रेक भक्कम तर ड्रायव्हिंगचा आनंद

सायकल, स्कूटर, मोटार, बस, रेल्वे, विमान किंवा चांद्रयान,–गती असलेल्या प्रत्येक वाहनाला आधी ब्रेकची व्यवस्था करावी लागते. शक्तीच्या वाहनात इंधनाची म्हणजे पेट्रोल, वाफ, वीज किंवा अग्निबाण अशा वेग देणाऱ्या वस्तूची जरुरी असते, तितकीच ब्रेकचीही असते. ब्रेक चांगले नाहीत असे कळले तर त्या वाहनात तुम्ही बसाल का ? मोटार जोरात चालली आहे, घाटातून उतरत आहे आणि ड्रायव्हरने सांगितले की ब्रेक चालत नाही, तर तुमच्या हृदयाची काय अवस्था होईल ?––कल्पनाच करा ! वाहनाला ब्रेक चांगले असले की वाटेल तितकी

गती देता येते आणि ड्रायव्हिंगचे सुख मिळते. मनाला निर्धास्तपणा वाटतो कारण वाहन आटोक्यात ठेवण्याचे साधन आपल्या हातात असते.

यांत्रिक वाहनाला ज्याप्रमाणे गती व शक्ती असते त्याप्रमाणेच मानवी मनाला गती व शक्ती दोन्ही आहेत. मनाचे सामर्थ्य कल्पनातीत आहे आणि त्याची गती मोजायला मीटर नाही. भौतिक विज्ञानशास्त्राचे नियम उल्लंघन करण्याचे सामर्थ्य मनात आहे. मनाचे गूढ विज्ञानशास्त्र यापुढील काळात अस्तित्वात येण्याचा संभव आहे.

मनाचा यथेच्च उपयोग करायचा असेल तर त्यालाही ब्रेक हवेत. हे ब्रेक म्हणजे आत्मसंयम; मनावर मनानेच नियंत्रण घालण्याची शक्ती. भौतिक शक्तीवर नियंत्रण ठेवणे सोपे आहे, पण मनावर नियंत्रण ठेवणे कठिण आहे. हा सवयीचा, अभ्यासाचा, सतत जाणीवेचा विषय आहे; पण प्रत्येकाला साध्य आहे. आत्मसंयम ज्याला साध्य झाला त्याच्यासारखा सुखी या जगात कोणी नाही. केवळ भौतिक सुखाच्या शोधात असलेल्या काही लोकांना वाटते की आत्मसंयम म्हणजे एक जुनीपुराणी, सनातनी, मागासलेल्या लोकांची कल्पना आहे. सर्व गोष्टी करून सवरून भागलेल्या, परलोकाकडे दृष्टी लावणाऱ्या, मुमुक्षू लोकांची विचारसरणी आहे. संन्यासी–बैरागी यांच्याकरता ती ठीक आहे, पण ऐहिक सुखाच्या आड येणारी असल्याने आपल्याला ती नको. जन्माला आलेल्या माणसाने मनमुराद सुख, आनंद, आणि उपभोग यांचा अनुभव घ्यावा.

आत्मसंयमाविषयी हा एक गैरसमज आहे. आत्मसंयम करणाराने भौतिक सुखाचा त्याग करण्याची मुळीच गरज नाही. आत्मसंयमी होणे म्हणजे संन्यासी–बैरागी होणे नव्हे. आत्मसंयमाचा उपयोग हा सदासर्वकाळ नसून वेळी प्रसंगीच करायचा असतो. ड्रायव्हिंग करणारा माणूस सतत ब्रेक लावतो का ? संकटाच्या वेळी स्वतःच्या सुरक्षितेकरता गती व शक्ती यांचे नियमन करण्याकरता तो ब्रेक लावतो. मनाच्या शक्तीला व गतीला अशा अडीअडचणीच्या वेळीच आत्मसंयमाचा ब्रेक लावायचा असतो. सुखाची कल्पना किंवा त्याचा उपभोग, सुखापेक्षा दुःखाकडे किंवा अधोगतीकडे नेत असेल त्याच वेळी माणसाने आपल्या मनावर नियंत्रण ठेवायचे असते. मिष्टान्नाने सुख होते; ते मर्यादित घेतले तर आरोग्य मिळते व आनंद वाटतो. मर्यादेबाहेर घेतले तर पुढे दुःख होते आणि रोगाच्या यातना भोगाव्या लागतात. कामक्रोधादी विकारांवर वेळीच नियंत्रण घातले नाही तर पश्चात्तापाची पाळी येते.

सामाजिक नीतीनियमांत बसणारे कोणतेही विषयसुख वाईट नाही. कोठे थांबायचे ते कळले पाहिजे. सुख भोगताना योग्य वेळी मनाला ब्रेक लावता आला नाही तर दुःख, अधःपात आणि संकट यांना आमंत्रण मिळते.

आत्मसंयमाची सवय लावा. सुखी व्हाल.

[१८–४–१९७०

३९. शिवबांचा वारसा—चारित्र्य व स्वार्थत्याग

महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावर शासनाने आपल्यापुढे छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवला ही अतिशय उत्तम गोष्ट आहे. दुर्दैव असे की या आदर्शाचा जितका अधिकाधिक उपयोग करून घ्यायला हवा तितका शासनकर्ते आणि समाजातले नेते करून घेत नाहीत. शासनकर्त्यांना व पुढाऱ्यांना स्वतःला मार्गदर्शन म्हणून, आणि सर्वसामान्य बहुजनांच्या नैतिक शिक्षणाकरता म्हणून, शिवबांच्या आदर्शाचा फार मोठा उपयोग होईल.

मोठमोठे पुतळे उभारणे, जाडजूड चरित्रे प्रकाशित करणे, टोलेजंग उत्सव करणे—या गोष्टींनाही समाजाचे दृष्टीने महत्त्व आहे. पण शिवबांकडून नेमके काय घ्यायचे हे नेत्यांना स्वतःलाच समजले नाही, आणि ते समाजाला तसे सांगू शकले नाहीत तर पुतळे, ग्रंथ आणि उत्सव यांना काही किंमत नाही. शिवबांचे दोन सद्गुण तरी स्वतः आचरणात आणा आणि त्यांचा आदर्श समाजापुढे ठेवा. तसे झाले नाही तर शिवबांचे नाव घेऊन आपल्या जिभेने ते विटाळण्याचा कोणाला अधिकार नाही.

शुद्ध चारित्र्य आणि निःसीम स्वार्थत्याग हे दोन सद्गुण शिवबांच्या जीवनात उठून दिसतात. त्यांचे अनुकरण समाजातील लहान-थोर सर्वच व्यक्तींनी करायला हवे. या सद्गुणांचा एकसारखा प्रचार करायला हवा. साध्या, सोप्या भाषेत पुस्तके लिहून, बहुजन समाजाकरिता आणि विद्यार्थ्यांकरिता या सद्गुणांवर भर देणारे वाङ्मय प्रसिद्ध व्हायला हवे. शिवजयंतीच्या समारंभात या गुणांवर प्रवचने व्हावीत. समाजातील ज्या व्यक्तींच्या जीवनात या गुणांचे आचरण झाले असेल त्यांचा "छत्रपती-पदके" देऊन गौरव करायला हवा. शिवबांच्या या गुणांचा वारसा महाराष्ट्राला मिळाला आहे. त्याच्या आधारावर या राज्यातील कारभारी, शासनकर्ते, अधिकारी, पुढारी, अनुयायी, शिक्षक, विद्यार्थी, कामगार, शेतकरी, सर्वसामान्य समाज—यांनी इतर राज्यांना एक आदर्श घालून द्यायला हवा. पण—

दुर्दैवाने आमच्या आजच्या जमान्यात चारित्र्य आणि स्वार्थत्याग या शब्दांना, त्यांच्या अर्थाला आणि आचरणाला किंमत राहिलेली नाही. आजच्या समाजाला हे शब्दच अपरिचित होत चालले आहेत. प्रत्येक कालखंडात काही विशिष्ट शब्दसंग्रह प्रचारात असतात. काळ बदलला की शब्दसंग्रह बदलतो. शिवबांच्या काळात स्वराज्यस्थापना, पराक्रम, आत्मबलिदान, स्वामिभक्ती, इत्यादी शब्दांना प्राधान्य होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात स्वातंत्र्य, स्वार्थत्याग, समाजसेवा, देशभक्ती इत्यादी शब्द प्रचारात होते. आजच्या जमान्यात अधिकारपदे,

मतदान, निवडणुकी, सदसद्विवेकबुद्धी, मानधन, फितुरी-धन, पक्षनिष्ठा, पक्षांतर, पक्षद्रोह, पागडी इत्यादी शब्द प्रचारात आहेत ! असेनात का. त्यांच्यातच चारित्र्य आणि स्वार्थत्याग या दोन कल्पनांची व शब्दांची भर पडली तर इतर सर्व विकृत कल्पनांचा आणि विचारांचा हळूहळू लोप होईल. समाजाची पातळी सुधारू लागेल. महाराष्ट्र हा एक आदर्श राज्य व समाज होईल.

लोकमान्य टिळकांनी साठ वर्षापूर्वी शिवजयंतीचा उत्सव सुरू केला.स्वातंत्र्य-प्रेम, उज्ज्वल चारित्र्य आणि अलौकिक स्वार्थत्याग या छत्रपतींच्या गुणांचा आदर्श लोकमान्यांच्या स्वतःच्या आचरणात होता. तोच छत्रपतींचा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. महाराष्ट्रातले लोक आज टिळकांना विसरत चालले आहेत. विसरा. पण टिळकांनीच प्रथम शिवबांचा आदर्श महाराष्ट्रापुढे ठेवला तो विसरू नका. टिळकांच्या वेळची महाराष्ट्रातली एक पिढी शिवबांच्या आणि टिळकांच्या गुणांनी भारली होती.

आजच्या समाजापुढे शिवबांसारखे व टिळकांसारखे जिवंत आदर्श नाहीत, पण त्यांची चरित्रे उपलब्ध आहेत ना ? त्यांचा अधिकाधिक उपयोग करा. त्यामुळे समाजात नवीन चैतन्य निर्माण होईल. शिवबांच्या चरित्रातले नेमके काय घ्यायचे हे थोरामोठ्यांना आणि बहुजन समाजाला समजावून सांगायला हवे. त्यांना हेच सांगणे आवश्यक आहे की—

चारित्र्य आणि स्वार्थत्याग या गुणांनी महाराष्ट्र जगला. या गुणांच्या जोरावरच त्याचा पुनरुद्धार होईल.

[८-५-१९७०

७०. देवदेवतांची उपपत्ती शोधा

चातुर्मास सुरू झाला म्हणजे या कालखंडात अनेक धार्मिक उत्सव, सण-समारंभ, जयंत्या वगैरे कार्यक्रम होतात. आपल्या धर्मात अनेक देवदेवता आहेत. त्यांचे वर्षातून केव्हा तरी स्मरण व्हावे म्हणून प्रत्येक देवतेकरता विशिष्ट दिवस, सण व विशिष्ट धार्मिक संप्रदाय आखून दिलेले आहेत. या उत्सवांचे पंचांग म्हणजे समाजाची स्मरणवहीच आहे असे म्हणावयास हरकत नाही. आपल्या संस्कृतीत आणि सुधारणेत भर टाकणारी व समाजाला पुढे नेणारी कोणतीही देवता विस्मृतीत जाऊ नये म्हणून समाजाचा हा प्रयत्न आहे.

आपल्या देव-देवतांना पूर्वेतिहास आहे. काही देवता निसर्गशक्तीची प्रतीके आहेत. प्राचीन संस्कृतीतील काही थोर विभूती देवतास्वरूप पावलेल्या

आहेत. चंद्र, सूर्य, अग्नी इ. निसर्गशक्तींना देव मानलेले आहे, कारण त्यांच्या अलौकिक शक्तीवद्दल आपल्या पूर्वजांमध्ये आश्चर्य, कौतुक आणि आदर या भावना निर्माण झाल्या. या भावना व्यक्त करण्याची त्यावेळची पद्धती म्हणजे त्यांची पूजा करणे ही होती. आज या देवतांची पूजा आपण निराळ्या स्वरूपाने केली पाहिजे. निसर्गातील या वस्तूंच्या शक्तींचा शास्त्रीय दृष्टीने अधिकाधिक शोध लावला पाहिजे. समाजाच्या प्रगतीला व संस्कृतिवर्धनाला त्यांचा अधिकाधिक उपयोग कसा होईल याचा विचार केला पाहिजे. आज चंद्र, सूर्य आणि अग्नी यांची उपासना संशोधनाच्या द्वारे प्रयोगशाळेमध्ये होत आहे. पूर्वी ज्या निसर्गशक्ती अस्तित्वात होत्या त्यांपेक्षा अधिक शक्तींचा शोध मानवाने लावला आहे. या शोधांचे ज्ञान संपादन करणे आणि ते संशोधन पुढे नेणे हीच खरी उपासना होईल.

आपल्या संस्कृतीत ज्या थोर विभूती होऊन गेल्या त्यांच्या कार्याची, कर्तृत्वाची, अलौकिक बुद्धीची व पराक्रमाची स्मृती राहावी म्हणून त्यांना देवता स्वरूप आपण दिले. उद्देश हा की त्यांच्या गुणांचे अनुकरण समाजात अखंड होत राहावे आणि सद्गुणांची परंपरा सतत कायम राहावी.

या अलौकिक व्यक्तींचे विशेष गुण लक्षात यावेत म्हणून त्या गुणांची निदर्शक अशी स्वरूपे प्रतिभावान कवींनी व तत्त्वज्ञांनी शब्दसृष्टीत निर्माण केली. तीच आपली पुराणे. कलाकुशल कारागिरांनी शाब्दिक वर्णनानुसार धातूच्या किंवा दगडाच्या मूर्ती बनवल्या. आपल्या देवता तयार झाल्या. त्यांच्या पूजा सुरू झाल्या. आरत्या-नैवेद्य इ. विविध पूजेचे उपचार प्रचारात आले. मूर्ती करणारांचा जो उद्देश होता तो बाजूला राहिला. मूर्तीच्या ठिकाणी प्रतीकाच्या स्वरूपात दाखविलेल्या गुणांचा आपल्याला विसर पडला आणि जड मूर्ती याच देवता आहेत अशा कल्पनेने त्यांची उपासना आपण करू लागलो. शिक्षणाकरता वापरलेले तंत्र आपल्याच बोकांडी बसले. गुणांचा विसर पडून बाह्य स्वरूपाला महत्त्व आले. देवदेवतांकडे मानवी दृष्टिकोनांतून पाहण्यापेक्षा चमत्काराच्या आणि अलौकिकतेच्या भावनेने त्यांच्याकडे पाहिले जाते. देवासारखा माणूस व्हावा, देवासारखे गुण त्याने संपादन करावेत म्हणून मूर्तिकारांनी प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला की ज्यांना देवत्व दिले त्या प्राचीन विभूती या जवळ येण्यापेक्षा त्यांच्यात व मानवात खोल दरीचे अंतर निर्माण झाले. सद्गुणांचे अनुकरण करण्याच्या वृत्तीपेक्षा केवळ तत्त्वशून्य पूजेची वृत्ती वाढली.

आज आपल्या समाजात दोन एककल्ली वर्ग आहेत; म्हणजे प्रत्येकाचा कल एका विशिष्ट टोकाकडे आहे. जुने ते सर्व खरे असे म्हणणारा बुद्धिविरोधी वर्ग आणि उलट जुने ते सर्व खोटे असे म्हणणारा परंपराविरोधी वर्ग. आपण मधला मार्ग स्वीकारला पाहिजे. ज्या काळात या विभूती व त्यांच्या मूर्ती तयार झाल्या त्या

काळातील वस्तुस्थिती काय असावी आणि त्या विभूती कोणत्या गुणांच्या प्रतीक आहेत याचा विधायक विचार आपण केला पाहिजे आणि तो समाजाला सांगितला पाहिजे. प्राचीन दाखले घेऊन आजच्या संदर्भात त्या वेळच्या घटनांचा अर्थ सांगितला पाहिजे.

दत्ताच्या मूर्तीला तीन तोंडे आणि सहा हात आहेत. ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांपैकी एकेका देवतेचे उपासक अनुयायी जेव्हा एकमेकांत भांडू लागले त्यावेळी या तिन्ही दैवतांचे गुण एकत्र असलेली दत्ताची कल्पना तत्त्वज्ञान्यांनी केली आणि कारागिरांनी तिला मूर्तिस्वरूप दिले. धार्मिक व सामाजिक ऐक्याकरता तिन्ही अनुयायांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने दत्ताची मूर्ती निर्माण झाली. तिच्या हातातील आयुधे व इतर उपाधी पाहिल्या म्हणजे या गोष्टी लक्षात येतील. परंतु झाले भलतेच ! दत्तजयंतीला काय होते ? हरदास कोणती कथा रंगवून सांगतात आणि लोक ती मिटक्या मारीत डोळे मिटून ऐकतात ? देवांच्या बायकांचे भांडण, अनसूयेचे सत्त्वहरण करण्याचा निश्चय, तिच्याकडून विवस्त्र स्थितीत भिक्षेची मागणी आणि त्यातून झालेला दत्ताचा जन्म ! मूळ उद्देश बाजूला राहिला आणि भलत्याच गोष्टींना महत्त्व आले. धार्मिक वादाच्या व संघर्षाच्या स्वरूपात या दत्तजन्माच्या कथेचा कितीतरी उपयोग होऊ शकेल. त्याकरता नव्या आधुनिक बुद्धीचे व दृष्टीचे पुराणिक, प्रवचनकार, कथाकरी, व्याख्याते आणि कीर्तनकार तयार व्हायला पाहिजेत. पण त्याच्या आधी संशोधनातून निघालेले सत्य ऐकून घ्यायची आपली तयारी पाहिजे ! चमत्कार म्हणजेच धर्म, हे विसरण्याची तयारी पाहिजे. ती आपण आधी करू या, मग भरसभेत या जुनाट कीर्तनकारांना सांगता येईल—"पुरे करा या भाकडकथा. बुद्धीला पटेल आणि आजच्या समाजाला उपयोगी पडेल असे काहीतरी सांगा."

[१५-७-१९७०

७१. गृहिणींना केवढी संधी आहे !

भारतातील कुटुंबसंस्था व गृहिणीजीवन यांत अत्यंत वेगाने संक्रमण होत आहे. स्वतःकडे व भोवताली पाहा म्हणजे लक्षात येईल. मोठी कुटुंबे मोडली, लहान कुटुंबे आली. वार्षिक पाळण्याचे दिवस संपून दोनतीन पाळण्याचे युग आले. शिक्षण केवळ विवाहाकरता राहिले नसून त्याच्या जोरावर बायकांना नोकऱ्या मिळू लागल्या. घरातील कष्टाची कामे वाचवणारी अनेक साधने आटोक्यात आली. घरकामात सर्व वेळ जायचे दिवस संपून रिकामपणा कसा वापरावा असा प्रश्न उत्पन्न झाला आहे.

सारांश, येत असलेल्या व येऊ घातलेल्या काळात अधिक वेळ, अधिक सवड, अधिक पैसा, अधिक सुखसोयी आणि अधिक शिक्षण भगिनींच्या वाटचाला येत आहे. त्याचबरोबर काम, कष्ट, विवंचना, ओढाताण यांमध्ये घट होत आहे. या संक्रमणाचा परिणाम काय झाला आहे आणि काय व्हावा याचेही समालोचन करणे जरूर आहे.

सुशिक्षित, मध्यमवर्गी व सुखी कुटुंबातील गृहिणीचे जीवन हा या नवीन युगातील जीवनाचा घडणारा साचा असे म्हणायला हरकत नाही. येथे काय दिसते ? अधिक सवड, पैसा व संधी यांचा विनियोग कसा होत आहे ? रेडिओवरील हलकी फुलकी गाणी ऐकणे आणि स्त्रियांच्याकरता खास निघणाऱ्या मासिकातील कथावाङ्मयाचे चर्वण; सौंदर्यप्रसाधने आणि वस्त्रप्रावरणांचे मार्केटिंग; वायफळ गप्पागोष्टीत आणि निरर्थक उद्योगात वेळ घालवणे, अशा स्वरूपाचे गृहिणीजीवन हळूहळू आकार घेत आहे. यांत गृहिणींचा दोष नाही, आणि वरील विधाने सर्वच गृहिणींना सर्वतोपरी लागू नाहीत. पण योजनारहित जीवन कसे होईल त्याचे चित्र हळूहळू स्पष्ट होत आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. जे आज लहान प्रमाणावर, तेच उद्या मोठ्या प्रमाणावर घडणार.

स्त्रियांना शिक्षण मिळावे, स्वातंत्र्य मिळावे, त्यांचे कष्ट कमी व्हावेत, त्यांना सर्व क्षेत्रांत समानता मिळावी म्हणून ज्यांनी आपले जीवन या कार्यात घालवले त्यांच्यापुढे भावी स्त्रीजीवनाचा हाच आदर्श होता काय, त्याचा विचार करा. त्यांच्या अपेक्षा काय होत्या ? त्यांना वाटले असावे—

स्त्रियांना शिक्षण आणि मोकळा वेळ मिळाला म्हणजे त्या एखाद्या विषयाचा अधिक अभ्यास करून बौद्धिक विकास साधतील आणि ज्ञानाच्या क्षेत्रात भर घालतील. स्वतःच्या आणि समाजातल्या मुलामुलींच्या गृहशिक्षणाकडे, चारित्र्य-संवर्धनाकडे आणि विकासाकडे अधिक लक्ष देतील. अधिक मिळालेल्या द्रव्याचा संचय करून त्याचा उपयोग केवळ आपल्याच सुखविलासाकडे न करता समाज-हिताकडे काही मिळकतीचा तरी विनियोग करतील. समाजातील अशिक्षित व गरीब भगिनींना शिक्षणाचे व अन्य सहाय्य करतील. सार्वजनिक उपयोगाच्या कामाकडे अधिक लक्ष, वेळ व सहाय्य देतील. अशाच प्रकारच्या अपेक्षा अधिक शिक्षण घेणाऱ्या, अधिक सवड असलेल्या, अधिक ऐपत असलेल्या गृहिणींकडून कोणताही सुसंस्कृत समाज करील यात शंका नाही.

अपेक्षा आणि वस्तुस्थिती यांत फार अंतर पडले आहे. ते फार मोठे पडण्या-पूर्वी आणि गृहिणी-जीवनाचा नवा साचा पक्का होण्यापूर्वीच आजच्या गृहिणींनी त्याला इष्ट असे नवे वळण लावले पाहिजे, नाही का ? निवळ करमणूक, निवळ इंद्रियसुखे, निवळ कौटुंबिक स्वार्थ, निवळ सुखविलास, निवळ संचयवाद यांपेक्षा

व्यापक दृष्टी ठेवा. ज्ञानाची उपासना, बौद्धिक विकास, समाजहिताची कामे, शिक्षण–विषयक सेवा, आपल्याच कुटुंबाचा उच्च सांस्कृतिक विकास, दुर्दैवी भगिनींना सहाय्य, अशा कामांच्या दृष्टीने आपल्या जीवनाकडे पाहा आणि त्यात हळूहळू बदल करा. भावी गृहिणींना म्हणजे आपल्याच मुलीबाळींना एक निराळा आदर्श घालून द्या.

गृहिणींना मिळणाऱ्या अनुकूल संधींचे सुपरिणाम सर्व समाजाला अनुभवायला मिळतील असे काहीतरी करा.

[१५–८–१९७०

५२. तुमच्या तर्साबरोला मुले हार मालतील!

मला परगावच्या एका पालकाचे पत्र आले आहे. त्याने विचारले आहे की 'माझ्या लहान मुलांच्या मनावर चांगले संस्कार करण्याकरता त्याला कोणती पुस्तके वाचायला देऊ ? आणखी काय काय करू तेही कळवावे.' अनेक पालकांच्या मनात असे पत्र कोणाला तरी लिहावे किंवा हेच प्रश्न कोणाला तरी विचारावेत असे आले असेल. वर उल्लेख केलेल्या गृहस्थांनी पत्र लिहून विचारले इतकेच. हा प्रश्न प्रत्येक विचारी पालकांपुढे असतो. पण असे पालक मात्र थोडे. अनेक पालकांच्या मनात तर हा विचारही येत नाही ! तेव्हा काही पालकांच्या मनात तरी हा प्रश्न येतो ही गोष्ट आशादायक आहे. आपल्या पालकवर्गातली सदसद्-विवेक बुद्धी व विचारशक्ती जागृत आहे ही आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. वाचकांनो, तुम्ही यातील कोणत्या वर्गातले आहात ? पहिल्याच, कारण चांगली मासिके व चांगले लेख तुम्हांला वाचावेसे वाटतात. तुमच्या घरात चांगली पुस्तके आहेत. ही लक्षणे चांगली आहेत.

आता मुलांवर संस्कार करण्याचे दृष्टीने विचाराल तर मला असे वाटते की पालकांनी या बाबतीत पालकत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी आपण होऊन आपल्या हक्कावर व कर्तव्यावरही उदक सोडले आहे. 'मुलांना शिक्षण द्यायचे व संस्कार करायचे काम शाळांनी करावे. ती त्यांची जबाबदारी आहे. त्याला पुरवणी म्हणून बालवीर संघटना व इतर त्यासारख्या संघटनांनी ते काम करावे. आपले ते काम नाही व आपल्याला ते करताही यायचे नाही. आणि— वेळही नाही ! ' ही बहुसंख्य पालकांची विचारसरणी आहे.

भारतीय संस्कृतीच्या परंपरेत व वातावरणात वाढलेल्या पालकांची ही स्थिती आहे. ज्यांच्या पुराणात व इतिहासात अशा गोष्टी आहेत की विदुला

मातेने संजयाला, जिजाऊ मातेने बाल शिवाजीला, लहानपणापासून चांगल्या संस्कारात वाढवून मोठे केले, अशा पालकांनी आधी आपल्या मनात असा विचार करावा की माझ्या स्वतःवर चांगले संस्कार कोणते झाले ? ते कोणी केले ? त्यांत चांगले कोणते होते व वाईट कोणते होते ? आता बालपण पुन्हा आले तर मला कोणते संस्कार मिळावेत ? असा विचार केला म्हणजे आपल्याजवळ विचारांचे व संस्कारांचे मूळ भांडवल किती आहे याचा एकदा आढावा घेतला जाईल. असा कधी घेतला का तुम्ही ? आता पुढचा विचार करा. माझ्या मुलावर चांगले संस्कार कोणते व्हावेत असे मला वाटते ? त्याने पुढे काय व्हावे, कसे वागावे, यांविषयी माझ्या कल्पनातरी काय आहेत ? सध्या माझ्या मुलावर संस्कार तरी कोण करतो ? ते काय आहेत ? त्यांत इष्ट कोणते आहेत, व अनिष्ट कोणते आहेत ? तुमची योजना असो वा नसो, मुलगा या क्षणी संस्कार घेतोच आहे. तो थांबलेला नाही. म्हणजे काय ?

तुमच्या मुलांनी तुमच्या न कळत तुमचे सगळे बरेवाईट गुण पाहून ठेवले आहेत. हळूहळू ते त्याच्या स्वतःच्या वागण्यात येतील. त्याच्या शेजारी पाजारी आणि संगतीत जी मुले आहेत त्यांचे तो अनुकरण करणार आहे. म्हणून तो कोणाच्या संगतीत आहे याची आधी नीट चौकशी करा. ती मुले अथवा मुली यांची पातळी काय आहे, त्यांच्या घरचे संस्कार त्यांना काय मिळाले आहेत ते पाहा. तो कोणती पुस्तके व मासिके घरात आणि बाहेर वाचतो ते पहा. तुम्ही तुमच्या करता आणून ठेवलेल्या वाङ्मयापैकी तो उघड अथवा चोरून काय वाचतो तेही पहा. तुम्हांला काही सवयी, व्यसने वगैरे असली तर त्यांचाही विचार करा. मुले वाईट गोष्टी लौकर उचलतात, चांगल्या गोष्टी उचलायला वेळ लागतो. तुम्ही तुमचा सवडीचा वेळ व सुटचा कशा घालवता तेही पाहून मुले तुमचे अनुकरण करतात.

आता असे पहा की तुम्ही कुटुंबवत्सल आहात. तुमचे घर म्हणजे केवळ जेवायची आणि विश्रांतीची जागा आहे का यापेक्षा ते काही अधिक आहे ? खरे म्हणजे तुमचे घर हेच संस्काराचे केंद्र आहे. तुमच्या घरात लहानसा पण चांगला ग्रंथसंग्रह आहे का ? चित्रे कोणाकोणाची आहेत ? देवघरासारखे काही आहे का ? देवांवर विश्वास नसला तर थोर स्त्री-पुरुषांवर तर असेल. त्यांची तरी चित्रे आहेत का ? सध्या देवांच्या व थोरं स्त्रीपुरुषांच्या चांगल्या मूर्ती मिळतात. तुमच्या घरी कोणत्या आहेत ? तुम्ही घरातली सर्व माणसे सकाळी, निजताना, भोजनापूर्वी काही प्रार्थना किंवा एखाद्या चांगल्या विचाराचे पठण करता का ? काही सात्त्विक करमणुकींचा एकत्र आस्वाद घेता का ? रेडिओवर तुम्ही काय ऐकता व मुले काय ऐकतात ? मुले चित्रपट कोणते पाहतात, वर्तमान-

पत्रातले व मासिकातले काय वाचतात ? त्यामुळेही त्यांचा मनःपिंड तयार होत आहे. बालवाङ्मयाबद्दल विचाराल तर सध्या मुबलक पुस्तके उपलब्ध आहेत. बालग्रंथालये पण आहेत.

आता शाळेत व अभ्यासक्रमातून मुले काय संस्कार घेतात तेही पाहा. 'ते कसे पहाणार' म्हणून विचाराल ! मुलांची क्रमिक पुस्तके कधी तुम्ही पाहिली आहेत का, वाचली आहेत का ? त्यांतून संस्कार करणारा भाग पुष्कळ आहे, त्याची माहिती तुम्हांला झाली तर त्यांचा रोजच्या भाषणात व मार्गदर्शनात उपयोग होईल. त्या पुस्तकातले संस्कारही चांगले आहेत असे आई-बापांना वाटते, त्या अर्थी खरेच ते चांगले असतील; ते घेतले पाहिजेत असे मुलांनाही वाटेल.

या लघुचिंतनात मी तुम्हांला विचाराची दिशा सुचवली आहे. या दिशेने विचार केला तर आणखी किती तरी गोष्टी तुम्हालाही सुचतील. मी तरी या गोष्टी विचार करून, निरीक्षण करून, अनुभवांचे स्मरण करून, हुडकून काढल्या. तुम्हीही तसेच करा. आपल्या मुलांच्या गृहशिक्षणाचा एक चांगला साचा निर्माण करा. मुले उद्या तुम्हांला दुवा देतील. मोठेपणी तुमच्या तसबिरीला हार घालून, हात जोडून म्हणतील—"तुम्ही दिलेल्या संस्कारांमुळे आम्ही मोठे झालो, सुखी झालो."

[१४-९-१९७०

७३. सार्वजनिक भाषणांची किंमत

सार्वजनिक स्वरूपात होणाऱ्या वक्त्यांच्या भाषणांत गेल्या पन्नास वर्षांत किती मोठे संक्रमण झालेले आहे याचा विचार केला म्हणजे मोठी गंमत वाटते. एक काळ असा होता की सार्वजनिक भाषण म्हटले की लोक ते ऐकण्याकरता जीव टाकीत. तो काळ आता राहिला नाही. आता भाषणे हा आपल्या जीवनातला नेहमीचाच भाग झाला आहे. त्यांची पूर्वी दुर्मिळता होती ती आता राहिलेली नाही. पण वक्ते, निमंत्रक आणि श्रोते यांत मात्र बदल झालेला आहे. त्यांचे स्वरूप कसे आहे ते नीट लक्षात घेतले पाहिजे. कारण, भाषण ऐकण्यात आपला वेळ व श्रम खर्ची पडतात, त्यामानाने त्यांचा योग्य फायदा आपल्याला झाला पाहिजे.

पंचवीस तीस वर्षांपूर्वीचा काळ आणि आजचा काळ यांची मी अगदी स्थूल अशी तुलना करतो. ती सर्वांनाच लागू पडेल असे नाही. प्रत्येक विधानाला अपवाद असतात. ते सोडून द्यावेत व सर्वसामान्यपणे या परिस्थितीचा अभ्यास करावा.

पारतंत्र्याच्या काळात सार्वजनिक भाषणे होत. ती देणारे वक्ते बहुधा देश-प्रेमाने प्रेरित झालेले व स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे असे असत. स्वतः त्याग व कष्ट सोसलेल्या व्यक्ती तळमळीने काही सांगत. इतरांनी समाजाकरता काही तरी करावे हा त्यांचा उद्देश असे. श्रोत्यांकडून त्यांना कशाची अपेक्षा नसे. आजचे वक्ते हे बहुधा सत्ताधिष्ठित राजकीय क्षेत्रातील पुढारी असतात. लोकमतावर ते निवडून आलेले असल्याने फेरनिवडणुकीत लोकांची मते कशी मिळतील याची विवंचना त्यांना असते. त्याग आणि सेवा यांपेक्षा निवडणूक तंत्राचा यशस्वी वापर हे त्यांच्या यशाचे वर्म असते. श्रोत्यांना काही प्रेरणेचे व कळकळीचे विचार द्यावेत यापेक्षा भावी काळात योग्य वेळी श्रोत्यांच्याच मतांचा आपल्याला सत्ता-संपादनाचे कामी उपयोग व्हावा हा दूरदर्शी अंतस्थ विचार त्यांच्या मनात असतो. अशा वक्त्यांकडून श्रोत्यांना जो वैचारिक लाभ व्हावयाचा तो वक्त्याची विद्वत्ता, तपश्चर्या व अनुभव यांवर अवलंबून राहाणार. आजकाल विद्वत्ता-संपादनाला कोणाला वेळ आहे ? तपश्चर्या आता कशाकरता करायची ? स्वातंत्र्य मिळालेच आहे. अनुभव मात्र प्रत्येकाला असतो पण तो श्रोत्यांना उपयोगी पडणाराच असेल असे नाही.

आता या वक्त्यांना बोलावणाऱ्या निमंत्रकांचे हेतू काय असतात तेही पाहा. आपल्या संघटनेतील, आळीतील किंवा गावातील लोकांना थोरामोठ्यांच्या भाषणांतून चांगल्या प्रेरणा मिळाव्यात हा पूर्वी निमंत्रकांचा उद्देश असे. आता निमंत्रकांचे अंतःस्थ हेतू निराळे असतात. अलीकडे एखाद्या समारंभाची निमंत्रण पत्रिका आणि तीमधील वक्त्यांची नावे व अधिकार यांचेकडे लक्ष दिले की सर्व काही आपल्या लक्षात येते. आपण आणि आपले काम सत्ताधारी व्यक्तींच्या डोळ्यांत कसे भरेल हा मुख्य हेतू निमंत्रकांच्या मनात असतो. श्रोत्यांना काही प्रेरणा किंवा वैचारिक चालना मिळावी हा उद्देश आता दुर्मिळ होत चालला आहे. वक्ते बोलावताना पूर्वी त्यांची विद्वत्ता, त्याग, शील, अधिकार व तपश्चर्या यांकडे लक्ष असे. आज वक्त्यांची सत्ता, बल, शासनात अधिकार, प्रभाव व निमंत्रकाला भावी संभाव्य उपयोग या गोष्टींकडे प्रामुख्याने पाहिले जाते.

वक्त्याच्या अधिकाराप्रमाणे त्याच्या भाषणाच्या परिणामातही बदल झालेला आहे. भाषणातून काही दूरगामी विचार, दुर्मिळ ज्ञान, जीवनाची प्रेरणा, नैतिक मार्गदर्शन असे काही मिळेल अशी आज अपेक्षा ठेवता येत नाही. समारंभ साजरे होतात आणि ते व्हावेत म्हणून श्रोत्यांचा, तुमचा व आमचा उपयोग केला जातो.

यावर उपाय काय ? उपाय निमंत्रक आणि श्रोते यांच्या हातात आहे. निमंत्रकांनी आता वक्त्यांची व पाहुण्यांची नवीनवी क्षेत्रे पाहावीत. केवळ राजकीय पुढारी आणि सत्ताधारी व्यक्ती यांच्याकडेच डोळे लावून बसू नये. किती तरी

क्षेत्रांत अलौकिक बुद्धीची माणसे गाजावाजा न करता उपयुक्त कामे करीत आहेत. त्यांना समाजापुढे आणून त्यांची प्रेरणा समाजाला द्यावी. राजकारणात जशा मोठ्या व्यक्ती आहेत तशाच इतर अनेक क्षेत्रांत आहेत. उद्योगधंदे, व्यापार, संशोधन, संरक्षण, शिक्षण, वैद्यक, कायदा, शेतकी, समाजसेवा इत्यादी कितीतरी क्षेत्रांत उपयुक्त काम करणाऱ्या व्यक्ती आहेत—त्यांना समाजापुढे आणणे हेही एक देशकार्यच आहे.

श्रोत्यांनीही आता अधिक चिकित्सक वृत्ती स्वीकारली पाहिजे. वक्त्यांचे शिक्षण, अधिकार, पात्रता, शील, त्याग, तपश्चर्या इत्यादी गोष्टी लक्षात घ्याव्यात. त्यांच्या भाषणातील ग्राह्य काय व चोथा किती, टिकाऊ काय व टाकाऊ किती, ते मूल्यमापन करायला शिकले पाहिजे. केवळ वक्ता उच्चपदस्थ आहे म्हणून माना न डोलावता त्या त्या व्यक्तीच्या, वक्त्याच्या व भाषणाच्या मूलभूत गुणांकडे व दोषांकडेही पाहण्याची नवी दृष्टी स्वीकारली पाहिजे. कालमानाप्रमाणे आपल्या दृष्टीतही बदल केला पाहिजे.

[१०–१०–१९७०

७७. डॅडी, गीता म्हणजे काय ?

'मम्मी, या कॅलेंडरमध्ये छापलय की ९ डिसेंबरला गीताजयंती आहे म्हणून. गीता कोण होती ग ?'

'आय् डोंट नो बेबी, डॅडीला विचार ना.'

'डॅडी.' 'येस् बेबी. काय पाहिजे ?'

'गीता कोण होती ? तिची जयंती का करतात ?'

'आय् रिअली डोंट नो, बेबी. एखाद्या बाईचं किंवा गाईचं नाव असेल. तुझी ती रीडरमधली 'साम ऑफ् लाईफ–' पोएम पाठ झाली का नाही अजून ? ती पाठ कर बरं.'

तुम्हाला वाटेल हा संवाद काल्पनिक आहे म्हणून. तसे वाटले तर एक प्रयोग करून पाहा ना ! तुमचे मित्र व नातेवाईक आहेत त्यांच्या घरी जा. जाल त्या वेळी सहज विचारा, 'तुमच्या घरात गीता आहे का ? तुम्ही वाचता का ? मुले वाचतात का ? मुलांना तुम्ही कधी गीता शिकवता का ?' तुम्हाला काय उत्तरे मिळतात ते पाहा. काही संभाव्य उत्तरे अशी असतील—

'गीता संस्कृत भाषेत आहे, आपल्याला काही संस्कृत येत नाही.' हे एक उत्तर. 'गीता वाचायला आम्ही आजच म्हातारे झालो का ? पेन्शन घेतल्यावर पाहू.'

हे दुसरे उत्तर. 'लहानपणी पंधरावा अध्याय पाठ केला होता पण आता सगळे विसरलो.' हे आणखी एक उत्तर. 'आम्हाला गीता वाचायला वेळ कुठं आहे? मुलांना त्यांच्या शाळेतलाच अभ्यास होत नाही तर ते गीता केव्हा वाचणार?' असे अनेक नकारांचे प्रकार तुम्हाला ऐकू येतील. मात्र एखाद्या घरी पालक आणि मुले गीता वाचणारे निघतील व त्या घरात गीतेवरील काही वाङ्मयही असेल. पण हा अपवाद; आमच्या कुटुंबातून गीता गेली हा नियम सिद्ध होण्यापुरताच.

पण निराश होण्याचे कारण नाही. दुसरीही काही आशादायक व उत्साहवर्धक चित्रे आहेत तीही पाहा. कल्याण ते बोरीबंदरच्या लोकलमध्ये एका डब्यात एक प्रवासी बसले होते. डबा खच्चून भरला होता. पण सर्व उतारूंच्या हातांत गीतेची पुस्तके होती. एक गृहस्थ खडया आवाजात संथा देत होता व इतर लोक पुस्तकावरून पाठ म्हणत होते. हे काय प्रकरण आहे म्हणून त्याने आपल्या एका मित्राला विचारले. तो म्हणाला—

'आम्ही सगळे कल्याणला बसतो. वेळ जाण्याकरता झोप घेणे, पत्ते खेळणे, वर्तमानपत्रे वाचणे, गप्पा मारणे असे चाले. आमच्यातल्या एकाने ही कल्पना काढून चारपाच जणांनी तिची सुरुवात केली आणि आता डब्यातले सगळे लोक गीता म्हणू लागले आहेत. यात मुसलमान आणि पार्शी देखील आहेत.'

अशी उदाहरणे थोडी आहेत हे खरे, पण आहेत. आता परदेशात काय चालले आहे पाहा. १६।८।७० च्या टाईम्समध्ये गीतेवरील एका पुस्तकाचे परीक्षण आले आहे. प्रो. आर्. सी. झेनर या विद्वानाने गीतेचे इंग्रजी भाषांतर व भाष्य अशा स्वरूपाचा ४८० पानांचा ग्रंथ लिहिला असून इंग्लंडमध्ये ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने तो प्रकाशित केला आहे व किंमत ८८ शिलिंग (अंदाजे १०० रु.) आहे. गीतेच्या पुस्तकाला मागणी असल्याशिवाय इतका मोठा व महाग ग्रंथ कोणी लिहिणार नाही व प्रकाशक प्रसिद्ध करणार नाही. जागतिक व अमर कीर्तीचा एक ग्रंथ आपला आहे असा पोकळ अभिमान बाळगून आपण स्वस्थ बसणार का?

संस्कृत येत नाही, वेळ नाही, सध्याच गरज नाही, देवावर विश्वास नाही— या सगळ्या थापा आहेत. खरे म्हणजे या गोष्टीकडे लक्षच नाही. असेही म्हणता येईल की ही गोष्ट आजपर्यंत लक्षात आली नाही. मराठी भाषांतरे वाटेल तितकी उपलब्ध आहेत व स्वस्त आहेत. अवांतर गोष्टीत किती तरी वेळ वाया जातो. त्यातून ५–१० मिनिटे मिळत नाहीत म्हणणे बिनहिशेबी ढोंग आहे. सध्या गरज नाही म्हणणारांना कधीच गरज निर्माण होणार नाही. बौद्धिक जिज्ञासा वाढवावी तितकी वाढते आणि तिला अर्धांगवातही होऊ शकतो. जीवनात ज्यांची 'आहार–निद्रा–भय–मैथुनं च सामन्यमेतद् पशुभिर्नराणाम्' अशी स्थिती आहे त्यांची बौद्धिक व नैतिक पातळीच सपाट असते व ती तेथेच ठेवण्याचा त्यांचा आग्रह असतो.

तुम्ही त्या वर्गात जाऊ नका. देवावर विश्वास नसणाऱ्या नास्तिकांनाही गीता उपयोगी आहे.

गीता वाचायला फार वेळ लागत नाही. तिची मराठी भाषांतरे मिळतात. ती सोपी आहेत. जीवनाचा विचार ज्यांना करता येतो त्या तरुणांपासून सर्व स्त्रीपुरुषांना गीता ही प्रत्येक प्रसंगात मार्गदर्शक आहे. एकदा वाचून तर पाहा. पण निवळ पोपटासारखे पाठांतर करू नका. अर्थाकडे लक्ष देऊन रोज ५-६ श्लोक वाचा म्हणजे पुरेत. वाचता वाचता तुम्हाला असा एखादा विचार मिळून जाईल की जो अखेरपर्यंत उपयोगी पडेल. 'गीतेचा अंश थोडाही मोठ्या चिंतेसि घालवी.'

[१४-११-१९७०

७५. भारताचा तिबेट किंवा चेकों होणार काय ?

समाजवादी चीनच्या आक्रमणामुळे तिबेटचे स्वातंत्र्य गेले. रशियाच्या लष्करी सामर्थ्यामुळे चेकोस्लोव्हाकियाचा स्वयंशासनाचा हक्क नष्ट झाला. भारतीय नागरिकांनी या दोन्ही घटनांचा व त्यामागील राजकीय विचारप्रणालींचा नीट अभ्यास केला पाहिजे. विचाराचे काम पुढाऱ्यांवर सोपवून भागणार नाही. या देशात अनुयायांनी पुढाऱ्यांना शिकवावे लागते. " वुई मस्ट एज्युकेट आवर मास्टर्स " अशी एक म्हण आहे.

या देशात मास्को किंवा वॉशिंग्टन यांचे लग्न दिल्लीत लागले आहे. मास्कोचा समाजवाद आम्हाला पाहिजे आणि वॉशिंग्टनची लोकशाही देखील आम्हाला पाहिजे. पण दोन्ही विचारसरणींतील पथ्यपाणी काय आहे, विधि-निषेध काय आहेत, याचा आम्ही विचारच केला नाही. त्यामुळे स्वार्थी व आपमतलबी लोक दोन्ही पद्धतींमधील फायदे पूर्णपणे भोगतात, पण त्या पद्धतींमधील जबाबदाऱ्या घेण्याचे नाकारतात. त्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकाला भोगावा लागतो. सरकारी नोकरांच्या संपामुळे तरी तात्त्विक व व्यावहारिक चर्चेला चालना मिळो आणि आमची विचारसरणी निश्चित होवो.

स्त्री-पुरुषाचे लग्न झाले तरी स्त्रीला तिचे धर्म व आचारप्रणाली पाळावी लागते, पुरुषालाही त्याचे स्वभावधर्म व जबाबदारी पाळावी लागते. लोकशाहीचे समाजवादाशी लग्न लावले तरी लोकशाहीची पथ्ये समाजवादाने मानली पाहिजेत आणि समाजवादाची पथ्ये लोकशाहीने मानली पाहिजेत. आपल्या देशात मात्र पूर्वी जशी लग्नानंतर स्त्रीला गुलामगिरी येई तसे लोकशाहीला झाले आहे !

लोकशाहीची मुख्य तत्त्वे व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि वैयक्तिक व खाजगी प्रयत्नांना पूर्ण वाव ही आहेत. त्याचबरोबर प्रत्येकाला संघटना-स्वातंत्र्य व संपाचा हक्क या सवलती आहेत. समाजवादात सर्व सत्ता शासनाकडे येते व शासनसंस्था माता-पित्याप्रमाणे समाजातील शेतकरी व कामगार वर्गाची सर्वतोपरी काळजी घेते. व्यक्तीला आर्थिक दृष्टीने शाश्वती मिळते पण त्याचबरोबर व्यक्तीचे आर्थिक स्वातंत्र्य, संघटना-संपाचे स्वातंत्र्य जाते. अमेरिकेत संघटना-संपाचे जे स्वातंत्र्य आहे, ते मॉस्को–पेकिंगमध्ये नाही. तेथे संपवाले देशद्रोही समजले जातील आणि त्यांना अत्यंत कठोर वागणूक दिली जाईल.

या दोन्ही देशांतील विचारप्रणाली आणि त्यांपासून निघणारे व्यावहारिक आचारधर्म यांचा आता सुशिक्षित, सुविचारी मतदारांनी अभ्यास करायला हवा. आमच्या पुढाऱ्यांच्या ठिकाणी ती कुवत नाही कारण त्यांची दृष्टी एकांगी झाली आहे.

ज्या क्षेत्रात व्यक्ति-स्वातंत्र्याला वाव आहे, वैयक्तिक मालकीचे उद्योगधंदे व संचयप्रवृत्ती यांना मुभा आहे, त्या क्षेत्रांतील कामगारांना व सेवकांना संघटना, सामुदायिक सौदा आणि संपाचे शस्त्र यांचा पूर्ण अधिकार आहे; कारण मालकांच्या हातात आर्थिक सत्ता असते तर कामगारांच्या हातात संघटनेची व सामुदायिक क्रियेची शक्ती असते. आता ज्या क्षेत्रात शासनाने सर्व मालकी मिळविली आहे, सरकारी उद्योग झाले आहेत, त्या क्षेत्रात शासन व सेवक यांच्यात पिता-पुत्राचे, माता-बालकाचे नाते निर्माण होते. शासन सेवकांना आर्थिक शाश्वती व अभय देते, उलट सेवक शासनाला आपली सर्व निष्ठा अर्पण करतात. त्यांचा संपाचा हक्क आपोआप संपुष्टात येतो. शासनाला मिळणाऱ्या सेवकांच्या निष्ठेमुळे उत्पादनात वाढ होते व समाजाचा संपाच्या आपत्तीपासून बचाव होतो. सेवकांचा योगक्षेम शासन वाहते. संपाचा प्रसंगच येणार नाही अशी पर्यायी यंत्रणा उभी केली जाते. त्यामुळे कामगार, सरकार आणि देश सर्वांना उत्पादनाचा व आर्थिक संपन्नतेचा फायदा मिळतो.

आपल्या देशात राष्ट्रीय मालकी पाहिजे पण राष्ट्राची तावेदारी नको. समाजवादातील शासनाची मालकी आणि लोकशाहीतील संपस्वातंत्र्य असे दोन्ही फायदे आम्हाला पाहिजेत. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले त्याच घटकेला मी भविष्य वर्तविले की आता कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत बँकसेवकांचा राष्ट्रीय संप होणार ! समाजवादातील राष्ट्रीयीकरण झाले, नोकरीत शाश्वती मिळाली, पण लोकशाहीतील संपाचा हक्कही राहिला. दोन्हीकडून सवलती !

शासनाच्या ताब्यातील उद्योगधंदे, व्यवस्थापन व इतर व्यवहार यांची कामे करणारे वरिष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ असे सर्वच अधिकारी व कामगार यांनी

समाजवादातील संप–त्यागाचे पथ्य पाळायला पाहिजे. नाहीतर हे संपाचे लोण कोठपर्यंत जाईल आणि त्याचे परिणाम काय होतील याचा विचार करा. उद्या पोलिस खात्यात संप होईल. मग नागरिकांचे संरक्षण फक्त चोर-दरवडेखोर आणि गुंड करणार ! त्यानंतर संरक्षण–खात्यात संप होईल. मग दारूगोळा आणि शस्त्रनिर्मिती थांवली. शेवटी सैनिकांचा संप. त्याचा परिणाम शेजारच्या आक्रमक राष्ट्रांचा भारतावर लष्करी हल्ला. भारताचा तिबेट किंवा चेको होणार. या कल्पना नाहीत, हा वास्तववाद आहे. तुम्हा–आम्हाला भिडणारा वास्तववाद आहे. लोकशाही आणि समाजवाद यांच्या मर्यादा काय आणि त्यांची बंधने काय या गोष्टी आजच स्पष्ट करून घ्या. गुळमुळीत आणि उदासीन राहाल तर पश्चात्तापाची पाळी येईल. राष्ट्रीयीकरण आणि संपाचा हक्क यांची पथ्यापथ्ये सांभाळली पाहिजेत.

[९–१२–१९७०

७६. ग्रंथसंग्रहावरून आपली बौद्धिक पातळी कळते

भारताची संस्कृती आपल्या विचारांच्या बलावर आजपर्यंत जगली आहे. अनेक आपत्तींतून तिला जावे लागले तरी तिने आपला विचारवारसा सांभाळून ठेवल्याने त्याच्या जोरावर प्रत्येक वेळी पुन्हा पुन्हा उचल खाल्ली. हे विचार सांभाळून ठेवण्याकरता भारतीयांनी फार कष्ट सोसले. ग्रंथचे ग्रंथ तोंडपाठ करून ठेवले. त्यांत किंचित्ही चूक होऊ नये म्हणून स्वतःलाच शिक्षा ठरवून घेतल्या. पुढे लेखनकला आल्यावर कधी झाडांच्या पानावर, कधी दगडावर, कधी धातूच्या पत्र्यावर ग्रंथांच्या प्रती कोरल्या. पुढे कागद आल्यावर लोकांनी आपापल्या घरी वाचनाकरता ग्रंथांच्या प्रती आपल्या हाताने लिहून घेतल्या. महाभारत, रामायण, भगवद्गीता, शाकुंतल, ज्ञानेश्वरी, दासबोध, नामदेव–तुकारामाचे अभंग आपल्या-पर्यंत कसे आले ? पूर्वीच्या लोकांनी ते तोंडपाठ केले आणि हाताने लिहून काढून आपापल्या घरी संग्रहात व वाचनात ठेवले म्हणून.

आज चारपाच रुपये टाकले की हे ग्रंथ तुम्हाला छापील स्वरूपात विकत मिळतात. कल्पना करा, तोंडपाठ करून किंवा आपल्या हाताने लिहून घेऊन तुम्ही त्यांचा संग्रह केला असता का ? पण आता इतक्या थोड्या श्रमाने व थोड्या पैशांत ग्रंथ मिळू लागले, त्यांचा तुम्ही कितपत फायदा घेता ? तुमच्या घरी उत्तमोत्तम वाङ्मय समजले जाईल अशांपैकी किती ग्रंथ आहेत ? ज्या प्रमाणात असा ग्रंथसंग्रह तुमच्या घरी असेल त्या प्रमाणात तुमची बौद्धिक व सांस्कृतिक पातळी आहे असे समजा. एखादा पाहुणा तुमच्या घरी आला तर तो तुमच्या

बौद्धिक पातळीची आणि अभिरुचीची कल्पना तुमच्या ग्रंथसंग्रहावरून करील. मी अनेक कुटुंबांत काही ना काही निमित्ताने जातो तेव्हा आधी तेथील ग्रंथसंग्रह पाहातो. कधी तेथे जगातील उत्तमोत्तम ग्रंथ दिसतात, कधी शाळा-कॉलेजातील पाठ्यपुस्तके आढळतात आणि कधी जुनी टाईम टेबले धूळ खात पडलेली असतात ! मी काय समजायचे ते समजतो. त्या माणसाच्या बुद्धीवर व विचारावर शिक्षणाचा परिणाम काय झाला त्याचे अचूक मोजमाप पाच-दहा मिनिटांत करता येते.

कुटुंबाचा एक आवश्यक घटक म्हणून तुम्ही आपल्या ग्रंथसंग्रहाची वाढ करा. दरवर्षी त्यात चांगल्या पुस्तकांची भर घाला. उत्कृष्ट पुस्तकांच्या स्वस्त आवृत्त्या आता मिळू लागल्या आहेत; त्यांचा संग्रह करा. जुन्या पुस्तकांच्या दुकानात वेळ घालवला तर प्रत्येक खेपेला एखादे उत्कृष्ट पुस्तक हाताला लागेल. एखाद्या सार्वजनिक ग्रंथालयाचे सभासद होऊन सात-आठ दिवसांनी एखादे तरी नवे पुस्तक घरात आणीत जा. ते सर्व वाचून झाले नाही तरी घरातील स्त्रिया, मुली, मुले यांच्या डोळ्यांपुढे या ग्रंथकारांची व त्यांच्या ग्रंथांची नावे राहतील. त्यांचे सामान्य ज्ञान वाढेल आणि कधी तरी अशी पुस्तके वाचायची त्यांना बुद्धी होईल.

ग्रंथसंग्रहाचे मार्गाने तुम्हाला लहानसे सार्वजनिक कामही करता येईल. तुमच्या शेजारची पाच-पंचवीस कुटुंबे एकत्र करून, त्यांच्याकडून अगदी थोडी वर्गणी घेऊन, तिच्या मोबदल्यात तुम्ही त्यांना महिन्याला एक उत्तम पुस्तक वाचायला देऊ शकाल. पंचवीस माणसांनी एकेका पुस्तकाच्या किंमतीइतकी वर्गणी दिली व ही पुस्तके एकत्र ठेवून फिरवली की एका पुस्तकाच्या किंमतीत पंचवीस पुस्तके वाचायला मिळतील. पण कोणी तरी या कामी पुढाकार घ्यायला हवा. तो घेणारे तुम्हीच का नसावे ? या उपक्रमामुळे तुमच्या कुटुंबाची बौद्धिक, मानसिक व सांस्कृतिक पातळी वाढेल आणि तुम्ही ज्या शेजारात राहाता त्यांचीही वैचारिक पातळी वाढेल. ही सेवा फार मोलाची होईल.

तुमच्या कौटुंबिक किंवा सामुदायिक ग्रंथसंग्रहात केवळ कादंबऱ्या व लघुकथा ठेवू नका. थोड्या उत्कृष्ट कादंबऱ्या, लघुकथा अवश्यच ठेवा पण त्यांच्या जोडीला चरित्रे, प्रवासवर्णने, विज्ञान, समाजशास्त्रे, राजकारण, धर्म, नीतिशास्त्र अशी सर्व प्रकारची पुस्तके ठेवा. आपले वाचन करमणुकीचे असू द्या पण ज्ञानवाढीचीही दृष्टी राहू द्या. ज्ञानाचा आनंद भोगायची सवय झाली पाहिजे.

या दृष्टीने तुमच्या घराकडे पाहा, तुमच्या शेजारी-पाजारी असलेल्या कुटुंबांकडे, मित्र, नातेवाईक यांच्या घरांकडे पाहा. कोणाला दुखवू नका; पण कौटुंबिक ग्रंथसंग्रहाच्या कल्पनेचे बी प्रत्येक ठिकाणी पेरीत राहा; आपल्या प्रासंगिक भाषणाने आणि स्वतःच्या उदाहरणाने.

आपल्या पूर्वजांनी ग्रंथसंग्रह करून विचार जिवंत ठेवले म्हणून आपण जगत आहोत. तीच ग्रंथसंग्रहाची प्रथा शतपटीने वाढवून आपण पुढल्या पिढीला देऊ या.

[१४-१-१९७१

७७. लोकशाहीवर उमेदवारांची श्रद्धा आहे का ?

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक वर्षे पारतंत्र्यात अथवा हुकूमशाहीत दिवस काढणाऱ्या अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले असून तेथे लोकशाही कारभार सुरू झाला आहे. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत व इटलीत लोकशाही सुरू झाली आणि लौकरच तिचे रूपांतर हिटलर व मुसोलिनी यांच्या हुकूमशाहीत झाले. तसे भारतात होऊ नये म्हणून काळजी घेतली पाहिजे.

निवडणुकीच्या निमित्ताने लोकशाहीची तत्त्वे आणि त्यांचा व्यवहार यांची एकदा उजळणी होते किंवा व्हायला पाहिजे. त्यामुळे अशिक्षित, निरक्षर, प्रौढ मतदार व नव्या पिढीतील नवे किंवा भावी मतदार यांचे शिक्षण होते. आपल्या समाजात अशा शिक्षणाची अद्याप फार फार जरूर आहे. उमेदवारांनाही लोकशाही हे काय तत्त्व आहे याचे आकलन झालेले नसते. 'मला निवडून द्या आणि मग मी सांगेन तसे मुकाटयाने वागा,' असाच गर्भितार्थ अनेकांच्या मनात असतो.

लोकशाहीची महत्त्वाची तत्त्वे अशी आहेत — हिंसा व अत्याचार यांचा निषेध; शांततामय मार्गाने बदल घडवून आणण्यावर विश्वास; प्रत्येक व्यतीचे संपूर्ण स्वातंत्र्य; विरोधी मताबद्दल सहिष्णू वृत्ती; बहुमताचा निर्णय मान्य करण्याची तयारी; स्वतःचे मत विरुद्ध असले तरी बहुमताने मान्य झालेल्या गोष्टी स्वीकारण्याची तयारी; मतमागणीच्या वेळची आश्वासने पाळणे व मतदारांचा विश्वासघात न करणे; आणि हुकमशाही वृत्तीविरुद्ध सतत झगडत राहाणे. या प्रत्येक तत्त्वावर एकेक निबंध लिहिता येईल. पण ही सूत्रे मतदाराने व उमेदवाराने तोंडपाठ करून ठेवण्यासारखी आहेत.

काही पक्ष व व्यक्ती लोकशाही तंत्रांचा उपयोग करून पुढे हुकूमशाही प्रस्थापित करतात. हुकूमशाही ही व्यक्तीची, व्यक्तिसमूहाची किंवा पक्षाची असू शकते. हिटलरने व सोकार्नोने असेच केले आणि अखेर ते तोंडघशी पडले. पण त्यांच्या देशाला व जगाला किती यातना सोसाव्या लागल्या ! हे लोक व पक्ष अधिकारावर आल्यानंतर लोकसभेला आपली बटिक बनवितात आणि वेळ आल्यास तिला लाथाडूनही देतात.

हे सर्व आधी ओळखावे कसे हा प्रश्न आहे. त्याला एक सोपा मार्ग आहे.

उमेदवाराचा पक्ष व त्याचे तत्त्वज्ञान ज्या देशात प्रभावी आहे त्या देशाकडे पाहावे. तेथे लोकशाही चालू असेल तर उमेदवाराचा पक्ष आपल्या देशातही लोकशाही-करिता झगडेल; उलट त्या देशात हुकूमशाहीचा प्रभाव आणि लोकशाहीचा अभाव असेल तर या देशापुढेही तेच ताट वाढून ठेवले आहे असे समजावे. आपल्या देशातील व्यक्ती व पक्ष इतर देशांचे अनुकरण करणारे आहेत. स्वतंत्र राजकीय तत्त्वज्ञान व मतप्रणाली निर्माण करण्याइतकी प्रतिभा व कुवत त्यांच्या ठिकाणी नसते. ते काम एखादी अलौकिक व्यक्तीच करू शकते. हे विधान सर्वच पक्षांना लागू आहे.

उमेदवाराने व त्याच्या पक्षाने गेल्या दहा-वीस वर्षांच्या कालखंडात लोकशाही वृत्तीने कार्य केले का अन्य मार्गाने केले तेही पाहाणे बोधप्रद ठरते. निवडणुकीच्या जाहीरनाम्यातील घोषणा मतदारांना झुलवण्याकरता त्या त्या काळापुरत्या बनवल्या जातात, आणि त्यांना अनुसरून उखाणे व ब्रीदवाक्ये पाडली जातात ! त्यांच्यामुळे बावळटांची दिशाभूल होते. चाणाक्ष लोक जाहीरनाम्यापेक्षा व्यक्तीच्या व पक्षाच्या इतिहासाकडे व अंतिम उद्दिष्टाकडे पाहातात.

मतदार या नात्याने लोकशाहीवर तुमचा स्वतःचा विश्वास आहे का ? आधी विचार करा. मग असा विश्वास कोणत्या उमेदवाराचा व पक्षाचा आहे ते पाहा. निश्चित करून घ्या व मग मत द्या. भारतात लोकशाही यशस्वी झाली तर जगातल्या सर्व मागासलेल्या राष्ट्रांत ती यशस्वी होईल, इतके महत्त्व तुमच्या एका मताला आहे. मत लहान पण त्याचा अर्थ विशाल आहे. याचा विचार करा. प्रत्येक निवडणुकीचे वेळी या विचारावर चिंतन व चर्चा करा.

[१९-२-१९७१

४८. मुले होतात पण ज्ञान मिळवावे लागते

आईबापांना मुले होणे हा निसर्गाचा धर्म आहे. पण मुलांविषयी ज्ञान होणे हा स्वप्रयत्नाने साध्य असा विषय आहे. ते ज्ञान मिळवावे लागते. स्वयंपाक-घरात वापरायचा मिक्सर घेतला की त्याच्याबरोबर तो कसा वापरायचा त्याच्या छापील सूचना त्या खोक्यातच येतात. औषध घेण्यासंबंधी सूचना बाटलीवर असतात. मोटार किंवा स्कूटर घेतली की मालक त्याच्याबरोबर येणारे रचनेचे पुस्तकही घेऊन ते वाचतो. परंतु मुले जन्माला येतात त्याच वेळी त्यांना कसे वापरावे-म्हणजे वागवावे व वाढवावे याच्या छापील सूचना येत नाहीत ! त्यामुळे आईबापांच्या अज्ञानाचे प्रयोग मुलांवर होतात.

संयुक्त कुटुंबात पूर्वी वृद्ध माणसे असत. त्यांचे अनुभवजन्य ज्ञान नूतन

आईबापांना उपयोगी पडे. आता तीही सोय नाहीशी होत चालली. घरात राजा, राणी आणि युवराज एवढीच माणसे. मार्गदर्शन करायला शेजारी पाजारी एखादी प्रेमळ आजी किंवा आजोबा असले तर नशीब. नाही तर नूतन दांपत्याच्या अपत्य-संगोपनाचे प्रयोग युवराजावर होणार. या बदललेल्या परिस्थितीत कसे वागायला पाहिजे त्याचा विचार फार थोडे आईबाप करतात. आरोग्याचे बाबतीत तर हा अनुभव सहज लक्षात येतो.

स्वयंपाक कसा करावा, नवे नवे पदार्थ कसे बनवावेत, गृहसौंदर्य कसे वाढवावे, केशरचना व वेशभूषा कशा कराव्यात इत्यादी वाङ्मय वाचून आपल्या कुटुंबाच्या राहाणीत सुधारणा करणारे अनेक आईबाप आहेत. पण त्याचबरोबर बालकांचे व युवकांचे मानसशास्त्र वाचून, समजावून घेऊन व त्यावर विचार करून मुला-मुलींना वळण लावणारे आईबाप फार थोडे आहेत. स्वत:च्या आई-बापांनी आपल्याला ज्या मार्गाने वाढवले त्याच्या अनुरोधाने स्वत:च्या मुलांना वागवणारे बहुसंख्य पालक असतात. आपल्या पिढीला अधिक ज्ञान उपलब्ध झालेले आहे याची जाणीव ठेवून ते ज्ञान घेणारे पालक थोडे. अलीकडेच पालकसंघ निघू लागले आहेत, त्यांच्या मार्फत असे ज्ञान काही प्रमाणात दिले जाते.

काही आईबाप मुलांचे अती लाड करतात तर काहीजण त्यांना खूप कडक शिस्त लावून धाकदपटशात ठेवतात. दोहींचे परिणाम विपरीत होतात आणि मुले–मुली पंधरा सोळा वर्षांची झाली की ते दिसू लागतात. पालकांच्या व त्यांच्या विचारात अंतर पडत जाते आणि मग 'मुले–मुली ऐकत नाहीत, बिघडली आहेत' अशा तक्रारी ऐकू येतात.

एकाच दांपत्याच्या पोटी येणारी अनेक मुले असली तरी सर्वांचे स्वभाव सारखे नसतात. प्रत्येक मूल आपापला स्वभाव घेऊन जगात येते व तेथून त्याच्या उत्क्रांतीला व वाढीला सुरुवात होते. काही मुले सौम्य, आज्ञाधारक, समजूतदार व प्रेमळ असतात. उलट काही बालक पहिल्यापासूनच रागीट, हट्टी, हेकेखोर, विध्वंसक, भांडखोर व आक्रमक असतात. काहींच्या ठिकाणी या गुणावगुणांचे मिश्रण असते. सात्त्विक, राजस आणि तामस या तीन गुणांचे विविध प्रकारचे मिश्रण प्रत्येक व्यक्तीत असते. तिच्यातील राजस व तामस गुण हळूहळू कमी करून सात्त्विक गुणांचा विकास करणे हे आईबापांचे काम आहे. मोठ्या माणसांनी स्वत:मध्येही हा विकास विचारपूर्वक करायचा असतो; पण मुलांना पुरेशी जाणीव नसल्याने ते काम पालकांनीच करायचे असते.

मुलांच्या व कुमारांच्या मानसशास्त्राचा पद्धतशीर अभ्यास अलीकडील पन्नास-साठ वर्षांत झाला आहे. त्या ज्ञानाच्या आधारावर पालकांना व शिक्षकांना उपयोगी पडेल असे वाङ्मयही निर्माण होत आहे. इंग्रजी वाङ्मय विपुल आहे

आणि मराठी भाषेतही थोडी पुस्तके आहेत. आपल्या शालेय व उच्च शिक्षणाचा उपयोग करून सुशिक्षित आईबापांनी हे वाङ्मय वाचले पाहिजे आणि त्यावर चिंतन व चर्चा केली पाहिजे. या ज्ञानाचा उपयोग आपली मुले सुसंस्कृत व सुस्वभावी करण्याकडे त्यांना करता येईल. बालकांचे मानसशास्त्र व शिक्षण या विषयावरील पुस्तके प्रत्येक कुटुंबाच्या ग्रंथालयात असली पाहिजेत.

छोटे कुटुंब व दोन-तीनच मुले, अशा आटोपशीर संसाराचा फायदा वयक्तिक लक्ष, उत्कृष्ट वळण व सात्त्विक संस्कार या स्वरूपात आपल्या मुलामुलींना मिळाला तर, प्रजा थोडी असली तरी कर्तबगार मुला-मुलींच्या प्रमाणात वाढ होईल. संख्येची कमतरता गुणवत्तेने भरून काढली तर कुटुंबाचा लौकिक होईल व देशाचेही हित साधेल.

[१६-३-१९७१

७९. बायकोचे पातळ धुवाल का ?

गंमत म्हणून हा प्रश्न विचारीत नाही. त्यात पुष्कळ अर्थ भरलेला आहे, त्याच्याकडे लक्ष वेधण्याकरता हा प्रश्न विचारला आहे. त्याच्यावर तुम्ही जे उत्तर द्याल त्यावरून स्त्रीजीवनविषयक आपल्या स्वतःच्या तत्त्वज्ञानाची कल्पना तुम्हाला येईल. या सर्व गोष्टींचा कित्येकांनी कधी विचारही केला नसेल, पण कधीतरी तो प्रत्येकाने करायला हवा.

व्याकरणातील शब्द पुल्लिंगी, स्त्रीलिंगी, नपुसकलिंगी असतात तशी आपल्या घरगुती आणि बाहेरच्या कामातही विभागणी झालेली होती, व तशी ती अद्यापही आहे. काही कामे स्त्रीलिंगी म्हणजे केवळ स्त्रियांनी करायची, तर काही कामे पुल्लिंगी म्हणजे केवळ पुरुषांनीच करायची, ही विभागणी आता हळूहळू कोलमडत आहे. पुरुषांची अनेक कामे आता गृहिणी करतात. घरातला बाजारहाट आणि हिशेब ठेवणे, नोकरी करून संसाराच्या उत्पन्नात भर घालणे ही पुरुषांची कामे आता स्त्रिया करतात. पण तितक्या प्रमाणात स्त्रियांची कामे पुरुष करीत नाहीत. स्वयंपाक, धुणे, घर झाडणे इत्यादी अनेक कामे अद्याप बायकांचीच समजली जातात. गडी-मोलकरणी न आल्या तर घरातल्या मालकिणीलाच ती कामे करावी लागतात. पुरुष त्यांना हात लावीत नाहीस. ही कामे बायकांची असून त्यांची व्यवस्था त्यांनीच केली पाहिजे असे पुरुष समजतात. ही प्रवृत्ती आता कमी झाली पाहिजे. वेळवखत पडेल त्याप्रमाणे पुरुषांनीही कपडे धुणे, भांडी घासणे, स्वयंपाक करणे ही कामे करायला शिकले पाहिजे. काही पुरुष कपडे धुतील, पण फक्त स्वतःचे; फार तर मुलांचे. बायकोचे पातळ तिलाच धुवावे लागेल. बायकोचे

पातळ धुणे कमीपणाचे समजले जाते. ते धुताना पाहिले तर आजूबाजूचे लोक नावे ठेवतील अशी भीती वाटते. हे थांबायला हवे. पत्नी ज्याप्रमाणे पुरुषाचे कपडे धुते तसे, वेळ पडली तर पुरुषही पत्नीचे कपडे धुतो, त्यात बावगे काही नाही हे समाजाला शिकवले पाहिजे.

या प्रश्नात दोन तत्त्वांचा समावेश आहे. पतीपत्नीचे प्रेम हा एक भाग, स्त्रीपुरुष समानता हा दुसरा विचार. वैवाहिक जीवनात आपल्या जोडीदाराची सेवा करणे हा एक प्रेमाचा भाग आहे. आपली कामे आपण करणे यात फार तर स्वावलंबनाचा भाग येईल, पण जोडीदाराची कामे करण्यात त्याग आणि प्रेम आहे. परंतु आजपर्यंत हे सर्व एकतर्फी म्हणजे पत्नीच्या बाजूनेच होत आहे. पत्नीने पतीची कामे करायची ही परंपरा आहे, आणि ती चांगलीही आहे. पतीची कामे करण्यात पत्नीला प्रेम आणि अभिमान वाटतो. ममत्वाची भावना वाटते. तशीच पतीलाही वाटायला हवी. पत्नीची म्हणून परंपरेने चालत आलेली काही कामे आता पुरुषांनीही अंगावर घेतली पाहिजेत. कामातील व्याकरण, म्हणजे स्त्री-पुरुष भेद, काढून टाकला पाहिजे.

स्त्री–पुरुषांची समानता या दृष्टीने आता विचार करा. स्त्री–पुरुष समान आहेत का ? निसर्गदत्त गुणांचा विचार केला तर समानता नाही. स्त्रियांकडे शारीरिक व मानसिक दृष्टीने बरीच दुर्बलता आलेली आहे. बुद्धीच्या क्षेत्रात स्त्री पुरुषाची बरोबरी करू शकेल पण शारीरिक आणि मानसिक बाबतीत ती स्त्रीच राहील. ही विषमता निसर्गसिद्ध आहे. पण सुधारलेल्या संस्कृतीत ही विषमता टिकवण्यापेक्षा ती कमी कशी करता येईल या दृष्टीने पाहिले पाहिजे. सामाजिक जीवनात स्त्रीला काही सवलती बुद्धिपुरःसर देऊन तिची दुर्बलता कमी करणे व पुरुषाबरोबर ती कर्तृत्व दाखवील असे वातावरण निर्माण करणे शक्य आहे. समाजातील निम्मानिम मनुष्यबळ स्त्रियांचे आहे. ते सर्व कार्यक्षम केले पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीकरता ते उपयोगात आणले पाहिजे. निसर्गाने स्त्री-पुरुषात विषमता निर्माण केली असली तरी कौटुंबिक व सामाजिक जीवनात समानतेचे फायदे स्त्रियांना दिले पाहिजेत. ते द्यायला तुमची तयारी आहे का ? घरगुती व सामाजिक कार्यक्षेत्रात ही विषमता प्रामुख्याने दिसते. या बाबतीत आपण सर्वांनीच विचार करावा. स्त्रियांनी सर्व कामे करण्याची तयारी दाखविली आहे, तशीच उलट पुरुषांनीही दाखवायला हवी. घरकामातले व्याकरण फाडून टाकायला हवे. पत्नीची सर्व कामे करण्याची तयारी पुरुषाने ठेवायला हवी. त्यात एखादे वेळी पातळ-पोलके धुवायचे काम आले तर मनाची व जनाची लाज न बाळगता तेही करायला हवे. आता सांगा—" बायकोचे पातळ धुवाल ना ?"

[१४-४-१९७१

५०. तत्त्वज्ञान चांगले, अनुयायी मूर्ख

मानवजातीच्या इतिहासात अनेक कुटुंबे एकत्र आली तेव्हाच समाज-जीवन सुरू झाले. ते सुखी होण्याकरता जीवनपद्धती कशी असावी याचा विचार शतकानुशतके झाला आहे, व तो चालू आहे. समाजातील विचारी व सुज्ञ लोक प्रत्येक पिढीत या प्रश्नाचा विचार करीत आले आहेत.

धर्म, राष्ट्रवाद, लोकसत्ता, जनताराज्य इत्यादी चांगली तत्त्वे विचारी व तत्त्वज्ञ माणसांच्या अनुभवातून व चिंतनातून निर्माण झाली. कालमान, परिस्थिती आणि पूर्व अनुभव यांना अनुसरून या तत्त्वांत पुष्कळ विविधता आहे. किंबहुना काही तत्त्वे परस्परांना विरोधी देखील आहेत. परंतु प्रत्येक तत्त्वानुसार चाललेल्या समाजात माणसे थोडीफार सुखी, व थोडीफार दुःखी आहेतच.

जग मोठे आहे आणि समाज अनेक आहेत. प्रत्येकाची पद्धती निराळी आहे. सर्वांचा अनुभव जमेला धरून त्यांतील चांगल्या गोष्टींचे मिश्रण करून सुखी राहण्याची शक्यता प्रत्येक समाजाला आहे. पण--

प्रत्येक समाजात काही मूर्ख, माथेफिरू, एककल्ली, हट्टी पण कर्तबगार माणसे असतात. "आमच्या समाजाचे तत्त्व आणि पद्धती चांगली आहे आणि जगातील सर्व समाजांनी ती स्वीकारली पाहिजे" असा त्यांचा आग्रह असतो. या आग्रहापायी धर्मा-धर्मांत, देशा-देशांत, समाजा-समाजांत कलह आणि युद्धे निर्माण होतात. लक्षावधी निरपराध माणसांचे मुडदे पडतात. त्यापेक्षा अधिक लोक लुळे-पांगळे-थोटे-आंधळे होतात, स्त्रिया विधवा होतात, बालके अनाथ होतात. इतिहासात याला अनेक उदाहरणे आहेत. आपल्या हयातीत या घटना घडत आहेत.

अशाच घटना शेकडो वर्षे घडत आलेल्या आहेत. त्यांची इतिहासात नोंद आहे, पण मानव त्यापासून काही शिकला नाही. मध्ययुगात धर्माधर्मांतील कलहांनी लक्षावधी मानवांचा संहार केला. या विसाव्या शतकात राजकीय तत्त्व-ज्ञानाच्या व पद्धतीच्या प्रसारासाठी लक्षावधी लोक मारले गेले. याला तत्त्वाचा चांगुलपणा किंवा दोष जबाबदार नसून त्या तत्त्वांचे काही अनुयायी जबाबदार आहेत. तत्त्वे भांडत नाहीत. तत्त्वांचे मूर्ख अनुयायी भांडतात. त्यांच्या हातात सत्ता, शस्त्र आणि अंगात थोडी कर्तबगारी असली की आपल्याला विरोध करणारांचे ते शिरकाण करतात.

धर्मप्रसाराच्या नावाखाली ख्रिस्ती व इस्लामी धर्मांतील काही आततायी सत्ताधाऱ्यांनी अनेक मानवांचे बळी घेतले ! त्याच पद्धतीने नाझी, फासिस्ट व कम्युनिस्ट पंथांच्या काही पुढाऱ्यांनीही आपल्या पद्धतीच्या प्रसारार्थ मानवाच्या

रक्ताचे सडे घातले ! हे अनेक शतके चालू आहे. मानव अद्याप सहिष्णुता शिकला नाही.

जगात शहाणी आणि मूर्ख दोन्ही प्रकारची माणसे असतात. कोणाच्या हाती सत्ता जाते, हा प्रश्न आहे. शहाण्यांच्या हाती सत्ता गेली तर, कोणतीही समाजपद्धती ते यशस्वी करून मानवी जीवन सुखी करतात. मूर्खांच्या हातात सत्ता गेली की चांगल्या तत्त्वांनाही विकृत स्वरूप देऊन लाखो लोकांचा बळी घेतात. जगात विविधतेला खूप वाव आहे. पण मूर्ख माणसांना सर्व लोक आपल्यासारखे असावेत व • करावेत असे वाटते. म्हणून—मानवच मानवाचा संहार करतो.

शहाणपणा आणि सहिष्णुता वाढवणे हाच यावर एक उपाय आहे. दुष्ट आणि मूर्ख माणसांच्या हातात सत्ता जाणार नाही असे सारे प्रयत्न सतत करणे हा दुसरा उपाय आहे.

[१०-६-१९७१

५१. वेळेवर ब्रेक लावा

पाणी, अग्नी, वारा, वीज, गॅस, पेट्रोल अशा अनेक प्रकारच्या शक्ती आपल्याला आता उपलब्ध झाल्या आहेत. शहरांत आणि खेड्यांत विजेची यंत्रे, यांत्रिक वाहने, पंप, गॅसवरची साधने उपयोगात आणली जात आहेत. ही यंत्रे आपले श्रम वाचवतात आणि वेळही वाचवतात, पण यंत्रांच्या उपयोगाबरोबर त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे ज्ञान हेही मिळवायला पाहिजे. यंत्र केव्हा कसे सुरू करावे, त्याच्या शक्तीला मर्यादा कशी घालावी आणि ते बंद केव्हा व कसे करावे, त्याची दुरुस्ती व साफसफाई कशी करावी याचे ज्ञान यंत्राच्या मालकाला व ते वापरणाराला हवे. ते नसेल तर मात्र यंत्र हे मालकाचा मित्र न होता शत्रूच होईल आणि केव्हा तरी त्याच्याच जिवावर उठेल.

पाण्याच्या प्रवाहाची साधी गोष्ट घ्या. बंबात भर घालण्याकरता नळ सोडला तर तो वेळेवर बंद करायचे अवधान पाहिजे. धरणात पाणी साठवल्या-नंतर पावसाळ्यात ते केव्हा किती सोडायचे हे ज्ञान नसेल तर धरण फुटून गावे वाहून जातील. स्टीम कुकरखालचा अग्नी वेळेवर कमी केला नाही तर अपघात होईल. विजेच्या शेगडीवर एखादी वस्तू शिजवायला ठेवली तर विजेचा प्रवाह बंद करायचे स्मरण ठेवले पाहिजे. मोटारमधून भरवेगाने जाताना वाटेत अडथळा आला तर ब्रेक लावायचे अवधान पाहिजे. घरात गॅस सिलिंडर असेल तर रात्री

तो बंद केला की नाही हे पाहाणे जरूर आहे. सारांश, सोयी वाढल्या त्याचबरोबर सावधानताही वाढायला हवी.

पूर्वी वाहतुकीला बैलगाड्या होत्या. गाड्या एकदा गावाच्या वाटेला लागल्या की गाडीवान खुशाल झोपून राहात. बैल आपले ठरलेल्या वाटेने जात असत. मोटारवाल्याला असे करून चालेल काय ? साध्या चुली व शेगड्या असताना फार काळजी घ्यायला लागत नव्हती. पण प्रायमस स्टोव्ह आला आणि अपघातांचे प्रमाण वाढले. कारण काय ? सावधपणाचा अभाव. पाटावरवंटा आणि खलबत्ता यांच्या जागी मिक्सर आणलात; आनंदाची गोष्ट आहे. पण त्याची शक्ती किती, तो किती वेळ चालवायचा, केव्हा बंद करायचा याची माहिती घेतली का ? घरात विजेचे दिवे आले, शेगड्या आल्या, गीझर आला, पंखा आला, ठीक झाले. पण शॉर्ट सर्किट झाले तर स्विच बंद करायचे ज्ञान घेतले आहे का ? फ्यूज उडाला तर तो बसवता येतो का ? शॉक केव्हा केव्हा बसतो ते माहीत आहे का ?

घड्याळाचे काटे मागे फिरत नाहीत, पुढेच जातात. त्याप्रमाणे या यांत्रिक सुधारणा अधिकाधिक येणार, आणि आपल्या हातात निसर्गाच्या शक्तीचे प्रवाह निरनिराळ्या स्वरूपात येणार. शक्तीचा नीट उपयोग केला तर ठीक, नाही तर ती शक्ती मालकावर उलटते व त्याचा जीव घेते. आज आपल्या समाजात ज्या वेगाने शक्तीवर चालणारी यंत्रे येत आहेत, त्या वेगाने त्या शक्तींच्या नियंत्रणाचे ज्ञान वाढत नाही ही एक चिंतेची बाब आहे. विशेषतः अशिक्षित नागरिक, स्त्रिया व मुले यांना हे यंत्रासंबंधी ज्ञान नसते, त्यामुळे अनेक आपत्ती येतात.

तुम्ही आपल्या पुरते तरी एवढे करा. घरात अथवा आपल्या भोवताली, जी यंत्रे व ज्या शक्ती उपयोगात येतात, त्यांची माहिती स्वतः करून घ्या, आणि घरातील मुले, भगिनी, गडीमाणसे यांना सर्वांना करून द्या. अज्ञानामुळे अपघात झाला असे होऊ देऊ नका.

आता निसर्गातील या बाह्य शक्ती आहेत, तशा काही मनाच्याही शक्ती आहेत, त्यांकडेही अंतर्मुख होऊन पाहा. या शक्तीही फार जबरदस्त आहेत. काम, क्रोध, प्रेम, आहार, धनसंचय, इच्छा, द्वेष, मोठेपणाची महत्त्वाकांक्षा, कीर्तीची हाव—या सर्व मनाच्या शक्ती आहेत. त्यांच्या जोरावर आपले जीवनातले व्यवहार चालतात. पण या प्रत्येक शक्तीच्या प्रवाहाचा अतिरेक झाला की जीवनाची शोकांतिका होते. या शक्तींनाही ब्रेक केव्हा लावायचा, स्विच केव्हा बंद करायचा, याचा विवेक ठेवला पाहिजे. नाहीतर यांत्रिक शक्तीप्रमाणे ही मानसिक शक्ती-देखील उपाय न करता अपाय करील.

म्हणून, ब्रेक केव्हा लावायचा त्याचे अवधान राखा.

[१३-८-१९७१

५१. निष्कारण गैरसमज

मनाच्या शांतीवर जगातील सर्व सुखे अवलंबून आहेत. पण ही मनाची शांती अनेक वेळा आपली आपणच नाहीशी करतो. इतरांच्याविषयी अकारण गैरसमज करून घेण्यामुळे आपले स्वत:चेच नुकसान होते. आपलेच मन अस्वस्थ आणि बेचैन होते. ज्याच्याविषयी आपण गैरसमज करून घेतो त्याला तर या गोष्टीची दादही नसते. गैरसमज हा मन:शांतीचा एक शत्रू आहे.

आपले नातेवाईक, मित्रमंडळी, परिचित लोक, पाहुणे, यजमान, मालक, नोकर इत्यादी प्रत्येकाविषयी आपल्या काही अपेक्षा असतात. निरनिराळ्या प्रसंगी त्या पुऱ्या व्हाव्यात असे आपल्याला वाटते. त्या पुऱ्या झाल्या नाहीत की इतरांविषयी आपण मनात अढी धरतो. 'त्याला आपली काळजीच नाही, फार अहंकार आहे, आपलेपणा नाही, तुटस वृत्ती आहे, चिक्कू आहे, कृतघ्न आहे, निष्काळजी आहे, कामचुकार आहे, स्वार्थी आहे,' अशा प्रकारचे अनेक आरोप त्या माणसावर आपल्या मनातले मनात आपण करतो आणि हे गैरसमज अनेक दिवस जतन करतो.

एखाद्या नवीन गावी आपण गेलो की तेथील माणसाने स्टेशनवर यावे किंवा कोणाला तरी पाठवावे असे वाटते. त्याची आपली चुकामूक होते. आपण म्हणतो– 'त्याला माझ्याविषयी अगत्यच नाही'. एखाद्याच्या घरी समारंभ असतो. आपल्याला निमंत्रण मिळत नाही. त्याने पाठवलेले असते, पण काही तरी घोटाळा होऊन आपल्याला ते पोचत नाही. लगेच गैरसमज-- 'गरीबाची आठवण कोण ठेवतो ?'

आपल्या घरी मोठा समारंभ असला की सगळ्यांनी हजर व्हावे अशी आपली अपेक्षा असते. लहान गावात हे जमते. पण पुणे–मुंबई यांसारख्या मोठ्या शहरांत एकाच दिवशी आणि वेळी इतक्या ठिकाणी कार्यक्रम असतात की सर्व ठिकाणी जाणे जमत नाही. तशी कोणी अपेक्षाही ठेवू नये. अशा प्रसंगी काही लोक आले नाहीत तर त्यांच्याविषयी लगेच गैरसमज करून घेऊ नये.

प्रत्येक माणसाला काल–मान–परिस्थितीप्रमाणे काही अडीअडचणी असतात, त्यामुळे त्याची इच्छा असूनही आपल्या अपेक्षा तो पुऱ्या करू शकत नाही. मोठ्या शहरांतली माणसे लहान गावात गेली की तेथील यजमान पाहुण्याकरिता भरपूर वेळ देऊ शकतो. कधी काळी पाहुणे येणार म्हणून आतिथ्यही भरघोस करतो. आता या आतिथ्याची परतफेड शहरातील पाहुण्याने करावी अशी तो अपेक्षा करतो आणि ती पुरी होत नाही. शहरात पाहुण्यांची संख्या जास्त त्यामुळे

यजमान त्याला भरपूर वेळ आणि श्रीमंती आतिथ्य देऊ शकत नाही. लगेच गैरसमज—"शहरातली माणसं तुटस आणि कृतघ्न असतात."

अशा या गैरसमजामुळे आपण निष्कारण दुःखी कष्टी होतो आणि काल्पनिक शत्रू निर्माण करतो. दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून थोडा विचार केला, किंवा अधिक माहिती मिळेपर्यंत थांबलो तर गैरसमज विरघळून जातील. दोघांनाही सुख लागेल.

मनात गैरसमज आणि अढी ठेवण्यापेक्षा मोकळ्या मनाने दुसऱ्या माणसाकडून खुलासा करून घेणे हे अधिक चांगले. त्याची बाजू, अडीअडचणी, परिस्थिती काय होती ते आपल्याला कळते आणि उभयतांमधील प्रेम कायम राहते. मोकळेपणाने न बोलल्यामुळे अनेक गैरसमज वाढीला लागतात. गैरसमजामुळे माणसे दुरावतात. जोडलेली माणसे तुटतात. माणसे तोडणे सोपे आहे, जोडणे कठीण असते.

आपल्याविषयी इतरांचे असेच निष्कारण गैरसमज झालेले असतात व ते आपल्याशी तुसटपणाने वागतात. अशा वेळी त्या त्या व्यक्तींना भेटून 'आमचे काही चुकले काय?' असे विचारावे. प्रांजळपणाने बोलून आपली बाजू मांडावी म्हणजे त्यांचे गैरसमज नाहीसे होतील. आपले जुने संबंध पुन्हा जोडले जातील.

[१०–९–१९७१

९३. कौटुंबिक संध्येचा प्रयोग

नव्या-जुन्या पिढीमध्ये खोल दरी निर्माण होऊन ती अधिकाधिक रुंद होत आहे. तरुणांचे आचारविचार प्रौढांना पसंत नाहीत आणि प्रौढांची विचारसरणी त्यांच्या मुला-मुलींना आकलन होत नाही. त्यामुळे कुटुंबातील शांती नाहीशी होत चालली आहे. भौतिक दृष्टीने सर्व सुखे उपलब्ध असली तरी मानसिक स्वास्थ्य हळूहळू नष्ट होत आहे. आपली माणसे आपल्या मनासारखे वागत नाहीत हे दुःख सारखे मनाला बोचत असते.

कुटुंबातील व्यक्तींना एका समान संस्कारांत बांधून ठेवण्याची पूर्वी परंपरा होती. काही विचार एका पिढीतून पुढच्या पिढीत चालत, उतरत येत. कुटुंबात प्रचलित असलेल्या गोष्टी, गाणी, धार्मिक संस्कार, कुलधर्म यांच्या साहाय्याने जुन्या–नव्या पिढ्यांमध्ये समान धागा राखला जात असे. त्या सर्व गोष्टी आता नाहीशा होत चालल्या आणि त्यांचे कार्य करणाऱ्या नव्या प्रथा निर्माण झाल्या नाहीत. जुन्या व नव्या पिढीमधील दुवे नाहीसे होत चालले आहेत.

समाजाचे नियंत्रण करायला राज्यशासन असते. कुटुंबाचे नियंत्रण पूर्वी धर्मसंस्थेकडून केले जाई. आज धर्मसंस्था अशी अस्तित्वात नाही व तिच्या हातात काही अधिकारही नाहीत. म्हणून कुटुंबप्रमुखानेच आपापल्या कुटुंबापुरता तरी विचार करून काही उपयुक्त व आवश्यक प्रथा निर्माण केल्या पाहिजेत. हळूहळू त्यांचा प्रसार शेजारीपाजारी व मोठ्या वर्तुळात होऊ लागेल. अशी एक प्रथा म्हणजे कौटुंबिक संध्या.

संध्या म्हणजे एकत्र बसून ध्यान करणे. पूर्वीसारखी सकाळ-सायंकाळची संध्या आता फारसे कोणी करीत नाहीत. म्हणून या कौटुंबिक संध्येची प्रथा सुरू करावी. या संध्येला पळी-पंचपात्र-ताम्हण किंवा पोथी यांची जरूर नाही. कुटुंबातील आबाल-वृद्धांनी सायंकाळी किंवा रात्री अर्धा-पाव तास एकत्र बसावे. कुटुंबप्रमुखाने एखाद्या चांगल्या ग्रंथातील विचार वाचून दाखवावा. त्यावर सर्वांनी उलटसुलट चर्चा करावी. मग आपापल्या कामाला जावे.

दिवसातून सर्वांनी एकदा तरी एकत्र जमणे ही महत्त्वाची गोष्ट आहे. त्या वेळी सर्वांनी एखादा विचार घेऊन त्यावर चर्चा व चिंतन करणे ही दुसरी महत्त्वाची गोष्ट. सर्वांचे एकत्र येणे आणि एकत्र विचार करणे, यामुळे देहाने आणि मनाने कुटुंबातील सर्व व्यक्ती एकत्र येतील. आपण एका कुलाचे घटक आहोत ही जाणीव त्यांच्यांत निर्माण होईल. असे अनेक वर्षे चालू राहिले म्हणजे त्यांच्यात काही समान विचारसरणी अस्तित्वात येईल. नव-नवीन विचारांच्या वाचनामुळे जुन्या आणि नव्या दोन्ही पिढ्यांच्या विचारांत जिवंतपण व ताजेपणा राहील. त्या विचारांवर चर्चा केल्यामुळे परस्परांची मने एकमेकांना कळतील.

मराठी भाषेत वैचारिक व सुबोध असे पुष्कळ वाङ्मय निर्माण होत आहे. सदाचार चिंतनी, गीतेतील मुख्य विचार, जगात वागावे कसे, कण आणि क्षण, अशी किती तरी पुस्तके आहेत. नैतिक, सामाजिक आणि व्यावहारिक विचार देणारे वाङ्मय वृत्तपत्र-मासिकातून येत असते. सर्वांच्या मताने एखाद्या जुन्या किंवा नव्या ग्रंथाची निवड करावी. तो संपला की दुसरा. अशा रीतीने दोन तीन ग्रंथ कुटुंबात वाचून होतील.

आज आपल्या कुटुंबाचे जीवन कसे आहे पाहा. सकाळी उठल्यापासून जो तो आपापल्या व्यवसायात व कामधामात गर्क असतो. मोकळा वेळ मिळणार संध्याकाळी. त्या वेळी पुरुष, भगिनी आणि मुले आपापल्या समवयस्क गटात जाऊन वेळ घालवतात. पुरुष क्लबात, स्त्रिया भगिनी मंडळात आणि मुले-मुली आपापल्या कंपूत. सिनेमा-नाटकाला जायचे झाले तरी प्रत्येकाची आवड व निवड निराळी. भोजनाला देखील सगळे एकत्र येऊ शकत नाहीत. याला का कुटुंब

म्हणतात ! पण आत्मनिरीक्षणाच्या अभावी आपण कुटुंबसंस्था या अवस्थेला आणली आहे. आपणच तिची सुधारणा केली पाहिजे.

या नवीन संध्येची प्रथा तुमच्या घरी सुरू करा. मित्रमंडळींना सांगा. तिचा प्रचार करा. एका वर्षात तुमच्या घरातील वातावरण बदलते का नाही ते पाहा. प्रयोग म्हणून तरी हे सीमोल्लंघन करून पहा. विजयी व्हाल.

[२९-९-१९७१

७४. नवे युग, नवे रोग, जुने उपाय

विसाव्या शतकामध्ये शास्त्रीय संशोधनामुळे वैद्यकशास्त्र आणि आरोग्याचे ज्ञान यांत खूपच प्रगती झाली आहे. परंतु या प्रगतीबरोबरच काही बाबतीत परागती किंवा पीछेहाटही झाली आहे. पूर्वीपेक्षा मृत्यूंची संख्या कमी झाली परंतु रोगांची संख्या वाढली. शास्त्राने मानवाला उपयुक्त अशी पुष्कळ आरोग्य-साधने निर्माण केली. परंतु पूर्वीपेक्षा मानव स्वप्रयत्नाने आरोग्य टिकवण्याच्या बाबतीत अधिक उदासीन व आळशी झाला आहे. सामुदायिक आरोग्य सुधारले पण वैयक्तिक रोगीपणात वाढ झाली. हा मोठा गमतीदार विरोध आहे आणि त्याचा आपल्या प्रत्येकाच्या जीवनाशी संबंध आहे. कसा तो पहा.

१८८० ते १९३० हा पन्नास वर्षांचा कालखंड घ्या. या काळात प्लेगची साथ दरवर्षी यायची आणि हजारो माणसांना घेऊन जायची. आजच्या पिढीतील नागरिकांना प्लेगच्या भयंकरपणाची कल्पना नसेल. सकाळी मनुष्य आजारी पडायचा आणि संध्याकाळपर्यंत किंवा एक दोन दिवसांत खलास. प्लेगवर औषध असे नव्हतेच. हजारातून एखादा रोगी नशिबाने जगायचा. प्लेग झाला म्हणजे माणूस मेलाच अशी स्थिती होती. ही रोगाची साथ गावोगाव पसरत असे. संसर्गाने तिचा प्रसार होई. गावात प्लेग झाला की गाव सोडून लोक शेतात किंवा गावाबाहेर माळावर झोपड्या बांधून राहात. आज साठी-सत्तरीत असलेल्या अनेकांचे अनेक नातेवाईक प्लेगला बळी पडलेले आहेत. माझे वडील आणि मातोश्री दोघांनाही प्लेगने नेले.

देवी आणि नवज्वर हे दोन रोग असेच भयंकर होते. दोन्ही संसर्गजन्य, पण प्लेगपेक्षा हे शत्रू सौम्य आणि योग्य उपचारांना दाद देणारे होते. तरीही त्यांना अनेक लोक बळी पडत. मलेरियाचाही प्रसार पूर्वी खूप होता. या रोगाने माणूस तडकाफडकी मरत नसे, पण त्याचे शरीर व आरोग्य पोखरले जाई. शेवटी त्यालाही अनेक लोक बळी पडत. १९१८ पासून फ्लूची साथ सुरू झाली.

पहिल्या साथीत औषधोपचाराचीच निश्चिती नव्हती. हा एक नवाच पाहुणा होता. पहिल्या वर्षी त्याने प्रत्येक कुटुंबातला एखाद–दुसरा माणूस खलास केला. पुढे फ्लूचीही साथ येऊ लागली.

१९३० ते १९५० या काळात जे संशोधन झाले त्यामुळे संसर्गजन्य आणि साथीचे हे अनेक रोग आटोक्यात आले. प्रतिबंधक आणि उपचारात्मक औषधांचे शोध लागले. त्यामुळे रोगांच्या साथीत हजारोंचा बळी जायचा ती परिस्थिती नष्ट झाली. पण त्याचबरोबर नवीन नवीन रोगांनी माणसांच्या शरीरात आपले ठाण मांडले. रक्तदाब, हृद्‌रोग, कॅन्सर, मधुमेह, नसाव्यूहांचे रोग आणि निद्रानाशासारखे मानसिक रोग यांचे प्रमाण आता वाढत आहे. पूर्वीचे रोग निसर्गाने निर्माण केले होते व मानवी प्रयत्नाने ते कमी झाले. आजकालचे नवे रोग हे मानवाने आपल्या जीवनपद्धतीने निर्माण केलेले आहेत. ही मीमांसा मोठी गमतीदार आहे!

वैद्यकशास्त्राच्या प्रगतीबरोबर आधुनिक जीवनातील सुखसोयींचीही खूप प्रगती झाली. तिचा फायदा मानवाने घेतला पण त्याचा परिणाम त्याला आता दिसू लागला. स्कूटर–मोटार–बस इत्यादी वाहनांच्या सोयी वाढल्या आणि स्वस्त झाल्या. त्यामुळे चालण्याचे श्रम कमी झाले. यांत्रिक साधनांची वाढ झाली त्यामुळे शारीरिक क्रिया व कष्ट कमी झाले. चालण्याचा आणि शारीरिक कष्टांचा व्यायाम कमी झाला. त्यामुळे स्नायूंची व हृदयाची ताकदही कमी झाली. अन्नधान्याचे वैपुल्य, वाहतुकीच्या सोयी, द्रव्यप्राप्तीत वाढ आणि आहारातील नवीन नवीन शोध, यांमुळे पुष्टिदायक आहार वाढला. आहारात मेदयुक्त, पिठुळ आणि गोड पदार्थांचे प्रमाण वाढले. आहाराचे प्रमाण वाढले आणि व्यायामाचे प्रमाण घटले. त्यामुळे जादा अन्न चरबीच्या रूपाने हृदयावर आणि शरीरातील अन्य भागावर साठू लागले. स्त्री-पुरुषांचा स्थूलपणा वाढला. मध्यमवर्गात सडपातळ आणि सुटसुटीत शरीराचे स्त्रीपुरुष दिसणे दुर्मिळ झाले आहे. वयस्कर आणि सडपातळ अशी एखादी नीटनेटकी भगिनी दिसली की सर्वांना तिचा हेवा वाटतो!

शहरातील जीवनात धावपळीचे प्रमाण वाढले. अंतरे वाढली, कामे वाढली, काळज्या वाढल्या, जीवनातील प्रश्नांची गुंतागुंत वाढली. या सर्वांचा परिणाम माणसाच्या मनावर झाला आहे. त्याच्या मनावर सदासर्वदा कसला तरी ताण असतो. आर्थिक विवंचना, गाडी पकडायची धांदल, व्यवसायाची काळजी, कंटाळवाणी कामे, इत्यादी गोष्टींच्या असह्य ताणाखाली मन दबलेले असते. त्यामुळे निद्रानाशासारखे मानसिक रोग वाढत आहेत. मनाला विरंगुळा वाटण्या-करता साधने म्हणजे रेडियो, टेलीव्हिजन, हलकेफुलके वाङ्मय आणि गुंगीची

औषधे यांत माणसाला नवीन निर्मितीचा आनंद मिळत नाही, शारीरिक हालचाल होत नाही आणि मनाला आराम प्राप्त होत नाही. उत्तेजित करणाऱ्या वाङ्मयामुळे व व्यसनामुळे मनात क्षोभ मात्र निर्माण होतो.

अशा प्रकारच्या आधुनिक जीवनामुळे वर उल्लेखलेले मधुमेह, हृद्रोग, अपस्मार, निद्रानाश, कॅन्सर, रक्तदाब, यांसारखे रोग मानवाने पैदा केले आहेत. पूर्वी हे रोग कमी प्रमाणात होते, आज त्यांचे प्रमाण वाढले आहे.

या रोगांवर व परिस्थितीवर उपाय काय ? अगदी सोपा. वर कारण-मीमांसा केलेली आहे, तिच्यातच प्रतिबंधक उपाय ध्वनित होतात. शारीरिक कष्ट कमी झाले व चालणे थांबले. चालायचा, टेकड्या चढायचा, आसनांचा, किंवा इतर नियमित व्यायाम घ्या. आहारातील मेदयुक्त व शर्करायुक्त पदार्थ कमी करा आणि मानसिक विश्रांती करता ध्यान, चिंतन, भजन, पूजन, सात्त्विक वाचन, संगीतसाधना, वाद्यवादन, बागकाम अशा प्रकारचा कार्यक्रम दैनंदिन जीवनाचा आवश्यक भाग ठेवा.

असे केले तर या नवीन रोगांची तुम्हांला भीती नाही. शतायुषी व्हाल. व्यवस्थित.



[१४-११-१९७१

१५. चारित्र्यावर संक्रांत

आजचा काळ आणीबाणीचा आणि संकटांचा आहे असे सर्वांना वाटते. पण प्रत्येकाची कारणे निरनिराळी आहेत. कोणाला राजकारणामुळे आणीबाणीचा काळ वाटतो; कोणाला आर्थिक परिस्थितीमुळे, तर कोणाला सामाजिक विषमतेमुळे. ही सर्व कारणे थोड्याफार प्रमाणात खरीही आहेत. हा संकटांचा काळ आला तसा जाईल.

माझ्या मते खरे संकट आहे चारित्र्यावर. शील, चारित्र्य, नीती, सदाचार, सद्गुण—यांच्यावर फार मोठी संक्रांत आली आहे. ज्या ज्या वर्गाकडून चारित्र्याचा आदर्श समाजाने घ्यायचा त्या त्या वर्गांतच दुराचार, दुर्गुण, भ्रष्टता, स्वार्थ, लबाडी, अनीती यांचा मोठ्या प्रमाणात प्रवेश होऊ लागला आहे. लौकिक दृष्टीने या लोकांना संपत्ती, सत्ता, मोठेपणा, सवलती यांचा लाभ होत असल्याने त्या त्या व्यवसायांतील नवीन पिढीतील उमेदवारही त्याच मार्गाने जाऊ पहात आहेत.

प्रत्येक क्षेत्र व व्यवसाय घ्या, त्यात भ्रष्टाचाराचा प्रवेश झाला आहे.

राजकारण, व्यापार, कारखानदारी, वकिली, वैद्यकी, शिक्षण, सरकारी नोकरी, शेतकरी कामगार वर्ग—कोणत्या एका क्षेत्रात दुराचाराचा प्रवेश झाला नाही असे नाही. या क्षेत्रांतील सर्वच व्यक्ती भ्रष्ट झालेल्या नाहीत. मुळीच नाही. काही व्यक्ती चारित्र्यसंपन्न, सदाचारी, शीलवान, आणि आदर्श वर्तनाच्या आहेत. पण भ्रष्टाचाराचे मानाने अशा व्यक्तींची संख्या हळूहळू कमी होऊ लागली आहे. सदाचाराने उत्कर्ष होत नाही असे पाहून या लोकांपैकीही अनेक लोक दुराचाराच्या आहारी जात आहेत.

गरीबी हटाव, विषमता हटाव, गंदगी हटाव, हे हटाव अन् ते हटाव, अशा गर्जना चालू आहेत. दुराचार हटाव, भ्रष्टाचार हटाव—अशा गर्जना करणारा एखादा पक्ष निघेल काय ? फ्रीडम फ्रॉम हंगर, फ्रीडम फ्रॉम फियर, फ्रीडम फ्रॉम एक्स्प्लॉइटेशन—ही ब्रीदवाक्ये ज्यांनी पाडली त्यांनी फ्रीडम फ्रॉम व्हाईस, फ्रीडम फ्रॉम करप्शन, अशा घोषणा करायला हव्यात. वस्तुस्थिती अगदी उलट दिसते. सार्वजनिक कल्याणाकरता निघालेल्या चळवळीतही भ्रष्टाचाराचा प्रवेश झालेला आहे. वर्गाचे हित प्रथम, समाज तिकडे मसणात गेला तरी चालेल, अशा स्वार्थी वृत्तीने सामाजिक चळवळी चालवल्या जात आहेत. क्रायसिस ऑफ् कॅरॅक्टर, चारित्र्यावरचे संकट प्रत्येक क्षेत्रात राक्षसी स्वरूप धारण करीत आहे.

चारित्र्याला प्रेरणा कोणत्या आणि भ्रष्टतेला प्रेरणा कोणत्या याचा थोडा विचार करा. द्रव्यसंचय, सत्तास्थान, मानसन्मान, प्रतिष्ठा, प्रसिद्धी या गोष्टी भ्रष्टाचारानेच मिळतात असा समज रूढ होऊ पाहात आहे, रूढ झाला आहे. थोडी लवाडी केली की प्रमाणाबाहेर खूप फायदा होतो असे आढळून आले की माणसाची सदसद्विवेक बुद्धी मरते. ती मेली की पुढचा मार्ग मोकळा झाला. स्वार्थ आणि लाभ या भ्रष्टाचाराच्या प्रेरणा आहेत. उलट सदाचाराची प्रेरणा काय ? सदाचारी माणसाला द्रव्य, सत्ता इत्यादी गोष्टी कधी मिळतील, कधी मिळणार नाहीत. कारण जीवनातील यश अनेक गोष्टींवर अवलंबून असते. भ्रष्टाचारात मिळणारा हुकमी फायदा सदाचारात नाही. सदाचाराचे फळ सदाचाराने मिळणारी मनःशांती, आनंद आणि समाधान हे आहे. पण हेच पारितोषिक फार मोठे आहे, याची जाणीव करून घ्या व इतरांना करून द्या.

अखेरपक्षी द्रव्य, सत्ता, मान या गोष्टी कशाकरता ? मनाला सुख, शांती, समाधान मिळावे या करताच ना ? भ्रष्टाचारी माणसाचे मन त्याला जन्मभर खात राहील. ते कधी समाधान व शांती मिळू देणार नाही. हा विचार ज्याच्या त्याच्या मनात उत्पन्न झाला पाहिजे. विचाराची दिशा दाखवणे आपले काम आहे. ते केले नाही तर आपणही गुन्हेगार ठरू.

[१९–११–१९७१

५६. युद्धकाळाचा शिकवण विसरु नका

आणीबाणीच्या आणि संकटाच्या काळात आपली स्वतःची आणि आपल्या माणसांची परीक्षा होते. व्यक्तीच्या बाबतीत याचा अनुभव प्रत्येकाला येतोच. आपल्याला पैशाची निकड किंवा मनुष्यबळाची गरज असली म्हणजेच खरे मित्र आणि नामधारी मित्र अशी विभागणी करता येते. जसे व्यक्तीचे तसेच राष्ट्राचे आहे. चालू युद्धकाळाचाच अनुभव पहा ना ! आफ्रिका आणि मध्य आशिया यांतील राष्ट्रे आपले परममित्र म्हणून आपण समजत आलो, त्यांची आता परीक्षा झाली ! ते आपल्याला जवळचे मानीत नाहीत. राजकीय मैत्रीपेक्षा धर्मनिष्ठ मैत्री प्रभावी ठरली. आपापसात त्यांची भांडणे होतील तेव्हा धर्मापेक्षा स्वराष्ट्रहित हे प्रभावी ठरेल. सारांश व्यक्ती काय किंवा राष्ट्र काय, पदराला खार लागत नाही तोपर्यंत मित्र; वेळप्रसंग आला की स्वतःचा धर्म किंवा स्वतःचा देश हा विचार प्रभावी ठरतो.

एखाद्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याला आपण सहाय्य केले म्हणजे ते भावी काळात सतत आपले मित्र राहील असाही भरंवसा नाही. नेपाळचे राजे त्यांच्या राणाशाहीच्या गुलामगिरीतून मुक्त करण्याकरता भारताने सहाय्य केले. अलीकडे नेपाळचे धोरण कसे आहे माहीत आहे ना ? संसारात मनुष्यस्वभाव ओळखून सर्वांशी वागावे. राजकारणातही त्या त्या राष्ट्रांचे स्वभाव ओळखून वागायला पाहिजे. हिंदी-चिनी भाई भाई म्हणून आपण पुण्यात आणि भारतात चौ एन् लायचे देव्हारे माजवले. तो बेरकी मुत्सद्दी त्याच वेळी भारतावर आक्रमण करण्याच्या योजना करीत होता !

इतर देशांत व आपल्या राष्ट्रात धर्म, लोकशाही, समाजवाद, साम्यवाद इत्यादी गोष्टी समान आहेत म्हणून तो देश आपला नेहमी मित्रत्व राहील असे नाही. त्याच्या स्वार्थाला धक्का लागत नाही तोपर्यंत मित्र; स्वार्थ आला की ज्याचा तो. रशिया व चीन दोघेही साम्यवादी, पण त्यांच्यात मैत्री नाही. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात ख्रिस्ती धर्माची राष्ट्रे परस्परांविरुद्ध लढली. पंजाबी मुसलमान आणि बंगाली मुसलमान एकाच धर्माचे पण आज शत्रू झाले. लोकशाहीप्रधान अमेरिका भारतीय लोकशाहीचे शत्रुत्व स्वीकारून हुकूमशाही असलेल्या देशांना मदत करते. यावरून लक्षात येईल की स्वदेशाचा विचार आला की समान धर्म आणि समान राजकीय तत्त्वज्ञान या गोष्टीही गौण ठरतात.

युद्धकाळात एक फायदा असा होतो की समाजाचे सर्व सद्गुण व दुर्गुण प्रकर्षाने प्रकट होतात. काळाबाजारवाले वेळ न घालवता भाव वाढवून समाजाला आणि देशालाही लुटून घेतात. पण या समाजद्रोहापेक्षा समाजनिष्ठा व देशप्रेम

दाखविणारी उदाहरणे अधिक घडतात. अंग मोडून कष्टाची तयारी, स्वार्थत्यागाची वृत्ती, पक्षीय मतभेदांना मूठमाती, राष्ट्रैक्याच्या भावनेला प्राधान्य, औद्योगिक उत्पादन वाढवण्याकरता संपप्रवृत्तीचा संप करण्याचा निश्चय, शासनाचे आदेश काटेकोरपणे पाळण्याची तत्परता, प्राणार्पणाची तयारी—हे सद्गुण प्रामुख्याने प्रकट होतात. त्याचा अर्थ असा की आपल्या ठिकाणी हे सद्गुण आहेत, पण बाहेरच्या एखाद्या राष्ट्राने बडगा मारल्याशिवाय ते दाखवायला आम्ही तयार होत नाही ! असे का ? शांततेच्या काळातही या गुणांचे आचरण का करता येऊ नये ? परकीय शत्रूचे आक्रमणच व्हायला हवे का ? शांतता काळातही आपल्या समाजात शत्रू आहेत, त्यांच्या निर्दालनाकरता आपण हे सद्गुण का दाखवू नयेत ?

आपले अंतःस्थ शत्रू कोणते आहेत पहा. निरक्षरता, दारिद्र्य, उत्पादनातील कमतरता, सर्वत्र कामचुकारपणा, पक्षीय भांडखोरपणा व आकुंचित स्वार्थ, समाजहितापेक्षा सत्ता-संपत्ती-मान संपादनाला प्राधान्य, देशाच्या मालमत्तेची मोडतोड व जाळपोळ, भारताचे शत्रुत्व करणाऱ्या देशांविषयी निष्ठा, देशहितापेक्षा स्वार्थाला प्राधान्य—हे आपले अंतर्गत शत्रू आहेत. शांततेच्या काळात आपण त्यांच्यावर मोहीम करून त्यांचा नायनाट केला तर देशाचे संरक्षणाचे सामर्थ्य वाढेल. शिक्षणवाढ, कष्टाची तयारी, उत्पादनवाढ, ऐक्यभावना, त्यागवृत्ती—या गुणांच्या जोरावर देशाचे लष्करी सामर्थ्य वाढले की देश स्वावलंबी, सामर्थ्यवान व स्वातंत्र्यरक्षणाला सदासिद्ध राहातो. मग आणीबाणीच्या वेळी उसने सद्गुण आणण्याची धावपळ करावी लागत नाही.

युद्धकालापासून काय बोध घेता येईल त्याचा विचार करा आणि तो शांतता काळातही सतत लक्षात ठेवा. कालच्या व आजच्या घडामोडीतून शोध घेऊन जो आपले धोरण सुधारतो तो माणूस, तो समाज व तोच देश वाटेल त्या प्रसंगाला तोंड देऊ शकतो.

[११-१२-१९७१

५७. हिला म्हणतात मॉडर्न गर्ल !

अमेरिकेत घर करून राहिलेल्या एक हिंदी बाई एकदा आमच्याकडे पाहुण्या म्हणून आल्या. गेल्या तीस पसतीस वर्षांत त्या मधून मधून इकडे येतात त्यामुळे घरगुती जीवनात होत असलेले आधुनिकीकरण त्यांच्या चटकन लक्षात येते. पूर्वी त्या पहात ते आमचे गृहजीवन निराळे होते. जमिनीवरच्या चुली.

काकडा घालून चूल पेटवायची आणि मग फुंकणीने फू फू करून जाळ करायचा. बंबात काकडा घालून तो पेटवायचा. चुलीचा आणि बंबाचा धूर घरभर झाला की डोळे चुरचुरायला लागायचे. कपडे धुरकट व्हायचे. सैपाकात क्रमाने एकेक वस्तू शिजवायच्या. तीन तासांचा कार्यक्रम. नळाचे पाणी हुकमी मिळायचे हेच आधुनिकीकरण होते. संध्याकाळ झाली की दिव्यांच्या काचा पुसून त्यांत रॉकेल घालायचे, वाती कापायच्या आणि मग स्टॅन्ड व कंदील लावायचे. वीज आली नव्हती त्या वेळची गोष्ट. डायनिंग टेबल आणि खुर्च्यांची पद्धत आलो नव्हती. पाट मांडून जमिनीवर जेवायला बसायचे आणि बैठकीकरता घोंगडी किंवा सतरंजी घालायची. स्टेशनवर जायला सहा आण्यात, आजच्या चाळीस पैशांत टांगा मिळायचा.

आता सर्व जमाना बदललेला पाहून बाई म्हणाल्या—अमेरिकेतील सैपाकघरातल्या सर्व सोयी आता तुमच्या घरात आल्या की ! गीझर आल्यामुळे हुकमी गरम पाणी. टॉर्च लावला की गॅसची चूल ज्वलंत झालीच. प्रेशरकुकरमधे पंधरा मिनिटात शिजवण. सर्वत्र वीज आल्यामुळे विजेचे घडयाळ, विजेची इस्त्री, रेडियो मिक्सर, या वस्तू आपोआप आल्या. फ्रीज महाग असल्यामुळे सार्वत्रिक झाला नाही, पण इतर यांत्रिक व आधुनिक वस्तू आपल्या घरात आल्या.

विज्ञानाच्या व यंत्रशास्त्राच्या तत्त्वावर आधारलेली सर्व साधने आपल्या घरात आली, परंतु त्या प्रमाणात, विज्ञानाचा विचार व त्याचे उपयोजन आलेले नाही. आज पन्नाशीच्या पुढे गेलेल्या भगिनींना ही गोष्ट क्षम्य आहे, कारण त्यांना शिक्षणाची संधी फारशी नव्हती, आणि त्यावेळी शाळेतही इतके विज्ञान शिकवले जात नव्हते. परंतु पंधरा ते पंचेचाळीसच्या वयातील मुलींना आणि स्त्रियांना विज्ञानशिक्षणाचा लाभ झालेला आहे. त्या आपल्या या ज्ञानाचा उपयोग सैपाकघरात व कुटुंबात करतात काय असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल.

विज्ञान–शिक्षणाची घरकामाशी सांगड शाळेने घातली नाही, ती गृहिणींनी घातली पाहिजे. गृहशिक्षणाच्या महाविद्यालयात सर्वांनाच जाता येणे शक्य नाही. पण काम करता करता विज्ञानाचा विचार केला तर दोहींची सांगड घालता येईल. तरुण मुलींनी या क्षेत्रात अधिक लक्ष घातले पाहिजे. घरातील कामे, त्यांच्या प्रक्रिया आणि ती करण्याची साधने यांचा अधिक चौकस बुद्धीने विचार केला पाहिजे. पुढील प्रश्नांची उत्तरे किती मुलींना देता येतील ?

प्रायमस् स्टोच्या आतील रचना कशी असते ? वर्शेनच्या गॅससिलिंडरमध्ये काय असते व आतील रचना कशी असेल ? वीज गेली तर फ्यूज कसा बसवावा ? वीज वापरताना कोणते नियम व सवयी काटेकोरपणे पाळल्या पाहिजेत ? प्रेशर-

कुकरचा दाब किती किलोचा असतो ? टॉर्चची रचना कशी असते ? इस्त्रीच्या आतील रचना कशी आहे ? प्रत्येक प्रकारचे अन्न शिजवताना त्याला लागणाऱ्या पाण्याचे प्रमाण काय आहे ? कणीक भिजवताना, तांदूळ शिजत लावताना, सांजा करताना, भाज्या शिजवताना पदार्थाच्या कितीपट पाणी लागते ? जुन्या नव्या तांदळात फरक काय ? तांदूळ उन्हात वाळत टाकत नाहीत ते का ? भाकरी व पोळी यांना पापुद्रा येतो तसा थालपीटाला का येत नाही ? फोडणीतल्या मोहऱ्या का तडतडतात व त्या काळ्या होईपर्यंत का थांबायचे ? तुमच्या आजच्या भोजनातील पदार्थात जीवनसत्त्वे, खनिजे, प्रोटीन, मेद आणि पिष्टमय द्रव्ये यांचे प्रमाण काय आहे ? घरातील प्रत्येक माणसाचा आहार किती (कॅलरीज) उष्मांकाचा आहे ? किती उष्मांकाचा आहार घेतला म्हणजे वजन आणि मेद वाढणार नाही ? साबणाने कपडे स्वच्छ का होतात ? दुधाचे दही होते म्हणजे शास्त्रीय दृष्टचा काय प्रक्रिया होते ? दही बिघडते ते का ? उन्हाळ्यात आंबट होते आणि हिवाळ्यात पातळ राहाते ते का? याच पद्धतीने कितीतरी मोठी प्रश्नमाला तुम्हाला देखील तयार करता येईल. ती अवश्य करा. मनात प्रश्न उत्पन्न होणे व तो स्वतःला विचारणे ही ज्ञानोदयाची पहिली अवस्था आहे. उपलब्ध ज्ञानाने जिज्ञासापूर्ती ही दुसरी अवस्था आणि स्वतंत्र विचार व संशोधन ही तिसरी अवस्था. आधुनिक मुलींनी या तिसऱ्या अवस्थेपर्यंत पोचायला पाहिजे. मॉडर्न गर्ल म्हणतात ती हीच. केवळ आधुनिक वेशभूषा आणि केशरचना करणाऱ्या आणि देहाचे प्रदर्शन फिरवणाऱ्या मुली खऱ्या अर्थाने मॉडर्न नव्हेत. मॉडर्नपणा विचारात, बुद्धीत, कृतीत यायला पाहिजे. निर्बुद्ध अनुकरण म्हणजे मॉडर्नता नाही हे मुलींनी लक्षात ठेवावे.

शाळा कॉलेजमधे जाणाऱ्या मुलामुलींनी रविवारी, सुटीच्या दिवशी व दिवाळी-उन्हाळ्याच्या मुदतीत आपल्या घरांतील कामात लक्ष घालावे व त्यांत आधुनिकीकरण कसे करता येईल त्याचा अभ्यास करावा. भावी संसारात त्यांना फार उपयोग होईल. संसारात पडल्यावर शिकू असे म्हणणाऱ्या मुलींच्या संसाराची पहिली चारपाच वर्षे शिकण्यातच जातात. विद्यार्थी जीवनातच या गोष्टी शिकून घेतल्या तर वैवाहिक जीवनाच्या आनंदात भर पडेल. काम एकदोन वेळा करून येत नाही. कामाची सवय लागणे जरूर आहे. आगीशी, विजेशी आणि यंत्राशी काम करताना अनेक अवधाने सांभाळावी लागतात. सावधानता, अंदाज, वेळेचा हिशेब, स्मरण, कार्यकारणभाव, योजनाबद्धता इत्यादी गुण सवयीने व अभ्यासाने येतात.

काम करण्यात एक आनंद वाटला पाहिजे. आपले व्यावसायिक जीवन यांत्रिक पद्धतीचे, ठराविक साच्याचे, धोपटमार्गी झालेले असते. नवनिर्मितीचा

आनंद त्याच्यात नसतो. त्यामुळे माणूस शरीराने व मनाने थकतो. उलट नव-निर्मितीच्या आनंदाने त्याचे पुनरुज्जीवन होते. सैपाकघरात रोज नवीन निर्मिती करावी लागते. त्याच वस्तू पण रोज त्यांची प्रक्रिया निराळ्या प्रकाराने करता येते आणि वस्तूच्या रूपात, चवीत व पोषणमूल्यातही फरक पडतो.

सौ. ताई परगावी गेल्या किंवा आजारी असल्या की मला चहा करावा लागतो. त्यात मला आनंद वाटतो. वस्तू त्याच पण रोज चहाची चव निराळी. आजचा चहा कसा झाला आहे ते पहाण्याकरता पहिला घोट घ्यायला मन उत्सुक असते. अशा रोज रोज मिळणाऱ्या आनंदाने माणूस सुखी होतो. त्याचे आरोग्य सुधारते आणि आयुष्य वाढते.

[२४-१२-१९७१

५८. लोकशाही का हुकूमशाही ? धडा घ्या

बांगला देश स्वातंत्र्याच्या निमित्ताने गेल्या वर्षात जगामध्ये ज्या घडामोडी झाल्या त्यांच्यापासून समाजाचे राजकीय शिक्षण झाले. लोकशाही आणि हुकूमशाही अंमलाखालील व्यक्तींच्या जीवनात जमीनअस्मानाचे अंतर असते ही गोष्ट प्रत्ययाला आली. या प्रसंगातून मिळणारा बोध आपल्या देशातील मतदारांनी घेतला तर यापुढे काही काळ तरी लोकशाही जिवंत राहील.

आपल्या देशांत लोकशाहीची घटना व तंत्रे आहेत. पण लोकशाही हे काय तत्त्वज्ञान आहे आणि तिचे फायदे काय आहेत याची पुरेशी जाणीव जनतेला नाही, मतदारांना नाही आणि निवडून देणारांनाही नाही. लोकशाहीच्या उलट हुकूमशाही. तिच्या पोटात कोणते धोके आहेत याचीही कल्पना नाही. बांगलादेश प्रसंग आणि आगामी निवडणुका या निमित्ताने, वरील दोन पद्धतींचा जरा विचार करा आणि आपल्या मनाशीच काही अडाखे बांधा. ते आपल्या मुला-मुलींना आणि मित्र-भगिनींना सांगा.

अमेरिका व इंग्लंड, रशिया व चीन या देशांतील शासक म्हणजे राज्यकर्ते, आणि सर्वसामान्य समाज यांच्या बांगलादेशविषयक प्रतिक्रिया कसकशा होत्या ते पहा. माओ-माओ म्हणून उदोउदो करणारांचा चीन घ्या. जगात सर्व देशातील क्रांतीला उत्तेजन देणाऱ्या या देशातील राज्यकर्त्यांनी ज. याह्याखानाच्या जुलुमी हुकूमशाहीचा पक्ष घेतला. सर्वसामान्य समाजाला चीनमध्ये मतस्वातंत्र्यच नाही. त्यामुळे याह्याखानाने केलेल्या कत्तलीविरुद्ध एकही व्यक्ती ब्र काढू शकली नाही !

पाच हजार वर्षांची संस्कृती असलेला हा एके काळचा सुसंस्कृत देश ! तेथील शासक जुलूमशाहीला पाठिंबा देतात आणि लोकमत काही करू शकत नाही.

कम्युनिझमचे बाबतीत चीनचा एके काळचा आद्यगुरु रशिया. तेथेही हुकूमशाहीच आहे, पण ती एका व्यक्तीची नसून पक्षाची आहे. सुदैवाने तिचे धोरण हळूहळू बांगलादेशाच्या स्वातंत्र्याला अनुकूल होत गेले. शासकीय मत आणि लोकमत यांत विरोध येण्याचा फारसा संभव नव्हता. पण दुर्दैवाने जर रशियन सरकारने विरोधी भूमिका घेतली असती तर त्या देशातील लोकमताला विरोध प्रदर्शित करण्याची छाती झाली नसती. चेकोस्लोव्हाकियातील स्वातंत्र्यवादी चळवळ ज्या वेळी रशियाने दडपून टाकली त्या वेळी प्रजेतील एकाही व्यक्तीने विरोध दाखवला नाही. शक्यच नव्हते.

आता इंग्लंड–अमेरिकेतील शासक व लोकमत यांचा विचार करा. इंग्लंडमध्ये शासकांचे मत बांगलादेश मुक्तीला अनुकूल होते व लोकमताने त्याची साथ केली. पण शासकीय मत विरोधी असते तरीही व्यक्ती व वृत्तपत्रे यांनी निर्भयपणाने बांगलादेशातील जुलूमशाहीचे वाभाडे काढलेच असते. ते चित्र आपणाला अमेरिकेत दिसले. अमेरिकेच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात निक्सन आणि किसिंजर ही जोडी अजरामर होईल ! एका स्वातंत्र्यप्रेमी लोकशाहीवादी राष्ट्राचा अध्यक्ष निर्बुद्ध लष्करी हुकूमशाहीच्या जुलुमाला आणि क्रूर वंशहत्येला शस्त्रसामग्री पुरवून सहाय्य करतो, आणि गुप्तपणाने हे चालू असताना वरपांगी निःपक्षपातीपणाचे ढोंग करतो, हे चित्र जगाला पाहायला सापडले. त्याच अमेरिकेत प्रभावी लोकशाही असल्यामुळे वृत्तपत्रे, प्राध्यापक व लेखक सरकारी धोरणाच्या विरुद्ध जाहीरपणे मतप्रदर्शन करू शकले. अँडरसनसारखा बातमीदार सरकारी कागदपत्रांचा गौप्यस्फोट करून अध्यक्षाचा खोटेपणा वेशीवर टांगू शकतो. भारतातील अमेरिकन प्रतिनिधी केनेथ कीटिंग सरकारी धोरणातील विसंगती व चुका जाहीरपणे दाखवू शकतात. ही घटना लोकशाहीवादी इंग्लंड–अमेरिकेत शक्य आहे. रशिया, चीन आणि त्यांच्या ग्रहमालेतील देशांत अशक्य आहे.

लोकशाहीत शासनकर्ते आणि समाज यांत मतभेद असू शकतो आणि लोकमताच्या प्रदर्शनाला वाव असतो. लोकमताच्या जोरावर पुढच्या निवडणुकीत सरकार बदलता येते. उलट हुकूमशाही राज्यव्यवस्थेत शासकांच्या मताविरुद्ध प्रजेचे मत असले तरी ते बोलायची व लिहायची मोकळीक नसते. लोकमताला वाव नसल्याने जनतेला नको असलेले राज्यकर्ते बदलता येत नाहीत. शासन बदलायचा एकच मार्ग असतो, सशस्त्र क्रांतीचा व गुप्त कटाचा.

तात्त्विक चर्चा करून हा मुद्दा सर्वसामान्य मतदारांच्या मनावर बिंबला

नसता. बांगलादेशच्या निमित्ताने लोकशाही आणि हुकूमशाही राष्ट्रांत घडामोडी झाल्या, त्यामुळे तो या पिढीच्या तरी जन्मभर लक्षात राहील.

आता ज्या ज्या वेळी मतदान करायला जाल तेव्हा लोकशाही टिकवण्याकरता मी मतदान करतो, ही जाणीव जागृत ठेवा. उमेदवार पैसे देतो म्हणून, किंवा दडपण आले म्हणून, किंवा उमेदवार जातभाई आहे म्हणून, मत देऊ नका. लोकशाही तत्त्वावर श्रद्धा असलेल्या उमेदवाराला मत द्या. त्याला पुढे हुकूमशाहा होऊ देऊ नका. तो तसा व्हायला लागला तर खाली ओढा. परत बोलवा. राजीनामा द्यायला लावा.

लोकशाहीच्या तंत्राचा फायदा घेऊन प्रथम मतदारांच्या सहाय्याने निवडून यायचे आणि नंतर त्याच मतदारांना आणि त्या लोकशाहीला पायाखाली तुडवून स्वतः हुकूमशहा व्हायचे, हे एक हुकूमशाहीचे तंत्र आहे. हिटलरने १९३३ साली त्याचा उपयोग केला. म्हणून आपण निवडून दिलेले पुढारी हुकूमशहा होत नाहीत ना या गोष्टीकडे सावधानतेने पाहिले पाहिजे. या गोष्टीकडे दुर्लक्ष झाले तर आपल्या देशातील पुढारीही हुकूमशहा व्हायला कमी करणार नाहीत. तुम्हा–आम्हांला गुलामगिरीचे जीवन जगावे लागेल. डोळ्यावर कातडे ओढून, कानात खुंटचा ठोकून, तोंडाला कुलूप लावून अन्याय, जुलूम, स्वार्थांधता व भ्रष्टाचार सहन करावा लागेल. सावधान.

[१०–१–१९७२

५९. सुखातही दुःखी होणारे जीव !

सुख आणि दुःख हे मानवाचे चिरंतन प्रश्न आहेत. जगाच्या प्रारंभापासून ते आहेत आणि अनंत काळ ते राहातील. त्यांचे स्वरूप बदलेल इतकेच. मानवाला दुःखापासून मुक्त करावे आणि सुखाचा मार्ग दाखवावा असा प्रयत्न समाजसेवक, तत्त्वज्ञानी, मानसशास्त्रज्ञ आणि धर्मप्रचारक करतात. तरीही दुःखी राहण्याची कला काही माणसांनी आत्मसात केलेली असते; ते दुःखीच राहातात !

सुखाची साधने दोन प्रकारची असतात. काही बाह्य साधने आहेत, काही आंतरिक व मानसिक आहेत. दोन्हींचा संगम झाला तर मनुष्य अधिकाधिक सुखी राहू शकतो. कोणतेही एक कमी पडले तर त्याला दुःख भोगावे लागते.

बाह्य साधनांत वस्तू आणि व्यक्ती येतात. सुग्रास अन्न, अंगभर वस्त्र, प्रशस्त घर, करमणुकीची साधने, शिक्षणाच्या व ज्ञानाच्या सोयी, ही बाह्य साधने आहेत. भोवतालची माणसेही आपल्या सुख-दुःखांना कारणीभूत होतात. आई,

वडील, पती, पत्नी, बंधू, भगिनी, कन्या, पुत्र, जावई, सुना, सासू, सासरे, मित्र, शेजारी, वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ नोकर—यांचे स्वभावही आपल्या सुखात किंवा दुःखात भर टाकतात.

आंतरिक साधनांत आपले मन हे प्रमुख आहे. सुख किंवा दुःख यांची जाणीव ठेवणारे आणि त्यांचा भोग घेणारे आपले मन आहे. मनाची शक्ती अफाट आहे तसाच त्याचा कमकुवतपणाही कल्पनातीत आहे. बाह्य साधनांचा अभाव भरून काढण्याचे सामर्थ्य मनात आहे. उलट बाह्य साधनांचे वैपुल्य असले तरी दुःखी राहण्याचा कमकुवतपणा आपल्या मनातच आहे. त्यामुळे गरिबीतही सुखी राहाणारे जीव आहेत, तसेच वैभवातही दुःखी राहाणारे प्राणी आहेत. याचे कारण काय ?

आपल्या ठिकाणी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, भय, आणि चिंता हे विकार आहेत. त्यांचे प्राबल्य झाले म्हणजे आपण सुखी वातावरणातही दुःखी होतो. शारीरिक सुखांचा ध्यास घेणारा माणूस कामविकाराच्या आधीन होतो आणि सदा असमाधानी राहातो. क्रोधाला बळी पडणारा रागीट माणूस इतरांना दुःख देतो आणि स्वतः मनात जळत राहातो. लोभी माणूस सदा असंतुष्ट राहातो. अहंकारी आणि मत्सरी माणूस इतरांच्या सुखामुळे स्वतः दुःखी होतो. भय आणि चिंता वाहाणारा जीव त्याच विकारात गुरफटून राहातो आणि असलेले सुख भोगू शकत नाही. सारांश, आपल्या मनातील विकार आपल्या दुःखाला कारण आहेत. इतरांच्या सुखातही ते व्यत्यय आणणारे आहेत.

यांच्या उलट प्रवृत्तीची माणसे वाटेल त्या परिस्थितीत सुखी राहू शकतात. शरीरसुखाच्या बाबतीत आत्मसंयमी माणूस सदा संतुष्ट असतो. क्रोधाला जिंकणारा माणूस सदा शांत असतो आणि सुखी राहातो. लोभ कमी झाला की संतोष आपोआप येतो. अहंकार आणि मत्सर गळाले की माणूस इतरांच्याही सुखात आनंद मानू शकतो. निर्भयता आणि निश्चितता असल्याशिवाय मिळालेले सुख अंगी लागत नाही.

या दृष्टिकोनातून स्वतःकडे पाहा. तुम्ही सुखी आहात का दुःखी ? या सुखाकरता बाह्य साधने किती लागतात आणि आंतरिक समाधान व निर्विकारता किती लागते ! तुम्ही दुःखी असाल तर त्याला कारणे काय आहेत ? बाह्य परिस्थितीकडे दोष किती आणि तुमच्या स्वभावातले आंतरिक दोष किती ? विचार करून अडाखे बांधा, आणि स्वतः सुखी व्हा. आनंदी, समाधानी व संतुष्ट राहा. तुमच्या आनंदी वृत्तीमुळे तुम्ही वातावरण आनंदी कराल व इतर जीवही आनंदी होतील.

[९-२-१९७२

६०. धर्मप्रेम इष्ट, धर्मवेड घातक

धर्म या एका शब्दामध्ये प्रत्येक जण आपापला अर्थ मनात ठेवून बोलतो; प्रत्येकाच्या मनात वेगवेगळा अर्थ असतो. त्यामुळे हा विषय अत्यंत वादग्रस्त झाला आहे. भारत हा सेक्युलर देश आहे असे घटनेने ठरवले आहे, त्यामुळे तर आपापल्या धर्माबद्दल भावना व्यक्त करण्याची चोरी झाली आहे ! धर्माबद्दल अभिमान दाखवला तर आपले देशप्रेम कमी दिसेल की काय अशी अनेकांना भीती वाटते. धर्माच्या नावाखाली गेल्या दोन हजार वर्षांत काही लोकांनी इतके अनन्वित अत्याचार केले आहेत की धर्माचा विषय काढल्यावरोबर ' पुरे झाले तुमचे धर्मपुराण ' असे अनेकांना वाटू लागते. काही धर्ममार्तंडांची धार्मिक अंधश्रद्धा पाहिल्यानंतर आधुनिक तरुणांना वाटू लागते की असला हा निर्बुद्ध धर्माभिमान विज्ञानपराङ्मुख लोकांचा निवळ आंधळेपणा व रूढीप्रियता आहे. त्यात काय खोटे आहे ?

धर्मप्रेम या शब्दाचा नीट अर्थ घेतला तर आपल्या लक्षात येईल की तो एक सात्त्विक सद्गुण आहे व सुसंस्कृतपणाचा निदर्शक आहे. धर्माच्या नावाखाली अनेक गोष्टी येतात, त्यांतील कोणत्या गोष्टी धर्मप्रेमाच्या निदर्शक आहेत ते नीट पहा. प्रत्येक धर्माला काही तत्त्वज्ञान असते व काही आचारधर्म असतो. तत्त्वज्ञान हे चिरंतन व शाश्वत असते पण आचारधर्मात कालमानाप्रमाणे बदल होत असतात. बहुसंख्य लोकांना आपल्या धर्माच्या तात्त्विक भागाचे मुळीच ज्ञान नसते. परंपरेने चालत आलेल्या व कालबाह्य झालेल्या आचाराला धर्म समजून ते कवटाळून बसतात. ते खरे धर्मप्रेम नसून तो एक अंधश्रद्धेचा प्रकार आहे. धर्माचे तत्त्वज्ञान समजून घेऊन नीती, न्याय, सदाचार व सद्गुण यांची जोपासना करणाऱ्या माणसाच्या प्रवृत्तीलाच धर्मप्रेम हे नाव शोभेल.

स्वधर्मावर ज्यांचे प्रेम आहे त्यांच्या ठिकाणी इतर धर्माविषयीही सहिष्णुता, आदर आणि जिज्ञासा या भावना असतात. आपापल्या धर्मावर खरे प्रेम करणारी माणसे किंवा समाज परस्परांशी समजुतीने व सहिष्णुतेने वागतात.

धर्मप्रेमाचे धर्मवेडात रूपांतर न कळत केव्हा होते त्याचा विचार करा. आपल्या धर्माची काहीएक माहिती नसताना केवळ काही अंधरूढीला चिकटून राहाणारा माणूस स्वतःला धर्माभिमानी समजतो, पण ते त्याचे धर्मवेड असते. अज्ञान हा धर्मवेडाचा पाया आहे. त्याचे अंधश्रद्धेत व असहिष्णुवृत्तीत रूपांतर होते. इतर धर्माविषयी, त्यातील समाजाविषयी त्याच्या आचारपद्धतीविषयी द्वेष वाटू लागतो. याला धर्मवेड असे नाव आहे. धर्मप्रेम हा इष्ट असा गुण आहे

तर धर्मवेड हा तिरस्कारणीय व निंद्य असा दुर्गुण आहे. इतिहासात धर्मप्रेमापेक्षा धर्मवेडाची उदाहरणे अधिक सापडतात त्यामुळे धर्म या कल्पनेविषयी आणि संस्थेविषयी अनेकांच्या मनात घृणा उत्पन्न होते.

स्वधर्मप्रेम हे स्वदेशप्रेमाच्या आड येऊ शकत नाही. दोन्ही एकत्र नांदू शकतात. धर्मप्रेम ही वैयक्तिक जीवनाची नियमन करणारी शक्ती आहे आणि स्वदेशप्रेम हे सामुदायिक व सामाजिक जीवनाचे नियमन करणारे तत्त्व आहे. इतर धर्माविषयी जिज्ञासा, आदर व सहिष्णुता ठेवून, आपल्या धर्माचे तत्त्वज्ञान अभ्यासून, त्याला सुसंगत असे वर्तन ठेवणारा माणूस स्वधर्मप्रेमाचा आदर्श होय. तो आपल्या देशावरही प्रेम करतो. स्वधर्मप्रेम आणि स्वदेशप्रेम यांत विरोध नसल्यामुळे धर्म व देश याबद्दल तो अभिमान बाळगतो, परंतु त्याचे कोणाशी वैर नसते. तो धर्मप्रेमाची धर्मवेडात विकृती होऊ देत नाही.

अंधश्रद्धा व धर्मवेड, धर्मप्रेम व स्वदेशप्रेम या शब्दांचे व कल्पनांचे अर्थ नीट लक्षात घ्या आणि त्यांचे परस्परांशी संबंध कसे आहेत तेही पहा. म्हणजे स्वधर्मातील व परधर्मातील व्यक्तींचे मूल्यमापन करताना तुमच्याजवळ एक वस्तुनिष्ठ कसोटी राहील. यांपैकी आपण कोणत्या वर्गात बसतो त्याचाही विचार करा.

[१६-३-१९७२

६१. सात्त्विक आणि उदात्त—लिहा व वाचा

लेखक आणि कवी यांना अनादि कालापासून सर्व देशांत मान मिळत आलेला आहे. शेकडो वर्षे झाली तरी व्यास, वाल्मिकी, होमर, कालिदास, शेक्सपियर, ज्ञानेश्वर, टागोर या पुरुषांची आणि त्यांच्या लेखनकृतीची गोडी व लोकप्रियता कमी झालेली नाही. यामुळे आपणही लेखक किंवा कवी व्हावे अशी सुप्त किंवा प्रकट भावना अनेकांच्या मनात असते.

समाजाला काही सांगण्यासारखे आपल्याजवळ आहे असे उत्कटतेने वाटल्याशिवाय चांगले लेखन होत नाही. आपल्या त्या सांगण्यामुळे वाचकांच्या भावना शुद्ध व उदात्त व्हाव्यात हा लेखकाच्या मनात प्रधान हेतू असावा. ज्या वाङ्मयामुळे मानवाच्या मनाची सात्त्विक करमणूक होते आणि जीवनाविषयी मार्गदर्शक विचार मिळतात ते वाङ्मय लोकप्रिय होते व चिरकाल टिकते. केवळ पैसा व प्रसिद्धी मिळवण्याच्या हेतूने लिहिलेले लेखन उच्च दर्जाचे व टिकाऊ होऊ शकत नाही.

अलीकडे जीवनातील ओंगळ बाजू ग्राम्य भाषेत रंगवण्याची नवीन प्रथा पडत आहे. अशा वाङमयाला गिऱ्हाईक चांगले मिळते, पैसा मिळतो व प्रसिद्धीही होते. पण लोकांनी ते वाचले तरी मनाने त्याचे मूल्य ते जाणतात. उत्कृष्ट वाङमय म्हणून त्याला कोणी वाखाणणार नाही. समाजात सात्त्विक, राजस, तामस सर्व प्रकारच्या व्यक्ती असतात, स्वभाव असतात, आणि तशा कृती असतात. वास्तवता म्हणून लेखनात त्या सर्व याव्यात, पण त्यांचा अंतिम हेतू अपप्रवृत्तींचे निर्मूलन आणि सत्प्रवृत्तींचे आरोपण हा असावा. ओंगळ गोष्टींचे विकृत भाषेत प्रदर्शन करण्याने आपल्या वाचकांच्या अभिरुचीवर काय परिणाम होईल हे लेखकाने पाहिले पाहिजे. समाजाच्या भाषेला, विचारांना आणि भावनांना मी कोणते वळण देतो, कोणते द्यावे, द्यायला पाहिजे, असा विचार लेखकांनी व कवींनी सतत मनापुढे ठेवला पाहिजे.

वाचकांत सर्व प्रकार असतात. काही केवळ सात्त्विक व उदात्त वाङमय हातात धरतात. काही अश्लील वाङमयाच्या शोधात असतात. बहुसंख्य वाचक दोन्ही वाचतात, पण चांगले असेल त्याला मनाने अधिक गुण देतात.

तुम्ही वाचनाकरता जे वाङमय विकत घेता, घरात आणता, स्वतः वाचता त्याला अशी काही तरी कसोटी लावता का ? घरात आणलेले वाङमय साक्षर झालेली मुले व मुली अधाशीपणाने वाचतात. त्या वाचनाचा संस्कार त्यांच्या मनावर दीर्घकाल राहतो. त्या वाचनाने त्यांची बऱ्या-वाईट वाचनाची अभिरुची बनत जाते. त्यांच्या चारित्र्यावर परिणाम होतो.

म्हणून तुम्ही लेखक असाल तर आपल्या मनातील हेतूंचे नीट आत्म-निरीक्षण करा. वाटेल ते लिहून पैसा व प्रसिद्धी मिळवायची आहे ? का वाचकांचे विचार आणि भावना यांना शुद्ध, योग्य आणि उदात्त वळण लावायचे आहे ? ते आधी ठरवा. त्याप्रमाणे विषय निवडा व भाषेची योजना करा. तुम्ही वाचक असाल तरीही आत्मनिरीक्षण करा. माझ्या वाचनातील वाङमय शुद्ध आणि उदात्त आहे ? का केवळ चुरचुरीत, उन्मादक आणि हीन करमणूक करणारे आहे ? कसे असायला पाहिजे ते ठरवा व त्यालाच उत्तेजन द्या.

बहुजन समाजाचे जीवन, भाषा व वाङमय या नावाखाली समाजातील सर्व घाणेरड्या जीवनाचे चित्रण करण्याची प्रथा पडत चालली आहे. समाजातील वरच्या, मधल्या आणि खालच्या सर्व थरांत घाण विपुल आहे. घाण नष्ट व्हावी ही भावना निर्माण करण्यापुरतेच तिचे चित्रण असावे. घाणीकरता घाण नको. मनाची स्वच्छता व शुद्धता करण्याकरता व घाणीविषयी घृणा निर्माण करण्याकरता समाजातील आवश्यक ती वस्तुस्थिती अवश्य मांडा. ती मांडण्यात आपला हेतू काय आहे आणि वाचकांच्या मनावर आपण कोणता संस्कार करू इच्छितो

त्याचे आत्मपरीक्षण करा. बहुजनसमाजाची भाषा, त्याचे वाङ्मय आणि त्याची अभिरुची याची पातळी हळूहळू वर न्यावयाची आहे ही जाणीव होतकरू लेखकांनी व वाचकांनी सतत ठेवावी.

[१४-४-१९७२

६२. चंद्रावरचा दगड आम्ही पाहिला !

अंतराळ प्रवाशांनी चंद्रावरून आणलेले खडक आता जगप्रवास करीत आहेत. काही खडकांची वैज्ञानिक तपासणी अनेक देशांतील प्रयोगशाळांतून होत आहे. काही दगड प्रदर्शनार्थ ठेवले जात असून अनेक देशांत व शहरांत ही प्रदर्शने फिरत आहेत. अशा एका प्रदर्शनातील एक दगड आम्हीही पाहिला !

एका काचेच्या कपाटात अडीचशे-तीनशे औंसाचा हा दगड एका बैठकीवर गोल फिरत होता, त्यामुळे प्रेक्षकांना सर्व बाजूंनी त्याचे दर्शन होत होते. राखी रंगाचा, गुळगुळीत, अनघड, तळहातावर सहज घेता येण्यासारखा असा हा दगड पाहून मला मनस्वी आनंद झाला. अगदी अशाच प्रकारचे अनेक दगड मी यापूर्वी अनेक वेळा पाहिले असतील. पण चंद्रावरचा हा दगड आपण पाहात आहोत ही कल्पनाच रोमांचकारी अशी होती. या दगडात मला अनेक अर्थ दिसले.

देवपूजेमध्ये आपणही शाळिग्रामासारखे दगड ठेवतो आणि त्यांच्या ठिकाणी ईश्वरत्व कल्पून त्यांची पूजा करतो. चंद्रावरच्या या दगडातही मला निसर्गाने मानवाला दिलेल्या सामर्थ्याचे दर्शन झाले. मानवी बुद्धीचा विकास, विज्ञानाची अभूतपूर्व प्रगती, अज्ञाताविषयीची जिज्ञासा, दुर्दम्य प्रयत्न, अनंताचा वेध घेण्याची इच्छा, कल्पकता, बिनचूक कामाची योजना–अशा अनेक गुणांचे प्रतीक मला या दगडात दिसले.

प्राचीन ऋषींनी केवळ बुद्धीच्या व मनाच्या सामर्थ्याने विश्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. आज वैज्ञानिक आणि यांत्रिक प्रगती झाली आहे, तिच्या साहाय्याने विश्वाचा शोध घेणारे वैज्ञानिक आणि धाडसी प्रवासी हे आधुनिक ऋषीच आहेत. मानवाच्या ज्ञानात आणि सामर्थ्यात ते एकसारखी भर घालीत आहेत.

चंद्रावर कधी काळी मानव जाऊ शकेल ही कल्पना मला अशक्य कोटीतील वाटे. तिच्याकडे मी दुर्लक्ष करीत असे. ही माझी चूक झाली. वैज्ञानिक व यांत्रिक प्रगती आपल्या कल्पनेपलीकडे झालेली आहे. तिच्याकडे डोळसपणे पाहाण्याचा काळ आहे. भावी काळात या प्रगतीचा वेग अनेकपटीने वाढणार आहे. त्या

प्रगतीचा काल्पनिक आराखडा आपल्या डोळ्यापुढे पाहिजे. आपल्या दैनंदिन जीवनावर या प्रगतीचा प्रभाव पडणार आहे.

कित्येक हजार मैल वेगाने जाणारी वाहने अस्तित्वात आली आहेत. लक्षावधी मैलावरील वस्तूंचे दर्शन टेलीव्हिजनवर घरबसल्या करणे शक्य झाले आहे. जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत, पृथ्वीवरून चंद्रावर आणि चंद्रावरून पृथ्वीवर, मानवाचा आवाज पोहोचू शकतो. या सर्व प्रगतीचा परिणाम आपल्याही जीवनावर होत आहे.

या मानवी प्रगतीची बीजे आजच्या प्रयोगशाळेत आणि यंत्रशाळेत आहेत. प्रयोगशाळा आणि यंत्रशाळा या निर्जीव संस्था आहेत. त्यांचा उपयोग करून घेणारा नवा मानवही आज अस्तित्वात आला आहे. ज्ञानाची अखंड साधना, रात्रंदिवस कष्ट करण्याची तयारी, प्रत्येक कामात काटेकोर बिनचुकपणा, आणि मानवाच्या ज्ञानात व सुखात आपल्या पिढीने भर टाकावी ही महत्त्वाकांक्षा, या गुणांच्या जोरावर जगाची प्रगती होत आहे, होणार आहे.

या प्रगतीला आपण भारतीयांनीही हातभार लावला पाहिजे. ते करण्याला आवश्यक असणारे गुण, ज्ञान, चिकाटी आणि श्रम यांची अखंड साधना करणे आवश्यक आहे. हे एक आव्हान आहे आणि ते आपण स्वीकारले आहे. आम्हीही जगाच्या ज्ञानात आणि सुखात महत्त्वाची भर घालू.

[१५-६-१९७२

६३. सुंदर चेहेरा हवा ना ?

आपला चेहेरा सुंदर आणि आकर्षक असावा असे तुम्हाला वाटते, खरे ना ? प्रत्येकालाच तसे वाटते. लहान मुले, तरुण, वृद्ध—कोणत्याही वयाचा माणूस असो. स्त्रिया असोत किंवा पुरुष असोत. गरीब असोत वा श्रीमंत असोत. गृहस्थाश्रमी असो किंवा साधुसंन्याशी असो. सर्वांनाच वाटते की आपला चेहेरा चांगला दिसावा.

या भावनेच्या पोटी आरशाचा शोध लागला. आदिमानव आपला चेहेरा पाण्यात पाही. पाण्यात आपले प्रतिबिंब पाहून आपल्याच चेहेऱ्यावर स्वतः मोहित झाला, अशी ग्रीक पुराणात नार्सिसस्‌ची कथा आहे. त्यामुळे स्वतःच्या सौंदर्यावर खूष असण्याच्या वृत्तीस नार्सिझम् असा शब्द रूढ झाला आहे. आपल्या प्रत्येकाच्या ठिकाणी नार्सीझम असतो. आरशात किती वेळा पाहाता त्याची एकदा नोंद ठेवून पाहा म्हणजे लक्षात येईल. फोटोग्राफीचा प्रसार त्यामुळेच झाला. आपल्या खोलीत

आपलाच फोटो लावणारा मीच एकटा नाही काही, माझ्यासारखी अनेक माणसे आहेत. ग्रूप फोटो हातात पडला की प्रथम मी आपला स्वतःचा चेहेरा कसा आला आहे ते पाहातो. मग बाकीच्या व्यक्ती. माझा फोटो चांगला आला असला तर संग्रह करतो, नाही तर देतो फेकून.

चेहेरे चांगले दिसावेत या भावनेचे एक्सप्लॉईटेशन, (हा कम्यूनिस्टांचा शब्द आहे. त्याचा अर्थ द्रव्यशोषण) करणारे कारखानदार आणि व्यापारी आहेत. आपण सर्व बावळट लोक त्यांच्या खऱ्याखोट्या जाहिरातींना बळी पडतो. स्त्रियांच्या प्रसाधनाच्या जाहिराती किती मोठ्या असतात ! आणि पुरुषांच्या रेझर ब्लेडच्या व व्हॅसलिनच्याही तितक्याच मोठ्या असतात. आता हिप्पी सांप्रदायाने मात्र या शोषकांवर गदा आणली आहे. ते मुळी दाढीच करीत नाहीत आणि केसांचीही निगा घेत नाहीत. पण ही लाट लौकरच ओसरेल.

सारांश काय, सगळे जग सुंदर चेहेऱ्याच्या मागे लागले आहे. पण सुंदर चेहेरा फक्त बाह्यप्रसाधनावरच अवलंबून आहे का ? सर्व प्रकारच्या बाह्य-साधनांनी चेहेरा सजवलेला असला तरी आपल्याला काही माणसे आकर्षक वाटतात आणि काही माणसे तिरस्करणीय वाटतात; याचे कारण काय ? विचार करा.

बाह्य साधनांचा जेवढा परिणाम चेहेऱ्यावर होतो तेवढाच, किंवा त्यापेक्षा अधिक, अंतःकरणातल्या भावनांचा होतो. मनातल्या भावनांचे प्रतिबिंब चेहेऱ्यावर दिसते. मनातील दुःख, विषाद, क्रोध, चिंता, भय, अहंकार, चढेलपणा, गर्व, मवाळपणा, निराशा, दुष्टपणा या भावनांमुळे ते ते विकार मुद्रेवर प्रतिबिंबित होऊन सौंदर्याची हानी करतात. उलट अंतःकरणात आनंद, समाधान, प्रेम, दया, सहानुभूती, आत्मविश्वास, विनयशीलता, शालीनता, संयम, शांती, सेवावृत्ती, निश्चितता, निर्भयता या भावना असल्या तर त्यांचे प्रतिबिंब चेहेऱ्यावर उमटते आणि माणूस आकर्षक दिसतो.

सारांश, माणसाच्या चेहेऱ्याचे आकर्षण केवळ बाह्यसाधनांवर अवलंबून नाही. अंतःकरणातल्या भावनावर ते मुख्यतः आधारलेले आहे. बाह्य प्रसाधनांची त्याला मदत होते. भावना शुद्ध असल्या तर प्रसाधने नसली तरी माणूस आकर्षक वाटतो. थोडी प्रसाधने असली तर दुधात साखर पडल्यासारखे गोड वाटते. सात्त्विक भावनांना बाह्यसौंदर्याची जोड मिळाली तर अधिकच आनंद वाटतो. पण विकृत भावना असल्या तर कितीही प्रसाधने वापरली तरी उपयोग होत नाही. माणूस नकोसा वाटतो. बाह्य सौंदर्यही तिरस्करणीय वाटते.

अंतःकरणाच्या सौंदर्याची प्रथम जोपासना करा. त्याला साहाय्यक म्हणून

आवश्यक त्या प्रसाधनांचाही उपयोग करा. पण सुंदर, आकर्षक दिसायचा अवश्य प्रयत्न करा. त्यामुळे तुम्ही समाजात आनंदाचे वातावरण निर्माण कराल.

मानापमान नाटकात कै. कृ. प्र. खाडिलकरांनी भामिनीच्या तोंडी एक सुंदर पद घातले आहे ते असे—धैर्यधराकडे पाहून ती म्हणते,

(ठुंबरी—चाल—पानी भरेली)

पाही सदा मी । परि केवि नाथ भासे मला नवोनव ॥
स्वरूप-गर्वा करी अदय घावा । दे मज भूषण सहाया ॥
हतबल-हृदया । डाव हा मांडिला, नवोनव ॥

भामिनीजवळ नैसर्गीक सौंदर्य असतेच पण ते वाढवण्याकरता ती भूषणे घालते. आणि धैर्यधराच्या चेहेऱ्यावर पराक्रम आणि पौरुष यांचे सौंदर्य असते. त्यामुळे भामिनीचा सौंदर्याचा गर्व नष्ट होतो.

निसर्गाने ज्यांना सौंदर्य दिले नाही त्यांनाही सात्त्विक भावना आणि प्रसाधने यांचे सहाय्याने आपले सौंदर्य वाढवता येईल. आनंदी, समाधानी, हसतमुख दिसा—लोकप्रिय व्हाल.

[११-७-१९७२

६४. स्वर्ग—नरकाच्या नक्की जागा

चांगली कर्मे केली म्हणजे मनुष्य स्वर्गाला जातो आणि वाईट कृत्ये केली की तो नरकात जातो, अशी आपल्याकडे पूर्वापार कल्पना आहे. या स्वर्गाच्या आणि नरकाच्या जागा कोठे असाव्यात त्यासंबंधीही काही संकेत सर्वमान्य आहेत. स्वर्ग वर आकाशाच्या पलीकडे कोठेतरी आहे आणि नरक हा खाली पातळात असावा असे मानले जाते.

हे पत्ते आता बदलले आहेत याची नोंद घेणे आवश्यक आहे.

चांगल्या कृत्यामुळे स्वर्ग मिळतो व वाईट कर्मांमुळे नरकात जावे लागते. चांगल्या किंवा वाईट कृतीची बीजे आपल्या विचारात म्हणजे आपल्या मनातच असतात. त्या कृतींचा परिणाम जसा बाह्य जगावर होतो तसा आपल्या मनावरही होतो. मनातील प्रत्येक विचार आणि हातून होणारी एकेक कृती आपल्या मनाला उन्नतीला किंवा अधोगतीला नेणारी असते. ही क्रांती आपल्या मनांतच होत असते. म्हणून आपले मन हेच स्वर्गाचे किंवा नरकाचे स्थान आहे.

सज्जनाचे मन हाच स्वर्ग. दुर्जनाचे मन हाच नरक. हे बदललेले पत्ते लक्षात ठेवून कोठे जायचे ते ज्याचे त्याने ठरवावे.

[३१-७-१९७२



REFBK-0024795

लेखक परिचय

डॉ. गजानन श्रीपत खैर

एम्.ए. (बॉबे व कोलंबिया युनि.),
पीएच्.डी. (न्यूयॉर्क युनि.)

जन्म : १५ जून १८९८

१९२० ते १९७० पुणे विद्यार्थी गृहाचे
आजीव सेवक व प्रमुख

महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक
मुख्य अध्यापक व मार्गदर्शक

संस्थेची ५० वर्षे सेवा आणि ५० हजारांचे संचयदान करून सेवानिवृत्त

- ★ पूना, बॉबे व कर्नाटक युनि. मधील एम्. एड्. वर्गाकरिता कंपॅरेटिव्ह एज्यु. विषयाचे सन्मान्य प्राध्यापक व पीएच्. डी. करता संशोधन-मार्गदर्शक.
- ★ १९५२ ते ५८ विधान परिषदेचे सभासद.
- ★ बॉबे युनि. सेनेट, पूना युनि. कोर्ट, एस्. एस्. सी. बोर्ड, सेकंडरी एज्यु. इंटिग्रेशन कमिटी, एज्युकेशन कमिशन टास्क फोर्स, इलाखा प्राथमिक शिक्षक संघ, टीचर्स व हेडमास्टर्स फेडरेशन, रकारी टेक्स्ट बुक्स व करीक्युलम रिसर्च ब्युरो इ. मध्ये प्रामुख्याने शैक्षणिक कार्य.
- ★ अमेरिका, इंग्लंड, रशिया, जर्मनी, जपान इ. देशांत प्रवास व शिक्षण-पद्धतीचे निरीक्षण.
- ★ प्रवास, शिक्षण, गीता इ. विषयांवर व्याख्याने, लेख, ग्रंथ व संशोधन.

गीतेवरील वाङ्मय व इतर ग्रंथ :

- ▭ सर्वबोध पद्यगीता रु. ३–५० ▭ मराठी गीता व विवरण रु. ६/–
- ▭ गीतेतील मुख्य विचार रु. ६/– ▭ गी. मु. विचार-पुरवणी मराठी श्लोक रु. २/–
- ▭ मूळ गीतेचा शोध रु. १०/– ▭ गीतेचा दृष्टिकोन In Press
- ▭ त्रिकाल गीता In Press ▭ गीताविकास २ री आवृत्ती मुद्रणावस्थेत
- ▭ बालगडचा किल्ला In Press ▭ सदाचार चिंतनी भाग १ ते ५ प्रत्येकी रु. १०/–
- ▭ **Quest for The Original Gita, Rs. 32/–** (सोमैया प्रकाशन)
- ▭ जीवनात गीता रु. १२/–